
# अंकुश शिंगाडे

# अत्त दीप भव



# अत्त दीप भव

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे.  प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# अत्त दीप भव

अंकुश शिंगाडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# अत्त दीप भव

लेखक : अंकुश शिंगाडे

फ़ोन – ९३७३३५९४५०

पत्ता : अंकुश शिंगाडे १२२ बी गजानन नगर भरतवाडा कळमना मार्केट रोड नागपूर
ईमेल - geetshingade454@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन ७ मे २०२०(बुद्धपोर्णिमा)

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक-आहे .



*अंकुश रा.शिंगाडे

*जन्मतारीख: ०३/०३/१९७७

*शिक्षण: एम ए, डी एड

*प्रकाशित साहित्य:

*कवितासंग्रह*

१)स्वातंत्र्याची गाणी २)आजादी के गीत(हिन्दी) ३)अश्रूंची गाणी ४)राजवाडा

*कादंबरी*

१)वेदना २)कंस ३)संघर्ष ४)चर्मयोगी

*कथासंग्रह*

१)मजेदार कथा २)चित्तथरारक ३)फोनच्या करामती ४)हरवलेलं बालपण ५)स्मशानाची राख ६)निकाल ७)अजून किती ८)निराशा

*लेखसंग्रह*

१)माझे शिकविण्याचे प्रयोग २)गतकाळातील शास्त्रज्ञ आणि शोध ३)अस्तित्व ४)अस्तित्वाची पाऊलवाट शोधतांना

*चारोळीसंग्रह*

१)आक्रमण

*प्रवासवर्णन*

१)प्रवास २)प्रवासातील गमतीजमती

*महाराष्ट्रात वेगवेगळ्या वृत्तपत्रातून साहित्य लेखन*









# अत्त दीप भव

## मनोगत

अत्त दीप भव ही कादंबरी ई पुस्तक रुपाने वाचकांना देतांना मला अत्यंत आनंद होत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळालं असलं,देशात संविधान बनलं असलं तरी अजूनही काही गावं अशी आहेत की ज्या गावात आजही विटाळ,स्री पुरुष भेदभाव आहे. याच कारणातून आजही अत्याचार सुरु आहे. अंधश्रद्धेला खतपाणी घातले जातेय. काही लोकांच्या अंगात येण्यापासून तर देवाला नवश म्हणून बळी देण्याच्या कुप्रथा आहेत. त्याला विरोधाचं झणझणीत इंजेक्शन लागावं व उपचार व्हावा यासाठीच मी अत्त दीप भव हे पुस्तक लिहिले असून वाचकांना आवडेल असं वाटत आहे.

अत्त दीप भव नावाची ई साहित्य रुपातील ही माझी पहिलीच पुस्तक असून ती मी वाचकांसाठी उपलब्ध करुन देत असतांना मी यामध्ये माझे बंधू नासा येवतीकर व सांगळे साहेब आणि त्यांची चमू यांचं विशेष आभार मानतो की त्यांच्याच प्रयत्नातून माझी ई पुस्तक साकार होत आहे. ते फार मेहनत घेत आहेत.

एका गावात एक मुलगी ती उच्च समाजातील उच्च शिक्षण घेत असून तिचं ध्येय असतं की गावातील विटाळ,स्री अत्याचार दूर करावा. तिचं प्रेम एका कनिष्ठ जातीतील मुलासोबत आहे.तसं प्रेम करणं गुन्हा नाही.पण अजूनही जातीतीलच विवाहाची प्रथा असल्यानं बापाला

वाटतं तिचं लग्न इतर जातीत होवू नये. त्यासाठी तिला गंगारामच्या अंगात येणा-या भुताकडे पाठविण्यात येते.

पण महत्वाचं म्हणजे गंगारामच्या अंगातील देव तिच्या अंगात असलेलं भूत काढते का? खरंच तिच्या अंगात भूत येतं का? तिचं लग्न त्या कनिष्ठ जातीतील मुलासोबत होतं का? तिच्या जगण्याच्या मार्गात कोणकोणते अडथडे येतात? खरंच ती अडथळे पार करते काय? अन् शेवटी तिचं काय होतं? हे सर्व जाणून घेण्यासाठी वाचकांनी ही कादंबरी वाचायला हवी. याआधी माझी भरपूर पुस्तके प्रसिद्ध झाली असली तरी अत्त दीप भव या कादंबरीत एक प्रकारचं नाविण्य आहे. ते आपण शोधावं आणि प्रतिक्रिया प्रकाशक व लेखकांना कळवाव्यात. जेणेकरुन प्रकाशकाला नवीन पुस्तक काढायला उत्साह वाटेल व लेखकांना नवीन पुस्तक लिहिण्याची उर्मी मिळेल. कळत नकळत ज्यांनी माझ्या या पुस्तकाला मदत केली त्यांचे विशेष आभार.

धन्यवाद!

अंकुश शिंगाडे, नागपूर ९३७३३५९४५०

# अत्त दीप भव

# अत्त दीप भव

तो जातीयवादाच्या भिंती तोडत होता. कदाचित त्याला वाटत होते की तो तसं करु शकणार नाही. त्याचबरोबर त्याला आपल्या अस्तीत्वीचाही प्रश्न होता. हे अस्तित्व टिकेल की नाही असं त्याला वाटत होतं.

जेव्हा जातीभेदाबद्दल बोललं जातं, तेव्हा लोकं मारपीट करतात. प्रसंगी खूनही करतात हे त्याला माहीत असल्यानं त्याला पडलेला अस्तीत्वीचा प्रश्न साहजिकच होता. त्याची अवस्था पिरगळलेल्या पानागत झाली होती. आजही गावात विटाळ चरणसीमेवर पोहोचला होता. चटके खाताना मात्र त्याच्या कित्येक पिढ्या धराशायी झाल्या होत्या. गावात कधीच त्यांच्या स्वातंत्र्याचा सुर्य उगवला होता.

कित्येक उन्हाळे पावसाळे त्याच्या आयुष्यात आले होते. कित्येक पिढ्यांनी त्याच्या बिरादरीत जन्म घेतला असला तरी आपल्यावर होणारा अन्याय दूर करावा हे शहाणपण कधी कोणाला सुचलंच नव्हतं.. कारण मनुचा पगडा जबरदस्त होता.

ज्याप्रमाणे विटाळ गावात ठाण मांडून बसला होता. त्याप्रमाणे त्यांची भाषा. त्यांची भाषा गावराणी होती. पण ती त्यांची आपली भाषा होती. मातृभाषा होती. त्या भाषेवर त्यांचे प्रेम होते. ह्या सर्व गोष्टी त्याला स्वस्थ बसू देत नव्हत्या. माणुसकी शिकवीत होत्या.

गावात सुसंपन्नता होती. वैर नव्हतं मुळी. लोकं प्रेमानं वागत. वार्तांविलाप करीत नसत. तसेच सुखानं आपला दिवस काटत असत. मात्र सर्व गोष्टी दुरून होत्या. कारण विटाळ हा तेवढाच प्रखर होता. जणू स्पर्शाचा कोणताच प्रश्न उठू नये असे त्यांना वाटत होते.

गावाच्या मधोमध स्पृश्य मंडळी राहात होती. तसेच गावाच्या बाहेर अस्पृश्य माणसे राहात होती. कदाचित आपण केलेल्या पापाची शिक्षा असे समजून दिवस कंठत होती. त्यांचाही समाज होता. चांभार जिथं राहात, त्याला चांभारवाडा म्हणत. महाराचा महारवाडा, मांगाचा मांगवाडा अशी जातीवरुन नावं. तसेच त्यांच्या विहिरीही..... त्यांच्या त्या बिरादरीत स्वतंत्र्य विहिरीही होत्या. या विहिरीचे पाणी मात्र खारट होते.

गावाच्या बाहेरच एक तलाव होता. या तलावातील पाणी पिण्यासाठी सर्व लोक वापरत असत. पण अस्पृश्यांना या तलावाला हात लावायला गावकऱ्यांची मनाई होती. जर हे पाणी कोणी प्यायलाच तर त्याला पंचासमोर दंड होत असे वा शिक्षाही होत असे. त्यामुळं ते पाणी पिणं दुरच, त्या पाण्याकडं ढुंकूनही पाहायची सवय अस्पृश्यांत नव्हती. एरवी कोणताही अस्पृश्य माणूस त्या तलावाकडे जात नसे. एवढं ते पाणीही त्यांच्यासाठी विषयुक्त बनलं होतं.

गावात एका बाजूला शेतीही होती. तर बाकी भाग डोंगरानं वेढलेला होता. त्या डोंगराच्या खोबणीत होतं ते गाव. शेतीवर मालकी चार दोन लोकांचीच होती. ज्याच्यीकडं शेती त्यांचं पोट भरत असे. बाकी लोकं मात्र उपासतापासात आपले जीवन जगत असत.

पाऊस फक्त चार महिने पडायचा. चार महिण्याच्या या पावसाळ्यात घाटमाथ्यावर ओसांडणारे पाणी अडवून संबंधित गावाच्या पाण्याचा प्रश्न सुटावा म्हणून म्हणून कोणा महाराजाने ते तळे बांधले होते. घाटमाथ्यावरुन ओसांडणारे पाणी हे लोकं या तळ्यात साठवून ठेवत.

तळ्याचं पाणी स्वच्छ होतं. जणू पाण्यात आपली छबी पाहून घ्यावी. त्या पाण्यात चेहरा पाहून केसं विंचरावे असं ते पाणी, त्या पाण्यात कोणी अंघोळही करीत.

कोणी कोणी गुरंढोरंही या तळ्यात पाणी प्यायला आणत असत. गावातील शेळ्या, मेंढ्या, गाई, म्हशीही हे पाणी पिवून तृप्त होत. एवढंच नाही तर कधीकधी हिंस्र श्वापदाला ही पाणी प्यायला तळं मोकळं असायचं. कधीकधी ते माणसावरही हल्ले करीत. पण त्याला वनविभाग काहीही करीत नव्हता.

गावाला लागूनच डोंगराळ भाग होता. तिथं झाडं भरपूर होती. जणू जंगलच. या जंगलात भरपूर वनसंपत्ती मिळायची. त्यामुळं गावात शेती कमी असल्यानं या गावची काही मंडळी या वनातील डींक, फळं मोह व इतर पदार्थ खावून तसेच विकून येणाऱ्या पैशावर उदरनिर्वाह करीत असत. तसं पाहिल्यास गाव स्वयंपुर्ण होतं.

एखाद्या व्यक्तीच्या घरी उपासाचा फटका पडत असेल तर तो अस्पृश्य का असेना तो व त्याची मुले जगली पाहिजे म्हणून गावातील लोकं धान्य देवून मदत करीत. एकमेकांचे पोटं जगवीत असत. कोणीही उपाशी पोटी मरु नये अशी त्यांची भावना होती.

गावात मनूचा जरी पगडा असला तरी माणूसकी थोडी शिल्लक होती. गावात राजकारण नव्हतं. सगळे गुण्यागोविंदाने राहात असत. तसं पाहता गावातील प्रत्येक माणूस एक दुसऱ्यावर प्रेम करीत होता.

गावात चारही बाजूंना असलेले चांभार, मांग, महार, गारुडी ही मंडळी गावाचं रक्षण करीत असे. जंगली श्वापद गावात शिरु नये म्हणून ही मंडळी विशेष काळजी घेत असे. रात्रीच्या वेळी हे जंगली श्वापद गावात शिरलंच तर प्रथम ते या अस्पृश्य लोकांवर हमला करीत. गावाच्या मध्यभागी शिरण्याची त्यांची हिंमत नव्हती. ही अस्पृश्य माणसे या जंगली प्राण्यांचे आक्रमण परतावून लावण्यासाठी भाले तलवारी पाजवून ठेवत. ऐनवेळी हमला झालाच तर आपला स्वतःचा जीव तर वाचवता येईल. असाच त्यांचा उद्देश होता.

चप्पल शिवता शिवता कित्येक चांभारांच्या पिढ्या गेल्या होत्या. चप्पलचे योग्य दाम मिळत असल्यानं चांभार जात त्यावेळी सुसंपन्न होती. पण त्यांचाही विटाळ मानण्यात येत असे.

त्यांच्या घरी कधीच पाणी पिण्याची इच्छा होत नसे. याचं कारण ही तसंच होतं. ही चांभार मंडळी कुंड्यांमध्ये चामडं सडायला टाकत. त्या चामड्याचा डुकार वास येत असे. तो वास नाकात शिरताच उलटी होण्याची संभावना नाकारता येत नव्हती. यामुळे की काय चांभारवाड्यात कोणी जात नसत. तसेच पकवलेले चामडेही अंगणातच दोरीवर टाकलेले असायचे. त्याचाही वास यायचाच. एखाद्या वेळी या चांभारवाड्यात जायचा प्रसंग आलाच तर नाकाला स्पष्ट सांगून जावं लागायचं.

चांभारवाड्यात विश्वकोटीची संपन्नता. पण दारिद्र्यातच राहात होती ती माणसं. त्यांची मुलेही उघडी नागडी राहायची. चांभारकीचे काम करता करता आणि गावातील लोकांसाठी मोटा, चपला बनविता बनविता त्यांना वेळच मिळायचा नाही. त्यांच्या घरची मंडळी देखील आपल्या घरच्यांच्या कामात मदत करीत. ते कधी वार्त्याही बनवीत होते. त्यामुळं त्यांचं स्वतःच्या लेकरांकडेही दुर्लक्ष होत होतं. त्यामुळं त्यांची लेकरं शेंबडानं माखलेली असायची. अंगावर मैलाचा थर असायचा. तसं पाहिल्यास चांभाराच्या लहान लहान पोरास कपडे मिळायचेच नाहीत. तशी ही गत महार, मांगाचीही होती.

जंगलातून सिंदोळ्या आणून मांग मंडळी त्याच्यापासून झाडू बनवत. कानटोप्या व बैठकीच्या चटयाही बनवत. एवढंच नाही तर बांबूपासून टोपल्या, परडे बनवत. ते गावाची गरज पुर्ण करीत. याचीही मुलं नागडी राहात.

महारांना काम नव्हतं. पण त्यांनाही मनुवादी जबरदस्तीनं नीच कामाला लावत. नाही केल्यास त्यांना शिक्षा वा दंड होत. पण हे लोक स्वाभिमानी होते. मात्र कांबरकी मागण्यासाठी ह्या अस्पृश्यातील सर्वच मंडळी सणासुदीला गावात जात व कांबरकी मागून आणत असत. कांबरकी म्हणजे ओल्या व सुक्या अन्नाची भिक्षा असे. यात कोणीकोणी लोकं भिक्षा म्हणून चांगलं अन्न देत, तर कोणी खराबही देत असत. यातून कधीकधी या अस्पृश्यांना महाभयंकर आजार होत.

सण म्हणजे काय हे येथील लोकांना चांगलं समजायचं पण घरची परीस्थिती बेताची राहात असल्यानं ते सणासुदीला सण काढत नसत. त्यांच्या वर्तनावरुन ते सणच काढत नसावे असं वाटायचं. त्यामुळं कुत्रही खाणार नाही असं अन्न भिक्षा पात्रात यायचं. तरीही ते अन्न खराब असलं तरी तो आवडीने खायचे. कधीकधी ते अन्न वाळवायचे आणि उकळून महिनोंमहिने खात असायचे. जे जे गुरं ओढत ते ते पाईन मागत. पाईन अर्थात मिळकतीचा पाव भाग. कारण तेवढी मेहनत ते करीत असत.

गावात शेती असल्यानं गुरं पाळणंही भरपूर होतं. गावातील मंडळी ही गुरं जवळच्या टेकडीवरील जंगलात न्यायचे. औषधी नसल्यानं, त्यामुळं गुरं मरण्याचे प्रमाण जास्त होते. त्यामुळं गुरं ओढावी लागत. महार जातीची मंडळी गुरं ओढत नसली तरी चांभारानं काढलेल्या चामड्यानंतर पडलेल्या प्रेतातले मांस काढून ते वाळवत असत. याला खांडऱ्या वाळवणे म्हणत.

असं ते गाव शिवारगड म्हणून प्रसिद्ध होतं. गावात एक मंदिरही होतं. तसंच टेकडीवर एक देवीचं मंदिर होतं. दरवर्षी या टेकडीवर देवीच्या मंदिरात उत्सव होत असे, तेव्हा हिच देवीची पुजा करणारी मंडळी गावात जोगवा मागत. त्यांना भक्त म्हणत. तर जोगवा म्हणजे त्यांची भिक्षा असे. ही टेकडीवरची देवी भक्तांना प्रसन्न होते अशी आख्यायिका सांगितली जात असे. याच गावात एक निर्णय नावाचा माणूस राहात होता.

निर्णय भाविक होता. गावातल्या मंदिरात नित्य पुजाविधी करण्यात येत असे. गावातील नितीनियम ठरविण्याचा, गावात उत्सव भरविण्याचा कार्यक्रम तोच करीत असे. तो त्याचा स्वतंत्र निर्णय असे. यावरुनच कदाचित त्याचं नाव निर्णय पडलं असावं. निर्णय हा भाविक तर होता. पण मनुवादीही होता. त्यामुळं तर या गावातील संपुर्ण जाती त्याला फटकून वागत असत. त्याने काढलेला शब्द म्हणजे काळ्या दगडावरची रेघच असायची.

मनुस्मृती फारच वाईट होती. त्यात स्रियांबद्दलही अतिशय वाईट गोष्टी लिहिल्या होत्या. स्रियांनी लहानपणी बापाच्या आज्ञेत, मोठेपणी पतीच्या आज्ञेत, तर म्हातारपणी पुत्राच्या आज्ञेत वागावे असा कडक नियम मनुस्मृतीत होता. स्रीने स्वतंत्र्यता स्विकारु नये. तसेच पती कितीही वाईट असला तरी त्याची देवाप्रमाणे सेवा करावी. तसेच अस्पृश्य स्रिया जर सुंदर असेल तर विटाळ होत असूनही त्या पत्नी म्हणून अस्पृश्येतर जातींना चालतात. हे मनुस्मृतीत लिहिले होते. आजही समाज हा मनुस्मृती विचारानं चालत होता.

याच गावात निर्दोष नावाचा एक गृहस्थ राहात होता. ही मात्र चांभार जातीचा होता. त्याला जात पात म्हणजे अस्पृश्य जातीला लागलेला कलंक आहे असं वाटत होतं. तसा तो अस्पृश्यतेच्या विरोधात होता. कारण त्याला अस्पृश्येतर समाजानं अस्पृश्य म्हणून लहानपणापासून छळलं होतं. त्याला महारांचा स्वाभिमान आवडत होता.

आज भारत स्वतंत्र झाला होता. संविधान ही लिहिलं होतं. गावच्या गावं सुधारली होती. पण डोंगर कपाटीत वसलेलं हो गाव, अजून पण सुधारण्याची चिन्ह दिसत नव्हती. कदाचित या गावाला डॉक्टर बाबासाहेबांनी केलेल्या गोष्टी आवडत नसतील. किंवा त्यांना सुधारणा हवी नसेल. कारण आजही ते गाव विटाळाच्या काळोखातच गुरफटलं होतं. तसेच इतर जातीही विटाळातून बाहेर पडण्याचा विचार करीत नव्हते.

निर्दोषला मात्र आश्चर्य वाटायचं या सर्वच जातीबद्दल की या जाती सुधारत का नसाव्यात. तो गावातील तरुणांना विटाळ दूर करण्याच्या गोष्टी सांगायचा. पण कोणीही या निर्दोषच्या बोलण्याकडे लक्ष द्यायचे नाही. याचं कारणही तसंच होतं. पण गावात विटाळ जरी असला तरी गावातील मंडळी गावात एखाद्या घरी विवाह असलाच तर ते धान्य, भाजीपाला पुरवीत असत. मग ते अस्पृश्य का असेना. मात्र गावची माणसं, गावातल्या माणसाची नामुष्की होवू देत नसत. त्यामुळं की काय, प्रत्येक अस्पृश्य माणसांचं प्रेम स्पृश्यांवर होते.

गाव तसं फार शांत होतं. गावात कुणाशी कोणताच कलह नव्हता. प्रत्येक माणूस कामात व्यस्त राहायचा. कोणात कुरघोडी नाही वा कुरघोडीचं राजकारण नाही. सगळं कसं शांत चाललं होतं.

गावात ज्याप्रमाणे अस्पृश्य मंडळी राहात होती. त्याचप्रमाणे ब्राम्हणही बहुसंख्येने राहात होते. मात्र ते स्वतः ब्राम्हणासारखे वागत नसून गावातील एक सामान्य नागरीक म्हणून वावरत असत. कोणीही कोणाच्या मानसिकतेला धक्का पोहोचू नये असं सर्वांचं सांगणं जरी असलं तरी त्यांच्या विटाळासारखं वागण्यानं मानसिकतेला धक्का पोहोचतच असे. तरीही उगाच वाद नको असा विचार करुन अस्पृश्यही मंडळी गावातल्या नियमाप्रमाणे वागत असे.

गावात जे तळं होतं. त्यावर पाणी भरण्याचा अधिकार उच्चवर्णियांचा होता. ह्या विहिरीचे पाणी पिण्यालायक जरी नसले तरी आता गावात त्या वस्त्यांना तेच पाणी पिण्याची सवय होती. तसा तर विटाळ पोटजातीतही होता.

गावातीलच जातीची निष्ठावान माणसे इतर जातीच्या घरी जेवत नसत. वा बेटीचा व्यवहारही करीत नसत. एकंदरीत सांगायचं झाल्यास देशात सुधारणा झाली असली तरी गावात सुधारणा झाली नव्हती. त्यांना विटाळ मान्यच होता. हे एकंदर त्यांच्या वर्तनावरुन दिसत असे.

निर्दोष सर्वसामान्य परीवारातील मुलगा. जातीनं चांभार असलेला. शहरात राहून नातेवाईकाकडं दोन चार वर्ग शिकलेला. सुधारणावादी गोष्टी त्याला समजत होत्या. पण त्याचेही बालपण याच गावात खस्ता खात गेले होते.

आपल्या घरात पूर्वीपासून चालत आलेला व्यवसाय. तोही चांभारकीचा. आज त्याला आवडत नव्हता. शहरातच राहिल्यानं आज घरातला उग्र वास त्याला स्वस्थ बसू देत नसे. पण उपाय नव्हता. कारण त्याला गावाकडं तर यावंच लागायचं. वडील होते ना तिथं.

चवदार तळ्याचा जेव्हा सत्याग्रह झाला होता. त्या चवदार तळ्याच्या आंदोलनात निर्दोष सहभागी झाला नसला तरी त्याने त्या बातम्या आज वर्तमानपत्रात वाचल्या होत्या. त्याने याच वर्तमानपत्रातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना जवळून अभ्यासले होते. त्या आंदोलनातील जोशही अभ्यासला होता. शिवाय बाबासाहेबांच्या प्रेरणा देणाऱ्या गोष्टी ही अभ्यासल्या होत्या. तो त्या गोष्टीनं भारावून गेला होता.

निर्दोषच्या चवदार तळ्याचे आंदोलन आज स्मृतीदिनी वर्तमानपत्रातून अभ्यासतांना त्याच्या मनात काही प्रश्न

प्रश्न उठले होते. आपलाही गाव विटाळापासून मुक्त व्हावा असं त्याला वाटत होतं. पण तरीही त्याच्याजवळ उपाय नव्हता.

दि.. २५/१२/१९२७ ला मनुस्मृती जाळली होती. हा सगळा सारीपाट निर्दोषच्या मनात उमटला होता. त्यामुळं त्यालाही आपल्या गावात तसंच आंदोलन व्हावं असं वाटत होतं. म्हणून तो धडपडत होता. आपल्या समाजबांधवांनीही अशीच धडपड करावी असं त्याला वाटत होतं. हे समाजबांधव एकत्र यावे व त्यांनी एकत्रितपणे या विटाळाचा धिक्कार करावा असं त्याला वाटत होतं.

चांभारवाड्यात घरंही काहीशी मोठी नव्हती. गवताच्या पेंढीनं सावरलेलं छत आकाश नावाच्या राक्षसापासून वाचविण्यासाठी तसेच थंडी, ऊन, वारा पाऊस या पिशाचीनीपासून बचाव करण्यासाठी उभारलं होतं. आजुबाजूला गवताच्या पेंढ्यांचंच कुड होतं. मात्र वरुन असलेलं गवत हे उतरत्या स्वरुपाचं असल्यानं पाऊस त्यावरुन झरकन सरकत असे. आतमध्ये जरासाही थेंब टपकत नव्हता.

गावातून एक नालाही वाहात होता. हा नाला नागमोडी वळणे घेत गावाला वळसा मारुन गेला होता. पाऊस आल्यास हा नाला सापागत फुसफुस करीत वाहात असे. कधीकधी जास्त पाऊस आल्यानं कवेत पाणी न सामावल्यानं हा नाला ते पाणी बाहेर फेकून देत असे. याला पूर म्हणत. नाल्याचा वळसा गावाला असल्यानं संपुर्ण पाणी गावात पसरत असे. सगळ्या गावात पाणीच पाणी तसेच गावकऱ्यांची मालमत्ता पाण्याखाली नासधूस होत होती.

पूर येण्याचे संकेत दिसताच काही गावातील लोक संभ्रमात असत. त्यांना वाटत असे की या गावाला वळसा देणाऱ्या नाल्याच्यी आत राहायचे नाही. पण पूर ओसरताच ती भावना व तो विचार बंद होत होता. त्याचं कारण म्हणजे गावात एकमेकांशी स्नेहसंबंध जुळलेले असत. जरी विटाळ असला तरी गावातील स्पृश्यांनी केलेली मदत या अस्पृश्यांना उपकारच वाटत होती.

गावात एक मंदिरही होतं. या मंदिरातील देव दगडाचा होता. हे मंदिर गावात उंचावर होते. कोणीतरी गाव वसण्यापुर्वी कोणीतरी हे मंदिर बांधलेले असावे असे एकंदर सांगण्यावरुन वाटत असे. गाव केव्हा वसलं, केव्हा नाही हे कोणालाच माहित नव्हते. पण एक गोष्ट नित्यानं सांगितली जात असे. कोणीतरी एक माणुस दिवा हातात घेवून आला. तो दिवा ज्या ठिकाणी विझला. तेथे त्याने अधिवास तयार केला. दिवा विझणे हे त्या गावासाठी अपशकुन असले तरी त्याला शकुनाचे रुप देवून गावची मंडळी राहात होती.

नाल्याच्या पुराने जीवीत व वित्तहानी ही होत होती. गावातून पालतू जनावरे, शेळ्या, मेंढ्या, गाई, म्हशी तसेच कुत्रेही वाहून जात. तसंच काही ठिकाणी सामानंही वाहून जात असे. पुराचा ओघ पाहता गावात वर्षाचे चार महिने तर ओलाव्यातच काढावे लागायचे. आता मात्र उच्चवर्णियांकडे सीमेंटची फ्लोरींग होती. पण अस्पृश्यांच्या घरी शेणामातीचं लिंपण असल्यानं त्यांची जागा पावसाळ्यात चार महिने वाळतच नव्हती. तरीपण अस्पृश्य मंडळी गाव मात्र सोडत नव्हते. कारण त्यांचे ऋणानुबंध जुळलेले होते.

हिवाळ्यातही प्रचंड गारठा असायचा. अस्पृश्यांचं झोपडं. त्यामुळं या थंडीच्याही दिवसात त्यांना फार त्रास व्हायचा. तर उन्हाळ्यात मात्र डासांचा त्रास असायचा.

भरपूर पाऊस, बेताची थंडी, कडक उन्हाळा...... यामुळे गाव होळपळून निघायचं. अशा या गावात मानापमानाच्या गोष्टी. त्यामुळं निर्दोषचं मन होळपळून निघायचं. पूर जेव्हा जेव्हा येत असे, तेव्हा तेव्हा तो त्या मंदिराच्या पायरीपर्यंत चढत असे. त्यामुळं देवाचा खरंच इथं चमत्कार आहे असं गावकऱ्यांना वाटत होतं. कारण मंदिरातील मुर्ती कधीच बुडली असं गावकऱ्यांना वाटत होतं.

गावाच्या काही किमी अंतरावर एक गाव होतं. हे गाव मोठं होतं. या गावात व्यापारपेठंही होती. आपल्या गावातून निघणारा माल ही मंडळी त्या गावात विकत. कधीकधी पूर जास्त वाढल्याने हे लोकं त्या गावच्या मंदिरात आपले बस्तान बसवत.

गावातील नाल्याचे पाणी वर्षभर टिकत नव्हते. पूर ओसरल्यावर काही दिवसच नाल्याला पाणी राहायचे. पण पूर ओसरताच नाला पुर्ण सुकून जात असे. तसंच मुरमाची जमीन असल्यानं पिकही व्यवस्थित होत नव्हते.

कोमल याच गावात राहणारी उच्च वर्णियांची मुलगी होती. तिचे निळे घारे डोळे व कोमल चेहरा कोणालाही मोहून टाकत असे. तशी ती दिसायला सुंदर होती. तिचे लांब लांब वेणी व ते काळेभोर केस तिच्याा सौंदर्याची चुणूक दाखवत असे. तसंच आता वयात आल्यावर तिचं सौंदर्य अजून खुललं होतं. तिच्या चेहऱ्यावर चमक आली होती. लहानपणी लठ्ठ असलेली कोमल आता सुडौल झाल्यानं तिच्या लावण्यात फार फरक जाणवत होता.

गावात एक शाळा देखील होती. ती शाळा पहिली ते चौथी पर्यंत होती. या शाळेतही भेदभावच होता. अस्पृश्यांची मुलं वर्गात एका बाजूला व उच्चवर्णियांची मुलं एका बाजूला बसत असत. खेळतानीही उच्च वर्णिय मुलं या अस्पृश्य मुलांना आपल्यात मिसळू देत नसत.

मास्तरांचा धार होता. हे गावचे लोक मास्तरांना घाबरत. तो दोन चार वर्ग अधिक शिकल्यानं त्याला कायद्याची भाषा निश्चीतच समजत असेल असं गावकऱ्यांना वाटत होतं. त्यामुळं ते लोक गप्प असायचे.

काही काही उच्चवर्णिय लोकांनाही हा विटाळ आवडायचा नाही कारण अस्पृश्य देखील माणसेच असे ते मानायचे.. त्यांनाही हाड, मांस, रक्त आहे. तेही सारखंच. त्यांचंही रक्त लालच. निळं नाही.. पण एक मनात भीती होती की जर त्या अस्पृश्यांना पाठीशी धरलं तर उद्या आपल्यालाच ही उच्चवर्णिय मंडळी वाळीत टाकतील. विटाळधर्म पाळतील व आपल्याशी व्यवहार करणार नाहीत.. त्यामुळं फुकटच आपल्याला अस्पृश्यांसारखा त्रास. त्यापेक्षा अस्पृश्यांना पाठीशी न धरलेलं बरं असा विचार करुन ते जगत होते.

गावात एक रंगराव नावाचा माणूस राहात होता. उच्चवर्णिय समाजाचा होता तो. पण त्यानं असा विटाळधर्म न पाळल्यानं त्याला उच्चवर्णियांनी वाळीत टाकलं होतं. तसेच त्याच्याशी जो कोणी संबंध ठेवेल त्याला गावातूनच निष्काषित करु असा दमही भरला होता. त्यामुळं अस्पृश्यासह अस्पृश्येतर माणसेही त्याच्याशी बोलत नव्हती. ही त्याची गत पाहून गावातील प्रत्येकजण विटाळ पाळत होता नव्हे तर अस्पृश्य ही विटाळाचे भोग भोगायला तयार होते

कोमल व निर्दोष लहानपणापासूच या गावात शिकले होते. वर्गात जरी वेगवेगळे बसावे लागत असले तरी दरम्यानच्या सुटीत ते एकमेकांशी बोलत असत. एकत्र खेळतही असत. असे खेळ खेळतांना त्यांना कधीच भेदभाव वाटला नाही. निरागस वयात विटाळ म्हणजे काय असतं, ते त्यांना समजत नव्हतं.

कोमलच्या वडीलाच्या घरी शेती होती. कधीकधी या शेतावर अस्पृश्य माणसेही मोलमजूरी करायला येत. त्यामुळं जेव्हा सुटीच्या दिवशी कोमल शेतावर जात असे. तेव्हा या मजूरांशी बोलत असतांना आई चक्क म्हणायची,

"कोमल, जरा बाजूला हो. चटका बसेल. विटाळ होईल. अंघोळ करावी लागेल."

कोमलला अंघोळ करावी लागेल हे समजत होतं. पण अस्पृश्य आणि विटाळ हे शब्द तिला समजण्यापलिकडचे होते. अंघोळीवरुन मात्र एक समजलं होतं की चांभार, मांग, महार, खाटीक या जातींना हात लावताच विटाळ होतो. पण ह्या जातीच विटाळाच्या कशा? हे मात्र अजून उमगलं नव्हतं. त्यामुळं आपल्याला न समजल्यानं आपल्या बाळबोध स्वभावानं ती आईला प्रश्न करायची,

"आई, विटाळ म्हणजे काय गं? ह्या जाती विटाळल्या कशा? ह्यांनी काय केलं? "

त्यावर आई म्हणत असे,

"बेटा, त्यांच्या पुर्वजांनी घोर पाप केलं. त्याची शिक्षा म्हणून आपण विटाळ पाळतो आहोत."

"पण आई, त्यांनी पाप कोणतं केलं? "

या प्रश्नावर आई गप्प होत असे. पुन्हा पुन्हा विचारताच आई तिला"गप्प बस, गप्प बस. अशा म्हणून गप्प करीत असे. मात्र कोमलच्या मनपटलावर त्याचा परीणाम होत होता. हा विटाळ म्हणजे काय? हे शोधायचे तिने लहानपणीच ठरवले होते. तसेच हा विटाळ मोडायचा जणू तिनं निर्धार लहानपणीच केला होता.

विटाळधर्म....... विटाळाचा चटका तिनं जरी अनुभवला नसला तरी आई अशी का बोलते याचं आश्चर्य तिला नेहमी वाटायचं. यातूनच हा विटाळ मोडायचा प्रयत्न तिचा होता. नकळत ती शेतावर जेव्हा जायची. तेव्हा आईची नजर चुकवून ती या दलित लोकांच्या सोबत सोबत राहायची. नाना तऱ्हेचे प्रश्न विचारत राहायची. एकदा ती आईला म्हणाली,

"आई, असे पापाचे भोग त्या अस्पृश्यांनाच का? अन् त्यांनी पाप तरी कोणतं केलं? "

"अगं त्यांनी मागच्या जन्मात पाप केलं."

"आई, मागचा जन्म तरी कोणं पाहिला? "

"अगं, आपलं शास्त्र सांगते."

"शास्त्र........ कोणं लिहिलं शास्त्र? त्या उच्च बिरादरीतील लोकांनी लिहिलं शास्त्र. ते शास्त्र...... ते शास्त्र ज्यांनी लिहिलं, त्यांनी या बिरादरीवर थोपवलं. माहित आहे तुले आई, आपल्या स्त्रीजातीईषयीबी त्याईनं जहरच लिवून ठेवलं."

"म्हणजे? "

"मी तुले सांगते, आईक त्या मनुस्मृती बद्दल."

कोमलनं बालवयातच मनुस्मृती वाचली होती. त्या मनुस्मृतीतील सुक्ते व कवने वाचली होती. त्यात स्त्रियांबद्दल ज्या काही गोष्टी लिहिल्या होत्या. त्या तिला फार घातक वाटल्या होत्या. अशाच काही गोष्टी अस्पृश्यांबद्लही होत्या. तशी ती त्या स्त्रियांची कवने सांगू लागली आपल्या आईला.

"नारी एक पुत्र माता कन्या जरी असेल तरी ती स्वतंत्र राहायला नको(अध्याय९श्लोक २ ते ६), पती पत्नीचा केव्हाही त्याग करु शकतो. कारण तिला कोणत्याही प्रकारचा अधिकार नाही. कोणत्याही स्थितीत विवाहानंतर पत्नी सदैव पत्नीच राहात असते. म्हणजे तिच्यावर पुरुषांना/पतीने कधीही अत्याचार करण्याची मोकळीक. (अध्याय ९श्लोक ४५)

स्त्रीला संपत्ती ठेवण्याचा अधिकार नाही. शुद्रांच्या स्त्रिया सुद्धा दास आहेत. स्त्रीने कितीही मिळकत कमविली तरी तिचा पती किंवा पुत्र किंवा पिता तिच्या संपत्तीचा मालक असतो. (अध्याय ९श्लोक ४१६)ढोर, गवार शुद्र आणि नारी हे सर्व ताडन करण्यायोग्य आहेत. म्हणजे स्त्रियांना ढोरासारखे मारता येवू शकते. (अध्याय ८श्लोक २९९)असत्य ज्याप्रमाणे पवित्र नसते. त्याप्रमाणे स्त्रिया सुद्धा पवित्र नाहीत. शिकायचा, शिकवायचा, वेद मंत्र म्हणायचा, उपनयन करण्याचा अधिकार स्त्रियांना नाही. (अध्याय २श्लोक ६६, अध्याय ९श्लोक १८)स्त्रिया

या नरकातच जाणाऱ्या असल्यामुळे त्यांना यज्ञकार्य किंवा अग्निहोत्र सुद्धा करण्याचा अधिकार नाही. (अध्याय ११श्लोक३६, ३७)यज्ञ कार्य करणाऱ्या किंवा वेदमंत्र बोलणाऱ्या या स्रियांच्या हातचे भोजन ब्राम्हणांनी वज्र मानावे. स्रियांच्या हातचे सर्व कार्य वज्र मानावे. ते कार्य अशुभ असल्यानं ते देवांना स्विकार नाही. (अध्याय ४श्लोक २०५, २०६)स्री पुरुषांना मोहीत करणारी असते. (अध्याय २श्लोक २१४)स्री पुरुषांना दास बनवून पदभ्रष्ट करणारी असते. (अध्याय २श्लोक २१४)स्री एकांताचा दुरुपयोग करणारी असते. (अध्याय २श्लोक २१५)स्री संभोगप्रिय असते. त्यासाठी ती वय किंवा कुरुपता बघत नसते. (अध्याय२श्लोक ११४)स्री चंचल, हृदयहिन, पतीशी एकनिष्ठ राहणारी नसते. (अध्याय २श्लोक ११५)स्री केवळ शैया, आभुषण आणि वस्र यावर प्रेम करणारी, वासनायुक्त, बेईमान, ईर्षाखोर, दुराचारी असते. (अध्याय ९श्लोक १७)सुखी संसारासाठी मनू सांगतो की स्रियांनी जीवनभर पतीच्या आज्ञेचे पालन करावे. (अध्याय ५श्लोक ११५)पती जरी दुराचारी असेल तरी तो इतर स्रियांवर आसक्त असतो. दुर्गुणांचे भांडार असो, नपुंसक असो, कसाही असला तरी स्त्रीने पतीव्रता होवून देवासारखी त्याची पुजा करायला पाहिजे. (अध्याय ५श्लोक १५४)

आतं मले सांग आई, माणसानं खरंच माणसाले माणूस मानावं की नाय. पती हा वाईट असला तरी का त्याची पुजा करावी. तो दारु पेवून रोज रोज पत्नीले मारत बी असन तरी त्या पतीची सेवा करावी. हे कितपत न्यायाचं हाये आई. मनुस्मृतीत म्हणलं हाये का नारी सर्व ताडन करण्यायोग्य आहे. हो बराबर हाये का? अगं आपुन जरी उच्च जातीतले असलो तरी या समाजानं हे नियम योग्य नसतानाही आजही राबवावेत हे बराबर तरी हाये का? अन् वरुन सांगतेत हे कायदे का पतीची आज्ञा स्त्रीनं मोडलीच तं स्री नरकातच जाईन. आई, तुनं तरी पाह्यला का स्वर्ग आन् नरकं. अन् तुनं तरी पाह्यला का मांगचा जन्म. मंग नाय पाह्यला मागचा जन्म तं आपुन का बरं कायदे पाळावा त्याईचे. स्री पुरुषाले दास बनवते.. स्री पुरुषाले मोहित करते.. असं सांगणारा हा ग्रंथ. मंग मले सांग आई, आजपर्यंत कितीक पुरुषाईले स्रियांना दास बनवलं? अन् कितीक जणाले मोहित केलं? अन् त्याईनं तरी कायले मोहित व्हावं.

स्री संभोगप्रिय असते असं सांगणारा ग्रंथ. वय, कुरुपता पाह्यल्या जात नाय. असं मानणारा समाज आज स्रियांना उपभोग्य वस्तू समजून चार वर्षाच्या बालिकाही आज नराधमांना कमी पडतात. आजही स्री इच्छा नसतांनाबी बलत्काराच्या शिकार होतात. शिक्षा एवढ्या तेवढ्याच. पहिलं बी बालविवाह व्हायचे. वयात येण्यापुर्वीच त्या बालिकाशी विवाह होत होते. अगं अगदी बालवयातच त्या बालिकेवर विचार न करता होणारा अत्याचार अन् हे लोकं माणुसकी शिकवतेत. जनम अन् मृत्यूचा खेळ करतेत. स्री नरकात जाईन म्हणतेत. पाप हेच पुरुष करतेत आन् दोष आपल्या स्त्रीजातीले देतेत. हे कितपत बराबर हाये आई. अन् तुबी मले त्या पुरुषाईच्याच वळणावर चालाले लावतेस. त्यापरस मी लगन नाय केलो तं बरं राईन. कारण मले पुरुषाईच्या गळ्यातलं ताईत नाय बनायचं. आन् आतंबी असाच प्रश्न उद्भवते."

"अगं बेटा, हे समाजाचे नियम नाय पाळता आले तं हे लोक जगू देणार नाय. स्त्रीले पहिलं पती मेला तं जाळून टाकत. इधवा झाल्यावर केशवेपण पिंडाले लागत होतं. कायदे करणारे ढोरच आन् राबवणारेबी ढोरच. का सांगतीन आपल्याले हे नियम बेटा, ह्याईचं नाय आयकलं तं आपल्याले मारुन टाकन हा समाज. म्हणून आयका लागते याईचं. जगू देणार नाय. अगं तुह्या बापाचंच पाह्य. तुह्या बापाले जर माहित झालं तं तुह्या बापच आपल्याले घराच्या बाहेर काढन. गावात माहित झालं तं गाव आपल्याकडंच तुच्छ नजरेनं पाहिन. कोणी कामं बी नाय देईन. मंग उपासानं मरा लागन आपल्याले. म्हणून ते असं आयकावा लागते. मंग तो पती का असेना."

"अगं ते समदं बराबर हाये, पण जसा मा बाप राबते, तशी तु बी राबतेस. मंग त्या मनुस्मृतीत लिहिलं हाये का पत्नीची संपत्ती हे पुरुषाचीच संपत्ती रायते. आत मले सांग तुह्या मेहनतीचं का? काईच अर्थ नाय. त्यापरस कामाले नाय गेली तं बरं नाय का? मंग स्त्रीले जर का हा समाज उपभोग्य वस्तू मानते तं तिले जाग्यावर पोषू का शकत नाय आमचा समाज? मंग जो पुरुष पोषू शकत नाय, त्यानं लगन तरी का करावं?

इकडं नारीले स्वतंत्र रावू देत नाय. अन् तिकडं तिले संपत्ती नाकारतेत. हे कोणत्या धर्मात बसते. तसंच विवाहानंतर पत्नी पत्नीच राहात असतांनी एक स्री आज एका स्रीजातीवर अत्याचार करते. मले हे समदं पसंत नाय. मले यातना जरी देल्या ह्या लोकाईनं तरी मी त्या यातना सहन कराले तयार हाये. तसेच यज्ञ कार्य करणाऱ्या स्रियांच्या हातचे भोजन वज्र मानणारा आमचा ब्राम्हण समाज वर्षभर आपल्या पत्नीच्या हातचे भोजन का ग्रहण करत असतीन. आपण पुरुष म्हणून सोता स्वयपाक करावा व जेवावं आपल्या बायकोलेबी चारावं. म्हणूनच ते म्हणतेत का स्रियाले शिकायचा, शिकवायचा अन् वेदमंत्र म्हणायचा अधिकार नाय.

आम्ही अडाणी राहावं असं त्याईले वाटते. कारण आमच्या अडाणीपणाचा ते फायदा घेवून आमच्यावर त्यांना सतत अत्याचार करता यावा. त्यामुळेच ते आमाले संभोगप्रिय, दुराचारी, इर्षाखोर म्हणतेत, हृदयहिन, चंचलही म्हणतेत. आमी बी तेच मान्य करुन वागतो. इरोध करत नाय. पती.... पती हा वाईट जर असला तं त्याची पूजा करुच नये. अन् पतीव्रतेपण स्त्रीलेच का? पुरुषाले का नाही? रामाच्या खांद्याले खांदा लावून आपली सीता वनवासात गेली. तरीही तिच्यावर संशय घेवून रामानं तिला शेवटी प्रजेचं आयकून वनवासातच धाडलं. अशा कित्येक स्रिया आज पुरुषी अत्याचाराच्या बळी पडत हायेत. आज दररोज कितीही चांगलं केलं पत्नीनं तरी एखाद्या दिवशी जर ती चुकलीच तर घटस्फोटापर्यंत गोष्ट येते. हे बराबर नाही.

अगं आई, आज समाज बदलत हाये. परीवर्तनाची लाट गावागावात पसरत हाये. बाबासाहेबांचे ईचार घराघरात पोहोचत हायेत. मात्र आपला गाव जागच्या जागीच हाये. हा बी बदलन. पण त्याले आस हाये एका ठिणगीची. आपून उच्च जातीतले लोकं जरी असलो ना. तरी हे समजून घ्याले पाह्यजे. आजही पुरुषाईनं कोणत्याबी स्त्रीले बुरखा घालाले लावलाच तं ईरोध कराले पाह्यजे. हा गुलामीपणा हाये. हा गुलामीपणा कवा दूर होईन. हा ईचार करण्यापक्षा हा गुलामीपणा दूर कवा व कसा करता येईन याचा आपून ईचार करावा. तसं

पाह्यता गुलामीपणा दूर करतांनी त्रास तं होईनच. पण हा गुलामीपणा दूर कराले कोणाले ना कोणाले समोर तं याच लागन नं. मी कायले समोर होवू असं म्हणल्यानं जमन का आई? "

"बेटा, तुह्ये ईचार मौलिक हायेत. ही बादशाईयत मोडाले पाह्यजे. पण कवा मोडन. त्यासाठी मी तरी तुहाच बळी कसा देवू? तरीबी शिक बेटा. भरपूर शिक. मी माह्या आगाची चोळी विकीन. पण तुले शिकवीन. तू माह्याच घरचा नाय तं संपुर्ण स्त्रीजातीचा आरसा बन. कोणीतरी लढालेच पाह्यजे स्त्रीच्या हक्काबद्दल. ही स्री आजबी स्वतंत्र नाय. पुरुषांच्या बराबरीनं शेतात राबणारी माह्या मायमाऊली दिवसभर कामं करतेत खळ्यात. अन् घरीबी आल्यावर हेच नशिबाचे भोग. चूल आन् मूल एवढाच संसार. पोराईले शिकवतेत लाडानं पिरमानं आन् पोरीले नाय. कारण तो पुरुष असल्यानं वंशाचा दिवा. आन् हे स्री असल्यानं पणती बनण्याचं सौभाग्य नाय. आजबी पोरीबाबतीत म्हणतेत, पोरगी पराया धन हाय. नवकरी बी लागन तं तिचा पैसा आपल्या घरी येणार नाय. पण तुह्याकडं पावून वाटते का पोरगी पराया धन नाय. आमची सोच पराया धन हाये. बेटा, पोरगी शिकन तं साऱ्या समाजाचा उद्धार आन् पोरगा शिकला तं एका कुटूंबाचा. त्यासाठी मले तू पोरगी झाली तं आतं लय बरं वाटते. तू कय्यो पिढ्या घडवशिन. यासाठी मले तुले अडवायचा अधिकार नाय."

"अगं आतं मले समाजात एक सत्र चालू असलेलं दिसते. जो तो टेस्ट ट्यूब बेबी कराले लागला. पोरीयचा भ्रुण दिसलाच तं त्याले समाप्त कराचा सपाटाच सुरु हाय. म्हणतेत पोरगी जर झाली तं लाखो रुपये खर्च लागते. तेवढा हुंडा द्यावा लागते. शेंबडा पोरगा, काय बी कमवत नसन तरी त्याचा भाव ठरलेला रायते. म्हणून हा प्रताप. म्हणून पोरी तू आपल्या पायावर उभी हो आन् या बेमौल स्री जीवनाले न्याय मिळवून दे."

आईच्या मुल्यवान मार्गदर्शनानं कोमलचं मन प्रफुल्लीत झालं होतं. तिच्या बधीर मनात नवप्रकाश पडला होता. तशी ती आधीच लढण्यासाठी तयार झाली होती. पण आईचं पाठबळ आज तिला उत्साह देवून गेला होता. बाबासाहेबांचे तसे विचार तिच्या पाठीमागं होते. त्या

विचारांना धरुनच ती आपले विचार समाजात पोहोचविण्याविषयी तयार होत होती. तसेच आपले ज्ञान वाढविण्यासाठी ती क्रांतीकारकाचींही पुस्तके वाचत होती. अगदी बालवयातच ही पुस्तक वाचण्याची सवय तिच्या मनाला आकार देत होती. तसतसे तिचे विचारही परीपक्व होत चालले होते.

बधीर डोक्यात पुस्तक वाचनाच्या सवयीनं प्रकाश पडला होता. डोक्यातील निरक्षरतेचा अंधार नष्ट होवून ज्ञानाची पणती पेटली होती तिच्या हृदयात. सत्य काय तिला उमगत चाललं होतं. तसा एक आशेचा अंकूर फुटावा असं होवून गेलं होतं.

कोमलचे बाबा रतीराम शेत एके शेत करीत या शेतावर राबत असत. दिवसरात्र शेतावरच काबाडकष्ट करीत त्यांची जिंदगी चालली होती. ते जसे मेहनती होते, तशीच इतरही मंडळी होती. ती मात्र नशेच्या आहारी गेली होती. दिवसरात्र पानटपरीवर बसून सिगारेटचे झुरके घेत त्यांचीही जिंदगी चालली होती. ते त्याच शौकानं आपल्या आयुष्याची सायंकाळ करीत होते. वीरभद्र नामक नेता तर निर्णय नावाच्या माणसाच्या तालावर चालणारी माणसं. त्यांना स्वतंत्र विचार नव्हते. त्यांच्या बायका मात्र दिवसभर मोलमजुरीच्या कामाला जावून स्वतःचा तसेच पती आणि मुलाबाळाचा उदरनिर्वाह करीत. मनुस्मृती चा दणकाच एवढा होती की पती व्यसनीही असेल तरी त्याला पोसावे लागतच असे. पतीची सेवा न केल्यास नरकवासात जाण्याची भ्रामक कल्पना. म्हणून अनकष्टी पतीचीही सेवा. मात्र आपण स्वतः मेहनत करुनही अशा पतींच्या विरोधात उभे राहण्याची भीती. तसेच सासुसासऱ्यांचीही नित्य सेवा करावी लागत असे.

रतीराम मात्र मेहनतीवर जास्त भर द्यायचा. त्या डोंगराळ भागात जिथे पाऊस तुरळक पडायचा. त्या ठिकाणी रतीरामची शेती होती. शेतीत राबतांना जो आनंद मिळायचा, तो आनंद या पानठेल्यावर नव्हता. रतीराम सकाळी सायकल पकडून शेतावर जात असे. सकाळी दहा

वाजेपर्यंत मेहनत करुन जेवन करायला घरी येत असे. नव्हे तर कधीकधी त्याची पत्नी बायजा तो घरी न आल्यास भाकरी घेवून शेतावर जात असे.

गावात विश्वकोटीचं दारिद्र्य खितपत होतं. त्या दारिद्र्यात लाचार झालेली माणसं. त्यांना घरी पोटभर खायला मिळायचं नाही. तरीपण गावाबद्दल कुरकूर नसायची. गावातील वीरभद्र नावाच्या नेत्याच्या छत्रछायेखाली काम न करता त्यांना बरं वाटत होतं. घरी असणारी पत्नी जंगलात जावून कधी मोळ्या तर कधी बोरं जवळच्या गावातील बाजारपेठेत विकून राबराब राबायची. पण या गावच्या पुरुषांना त्याचं काहीच वाटत नव्हतं. याचं रतीरामला वाईट वाटायचं. पण तो तरी काय करणार होता.

वीरभद्र हा नेता होता. गावातील गर्भश्रीमंतच माणूस. कधी आयुष्यात त्यानं अडचण नावाची वस्तू पाहिली नव्हती. पैशामुळं सगळं विकत मिळतं असं त्याचं मानणं. त्याला मात्र गावातील लोकांबद्दल प्रेम नव्हतं वा लालसाही नव्हती. मात्र मतदानाच्या वेळी त्याला गाव आवडत असे. मतदानाच्या वेळी मात्र तो या गावातील लोकांना दारु पाजून निवडून यायचा. तेही ग्लासभर....... त्या ग्लासभर दारुसाठी लाचार झालेली माणसं वीरभद्र साठी वाट्टेल ते करायला मागे पुढे पाहत नसत. जणू निवडणुकीच्या नशा त्या वीरभद्र पेक्षा या लोकांनाच जास्त चढायची.

सकाळी सात वाजता पासून निवडणुकीला रंग यायचा. या नेत्यांच्या घराजवळ गावातील काही मंडळी जमायची. सकाळी नाश्ता करुन गाडीत बसल्यावर चाळीस गावं फिरायला गाडी निघायची. एक एक गाव घेत घेत व सभा घेत घेत वेळ कसा निघून जायचा ते कळायचं नाही.

वीरभद्र च्या पायपीटीनं त्याच्या निवडणूकीला आकार यायचा. तसतसे दारु पिणारे कार्यकर्ते त्याच्या पायपिटीत साामील होत.. रात्री साडेदहापर्यंत निवडणूकीत फिरल्यानंतर त्यांच्या गाड्या एखाद्या धाब्यावर थांबत. तसेच यथेच्छ मटन व दारुवर ताव मारुन जात. याच

घोटभर दारुसाठी दिवसभर आपले काम टाकून त्याच्या मागे फिरायला गावातील लोकांना मजा वाटायची.. या मजेतच त्यांचा संसार धुळीस मिळत होता.

बालपणीचा कोमलचा काळ अगदी सुखात गेला होता. त्या काळात वेदना समजल्या नव्हत्या. तरीही तिच्यासमोर आईचे मार्गदर्शन प्रश्न निर्माण करीत होते.

जसजसं वय वाढत गेलं. तसतसं कोमलला कळायला लागलं की विटाळ हा बरा नाही. हा विटाळ नष्ट व्हायला हवा. तिला बाबासाहेब कळला होता, पण आजही समाजात विटाळ होताच. स्त्रियांच्या बाबतीत विचारायचं कारणंच नव्हतं. आजही स्त्री सुरक्षीत नव्हती. ती तर त्या व्यसनाधीन पुरुषांच्या हातची कळसुत्री बाहुली होती.

निर्दोषलाही वाटायला लागलं होतं की हा विश्वकोटीचा असलेला अंधार संपवावा. त्या यातना नष्ट कराव्या. या यातनेतून नवा प्रकाश पडावा. जेणेकरुन समाजाचा आर्थीकच नाही तर सर्वप्रकारचा उद्धार व्हावा. या हेतूनं त्यांच्याही मनात विचारांची परीपक्वता आकार घेत होती.

निर्दोष लहानपणापासूनच पाहात होता की त्याचा बाप चांभारकीचा व्यवसाय करायचा. चामडे चांभारकुंडीत पकवून त्यापासून चपला तयार करायचा. हे काम जरी घाणेरडे वाटत असले तरी पोटाच्या समस्येमुळं ते काम त्याच्या वडीलांना करावंच लागे. तसेच मनात इच्छा नसतांनाही विटाळ हा पाळावाच लागे. शाळेत, घरी दारी, सर्वचठिकाणी....... एक दिवस न राहवून त्यानं बापाला विचारलं,

"दादा, आपल्याले वस्तीत दहा वाजेपर्यंत का जाता येत नाय."

"बेटा, हे परथा हाये आपल्या गावची."

"परथा म्हणजे? "

"अरे बेटा, ईटाळ, ईटाळ होते त्या समद्या लोकाईलं."

"ईटाळ म्हणजे? "

"ईटाळ म्हंजे बेटा त्या स्पृश्य लोकाईले आपला हात लागला तं ते बाटतेत."

"कावून बा बाटतेत? अन् बाटतेत म्हणजे? "

"घाण लागते त्याईले. त्याईले नंतर आंघोळ करा लागते."

"एवळे आपुन वाईट दादा. अन् आपल्या हातात एवळी घाण हाये."

"नाय बेटा, पण आपून चांभार न. आपली जात नाच हाये न."

"आपली जात नीच म्हणजे? "

"अरे, तुले मी कसं समजावून सांगू. अरे आपली जात चांभार सर्वात खालच्या दर्जाची. त्या कुत्र्याईपरसबी......."

"त्या कुत्र्याईपरसबी."

"होय. त्या कुत्र्याईपरसबी. त्यापरसबी खालची."

"असं का समजतेत लोक. आपली जात खालच्या दर्जाची."

"आतं ते माईत नाय."

"आपुन जो धंदा करतो. त्या धंद्यानं तं नसन समजत खालच्या दर्जाची जात."

"हं, कदाचित समजत असतीन. पण त्याले उपाय नाय."

"मंग हे धंदे आपुन का नाय सोडत."

"हे कसे सोडन बेटा, अन् कोणते धंदे करन वेळेवर. अन् त्या धंद्यापासून पैसे बी भेटतेत दोन. त्यानं आपलं पोट चालते."

"म्हणजे? "

"म्हणजे आपुन जगतो बेटा."

"म्हणजे त्याईचे धंदे केल्यानं नाय जगत का? "

"नाय बेटा, त्याईचे धंदे नाय करता येत आपल्याले."

"का बरं? त्याईचे धंदे आपल्याले का करता येत नाय."

"बेटा, त्याईच्या धंद्याचं आटोप नाय आपल्याले."

"दादा, यापरस आपुन मोलमजूरी केलेली बरी."

"पण बेटा, आपला धंदा का वाईट हाये. बसल्या बसल्या दोन पैसे मिळत्याती आपल्याले. शिवाय आपल्याले आपल्या धंद्याचं आटोप बी हाय. आपला धंदा कोणाकडून शिका लागत नाय."

"पण दादा, या धंद्यापासून तं ईटाळ समजतेत ते लोकं."

"पण बेटा, आपली जात चांभार हाये. आपुन हा धंदा बी सोडला तरी आपली जात का बदलणार हाये. ना जात बदलन कधी. ना कधी हा ईटाळ संपन. हा ईटाळ सहन करावाच लागन."

बापाच्या म्हणण्याचा अर्थ त्याला चांगला समजत होता. तसा त्याचा निरक्षर बाप आपल्या असहाय वाणीनं वेदना ओकत होता. दगडाचा देव.... त्याला स्पर्श करताच तो बाटतो. तसेच पाणीच नाही तर अस्पृश्यांच्या स्पर्शानं स्पृश्यांचं अंगणही बाटत होतं. जणू सावलीचाही विटाळ. नव्हे तर अस्पृश्यांच्या उपस्थितीचाही विटाळ. दहा वाजतापर्यंत नक्कीच वस्तीत जाण्याचाही विटाळ. बाबासाहेबांचे केलेले कार्य या गावात लागू नाही. याचेच जणू निर्दोषला आश्चर्य वाटत होते.

विटाळ म्हणजे नेमकं काय, विटाळ कसा होतो? या प्रश्नांची उत्तरे आज निर्दोषजवळ नव्हती. देवाला विटाळ होतो म्हणजे नेमके काय होते? पाण्याला विटाळ होतो म्हणजे नेमके काय होते? अंगणही कसे विटाळते? याही प्रश्नांची उत्तरे निर्दोषजवळ नव्हती. मात्र ते जाणण्याचा प्रयत्न निर्दोषनं नक्कीच केला होता. पण त्यालाही आज उत्तर मिळालं नव्हतं.

लहानपणापासूनच निर्दोष व कोमल सोबत सोबत शाळेत गेले होते. या निर्दोषबाबत कित्येकदा आई कोमलजवळ बोलली होती. ती त्याचेसोबत राहायला मनाई करीत होती. त्यांचेशी बोलायचं नाही. विटाळ होतो हे आईनंच शिकवलं होतं. तरीही उत्सुकतेपोटी ती त्याचेशी बोलत असायची. लहानपणी ती त्याचे शी भातुकलीच्या खेळातही रमायची. पण तिला कधीच विटाळ जाणवला नाही. हे खेळण्याचे दृश्य कधीकधी आजुबाजूला असलेली मंडळी पाहायची. कधी रागवायची. पण या कडे तिनं कधी लक्षच दिलं नाही. वडीलधारी मंडळीही ते लहान आहेत, त्यांना कळत नाही म्हणून दुर्लक्ष करायचे.

आज जसजसं त्यांचं वय वाढत होतं, तसतशी त्यांच्यात प्रगल्भता वाढत चालली होती. लहानपणीच्या जवळीकतेचे रुपांतर प्रेमात होवू पाहात होते. ते आपापसात बोलत असत. कधीकधी प्रेमाच्या तर कधी याच विटाळाच्या गोष्टी करीत. कोमलला नक्की वाटायचं की आपण आंतरजातीय विवाह करावा व हा विटाळ मोडावा कायमचा.

दोघांचंही प्रेम. आज ते प्रेमात गुरफटलेले प्रेमप्रवासी आता तारुण्यात एकमेकांशिवाय राहू शकत नव्हते. वय वाढलं होतं, त्यानुसार त्यांच्यातल्या भावनाही. प्रेम म्हणजे काय ते जरी त्यांना उमगलं नसलं तरी एक शारीरिक आकर्षण होतं, त्यालाच ते प्रेम म्हणून संबोधायचे.

कोमलला वाटत होतं की आपण आंतरजातीय विवाह करावा. त्या भातुकलीच्या सारखा विवाह नको. अन् त्या जातीशी करावा, जी जात आज अस्पृश्य समजली जाते. याच गावातल्या मुलाशी करावा.

असंच निर्दोष आणि कोमलचं प्रेमप्रकरण जोरात सुरु होतं. त्या जातीच्या अमानुष नोंदी आणि संवादांवर त्यांचं प्रेम आधारलेलं. असंच जणू त्यांचं प्रेम होतं.

मृग नुकताच संपला होता. पण पावसाच्या टपोऱ्या थेंबात काहीही जाण नव्हती. कॉलेज नुकतंच सुरु झालं होतं. तशी पावसाची एक सर या जुलै मध्ये येवून गेली होती. तसेच कॉलेजच्या पहिल्याच दिवशी कॉलेजला निघालेले हे प्रेमी कॉलेजला न जाता भलत्याच कॉलेजला निघून गेले होते. त्या बागेत रमणीयत्व शोधण्यासाठी नव्हे तर विटाळ संपविण्याच्या गोष्टी करण्यासाठी. ते प्रेमाच्या गोष्टी करायला जात नसत. तप्त उन्हाळ्यात महाविद्यालयात सुट्ट्या असल्यानं त्यांना भेटता आले नव्हते. तसं पाहिलं तर गावात भेटायला जागाही नव्हती. अन् भेटल्यास कोणाला दिसू याची भीतीही होती. म्हणून त्यांनी भेटण्याचं टाळलं होतं.

महाविद्यालय गावात नव्हतं. ते गावापासून काही मैलाच्या अंतरावर होतं. या महाविद्यालयात विविध धर्माची लोकं होती. तिथे विद्यार्थी विटाळ न मानता आपापसात बोलत असत. स्पर्शही करीत. सोबत सोबत खातही असत. त्यांना विटाळ म्हणजे काय हे समजत नव्हते.

गावाकडील बरीचशी मुलं शालान्त पास झाल्यावर त्या गावातून या महाविद्यालयात शिकण्यासाठी येत. पण त्यात उच्चवर्णियांची पोरं असायची. अस्पृश्यांच्या मुलांना शिक्षणाची संधी नसल्यानं ते शिक्षणात रस घेत नसत. ते एक दोन वर्ग शिकून बापाच्या वंशपरंपरेने चालत आलेल्या धंद्यात मदत करत. मदत करता करता तोच धंदा त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन बनत असे. स्वयंपुर्णतेच्या बाता करणारे लोकं आजही अस्पृश्यता पाळत होते. त्यांना बाहेरच्या सुधारलेल्या परीसराचं काही घेणं देणं नव्हतं. बहुतेक शिकणाऱ्यामध्ये निर्दोषच असा मुलगा होता की तो शालान्त पास झाला होता. तसा त्याच्या शिक्षणाला कुटूंबाचा विरोध असला तरी तो आपल्या जिद्दीने शिकत होता. आईच्या शिकविण्याच्या हट्टापुढे वडीलांचे काहीही चालले नव्हते.

कोमलच्याही बाबतीत तेच घडत होतं. गावात एक दोन मुले शिकलेली होती. त्यांना अक्कल होती. पण निर्णयच्या दबावाखाली असलेल्या गावात त्या मुलांचे कोणी ऐकत नाही. हे पाहून ती शिकलेली नुलं गाव सोडून शहरात वास्तव्यास होती. महिलांपैकी या गावात कोणतीच स्री या गावातून शिकून पुढे गेलू असेल असे वाटत नव्हते.

गाव तसं अनपढ निरक्षर अंधश्रद्धच्या बुरख्याआड पसरलेलं होतं. देव देव्या अंगात येणं ही येथील परंपराच होती दरवर्षी आषाढी यात्रा भरत असे. या यात्रेत गावात देवीला कोंबड्या बकऱ्याची दावण कापत असत. देवीला कोंबड्या बकऱ्या कापल्यानं गावात महामारी येत नाही असं लोकांचं मानणं होतं. तसेच पावसाळ्यापुर्वी जर देवीला कोंबडं बकरु दिलं तर देवी पावते व पीकपाणी चांगलं होतं असं गावकऱ्यांचं म्हणणं होतं. याला भाव देणे म्हणत. जर देवीला असा भाव दिला नाही तर देवीचा कोप होवून गाव दुष्काळात सापडून गावाचा नायनाट होईल असं गावकऱ्यांचं मत होतं. या गावातील देवी नवसाला पावते अशी दुरपर्यंत आख्यायिका होती. त्यामुळं दुरदूरचे लोक या मंदिरात येत. कोणी स्वयंपाक करीत तर कोणी नवशं कबूल करीत. तर काही लोकं नवशं पुर्ण झाले म्हणून कोंबडं बकरु कापायला येत.

देवी फक्त भावाची भुकेली आहे. सगळं आपणच तर खातो असं सगळे मानत. निर्णय मांस खात नसे. पण या आषाढीच्या वेळी कापलेल्या बकऱ्याचा हिस्सा मात्र अवश्य मागत असे. त्याला तो प्रसाद म्हणत असे. वर्षातून एक वेळा तो मांस खात असे, तेही दानात भेटलेला. याला तो मांस खाणे समजत नव्हता. तसं पाहता गावच्या सर्व मंदिरावर त्याचीच चलती होती. त्याला ते मांस फुकटात मिळत असे. पण तो दिवस जर सोडला तर बाराही महिने तो कडक शाकाहार सेवन करीत असे. हे संबंध गाव जाणत होतं.

गावात बहुतेक लोकांच्या अंगात येत असलं तरी विशेषतः गंगारामच्या अंगात येणारी देवी प्रसिद्ध होती. रमजानच्या दिवशी गंगारामच्या अंगात येणारा देव पाहण्यालायक असायचा. बाकीच्यांच्याही अंगात रमजानच्या दिवशी येतच असे. तेही लोकं भुतानं पछाडलेल्यागत या

दिवशी थयथय नाचत असत. याच दिवशी गावातील सर्व लोकांच्या चुलीतील अंगार आणून ती रस्त्यावर पसरवायचे. या रखरखत्या निखाऱ्यावर पायात चपला न घालता देव्या नाचत. कोणी त्याला ताबूतं म्हणत. या निखाऱ्यावर देव्या नाचताच त्या अंगातून निघून जात. त्याला देव्या शांत झाल्या असे समजत. त्यानं कोणं आपल्या चुलीतील निखारे दिलेले नसतील, त्याच्या घरी वर्षभर सुख शांती नसेल असे मानत असल्यानं ताबुत थंड करण्यासाठी गावातील सर्वच मंडळी देवीसाठी तप्त निखारे देत. त्या निखाऱ्याचा अर्थ म्हणजे बहारबांधा, ईडापीडा, गावात येवू नये. कोणता भूत गावात येवू नये.

नाचणाऱ्या देव्या. कोणी कोणी तप्त निखारे न दिल्याने त्यांच्याच घरी येतात असा संकेत गावाचा. ह्या देव्या नसून भुतंच आहे असं काही लोकांचं मानणं.

गंगाराम चांभार जातीचा होता. गर्भश्रीमंतच नाही तर तो एक मांत्रीकही होता. त्याच्या अंगात देव येतो असे लोकं मानायचे. ताबुत शांत करतांना तो कधीच तप्त निखाऱ्यावर नाचला नाही. पण हे ताबूत त्याच्याच अंगणात शांत होत. गावोगावची गर्दी रमजानच्या दिवशी गंगारामच्या घरी. गंगाराम चांभार असला तरी आणि विटाळ होत असला तरी ते ताबुतं पाहतांना कोणालाच विटाळ जाणवला नाही.

तप्त निखाऱ्यावर ताबुतं नाचत असतांना ह्या ताबुतांना कोणी देव्या समजत तर कोणी भुतं. हे भुतं निखाऱ्यावर नाचताच गंगाराम एका वाडग्यात पाणी घ्यायचा. त्या वाडग्यातील पाणी तोंडात काहीतरी पुटपूटत त्या ताबुतावर टाकायचा. कोणी मंत्र म्हणत आहे असे म्हणत. शेवटी म्हणत असे,

"जा रे माह्या लेकरा, जा. यावर्षीचं तुह्य काम संपलं. पुळच्या वर्षी येजो. जा."

त्यानं पाणी अंगावर शिंपताच तसाच त्या भुताच्या अंगावर पाण्याचा थेंब पडताच त्या लोकांच्या अंगातून एखादी अद्‌भुत शक्ती बाहेर पडायची. तसा चमत्कार दिसायचा. ते शरीर तप्त निखाऱ्यावरुन झटकन बाहेर यायचं. जणू ते निखारे पायाला झोंबत असावेत की काय?

मग बाहेर आल्यावर ते शरीर क्षीण पडल्यागत निपचीत असायचं. जणू ते शरीर मृत झालं की काय? पण श्वास सुरु असल्यानं ते जीवंतच असायचे.

गाव तसं रंगेल होतं. एखाद्या वेळी कोणता आजार झाल्यास ते डॉक्टर कडे न जाता याच गंगारामच्या घरी येत मग गंगाराम काही जडीबुटी खायला देत असे. तसेच त्यावर पाणीही प्यायला देई. ते पाणी पिताच वा जडीबुटी खाताच औषधी लावल्यागत रुग्ण तात्काळ बरा होई. तेव्हा मात्र पाणी पितांना किंवा जडीबुटी खातांना लोकांना विटाळ झोंबत नव्हता.

ताबूत शांत करतांना मंत्रीत होणारं पाणी हे त्या गंगारामच्या चांभार कुंडीतील असावे असे काहीजण म्हणत. तर काहीजण त्या पाण्याला साधं पाणी म्हणत. ते पाणी मंत्रून ते पाणी गंगाराम वापरतो असं मानणं होतं. ते पाणी आपल्याच शैलीत ताबुताच्या अंगावर पडताच ते ताबूत निघून जायचे.

गावात जी टेकडी होती. त्या टेकडीवर अनेक झाडंही होती. या झाडांचा उपयोग औषधी म्हणून होत होता. मात्र कोणतं झाड कोणत्या आजारावर चालते, याचं ज्ञान सामान्यांना नव्हतं. ती माहिती फक्त गंगारामला होती. तो आजारावर जडीबुटीच द्यायचा. पण ती जडीबुटी हातावर घेवून मंत्र म्हटल्यागत त्या जडीबुटीचा उपयोग करीत असे. बरेचशी मंडळी या जडीबुटीनं दुरुस्त व्हायची. नाव मात्र मंत्राचं व्हायचं. लोकांना वाटायचं की ते मंत्रानंच सुधरले आहेत.

गंगारामच्या अंगात येणारा देव हा साक्षात खरा बोलतो हा सर्वांचा समज होता. हा देव खरा असल्याच्या दोनतीन गोष्टीही घडल्या होत्या. तसा आठवड्याचा एक दिवस गंगाराम आपल्या भक्तांसाठी काढत असे. त्याचे भरपूर भक्तही होते. ते भक्त यादिवशी येत. याला आकत लावणे म्हणत. आकतीच्या वेळी अंगातला देव प्याला म्हणत असे. तर दिवाबत्तीसाठी भक्तांकडून काही शुल्क घेत असे. जर भुताची लागवण झाली असं सांगून त्याचा उतारा काढायला लावत असे. उतारा म्हणजे कागदावर काहीतरी भुताची चित्र काढून त्यावर लिंबू

मिरची ठेवून चौकात टाकलेली पुडी. कधीकधी हा गंगाराम आसरा लागल्या असे सांगून मासोळ्या आणायला लावत असे. त्यात एकदोन मासोळ्या त्या भुतांना देवून बाकी सगळ्या मासोळ्या पोट भरण्यासाठी वापरत असे.

गंगारामच्या अंगातला देव हा इतरत्र न येता, तो त्याच्याचघरी येत होता. या देवघरात एक मोरपिसाची झाडणी होती. तिथं एक देवीची शेंदरानं फासलेली मुर्ती होती. त्या मुर्तीवर लाल रंगाची ओढणी होती. देव अंगात येताच तो झाडू आणि शेला मागत असे. त्यानंतर प्यालाची मांग करीत असे. हा प्याला म्हणजे दारुचा नैवेद्य होता.

प्याला......... प्याला ही दुसरी तिसरी वस्तू नसून दारुचा ग्लास असे. एका ग्लास मध्ये छोटीशी मोहाची किंवा देशी दारु ओतून ती त्या देवाला प्यायला द्यावी लागत असे. त्याशिवाय गंगारामच्या अंगातला देव आकत तोडत नव्हता. देवाच्या निमित्ताने का होईना, गंगारामचा दारुचा शौक पुर्ण होवून जात असे. भक्तही आपल्या अंगातील इडापिडा निघते म्हणून डॉक्टर कडे न जाता या मांत्रीकाकडे जात. शिवाय डॉक्टर कडे लागणा-या पैशापपेक्षा अतिशय कमी पैशात भक्तांचा इलाज या गंगाराम कडे होत असे. त्यामुळं की काय आठवड्यातून एक दिवस भक्तांच्या रिघची कतार गंगारामच्या घरी लागलेली असे.

ज्याप्रमाणे गंगाराम चांगले म्हणणारा भक्तगट होता. त्याचप्रमाणे वाईट म्हणणारा देखील भक्तगट होता. हा भक्तगट गंगाराम जादू करतो असं म्हणायचा. तो रात्री बारानंतर स्मशानात जातो, भुतं उठवतो भुताशी बोलतो असे लोकं म्हणायचे. ती मंडळी त्याच्यापासून पाच हात दूरच राहायची. त्यामुळं त्याच्या घरी खुप दूरची मंडळी येत. पण गावची मंडळी त्याला फारसा भाव देत नसत.

कोमल व निर्दोषचं प्रेम प्रकरण जोरात सुरु होतं. कॉलेजच्या पहिल्याच दिवशी ते कॉलेजचा बहाणा करुन बागेत फिरायला गेले होते. तसं पाहता त्यांच्या शिक्षणाला गावातील लोकांचा विरोध होता. कारण अस्पृश्य आणि विशेषतः स्रियांना या गावात शिकवल्या जात नसे.

पण निर्दोष अस्पृश्य असून शिकत होता. त्यातच कोमलही....... कोमल ही स्री असून शिकत होती. हे सर्व त्यांच्या त्यांच्या आईमुळं घडत होतं. तसं पाहता बापाची त्यांच्या शिक्षणाला परवानगी नव्हती.

बागेमध्ये फिरतांना मजा वाटत होती. पण जागोजागी झुडपामध्ये ते शहराचे प्रेमीयुगल बसले होते. तसेच के बिभत्स प्रणयात लिन होते. पण निर्दोष आणि कोमल हे त्यातील नव्हते. कारण त्यांच्यात गावचा संस्कार होता. हाच संस्कार त्या बागेत फिरतांना कामी येत होता.

बागेतील ते प्रेमीयुगल......... त्यांचे वागणे किळसवाणे होते. बहुतःश ही बाग या प्रेमीयुगलांच्या प्रणयक्रिडेसाठीच बनविण्यात आली की काय असे वाटत होते. कोणी हातावर हात ठेवून बसले होते. तर कोणी गळ्यात गळे घालून बसले होते.

बागेत एक तलावही होता. या तलावात मासोळ्या होत्या. ते जणू मत्सपालन वाटत होतं. कारण त्या तलावाचं चांगलं बांधकाम केलेलं दिसलं. तसा कोमलनं निर्दोषचा हात पकडला. म्हणाली,

"निर्दोष, आपण तिकडे जावू. त्या तलावाजवळ खुल्या मैदानात. मला इथं बराबर वाटत नाय."

तिथलं दृश्य. ते दृश्यच नाही तर प्रेमीयुगलांचा नंगा. बाग फिरण्यासाठी जरी असली तरी अलिकडे बागेचं स्वरुप बदलत चाललं आहे. ह्या बागेचं स्वरुप आता राधेच्या वृंदावन बागेसारखं राहिलेले नाही. त्यामुळं तिथलं बिभत्स दृश्य पाहून कोमलचा जीव कोंडत होता. कदाचित ते पाहून निर्दोष जबरदस्तीनं तिच्या शरीराचा उपभोग तर नाही ना घेणार असंही तिला वाटलं. म्हणूनच तिनं त्याचा हात जबरदस्तीनं पकडून घेत त्याला त्या तळ्याजवळ आणलं. जिथं मोकळं मैदान होतं. तोही तिला न अडवता मत्सालयाकडं जावू लागला.

तसे ते मत्सालयापाशी आले त्या मत्सालयाजवळ दोघंही मासोळ्यांचे निरीक्षण करु लागले. तशी ती म्हणाली,

"बघ कशा मुक्तविहार करतेत या मासोळ्या. या मासोळ्यांलेबी स्वातंत्र्य हाये आन् आपुन. आपल्याले साधं गावात मनासारखं वागण्याचं स्वातंत्र्य नाय. पण का रे, या मासोळ्या प्रेम करीत असतीन का रे? "

"करत असतीन. पण आपल्याले कसं माहित होणार. आपल्याले ते माहित करण्यासाठी त्याईच्या वंशात जनम घ्यावा लागन. प्रेम भावना सगळ्यालेच लागू रायतेत."

"हं पण या झुडपात अशा प्रेमभावना नाय."

"बराबर."

"हे कॉलेजचीच पोरं असन का? "

"हो."

"पण हे पोट्टे असं का करत असन? "

"अगं हे शरीरवासना."

"एवळी शरीरवासना. अन् ते बी यांच्यात. अन् यातून भलतं काई घडलं तं. तं त्याचे भोग स्त्रीजातीलेच."

"म्हणजे? "

"हे बघ, यातून समजा ते पोट्टी गरोदर राह्यली तं."

"गर्भ तं पाडता येते. आतं लपूनछपून गर्भलिंगनिदान करतेत अन् गर्भबी पाडतेत डॉक्टर."

"पण कळलं तवा नं. नाय कळलं तं."

"हं."

"अशायेळी तो पोट्टा तिले सोडून गेला तं कोणाले भोगा लागन? अन् हं तुबी मले तसाच सोडून जाशीन."

"मी त्याईच्यासारखा नाय. मी हुकमाचा ताबेदार हाये तुह्या."

तशी ती हसायला लागली. म्हणाली,

"जास्त फुशारक्या मारु नोको. हे वासनांध मंडळी. सोताची वासना पुर्ण करण्यासाठी इतं येतेत. ह्याईचं पिरम बिरम नाय. फक्त वासनेचे भक्त. हे काई लगन करणारे नोयेत."

"हं, तेच तं मी सांगतो."

"अन् एक ईचारु? "

"ईचार."

"अरे, या मासोळ्यात रंगीबेरंगी मासोळ्या हायेत. कोणी आकारानं मोठ्या हायेत. कोणी लान हायेत. तरीबी ह्या तलावात त्या कशा एकत्र रायतेत. कशा राहात असतीन? त्याईच्यात भेदभाव नसन का? "

"नाय, अगं भेदभाव जर त्याईनं केला असता तं या पाण्यात ते एकत्र आनंदानं रायले नसते. भांडण केलं असतं. एकमेकाईले खावून टाकलं असतं. हा भेदभाव माणसाईतच हाये."

"हा भेदभाव माणसाईतच का? "

"माणसाईतच यासाठी का आपण माणसं हाओत. आपल्याले ईचार करता येते. जातीधर्माच्या गोष्टी करता येतेत. जातीधर्माचं ईष पेरता येते. म्हणून आपण पाळतो भेदभाव. ह्या जाती बिरादरी, हे पंथ, ह्या भाषा. सगळ्याच गोष्टीबद्दल आपुन भांडतो. संपत्तीसाठीबी भावा

बहिणीचं नातंबी समजत नाय. एकाच आईच्या पोटातून जनमलेले आपुन भाऊबहिण. एक इंच जागेसाठी. अन् एक इंच जागेसाठी एकमेकांईची कत्तल करत सुटतो. जिथं आपुन आपल्याच रक्ताच्या संबंधाले ओळखत नाय. तिथं खरंच हा स्पृश्य, अस्पृश्य कसं ओळखणार! " निर्दोष आपली खंत व्यक्त करीत म्हणाला.

कोमल शांत होती. ऐकत होती. हा विटाळाचा फटका तिलाही माहित होता. अख्खा देश आज सुधारत चालला होता. पण तिचं गाव आजही तसंच होतं.

पावसाची सर नुकतीच येवून गेली होती. तसा मातीचा मृदगंध वातावरणात पसरला होता. वेगवेगळ्या मासोळ्या. त्यातच मगाशी धरलेला निर्दोषचा हात तिला सुखद स्पर्श देत होता.

लपायला पुरेसा आडोसा नसल्यानं पाऊस त्या दोघांच्याही शरीराला लाजवून आणि भिजवून गेला. पावसाचे टपोरे थेंब नितळून खाली आले. हळूच कोणीतरी आपल्या ओठाला स्पर्श करतंय असं तिला वाटायला लागलं. तसा निर्दोष बोलायला लागला.

"विटाळ कोणं निर्माण केला असन. आमीबी माणसंच. तुमीबी माणसंच. पण पाय किती अंतर हाये तुह्यात अन् माह्यात. माणुसच आज माणसाच्या माणुसकीले पारखा झाल्यासारखा वाटते.

तो काय बोलत आहे हे तिनं काही ऐकलं नाही. तो स्वगत बोलल्यासारखा बोलत होता. त्याला वाटत होतं की ती ऐकत आहे. पण ती तर भलत्याच विचारात गुंतली होती. त्या पावसानं जणू येवून तिला घट्ट मिठी मारली होती. हे ती स्वतः अनुभवत होती.

तिचं आपल्याकडं लक्ष नाही याचा अंदाज येताच त्यानं तिचा हात गच्च दाबला व म्हणाला,

"कुठं हरवलीस? मी असाच एकटा बडबडतो. तू कुठं हाये? तुले भान हाय का? "

मगापासून निर्दोष काय बोलतोय याचं भान नसलेली कोमल हात गच्च दाबला जाताच भानावर आली. त्या ताठर हातानं दाबलेला नरम हात, त्याला वेदना होताच ती म्हणाली,

"निर्दोष, काय झालं? माह्या हात का दाबलास? "

"अगं तू कुठं हरवलीस? मी असाच एकटा बडबडतो हाये. मात्र माह्या बोलण्याले तू प्रतिसाद देला नाय. म्हणून दाबला हात."

भानावर येताच ती म्हणाली,

"बोल, काय बोलायचं ते मगापासून."

"आधी तू सांग, तू कुठं हरवलीस? "

"मी... मी या पावसात हरवली. या पावसात भिजल्यानं व मले थंडी लागत असल्याने मी गप्प होते."

मनातल्या भावना लपवीत कोमल बोलून गेली.

"ठीक हाय ठीक हाय. तसंही बायाईले जेवळे केसं असतेत, तेवळेच मिसंबी असतेत असं म्हणतेत लोकं."

"काय$$? " ती मोठ्यानं म्हणाली.

"काय नाय. मी म्हणलं, आपुन जावूया आतं घराकडं."

"नाय, आतं यापूर्वी का म्हणलं? "

"नाय म्हणलं कायपण."

"नाय तू सांगच आतं." ती म्हणाली.

"काय नाय. असंच कायपण."

"तू ना.......”ती बोलायचं थांबली.

"रागावलीस.”

तिनं आपल्या मिश्किल चेहऱ्यावरुन आपल्या डोळ्याचा एक कटाक्ष टाकला. तशी ती म्हणाली.

"नाय रे, मी कशी रागवीन तुह्यावर.”

"जावू दे. आतं जावूया घरीकडं आपुन.”

"होय. तसं आपलं गाव बरंच लांब हाय.”

"होय. म्हणूनच म्हणलं.”

तसं पाऊस आल्यानं त्या ठिकाणावरचो प्रेमीयुगल घराच्या रस्त्यानं लागले होते. पावसाच्या पहिल्या सरीचा फटका त्यांनाही बसला होता. झाडाझुडपाच्या आडोश्यात रम्य गोष्टी करता करता पावसानं व्यत्यय आणल्यानं तसेच बसायला जागाच उरली नसल्यानं त्यांनी परतीची वाट धरली होती. तेही चिंब भिजल्यानं घरी परतले होते.

कोमलनं परतीसाठी होकार देताच ते दोघंही तिथून निघाले. च

ते मुख्य रस्त्यावर आले. त्यांनी बस पकडली. दोघांनाही वेगळीच सीट मिळाली. जणू काही ते आज सोबत सोबत फिरलेच नाही असं वाटत होतं. मात्र त्याच्या मनात सोबत सोबत भिजण्याच्या गोष्टी होत्या. ज्या त्यांना आठवत होत्या. शरीरस्पर्श नाही, पण त्या पावसाच्या चुंबन घेण्याचाही थरार तिच्या मनात घर करुन गेली होता.

पाऊस पुरेसा थांबला असला तरी या पावसानं दोघांनाही चिंब केले होते. पण आता अंगावरचे कपडे थोडे सुकले होते. अंगातली उब त्यांच्यासाठी कारणीभूत ठरली होती. आता पाऊस थांबला होता, पण गार वारा सुटला होता. तो गार वारा अंगाला झोंबत होता.

तशी बसमधून थंडी येताच कोमलनं बसची काचं लावून घेतली आपली ओढणी पांघरली. तरीही वारा ओढणीतून आत शिरुन तिला डोकावून पाहात होता. त्यामुळं की काय, तिनं आपले डोळे घट्ट मिटले. जणू आपले डोळे कोणाला दिसू नये.

निव्वळ निर्दोषच्याही मनात पहिल्या पावसानं हालचाल निर्माण केली होती. तिनं पकडलेला त्याचा हात क्षणोक्षणी आठवत होता. तसंच त्यानं तिचा घट्ट दाबलेलाही हात आठवत होता. एवढंच नाही तर तिचं विव्हळणंही. अन् आठवत होते तिचे विचारणे. सारंच आठवत होतं त्याला. त्या मासोळ्या अन् त्या मासोळ्यांचा मुक्त विहार. तिच्यासोबत मुक्त विहार करणेही तो विसरु शकत नव्हता.

तो प्रेमात केव्हा आणि कसा पडला हो मात्र त्याला आठवत नव्हतं. पण तो आज तरुणपण येताच तिच्यावर प्रेम करु लागला होता. तसा तो प्रश्न स्वतःच्या मनात उपस्थित करीत होता. तिचंही आपल्यावर प्रेम असेल की ती फक्त फिरायला येते, या साऱ्या गोष्टी त्याला स्वस्थ बसू देत नव्हत्या. खरंच तिचं प्रेम असावं असं त्याला वाटत होतं.

सायंकाळची वेळ होती. पाच वाजले होते. दोघंही गावी पोहोचले होते. आता त्यांच्या वाटाही वेगळ्या झाल्या होत्या. ते प्रेम करीत होते. पण कुणाला कळलं तर समस्या निर्माण होईल याचीही त्यांना भीती वाटत होती. ती भीती वाटणंही साहजिकच होतं, कारण ते विभिन्न जातीचे होते. त्यातच अस्पृश्य स्पृश्य असा भेदभाव. वाद होणारच होता. कारण यापुर्वीही एकदा राम्यानं सायलीवर केलेलं प्रेम त्याला आठवत होतं.

राम्या उच्चवर्णिय होता. तर सायली अस्पृश्यांची मुलगी. कोण्या एके प्रसंगी सायलीचं राम्यावर प्रेम जडलं होतं. सायली दिसायला सुंदर असली तरी, ती राम्याला पसंत असली तरी ती कनिष्ठ जातीची असल्यानं गावच्या लोकांना पसंत नव्हती.

प्रेम किती लपवून ठेवायचे? ते कितीही लपवून ठेवलं तरी एक ना एक दिवस उजागर होणारच. अगदी त्यांचंही तसंच झालं. गाववाल्यांना जसं सायली व राम्याचं प्रेम माहित झालं,

तसं भर चौकात दोघांनाही ठार करण्यात आलं. एवढंच नाही तर गावात प्रेमाच्या विवाहाला संमती नव्हती. दोघांच्याही विजातीय उच्च जातीच्याही गोखलेच्या पोरासुनला निव्वळ प्रेम केल्याने विवाहानंतर आत्महत्या करावी लागली. गोखले ब्राम्हण होता. तर सुन उच्चवर्णिय इतर जातीची होती. दोघंही उच्च जातीची असली तरी समाजानं लग्नानंतर केलेला त्यांचा छळ त्यांच्या आत्महत्येला कारणीभूत ठरला. हा इतिहास होता त्या गावात विजातीय प्रेमाचा.

अशी बरीच प्रकरणं गावात घडली होती. काही आठवत होती. काही आठवत नव्हती. पण ती यशस्वी ठरली नाहीत. छळंच एवढा झाला की त्यांना आपलं जीवन संपवावं लागलं. याची दहशत होती गावात म्हणून प्रेम असुनही निर्दोष व कोमल अगदी फटकून वागत होते. सावधगिरीने........ ते गावात कधीच एकमेकांशी बोलत नव्हते.

गंगारामची वैयतकी. त्याची परीसरात चर्चा रंगली होती. गंगाराम विटाळ मानत नव्हता. तो चांभार असला तरी त्याला न्यायला गावोगावचे लोकं येत. कितीही मोठा भुत का असेना, गंगाराम घालवणार म्हणजे घालवणार असा नेमच होता. गंगारामला शैतान म्हणजे काडीकचराच वाटायचा. त्याच्या घरी येणारी मंडळी एवढी घाबरुन यायची की शैतानानं त्यांच्या घरी बस्तान बसवलंय. गंगारामला अघोरी विद्या येतेय असे गावची मंडळी म्हणत. अघोरी अर्थात तो कवडीभर विष्ठा दररोज खाते असं गावकरी म्हणत. पण कोणीही त्याला पाहिलं नव्हतं. त्यावर कोणी नाही म्हणत. त्यावर काही म्हणत. तो दारु पितो ना, तेही विष्ठा खाण्याच्या बरोबरच. दारु पिणारा माणूस हा जेव्हा नशेत असतो, तेव्हा त्याच्या तोंडात कोणी

शेणही टाकलं तरी त्याला ती खाल्ल्यासारखी वाटत नाही. अर्थात दारु आणि शेण यात तसुभरही फरक नाही असं वाटायचं. दारुही सडवूनच बनवली जाते. विष्ठा देखील काहीसा असाच प्रकार. त्यावर कोणीतरी म्हणायचं, तो कसाही असो, त्याच्या विद्येनं आराम लागते ना, ते महत्वाचं. बाकी गोष्टीची काही लेनदेण नाही.

गंगारामच्या घरी येणारा प्रत्येक माणूस हा कोणत्या ना कोणत्या रोगानं त्रस्त असायचा. पण त्यानं मंत्र म्हणत दिलेला अंगारा खाल्ल्यावर जसं त्याला काहीच झालं नाही असा धडधाकट बनायचा. त्या राखेत पोटॅश असून ते पोटॅशच पोटातील जंतू मारते, म्हणून बरं वाटतं याची जाणीव गावकऱ्यांना नव्हती. तसेच तो विविध रोगावर मारक असलेलू औषधी देतो याचीही कल्पना गावकऱ्यांना नव्हती. ते फक्त त्याच्या मंत्रावर विश्वास ठेवत.

एखादा भक्त सापडला रे सापडला की गंगाराम हळूहळू पावले पसरवत असे. प्रत्येक भक्तांना उतारा सांगतच असे. ह्या उताऱ्याला लागणारे सामान लिहून देई. ते कोणी आणायचे ते ठरवून घेई. त्यांनी सामान आणले तर त्यातील बऱ्याचशा गोष्टी दुकानात भेटत नसत. त्यामुळे त्याचे पैसे तो स्वतः घेई. उतारा काढण्याचे पैसे घेई. यात सामानाचं कमीशन त्याला भेटत असे. कधीकधी तो हवनही करीत असे. हवनाची त्यानं लिहिलेली लाकडं बाजारात मिळत नसत. ती लाकडं गंगाराम जंगलातून आणत असे. त्यांचे तो पैसे घेई. शिवाय आकतसाठी येणाऱ्याकडून तो पैसे घेई. डॉक्टर जशी फी आकारतो, तशी फी....... मात्र रोगी जरी दुरुस्त होत असला तरी गंगारामच्या या औषधी देण्याला कुणाचीच मान्यता नव्हती. जी मान्यता दवाखान्याला होती.

गंगारामकडे येणारी मंडळी ही चौकस असायची. ती बारा घाटची पाणी पेल्यागत सगळे दवाखाने फिरुन आराम न लागल्यास यायची. पण गंगारामच्या अंगातला देव त्याला भुत लागल्याचं सांगून त्याला क्षणार्धात दुरुस्त करायचा.

पाणबुड्या, नक्टोबा, आंबागड्या, वाघोबा हे नित्याचे गंगारामच्या तोंडातले शब्द. कोणाला कोणता झोंबला ते अंगातला देव सांगायचा. तशी संमोहन विद्याही त्याला येतच असावी. कारण एकदा त्याच्याकडे गेलेला माणूस त्याला उपचार होईपर्यंत सोडत नसे. त्या माणसाचे समाधान होताच तो माणूस त्याला कपडे घेवून देई. स्वतः मात्र गंगाराम ते कपडे मागत नव्हता. त्याचे म्हणणे एकच होते की निःस्वार्थ लोकांची सेवा करावी. देव आपोआपच त्याचं फळ देतो.

अंधश्रद्धेच्या बुरख्यात जगणारी माणसं देव देव करत बसलेली माणसं जंतूच्या प्रादुर्भावाने आजारी पडायची. कोणाला साधं गलगंड झालं तरी त्याच्याकडं जायची. त्यानं फुकलेल्या मंत्रावर व दिलेल्या पाण्यावर विश्वास ठेवून जगण्याचा मार्ग शोधायची. मात्र निर्णयला गंगाराम आवडत नव्हता. तो त्याचा द्वेष करायचा. तो लोकांना समजवायचा. त्याला बदमाम करायचा. मात्र गंगाराम त्याचा कधीच राग करीत नसे.

निर्णय गंगारामला बदनाम करायचा. त्याचं कारणही तसंच होतं. तो अस्पृश्य तर होताच, पण त्याचेकडे येणारी माणसं वेगवेगळ्या गावची जरी असली तरी वेगवेगळ्या जातीधर्माची होती. ते पाहून गावातील माणसं विटाळाचा नियम तोडतील असं निर्णयला वाटायचं. भेदभाव जर गावात टिकला तरच तो गावात राज करु शकेल, अन्यथा नाही असं त्याला वाटायचं.

गंगारामच्या घरी अस्पृश्यता भंग करणारा नियम जरी असला तरी तो गावातील सर्व नियम पाळत असे. गावात कधीच तो दहा वाजेपुर्वी जात नसे. सायंकाळी देखील तो घराच्या बाहेर पडत नसे.

निर्णयही त्याला तो पटत नसुन त्याच्या तोंडावर बोलला नाही. त्यालाही भीती होती की गंगाराम कधी एखाद्या वेळी त्याच्यामागं भुत लावून देईल. मग गोची होईल. परंतू तो समोरासमोर जरी बोलत नसला तरी पाठीमागून वार करीत होता. लोकांना भडकावत होता. त्यामुळं गावही कामापुरता मामा असाच व्यवहार ठेवत होता. निर्णयचा गावाला

भडकविण्यामागे अजून एक फायदा होता. तो म्हणजे त्याच्या पोटाचा. निर्णयचे पोट गावकऱ्यांवर अवलंबून होते. तो कथा करायचा, होम हवन वैगेरे सर्वकाही. कथेचे व मंदिराच्या दानाचे जे काही पैसे यायचे, ते सर्व पैसे निर्णय घ्यायचा. त्या पैशात त्याच्या कुटुंबाची गुजराण होत असे. जर गाव गंगारामच्या इशाऱ्यावर चालला, गंगाराम लोकांना बरे करत गेला, तर कोणीच घरात होम हवन शांती करणार नाही व आपोआपच आपली कमाई कमी होईल असं त्याला वाटायचं. म्हणून तो लोकांना भडकवीत असे.

दोघांचाही उद्देश एकच होता. पैसे कमविणे.......... गंगाराम वैयत्कीतून पैसा कमवीत होता. तर निर्णय होम हवन शांतीतून. गंगाराम लोकांना जास्त पैसे मागत नव्हता. मात्र निर्णय लोकांना लुटायचा. मात्र लोकांच्या हे लक्षात येवूनही लोकं त्याला काही म्हणत नसत. उलट त्याचे काम देवाचे आहे, ते पवित्र काम आहे असे म्हणून त्याचं कर्म चालवून घेत. एक शैतानाला दूर हाकलतो असे सांगून गावाला मुर्ख बनवीत होता, तर दुसरा देवाला प्रसन्न करुन देतो म्हणून मुर्ख बनवीत होता. दोघंही गावाला अंधश्रद्धेच्या तलवारीनं छाटायचंच काम करीत होते.

निर्णय गावात जातीयवादी विष पेरत होता. त्याच्या या जातीयवादी विचारानं प्रेरीत झालेली जनता गंगारामच्या विचारावर कसा विश्वास ठेवेल! त्यामुळं ती मंडळी निर्णयलाच साथ देत होती. जातीयवादी विचार पेरण्यासाठी खतपाणी घालत होती. गंगारामचे काम कितीही चांगले असले तरी तो अस्पृश्य असल्यानं लोकं त्याला मदत करीत नव्हते. त्याचं कारणही तसंच होतं. गंगाराम हा करनी करतो म्हणून अख्खं गाव घाबरायचं. त्यात लहानमोठे सर्वच. भुत जरी कोणी पाहिला नसला तरी त्यांचा भुतांवर विश्वास होता. त्यांना वाटायचं की भुतं पौर्णिमा अमावस्येला स्मशानात थयथय नाचतात. त्याचं कारणही तसंच होतं. भुतानं झपाटलेली माणसं जेव्हा गंगारामकडे यायची. तेव्हा तो चक्क सांगायचा. यांना भुतानं झपाटलंय.

देव जर आहे तर भुतंही असतातच. असा संकेत ठेवणारा समाज भुतांवर विश्वास ठेवणार नाही तर काय? मग शेतातही जायचे असेल तर समूहाने जावे लागे. अशातच होळीचा सण आला.

गावात सगळ्या प्रकारचे सण साजरे व्हायचे. आषाढी पौर्णिमा, शिवरात्री, वटपौर्णिमा या दिवशी या गावाला जत्रेचं स्वरुप यायचं. सगळ्या महिला वडाच्या झाडाला पुजत. गावात स्त्रीला दुय्यम दर्जा असला तरी पतीला चांगले आयुष्य मिळावे म्हणून वड पुजणे ही प्रथा सुरु झाली होती. तोच पती सात जन्म मिळावा म्हणून प्रत्येक स्री वडाच्या झाडाला फेऱ्या मारायची. तशा स्रिया तिळसंक्रांतीला वाणही वाटत. होळीला गावात फारच मजा यायची.

गावात जसे हिंदू होते. तसेच मुसलमानही होते. हे मुसलमान हिंदूच्या सणात सहभागी होत. तर हिंदू मुस्लिमांच्या सणात. सगळे गुण्यागोविंदाने मजा घेत घेत आपआपले उत्सव साजरे करीत. आपला साथीदार व्यसनीही असला तरी त्याच्या चांगल्या आयुष्यासाठी मंगलकामना करीत. स्रिया पुरुषांसाठी किती ही करीत असल्या तरी पुरुषांनी त्यांच्या जीवनातला अंधार दूर करण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. त्यांनी कधीच स्रियांची बुरखापद्धती बंद केली नाही..

तिळसंक्रांत असो की वटपौर्णिमा, काजळतीज असो की नवरात्र, स्रिया पुर्णतः हे सण साजरे करतांना स्वतःला झोकून देत. तसेच ईद आणि त्यातच रोजा पाळतांना मुल्लिम स्रियांही तिच भुमिका ठेवत. साऱ्या सणात स्रियाच पुढे राहायच्या.

सण साजरे करणे ही परंपरा होती. मग ते सण कोणत्याही धर्माचे का असेना. कोणी स्वतः तर कोणी दुषणं ठेवू नये म्हणून पतीच्या काळ्या कृत्याला, व्यसनाधिनतेला, त्याच्या मारकुंड्या स्वभावाला, त्याच्या अनेक विवाह करण्याला स्रिया विरोध न करता करनाचौथ किंवा वडाला धागा बांधण्यासारख्या गोष्टी स्रिया करीत. पतीची सहानुभूती मिळविण्यासाठी.

पण पती सहानुभूती देण्याऐवजी चटके देत असे. पुरुष  तिला विचारस्वातंत्र्य देत नव्हता. मुळात या गावातून त्यांनी स्रियांची सर्व स्वतंत्र्यताच हिरावली होती.

धार्मिक ग्रंथ पण अशाच विचाराची होती. धार्मिक ग्रंथांनीही स्रियांनाच बंधने घातली होती. स्रिया कोणत्याही जातिधर्माच्या का असेना, तिची संपत्ती ही तिची नसून ती पतीची मानण्याची पद्धत याच धार्मिक ग्रंथांनी रुढ केली होती. स्त्रीने पहिला पती काही कारणानं सोडून दुसरा केल्यास समाज तिला वेश्या म्हणत असे. त्याच पुरुषाने अनेक बायका केल्यास त्याचा आदर करीत. व्रतवैकल्ये न केल्यास समाज तिलाच दूषणे द्यायचा. पतीनेही व्रतवैकल्ये करावी पत्नीच्याही लांब आयुष्यासाठी असे विचारही काही स्रियांच्या मनात येत. पण नाईलाज होता. कारण त्या स्रिया स्वतंत्र्य नव्हत्या. जणू गुलामीचं जीवन जगत होत्या. स्री पुरुषांसाठी एवढं सगळं करीत असतांनाही या गावानं तिला बंदिस्त चौकटीत उभं केलं होतं. तिनं काम तर करावंच शेतात, व्यतिरीक्त घरी आल्यावरही चूल मूल सांभाळावं, तसेच पुरुषाने सांडासारखं गावात हिंडावं हा या गावचा नियम. स्रियांवर विविध बंधने लादली गेली. आता ही बुरखाच. तो न वापरल्यास तिचा अनन्वीत छळ. प्रसंगी तिची जाळपोळ आणि कत्तलही. वडीलधारी मंडळींसमोर लुगड्याचा पल्लू घसरता कामा नये. सौभाग्यवतीनं नऊ श्रृंगारानं नटावं. तर परीतक्तेने व विधनेने नटू नये. धर्माची सारीच बंधनं...... धर्म आजही या गावात कुराण आणि मनुस्मृतीच्या जोखडात फसलेला. तिळसंक्रांतीला वाण वाटला नाही तर आघात, वटपौर्णिमेला वडाला धागा बांधला नाही तर आघात. अशा साऱ्या बंधनाने बांधलेली स्री. तरीही पुरुषी वेदना. हे सारं पाहात होती कोमल. तिला वाटत होतं. का पाळाव्या ह्या चालीरीती? का करावे साजरे हे सण उत्सव? का स्रियांनी समाजात स्वतंत्र्यपणे वावरु नये? का स्रियांनीच आश्रीत असावे? का पतीच्या लांब आयुष्यासाठी स्त्रीनेच कामना करावी? का त्यांनीच रोजा पाळावा? का पती निधनानंतर त्यांनीच पांढरी साडी नेसावी? का बांगड्या फोडाव्या? का तिची मिळकतीची संपत्ती पुरुषांनी आपली समजावी? इत्यादी प्रश्न आजही कोमलच्या मनात होते.

जो धर्म स्रियांना सुरक्षितता प्रदान करीत नाही असा धर्म व त्या धर्माचे नियम पाळूच नये असं कोमलला वाटायचं. मनुस्मृतीने लहाणपणी वडीलाच्या, मोठेपणी पतीच्या व म्हातारपणी पुत्राच्या आज्ञेत वागावे असे सांगितले. पण पुरुषाला का बंधनं दिली नाहीत. याचा विचार तिला पदोपदी यायचा.

शिवरायांचा इतिहास ती अगदी प्राथमिक वर्गात शिकली होती. जिजाबाईच्या आज्ञेत शिवबा शेवटपर्यंत वागला. म्हणून त्याला स्वराज्याचं तोरण बांधता आलं नव्हे तर स्वराज्य स्थापन करता आलं. हे तिला पाठ्यपुस्तक सांगत होतं. हा इतिहास साक्षीला असतांनाही आम्ही स्रिया मनुस्मृतीवर का चालतो? हा प्रश्न तिच्या मनात संभ्रम निर्माण करणारा होता. स्वतः जिच्या उदरातून जन्म घेतला, तिला दूषणे देणारा हा समाज तिला आवडत नव्हता. जो समाज स्त्रीचा जन्म वाईट मानत असेल, त्या समाजात वडीलांना मुलीला जन्म देतांना सतऱ्यांदा विचार करावा लागत असे. पदोपदी अपमानास्पद गोष्टी. नशीबाच्या रेषेवर उभ्या ठाकलेल्या. नराधम पुरुष जेव्हा वासनेने पछाडतो. तेव्हा बलात्कार करुन तिला बळजबरीनं पत्नी बनवतो. हुंड्यासाठी आजही स्त्री छळली जाते नव्हे तर जाळली जाते. कधीकधी तिच्यासह तिच्या वडीलांचाही अपमान होतो. मुळात हे सगळं धर्मानं केलं. धर्मानं तिच्या साठी जगण्याची जागाच ठेवलेली नाही. हा तर गाव आहे बुरसटलेल्या अंधश्रद्धेच्या विळख्यात. स्त्रीभ्रुणाचा आदर करणारा पुरुष आज नाही. तो स्रियांच्या पोटातून पैदा होतो तरी...... या स्त्रीचा आदर का करीत नसावा? याचं आश्चर्य कोमलला नित्य वाटायचं.

निर्दोषच्याही मनात असे चित्रविचित्र प्रश्न त्रागा करीत. मुख्यतः त्या स्मशानात भुतं नाचतातच कसे? अन् गंगारामच्या घरी येणाऱ्या लोकांच्या अंगात भुतं येतातच कसे=याचं आश्चर्य त्यालाही वाटायचं. कधी एखाद्या रात्रीला स्मशानात जावून पाहावे की भुतं खरंच नाचतात का? असंही कधीकधी त्याला वाटायचं. पण भीतीने कोणाला सोडलंय. तशी त्यालाही भीती वाटायची.

असाच तो होळीचा दिवस. गावातील लोकं दरवर्षी होळी पेटवायचे. आजही होळी पेटलेली होती. दरवर्षी लोक होळीजवळ खेळायचे. होळीच्या उबेत थंडीचा तेवढा जोश जाणवायचा नाही. काही लोक एखाद्याच्या शेतीतून ओला हरभरा आणून तो होळीजवळ भाजून हरभऱ्यावर ताव मारत मारत रात्र काढायचे. तर काही लोक रात्र न जागणं जमल्यानं झोपायचे.

होळीच्या दिवशी होळीत टाकण्यासाठी सर्व लोक झोपल्यावर त्या लोकांच्या अंगणातील किंवा शेतीतील सरपणासाठी असलेली लाकडं आणून हे लोक होळीत टाकायचे. कोणी तर मौज घेण्यासाठी खाटाही आणायचे. पण ही खाट आणले गाढ झोपेत असलेल्या लोकांना कळायचं नाही.

निर्दोष होळीजवळ बसला होता. उष्णतामान पाहता उन्हाळ्याचे दिवस सुरु झाले होते. तरीही थोडीशी थंडी होतीच. होळीजवळ निर्दोष सह सर्व मित्र बसले होते. आबालवृद्ध घरी झोपायला निघून गेले होते. सर्वांनी एकमेकांना ठरवलं चना आणायला शिवारात जायचं.

निर्दोषही त्या मुलांमध्ये बसला होता. त्याच्या पायात चप्पल नव्हती. चना आणायला शिवारात जाणं म्हणजे काट्याचा रस्ता. शिवाय रात्र. रात्रीच्या वेळी पायाखाली साप विंचू येण्याची भीती. तसेच दात गाडणारे उंदीर घुस. शिवाय चप्पल जर असेल तर या सर्वांपासून रक्षण होईल. म्हणून निर्दोष म्हणाला,

"मित्रांनो, मी चप्पल घालून येतोय."

निर्दोष घरी गेला चप्पल आणण्यासाठी. त्यानं पायात तुटकीफुटकी चप्पल घातली. घरची सर्व मंडळी गाढ झोपेत होती. तसा तो मित्रांना आश्वासन दिल्याप्रमाणे मागल्याच पायी परत आला. तो होळीजवळ आला. तर तिथं कोणीच नव्हतं. तसा तो होळीजवळ बसला. एकटाच बसला होता तो. मनात विचार होता. 'आपण एकटेच बसलो आहे. मित्र कुठे गेले असतील? चना आणायला गेले की घरी गेले असतील? पण त्यांनी तर चना तोडायला जावू असं

सांगितलं. नक्कीच ते चना तोडायला गेले असतील. माझ्यासाठी थांबले नाहीत. आता घरी जावू की शिवारात. पण आपण एकटेच. रात्रीच्या अंधारात कसे जाणार शिवारात. '

निर्दोष होळीजवळ बसून विचार करीत होता. त्याला वाटलं की आपण घरी न जाता शिवारात जावं. शेवटी मनाचा निश्चय करुन निर्दोष निघाला शिवारात. समजा मित्र शिवारात नसतील तर आपण एकट्यानंच चना आणायचा.

निर्दोषनं रानात जाण्याचा विचार पक्का केला. पण मनात मात्र भीती होती. कारण रानात जातांना ती एकच वाट होती. ज्या वाटेनं स्मशान लागत होतं. त्या वाटेनं कित्येक मुडदे गाडले होते. शिवाय या स्मशानात पौर्णिमा अमावस्येला भुतं नाचतात असं सांगितलं जात होतं. शिवाय गंगारामच्या घरी अंगात येणारी भुतं निर्दोषनं पाहिली होती. ती मंडळी भुतं आल्यागत डोलायची व म्हणायची,

"मी फलाण्या झाडावरची वाघी मांगीण होये. हा रस्त्यानं जात असतांनी मले जेथं जाळलं, तेथं मुतत होता. म्हून मी याले धरलं."

असले विचित्र संवाद. त्यामुळे निर्दोषही घाबरलेला असायचा. पण आज निर्दोषनं त्याच रस्त्यानं जाण्याचा निर्धार केला. कदाचित त्याला वाटलं की हे मित्र स्मशानात गेले असावेत. तशी त्यानं एक काडी हातात घेतली आणि तो निघाला.

आज होळी पौर्णिमा होती. गावाला लागूनच शेती होती. त्यांना वाड्या म्हणत. त्या वाड्यांमध्ये गहू पेरलेला होता. गहू निसवाच्या कक्षेत होता. त्यामुळं तो भाजायच्या कामी येत नव्हता. मित्र मात्र दिसत नव्हते.

काठी....... भीती नष्ट करण्याचा आधार. तसं पाहता ती काठी लहानशी होती. त्यामुळं ती काठी कोणत्याच कामाची नव्हती. पण तीच काठी भीती नष्ट करण्याचा पर्याय होता.

कदाचित ती काठी म्हणजे त्याचा आधार होती. त्या काठीनं त्याच्या अंगची भीती थोडीशी नष्ट झाली होती.

काही अंतरावर स्मशान होतं. निर्दोष एकटा निघाला खरा. त्याच्या हातात काठी होती खरी. पण भीतीही तेवढीच वाटत होती.

गावाच्या जवळून गावाला वेढून एक नाला होता. त्या नाल्याला पुल बांधला होता. या पुलाच्या खाली चोर लपतात असे म्हणत असत. हे चोर रात्री अपरात्री लोकांना लुटतात असे लोकं म्हणायचे. तसा निर्दोष या पुलावरून जात असतांना त्या चोरांचा विचार आला. पण आपणच तर आज चोर आहोत चनाचोर. त्यामुळं त्या चोरांची भीती वाटली नाही. शिवाय आपल्याजवळ काय आहे तर चोर आपल्याला काही करणार.

निर्दोष पुलावरून जात होता. आता पुल पार केला होता. या पुलाच्या खाली असलेले काजवे चमकत होते. तसाच रातकिड्यांची किर् किर् आवाज येतच होता.

पुल पार करताच एक आंब्याचं झाड लागलं. या आंब्याच्या झाडाखाली थोडे बाजूला त्याच्या आजीला अग्नी दिला होता. तसं पाहता ती आजी आंब्याच्या झाडावर थयथय नाचते असे लोकं म्हणायचे. कोणीतरी त्या आजीला तेथं नाचतांना पाहिलं होतं. तसेच आजी मरायच्या पुर्वी एक लावळीन याच फांद्यांवर नाचत असतांना या झाडाचा फांदा पडला होता. तो फांदा त्या झाडाखालून जात असणाऱ्या माणसाच्या अंगावर पडून तो मृत्यू पावला होता. असे कधीकधी गावकरी सांगत. ही आपली आजी येईल व ती नातूही समजणार नाही. ओळखणार नाही असंही निर्दोषला आज वाटत होतं. कारण भुताला रिश्तेनाते समजत नाहीत असंही गावकऱ्यांनी काही दिवसांपूर्वी सांगितलं होतं. तसं त्यानं ते एकेकाळी ऐकलंही होतं.

पुल पार करताच निर्दोषनं झाडाकडं पाहिलं. त्या आंब्याच्या झाडाची रस्त्यावर आलेली तुटलेली फांदी पाहिली. ती फांदी तुटली होती. फक्त बुंधा तेवढा शिल्लक होता. तशी ती आजी ज्या ठिकाणी जाळली होती. त्या ठिकाणी आता व्रण नव्हतं, तर तिथं गवत उगवलं

होतं. तसं त्यानं इकडं तिकडं पाहिलं. झाडाच्या फांद्या अक्राळविक्राळ पसरल्या होत्या. झाडावरही भुतासारखं काहीच दिसलं नाही. तद्वतच त्याला वाटलं की स्वमुत्राचा टिळा कपाळावर लावल्यास भुतं दूर पळतात. त्यानं ती भीती घालविण्यासाठी तेच केलं. त्याला माहित होतं ही अंधश्रद्धा आहे तरीही..... तसा तो पुढे गेला.

इथून खऱ्या अर्थानं स्मशान सुरु झालं होतं. तसं त्याला अचानक आठवलं. गंगारामचं घर आणि तो भुत. ते भुत एकदा बोललं होतं,

"मी वाघी मांगीण हाये. हा रस्त्यानं जात असतांनी मले जेथं जाळलं होतं, तेथं मुतत होता. म्हून मी याले पकडलं."

असं आठवताच तो घाबरला. त्याला वाटलं की बेकारच इकडं आलो.

निर्दोष पुढं निघाला. त्याला भीती वाटत जरी असली तरी तो निर्धास्तपणानं वाट चालत होता. रस्त्याचा किर् किर् आवाज त्याची शांती भंग करीत होता. चंद्र थोडा मावळतीला टेकला होता. पण चंद्राच्या प्रकाशात रस्ता पूर्णतः स्वच्छ दिसत होता. क्षणातच स्मशान जवळ आलं. तसा तो त्या स्मशानातील मुदडे जाळलेल्या जागेकडे पाहू लागला.

दुरुनच अंदाज घेत असतांना त्याला नुकतीच ती प्रेत जाळलेली जागा दुरुनच दिसली. तिथे काहीतरी चमकत असल्याचं जाणवलं. थोडी भीती जाणवलीच. नेमकं काय चमकत असावं. बाजुलाच एक झुडूप. त्या झुडपावरही चमकत आहे. कपाळावर टिळा लावल्यावरही हे काय? क्षणभर निर्दोषच्या मनानं खल केला. त्याने पाठ्यपुस्तकात पिवळा फॉस्फरस स्वतः जळतो हे वाचले होते. कदाचित तो हाडातून निघालेला पिवळा फॉस्फरस तर नसावा, जो रात्रीच्या अंधारात चमकत आहे. त्याच्या मनात विचार आला. तसं त्याला आठवलं.

नुकतेच आठ दिवस झाले होते. गावात मैयत झाली होती. ते प्रेत याच जागेवर जाळले होते. सारं त्याला आठवत होतं. कदाचित राख गोळा करतांना एखाद्या हाडाचा तुकडा राहिला

असेल, तोच चमकत असेल. असंही निर्दोषच्या मनाला वाटलं. पण ते झाडावर काय चमकत असेल? तिथे कशी हाडं ठेवली असतील. पण नको, आधी शहानिशा केलेली बरी. नाहीतर आपली भीतीच त्या भुताच्या पहिलं आपला जीव घेईल. तसा हिंमतीनं तो पुढे सरकला. काही वेळातच तो जळत्या जागेवर पोहोचला. मनात मात्र थोडीशी भीती होतीच.

ती जागा........ खाली हाडाचे छोटे छोटे तुकडे. तुकडे चमकत होते. तर झाडावर हार होते. त्या हारातील चमकी चमकत होती. तसा तो हारं पाहून निर्दोष स्थिरावला. त्याच्या मनात होती नव्हती पुर्ण भीती आता कोसो दूर पळाली होती. ती हारं मागे सोडून निर्दोष पुढे निघाला. पुढं एक मोड होती. याच मोडीवर त्याच्या मित्राची आजी गाडली होती. तिला बसलेल्या अवस्थेत गाडले होते.

स्मशानी वाट...... साऱ्याच स्मशानाच्या गोष्टी आठवत होत्या त्याला. निर्दोष मोडीवर आला. तोच पलिकडून त्याचे मित्र, हातात चण्याचे धसकट घेवून येत असलेले दिसले त्यांना पाहताच निर्दोषच्या जीवात जीव आला. त्याला हायसे वाटले. तसा त्यांना पाहताच निर्दोष म्हणाला,

"अरे, मी तुम्हाले थांबाले सांगितलं होतं ना."

"होय."

"मंग.... मंग तुम्ही का थांबले नाय."

"अरे आम्ही तुही बरीच वाट पाहिली. पण तू आला नाय लवकर. म्हणून आम्ही निघालो."

बारावी पास झाल्यावर निर्दोषच्या भाषेत बदल झाला होता. नव्हे तर करावा लागला होता. कोमलही आता शुद्ध बोलत होती. कारण शहरातील महाविद्यालयात चांगली भाषा बोलणारी मुले होती. पण गावात आजही त्याचे मित्र गावचीच भाषा बोलायचे. म्हणून नाईलाजाने त्यालाही ती भाषा बोलावी लागायची.

"मी पण येतो म्हणलं नं." तो म्हणाला.

"हं, आतं का बिघडलं. झाली न आपली भेट. आतं जावू आन् भाजू चना."

"पण मी किती घाबरत आलो. वरुन हे स्मशानी वाट."

"त्यात का घाबरल्यासारखं. आम्ही तं आलो."

"अरे, तुम्ही एवळे सगळे. कसे घाबरान. पण मी एकटा नं."

"अं, आतं घाबरु नोको. आम्ही हाओ."

त्याला हायसं वाटलं मित्र भेटताच. ते परत आले होळीजवळ. त्यांनी त्या चन्याचा हुरा होळीजवळ भाजला आणि खात खात रात्र काढू लागले.

पहाटेचे चार वाजले होते. तशी त्यांना झोप यायला लागली होती. त्यामुळं की काय, मित्र आपआपल्या घरी गेले होते. फक्त तोच एक शिल्लक होता. तो एकटाच राहून भाजलेले चणे खात बसला होता. तो दाणा पक्ष्यागत टिपतांना त्याला मजा वाटत होती.

पहाटेचे साडेपाच वाजले होते. मोहोल्यातील मंडळी जागी झाली होती. आबालवृद्ध बाया, माणसे, पशुपक्षी सारेच उठले होते. पक्ष्यांचा किलबिलाट त्याच्या कानी येत होता. तसा गावचा एक वयस्क माणूस होळीजवळ येवून बसला. त्यानं भाजलेला हुरा पाहिला. तसे निर्दोषचे तोंडही पाहिले. ते तोंड काळे झाले होते. त्याचबरोबर हातही. तसा तो म्हणाला,

"काय खातो? "

"चना खातोय."

"कोठून आणला? "

"वावरातून."

"चोरुन आणला का? "

निर्दोष त्याच्या प्रश्नावर चूप झाला. तसा पुन्हा प्रश्न.

"चोरुन आणला का? "

"होय. पण मी नाय आणला."

"ते झोपायला गेले. इथं भाजला दिसला. मी खात बसलो."

तो वयस्क माणूस गप्प झाला. तोही आता चन्याचा हुरा होळीजवळ बसून खावू लागला.

आता तर त्यानं कहरच केला होता. रात्र जागविण्यासाठी आणलेला चना. सकाळ झाली होती. तसं त्यानं घरुन सुप बोलावलं व आता तो चना पाखडू लागला होता.

ते सुपही त्याच्या हातात थयथय नाचत फेर धरत दाणे व फोलपटं वेगळे करु लागला. ते दाणेही वेगळे होण्यासाठी नाचत नाचत फेर धरु लागले. थोड्याच वेळात ते दाणे वेगळे झाले. ते आयते दाणे त्याने घरी नेले. तेव्हा मेहनत करे मुर्गा व अंडा खाये फकीर अशी गत निर्दोषसह मित्रांची झाली होती. तो हुरा भाजण्यासाठी काट्याकुट्यात जावून ज्यांनी मेहनत केली. साप विंचू व भुताची भीती न बाळगता, त्यांना तो चना मिळाला नाही आणि भलताच माणूस त्यावर ताव मारत त्याला आपल्या घरात घेवून गेला होता. आयत्या बिळात नागोबासारखे......

कोमलच्या मनात जातीयतेची चीड निर्माण झाली होती. तशी ती अस्पृश्य नव्हती. पण मनुस्मृती वाचनानं तिच्या मनातील विचारांची प्रगल्भता वाढली होती. मनुस्मृतीतील दलित, चांडाळ तसेच स्रियांना हिन समजणारे लेखन तिच्या मनाला स्पर्शून गेले होते.

तिला अस्पृश्यांबद्दल जिव्हाळाही वाटला नसता जर मनुस्मृती वाचली नसती तर..... कारण मनुस्मृतीत स्रिया व अस्पृश्यांबद्दल लेखन झालं होतं. हवं तर समाजही त्या मनुस्मृतीच्या विचारानं चालत होता.

निर्दोषवर निरतिशय प्रेम होतं तिचं. त्यात ते एकाच महाविद्यालयात असल्यानं कधीकधी ते महाविद्यालयात बुट्टी मारुन फिरायलाही जात. हळूहळू त्यांचं प्रेम वाढत चाललेले होते. त्यांना माहित होतं की याचा अंत हा शेवटी मृत्यूतच होणार. तरीही ते प्रेम करीत होते.

कोमलच्या हृदयात काही गोष्टी स्पर्शून जात होत्या. तिला वाटायचं की माणसानं आपल्या स्वार्थासाठी हा विटाळ बनवला आहे. जणू या स्वार्थाने माणुसकीची हत्या केलेली आहे. माणूसाने स्वार्थ जर सोडला असता तर हा विटाळ राहिला नसता.

गुलामगिरीच्या कारावासातून मुक्तच होवू पाहात नाहीत लोक. स्वातंत्र्याच्या नंतरही स्वातंत्र्याचा अट्टाहास नाही करत लोक. हे लोक केवळ स्वार्थासाठी एकमेकांचा जीव घेण्यास तयार आहेत. नव्हे तर दैवावर विसंबून राहून आपल्या जीवनाचा सत्यानाश करीत आहेत. हे लोक देव जे करेल ते असेच समजतात. मग या देवाला आतापर्यंतचा अत्याचार दिसला नाही का? एवढी पुजा अर्चना करुन या लोकांना काय मिळालं. आज आपल्याच माणसावर हल्ला करुन आपल्याच मंडळींनी तुम्ही आमचे नाहीत ही भावना रुजवली. इतिहास पुर्णतः बदलण्यासाठी प्रयत्न केला. देश आपला आहे, गाव आपला आहे असं समजणारी माणसे. पण या माणसांनी आपल्याच बांधवांना अन्यायाचे चटके दिलेत. स्रियांना केशवेपण, सतीप्रथा तर इथल्या अस्पृश्यांना झाडू व गाडगा दिला. हे लोक त्या धर्ममार्तंडांच्या नादी लागून अख्ख्या गावाची राखरांगोळी करतात. हे बरोबर नसलं तरी लोकांना हेच बरोबर वाटतं. आपलं स्वार्थानं किती नुकसान झालं हे न पाहता केवळ धर्माच्या नावानं एकमेकांना किती छळतात हे लोक. त्यांना यातच किती मोठा आनंद वाटतो.

संपुर्ण अस्पृश्य जाती या देशात अधिवास करीत असतांना इथला समाज त्यांना वेठीस धरतो. त्यांचा काहीही गुन्हा नसतांना इथला समाज स्वतःला शहाणा समजत त्यांना तुच्छ समजतो. इंग्रज भारतात आले. त्यांनी सुधारणा आणल्या. गावागावातून आणि शहरातून सतीप्रथा बंद केली. कमरेचा झाडू आणि गळ्यातील गाडगा काढला. विटाळंही काढला. अन्

हे मुर्दाड गाव.... विटाळ संपवीत नाही. आजही तुच्छ परंपराच पाळतो. आजही अस्पृश्यांना गावात पाय ठेवायला बंधन. आजही सतीप्रथा बंद होवूनही हुंड्यासाठी स्त्रीला जाळणे. यावरुन वाटतं की आपल्या गावासारखी देशात कितीतरी गावं असतील की जिथे आजही स्त्रीजातीला व अस्पृश्यांना योग्य स्थान नसेल. तेव्हा असं वाटतं कधीकधी की पुन्हा या देशातच कमरेला गाडगा व गळ्यात झाडू येईल की काय?

आम्ही भारतीय आहोत. आम्हाला इंग्रज नको होते. आम्हाला मुस्लिम आर्यही नको होते. पण आम्ही भांडखोर. लहानपणी चतकोर पोळीसाठी भांडणारे मोठेपणी एक फुट जागेसाठी भांडतो. कधी पतंगासाठी भांडतो. कधी स्वार्थासाठी आत्महत्या करतो. मरण स्वस्त झालं असं वाटतं. आमचे सैनिक देशातल्या सीमेवर दिवसरात्र राबतात डोळ्यात तेल घालून. ते रात्रंदिवस झोपत नाहीत. अन् आम्ही सुख आहे म्हणून भांडतो. महिलांवर रोजच बलत्कार. वर्तमानपत्रात तशाच गोष्टी दररोज येतात. तरीही माझा गाव सुधारत नाही.

आज आम्ही प्रजासत्ताक असलो तरी ते प्रजासत्ताक पण गावाच्या बाहेर आहे. आम्ही फालतूच वर्गात म्हणतो. भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत. पण आम्ही प्रत्यक्षात कोणाला भगिनी समजत नाही. रस्त्याने जात असतांना जर सुंदर तरुणी दिसलीच तर तिला छळतो जाणूनबूजून. देशातही भेदभाव मिटला असला तरी गरीब श्रीमंत भेदभाव सुरु झाला आहे. पैशानं गब्बर झालेली माणसं सर्रास गुन्हे करीत आहेत. वकील लावून सर्रास न्यायालयातून बाहेर पडत आहेत. पुन्हा गुन्हे करीतच आहेत. त्यांच्या गुन्ह्याला लगाम लावू शकत नाहीत. गरीबांजवळ लढायला पैसा नसल्यानं ते चूप बसतात. लढायला पैसा पुरत नाही. कारण जिथं दोनवेळची भूक मिटवता येत नाही, तिथं अन्यायासाठी लढणं दूर. पण ते देशाचं झालं. आपल्याला फक्त आपला गाव पाहायचाय. आपल्याला फक्त आपला गाव पाहायचाय.

आज आमच्या स्वार्थापणाने व आमच्या आपापसातील भांडणाने देश इंग्रजांनी गुलाम केला होता. मुस्लिम आणि आर्यांनीही गुलाम केला होता. आम्ही भावूक आहोत खरे. पण हे

आमचे भावूकपण आमच्या काही कामाचं नाही. हे भावूकपण त्या सीमेवर असायला पाहिजे होतं. जिथं दोन सख्खे भाऊ भारत अन् पाकिस्तान भांडत आहेत. चीन माकडासारखा केळी फस्त करीत आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळालं होतं. पुरती गुलामी नष्ट झाली होती. सर्वत्र सुधारणा झाल्या होत्या. काही ठिकाणी अंशीक सुधारणा झाल्या होत्या. पण आता इंग्रजांची गुलामी जावून देशात श्रीमंतांची गुलामी आली होती. ती फोफावत चालली होती. पुर्वी इंग्रज अत्याचार करीत होते. आता आपलेच बांधव अत्याचार करायला लागले होते.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी क्रांतीची मशाल पेटवली होती. त्यानुसार परीवर्तन झालं होतं. गावोगावचा विटाळ कोसो दूर पळाला होता. लोकं दहा वाजण्यापुर्वीच गावात जावू लागले होते. नव्हे तर त्या चवदार तळ्याच्या आंदोलनातून गावच्या सार्वजनिक पाणवठ्यावर पाणीही पिवू लागले होते. मंदिरातही देवपूजा करायला स्वातंत्र्य मिळालं होतं. आता अंगण अपवित्र होत नव्हतं. वा कामाच्या ठिकाणी हेळसांड होत नव्हती. विटाळाचा शहरात नामोलेख नव्हता. पण काही गावात आजही जातीयवादी शक्ती होत्या. त्याच शक्ती अस्पृश्य स्पृश्य भेदभाव मानायला लावत होत्या.

कोमल आणि निर्दोष ज्या शहरातील महाविद्यालयात शिकत होते. त्या महाविद्यालयातील वाचनालयात भरपूर पुस्तके होती. जी पुस्तकं या जातीयवादी तत्वाला कसा सुरुंग लावायचा. याची प्रेरणा देत होती. तिथे येणाऱ्या वर्तमानपत्रातून सत्य काय ते उमगत होते. तसेच देश कुठे चाललाय आणि आपण कुठे आहोत हे समजत होतं.

निर्दोषच्याही वाचनातून या गोष्टी बऱ्याच वेळी आल्या होत्या. त्यालाही गावासाठी बरंच काही करावेसे वाटत होते. पण बंधनं होती.

दोघांचेही मायबाप त्यांना शिकविण्यासाठी धडपड करीत होते. त्यांना माहित नव्हतं की त्या दोघांचं आपापसात प्रेम असेल.

कोमल बघता बघता उपवर झाली होती. त्यामुळे तिच्या वडीलांना तिच्या विवाहाची चिंता पडली होती. अलिकडं समाज परीवर्तनानं विवाहामध्येही परीवर्तन आलं होतं. आधी मायबाप विवाहासाठी स्वतः मुलगी मुलगा पसंत करीत. पण आता मुलं मुली मायबापांना न विचारता स्वतःच आपला जोडीदार निवडत असत. पण गाव तर जुन्या रितीरिवाजानं चालत होता. त्यात जोडीदार निवडीला स्वातंत्र्य कसं मिळणार. त्यातच मुलामुलींचे मत कोण घेणार! ज्यांना आयुष्यभर सोबत राहायचं. त्यांच्या विवाहाचा निर्णय खुद्द मायबाप घेणार. हे विसंगत वाटत असलं तरी आजही ही प्रथा गावात सुरु होती. या गावातील मायबाप मुलामुलींसाठी त्यांचे विवाह करतांना त्यांचे मत विचारात न घेता वरवधू शोधत होते.

साहजिकच अख्ख्या गावात जी प्रथा होती. त्या प्रथेला फाटा देईल कोण? कोमलच्याही मायबापानं तेच केलं. कोमलसाठी बिरादरीत एक मुलगा पसंत केला. त्यासाठी तिचं मत त्यांनी घेतलं नाही. दाखविण्याची तारीख ठरवली होती. तसा तो मुलगा तिला पाहायला येणार होता.

कोमलची धडपड आईला माहित होती. पण कोमलचं प्रेम अद्याप आईला माहित नव्हतं. तिला फक्त तिचं शिक्षण पुर्ण करायचं होतं. तसं आईलाही ते भेदभाव करणारं गाव सुधरवायचंच होतं. त्यामुळंच तिला तसा मुलगा तिच्या विवाहासाठी हवा होता. जो या समाजाशी लढतांना तिच्या आड येणार नाही. पण पती तर स्रियांना चूल आणि मूल करुन ठेवतात. परंतू मुलगी तर उपवर झाली. विवाह जर झाला नाही तर गाव आपल्याला दुषणे देईल. म्हणून मायबापानं कोमलचा विवाह निश्चित केला होता.

पावणे पाहायला येणार होते. त्यामुळं कोमलला त्या दिवशी घरी राहाणं भाग होतं. तशी आई कोमलला म्हणाली,

"कोमल बेटा, उद्या घरी राहशिन."

"कशाला? " माहित नसल्यानं कोमल म्हणाली.

"अगं तुले पावाले पावणे येणार हायेत."

"पावणे! कुठचे? "

"सावरगावचे."

"काय करतो मुलगा? "

"मुलगा शेती करते. शेती हाय लय मोठ्ठी. दोन जोड्याईची कास्तकारी हाये. शेतीत गडी माणसं सर्वकाही."

"मंग."

"आतं तू लग्नाची झालीस. म्हून आम्ही ईचार केला का तुह्या लगन करुन टाकावा. चांगला मुलगा गवसला म्हून ठरवलं."

"अगं पण मला विचारलं का एखादा शब्द."

"म्हंजे, तुले ईचारावंच लागन का? "

"हो, मले ईचारावंच लागन नाय तं का? "

"पण पोरी, आम्ही कोणी नाय का तुह्ये."

"हो पण आई, मला त्याचेसोबत जीवनभर राहायचं आहे. मग मला विचारायला नको."

"पण पोरी रिश्ता चांगल्या घरचा हाये. नगं म्हणू नोको."

"आई माझ्या जीवनमरणाचा प्रसंग हाये."

"म्हंजे, तुले आमचा काईच ईचार नाय."

"हो आहे. पण........"

"पण बीन काय नाय. उद्या तुले सुट्टी मारावाच लागन. आमाले तोंड दाखवाले जागा तरी रावू दे. तुले पावाले पावणे येवून रायले. त्याईच्यासमोर एकदा तरी हजर राय. मंग तुले जे कराचं ते करजो."

"ठीक हाय, मी सायंकाळी सांगते."

तशी ती चिंतेत पडली. तिचं निर्दोषवर अतिशय प्रेम होतं. ती प्रेमच करीत नव्हती तर तिचं ध्येयही ठरलेलं होतं. त्यामुळं आईच्या बोलण्याला कसा होकार द्यावा. याचा विचार तिला येत होता. कसेबसे कोमलने आपले काम उरकवले आणि ती महाविद्यालयाला जाण्यासाठी तयार झाली. हळूच निराशेनं ती आईला म्हणाली,

"येते आई मी कॉलेजमधून."

"ये, हं."

रस्त्यानं ती चालत जात होती. तसा विचार तिच्या मनात आकार घेत होता. आपण प्रेम केलं त्यांचेशी. आणाभाका घेतल्या. त्यांच्या मनात स्वतःविषयी मायाजाळ निर्माण केला. तोही विटाळानं पछाडलेला. विटाळ त्याच्याही टाळक्यात. त्यालाहीी गावातील विटाळ दूर करायचाय. मलाही त्याला मदत करायचीय. अशा जणू शपथा घेतल्या दोघांनी. त्याचं काय? अशानं विटाळ कसा दूर होईल. नाही नाही, निर्दोषला सोडायचं नाही. तोच माझं ध्येय पुर्ण करु शकेल. माझ्या स्वप्नांना आकार देवू शकेल. असं एक मन तिला सांगत होतं. तर दुसरं मन तिला दुसऱ्या गोष्टीकडं वेढावत होतं. दुसरं मन म्हणत होतं,

'कशाला पछतावतेस बाळ, अगं लग्नानंतर प्रेम राहात नाही. स्वार्थ येतो अंगात. शैतानासारखा वास करतो अंगात. मानवी मनाला थारा नसतो तेव्हा. भावना आपोआपच मृत होतात. मग निरतिशय प्रेम करणारी ही अक्राळविक्राळ बनतो. त्यांच्यातही दानव शिरतो. प्रेम कुठंच दिसत नाही. ध्येय तर नाहीच नाही. मग तू जर निर्दोषवर प्रेम जरी करीत असेल आणि

तो जर करंटा निघालाच तर प्रेम तुटेल. तर धेयही शिल्लक राहणार नाही. शेवटी तो दुसऱ्या जातीचाच ना. '

रस्त्यानं जाता जाता दुसराही विचार आला. आपण आपलं प्रेम जाहिर करु शकत नाही. शिवाय पळून जावून लग्नही करु शकत नाही. पळाले तरी समाज आपल्याला सोडणार नाही. जगलोच तर जगू देणार नाही. हत्या करेल समाज. उरेल फक्त आठवणी. यापेक्षा आत्महत्या केलेली बरी. पण आत्महत्या तरी कशी करणार? मी मायबापाची एकुलती एक मुलगी. त्यांच्या काळजाचा तुकडा. माझे मायबाप किती दुःखी होतील. दिव्याच्या पणतीसारखं जपलं त्यांनी. कुठंही काटा रुतू दिला नाही. बाहेरही नाही, नाही काळजातही. मग मी का बरं त्यांना दुःख देवू. शिवाय मी मेल्यावर तरी ते जीवंत राहू शकतील काय? अर्थात हे पापच. मला त्या दोन जीवाचं पाप लागेल. त्यापेक्षा जगलेलं बरं. वेळ आहे सायंकाळपर्यंत. सायंकाळी होकार नकार द्यायचा आहे. तोपर्यंत विचार करु.

ती महाविद्यालयात गेली. सगळं मित्रमंडळ मिळालं. ती त्यांना टाळत होती. पण आज कोणाच्याच बोलण्याकडं तिचं लक्ष नव्हतं. तिला कोणाचीच काळजी नव्हती. तशी मोना म्हणाली,

"अगं कोमल, काय झालं? अशी गप्प का? "

"अगं काही नाही गं सहजच."

"सहज म्हणजे? नाही तू दररोज हसतमुख असतेस अन् आज उदास का? काय घडलं असं? "

"नाही गं सहजच."

"नाही नाही. काहीतरी नक्कीच आहे. सांग. सागितल्यानं मन हलकं होतं. काहीतरी उपाय, नक्कीच निघतो. सांग काय घडलं ते."

मोना तिच्या कॉलेजातील मुलगी. तिची खास मैत्रीण. मनमिळावू स्वभावाची. अत्यंत गरीबीतून आलेली. पण अभ्यासात हुशार होती ती. कोमलही हुशारच. म्हणून ती तिची मैत्रीण बनली होती. ती तिच्याशी बोलायची.

महाविद्यालयात सगळं मित्रमंडळ सुसंपन्न घरचं. कॉलेजात येऊन निव्वळ हुल्लडबाजी करण्यात त्यांचा दिवस जात असे. पण मोना त्यातील नव्हती. कोमल ध्येयानं अभ्यास करायची. मोना मात्र गरीबीनं. कोमलला गाव सुधारायचं होतं. तर मोनाला घरची आर्थीक परीस्थिती. मोनाच्या म्हणण्यानुसार ती मोनाला आपली कहानी सांगू लागली.

"हे बघ मोना, आमचा गाव अजून सुधारलेला नाही. आजही गावातला विटाळ संपलेला नाही. आजही त्या माणसांच्या घरात अजून सुर्य निघालेला नाही. बाबासाहेबांनी संविधान लिहिलं. परीवर्तन अख्ख्या देशात झालं पण आमचा गाव ह्या परीवर्तनाला मानत नाही. आजही आमच्या गावात परिवर्तनाचे वारे वाहात नाहीत. शिवाय ज्यांना विटाळ नको आहे. तेही लोक आंदोलन करीत नाहीत. हा विटाळ नष्ट व्हावा हेच माझे ध्येय आहे. पण.......”

''पण काय? "

"पण या परंपरेला तोडण्याची ताकद माझ्यात नाही.”

"का बरं. का ताकद नाही. तुझ्यात माझ्यात साऱ्यात ती ताकद आहे.”

"पण आपण तर स्रिया आहोत. आपली ताकद आपल्या गुडघ्यात. गावातील लोकांचं सोड. खुद्द घरातील लोकंच म्हणतात की स्रियांनी चूल आणि मूल सांभाळावं. सगळे मनूचे कायदे. मनू मरुन एवढे वर्ष झाले तरी.”

"अगं पण, तुला काय करायचं मनूचं आणि तुझ्या मायबापाचं म्हणणं तर बरोबर आहे. अगं, तुला ज्यावेळी मदतीची आवश्यकता असेल, तेव्हा तो अस्पृश्य समाज धावेल तरी का? तुझे घाव भरण्यासाठी तरी..... तुझे अश्रू पुसण्यासाठी तरी..... सांग नाही ना धावणार. मग तुलाच

का त्यांच्याबद्दल सहानुभूती. अन् आताचा नको विचार करु. पुढचा कर. काय करतो मुलगा याचा विचार कर. सांग काय करतो मुलगा? "

"अगं शेती आहे. खुप सारी शेती आहे म्हणे. दोन जोड्याची कास्तकारी आहे म्हणे. गडी माणसं सर्वकाही."

"मग काय कमी आहे. तू होकार दे लवकर. मी तुझ्या जागी असते तर पटकन हो म्हटलं असतं."

"हो, पण अजून एक विचार आहे ना."

"कोणता? "

"अगं माझं प्रेम आहे त्या निर्दोषवर."

"कोण निर्दोष? तो तुझ्या गावचा? "

"होय."

"अं हं, म्हणूनच तुला तसं वाटतेय. पण मी सांगू. तू ऐकशिल माझं. वाईट सांगणार नाही."

"सांग. ऐकेल."

"अगं, आयुष्यात प्रेम बिम काही नसतं. हे तुझं तरुणपण आहे. तरुणपणी अशा सवयी लागणारच. फार जपावं लागतं तरुणपण. तरुणपणी फक्त शरीराचं आकर्षण असतंच. विचारांचं आकर्षण नसतं. शरीरामुळं व हार्मोन्समुळं आपल्याला माणसे आवडतात. प्रेम करावंसं वाटतं. प्रेम नसतंच. म्हणून सांगते निर्दोषच्या नादात लागून आपल्या आयुष्याची राखरांगोळी करु नकोस."

"पण मोना, तो निर्दोष तसा नाही. बाकी तरुण मंडळी ही फक्त शरीराचं आकर्षण ठेवतात. शोधतात ते मुलीमध्ये अश्लिलकेच्या भावना. प्रथम बोट पकडून पाहतात. मग हात

पकडतात. ते मुलींच्या भावनांशी खेळतात. हत्या करतात विचारांची. ते मुलींना समजूनच घेत नाहीत. लग्नाच्या आणाभाका टाकून संगनमतानं बलत्कारासाठी कृत्य करतात. मग प्रसंग ओढवून घेतात स्वतःवर...... गर्भारपणाचं दुःख. गर्भार राहिल्यानंतर जीवापाड प्रेम करणारा मित्र म्हणतो की मी तुझ्याशी लग्न करीत नाही, तेव्हा विचार येतो. आत्महत्याच करावीशी वाटते. काही आत्महत्याही करतात. कारण बदनामीचा धाक असतो त्यांना. ध्येय नसतेच त्यांच्यापुढे. केवळ आकर्षण असतं. त्यामुळेच असं घडतं. पण निर्दोष तसा नाही. तो चांगल्या स्वभावाचा आहे. त्यानं कधीच मला शरीरसुखाची मागणी केली नाही. त्यांच्याहीपुढे ध्येय तेच. जणू दोघांनाही एकाच ध्येयानं पछाडलेले आहोत असं वाटते."

"तुझं म्हणणं बरोबर आहे पण."

"पण काय मोना? "

"पण तुला असं स्थळ कधीच मिळणार नाही."

मोनानं आपली भुमिका मांडली होती. तसं तिनं आपल्या मैत्रीणीच्या म्हणण्यानुसार आपलं मत प्रदर्शित केलं. तिचंही बरोबर होतं. पण ती तरी काय जास्त सांगणार होती. मोनानं सहजच तिच्या मनावरील ताण दूर करण्याचा प्रयत्न केला.

आज कोमलला बरं वाटत नव्हतं. दिवस उदास जात होता. ती कोणाशी बोलली नाही. दररोज हाय हलो करणारी कोमल आज निर्दोषशीही बोलली नाही. तसा तो आज उशिराच आला होता. तो निरीक्षण करीत होता. तसं त्यानं तिचं वागणं आपल्या चाणाक्ष नजरेनं हेरलं.

मधली सुटी झाली होती. मधल्या सुटीत तिची अवस्था पाहून निर्दोष तिच्याजवळ गेला. म्हणाला,

"कोमल, आज एवढी उदास का? "

"काही नाही. सहजच."तिच्या तोंडून शब्द फुटले.

"नाही नाही. काहीतरी वेगळीच गोष्ट आहे. बोल काय घडलं? "

"काही नाही रे."

"अशी आढेवेढे घेवू नकोस. नक्कीच काहीतरी घडलंय. बोल काय घडलं घरी? निदान आपलं घुमणं फिरणं. प्रेमाच्या गोष्टी."

"नाही नाही. आपलं घुमणं फिरणं नाही कळलं. आपल्या प्रेमाच्या गोष्टी नाही कळल्या."

"मग नक्कीच काय झालं? आई काही म्हणाली का? बाबा तुझे? माझ्या हातून चूक झाली का? "

"नाही नाही. तसं नाही."

"अगं पण काय झालं नक्की ते तर सांग. मी भाग्यवान समजेल स्वतःला की तुझी वेदना दूर करु शकेल."

"हं तुच....... तुच करु शकशील माझं दुःख दूर."

"म्हणजे? निदान झालं तरी काय? "

"हो, सांगतेय." तशी ती सांगू लागली.

"मला पाहायला एक मुलगा येणार आहे."

"मग त्यात काय झालं? मुलगा चांगला नाही का? "

"असेल, चांगलाच असेल. मी पाहिला नाही. दोन जोड्यांची कास्तकारी आहे. शिवाय भरपूर शेती आहे. शेतीत राबणारी गडी माणसं सर्वकाही......."

"छान आहे. मग तुला का बरं प्रॉब्लेम? "

"...........” ती गप्प होती. तसा तो म्हणाला,

"का गप्प? तुझ्या मायबापाला आवडला नाही का? "

"हो, माझ्याशी तो लग्न करणार. पण मी कशी करणार त्याच्याशी लग्न? "

"काही काही प्रॉब्लेम आहे का लग्न करण्यात. अगं तू आता विवाहयोग्य झालीय. शिवाय मुलीनं जास्त दिवस थांबू नये.”

"पण.”

"पण काय? मनापासून पण शब्द काढून टाक. असं स्थळ मिळणार नाही पुन्हा कधी. काय करतेस शिकूनही नोकऱ्या मिळत नाही.”

"अन् ते ध्येय.”

"कोणतं? "

"आपल्या गावाला सुधरंवायचं.”

"अगं तुझ्या माझ्या दोघानं गाव सुधारणार नाही. ते गाव मुळात पोशिंद्याचं गाव. जेव्हापर्यंत तो निर्णय गावात आहे, तेव्हापर्यंत गाव सुधरणार नाही. माणसांच्या मनात चांगले सुधारणावादी विचार हवेत. ते आहेत का त्यांच्याजवळ. ज्यांच्यावर अत्याचार होत आहेत, त्यांनाच तर त्याची गरज वाटत नाही, मग तुलाच कोणती गरज येवून पडली. गाव काय देईल बदल्यात तुला. अन् काय देत आहे? निव्वळ संताप देईल गाव. ही व्यवस्था कधीच बदलणार नाही. कारण व्यवस्था बलशाली आहे. तिचेच बळी ठरलो आपण. तू फक्त आपलं पाहा. चांगलं स्थळ आलंय.”

"हो, पण मी ध्येयासाठी नाही म्हणत. माझी समस्या ध्येय साकार होणं नाही. हे ध्येय तर मी माझ्या लग्नानंतरही साकार करु शकते. पण.....”

"हा दुसरा पण अजून कशाला? "

"तू रागावणार तर नाही."

"नाही रागावणार. हा निर्दोष वचनाचा पक्का."

"माझं की नाही........" ती थांबली. तसा तो म्हणाला.

"काय माझं? तुझं अजून प्रेम आहे का कोणावर. हं एक, कोणाचं प्रेम नसतंच. प्रेम असतं फक्त शरीरावर. प्रेम फक्त लग्नानंतरच होतं, तेही पतीवर. तू प्रेम बिम सोडून दे. आपला संसार बघ. पुढचं आयुष्य बघ. प्रेमाचा त्याग करण्यातच तुझं भलं आहे. तुझं प्रेम आहे का कोणावर. निदान माझ्यावर. मगाशी मी गंमत केली बरं का? आपल्या प्रेमाच्या गोष्टी म्हणून. त्याला खरं प्रेम समजू नको." तो हसत म्हणाला.

"हो." ती झटक्यात म्हणाली.

"कोणावर आहे प्रेम? "

"जावू दे."

''नाही गं, सांग तर खरं "

"नाही, आता सांगत नाही." ती हेकड बोलली.

तो विचार करु लागला. ही का बरं आढेवेढे घेत बोलत आहे ते त्याला कळेना. तसा तो म्हणाला,

"मी तुझ्या गावचा. निदान मला तर सांग. कदाचित मी तुझ्या मायबापाला मनवेन. मात्र तिही तुझी इच्छा असेल तर. इतर कोणालाही सांगणार नाही."

"अरे वेड्या, तुला अजून कळले नाही. मी कोणावर प्रेम करते ते. किती रे तू भोळा."

"नाही कळलं. कोणावर प्रेम करतेय? "

तिनं दोन्ही हातानं डोळे झाकले. तशी ती म्हणाली,

"सांगू."

"सांग. माझ्यावर तर तू प्रेम करीत नाहीस. पण मी तुझ्या लायक नाही बरं का? "

"ते कसं काय? "

"अगं, मी पाहिला चांभार जातीचा. पाहायलाही तेवढा देखणा नाही. मग तू माझ्यावर तरी प्रेम कशी करणार."

"जावू दे मग." ती म्हणाली व जावू लागली. तसा तो म्हणाला,

"अगं पण निदान स्वप्नातला तरी राजकुमार मला कळू दे. थांब तो स्वप्नातला राजकुमार सांगितल्याशिवाय जावू नकोस."

तशी ती हुंदके देत म्हणाली,

"काय सांगू तुला. सगळ्या गोष्टी काय सांगायच्या नसतात."

"म्हणजे? "

''त्या गोष्टी समजून घेण्यासाठी असतात."

"म्हणजे? तू खरंच माझ्यावर प्रेम करतेस बरं."

''हो, मी तुझ्यावरच प्रेम करायला लागली. पण तू तर समजून घ्यायलाच तयार नाही माझं प्रेम. निर्दोष माझं तुझ्यावर निरतिशय प्रेम आहे. या कोमलनं तुझ्यावर निरतिशय प्रेम केलं. अगदी जीवापाड मी तुझ्याविणा जगू शकणार नाही." ती बोलून गेली.

ती बोलून गेली खरी. पण तो विचारातच पडला. तसा तो तिच्यावर प्रेम करीत होताच. पण ती त्याला मिळेल याची शाश्वती नसल्यानं तो फक्त दोस्तीच्या नात्यानं राहात होता. जातीयतेची भिंत आज असल्यानं तो आपलं प्रेम जाहिर करु शकत नव्हता. त्याचं तिच्यावर प्रेम होतं. ते भातूकलीसारखं नव्हतं. अगदी खरं प्रेम होतं. कधीही न संपणारं पण आज त्याला विचार होता. तसा तो बोलणार, तोच ती म्हणाली,

"काय, तुला माझं प्रेम मान्य नाही काय? हे बघ मी तुझ्यावर निरतिशय प्रेम करते. मला त्या गावातील जातीयतेची भिंत तोडायची आहे. मला गाव सुधारायचं आहे. मला विटाळ मिटवायचा आहे. मी त्यासाठीच शिकत आहे. हेच माझं ध्येय आहे. बोल तुला माझ्या प्रेमाचा स्विकार आहे का? मला तरी तुझं मत कळू दे."

"पण आपलं हे प्रेम तुझ्या परीवाराला माहित आहे का? माहित जर झालं तर..... त्यांना मान्य तरी आहे का? कधीही मायबापाच्या आशिर्वादानं जगावं माणसानं. नाहीतर याचे परीणाम वाईट होतात. माहित आहे आपण लग्न केल्यावर कुठं राहू? काय खावू? हा समाज जगू तरी देईल का आपल्याला? काय काय हाल करतील माहित आहे का तुला? "

"काय हाल करतील? "

"अगं ते वाळीत टाकतील नाहीतर मारुन टाकतील आणि आपण पळून गेलो तर आपल्या मायबापाला. खरंच, आपल्याला त्रास झालेला आपण सहन करु. पण आपल्यामुळे आपल्या मायबापाला होणारा त्रास. त्यात त्यांचा कोणता दोष? ते आपल्या मायबापालाही ठार करायला मागे पुढे पाहणार नाहीत."

"पण माझं तर प्रेम आहे तुझ्यावर निरतिशय. जीवापाड प्रेम केलं मी. हो हे प्रेम सहजासहजी तोडून टाकू "

"अगं प्रेम हे भातुकलीच्या खेळासारखं. लग्न तसं नाही. थोड्या वेळापुरता करता येईल तसा विचार, करारही. पण तो करार क्षणभर टिकेल. तू आधी मायबापाचा विचार घे. मग पाहू काय करायचं ते."

"ठीक आहे तर मग आजच सांगून टाकते मी माझ्या आईवडीलांना. मग तर झालं "

''ठीक आहे."तो म्हणाला. तसा त्याच्या मनात विचार आला.

आपण चांभार जातीचे. आपली जात नीच. यांनीच ठरवलेली नीच जात. गावात यापूर्वी प्रेम करणाऱ्यांना थारा मिळालेला नाही. त्या प्रेमविरांची कत्तल झाली. सायली अन् राम्याला याच गावानं ठार केलं. नव्हे तर गोखलेच्या पोरासुनलाही. पुढं आपणही याच पंक्तीत येणार. याचाही विचार त्याला येत होता.

तो तिच्यावरही आधीपासूनच प्रेम करीत होता. पण त्याच्या प्रेमात वासना नव्हती. त्याने तिच्यातला माणूस शोधला होता. तो तिच्या ध्येयावरही प्रेम करीत होता. कारण दोघांचे ध्येय एकच होते. ते ध्येय....... त्या ध्येयाच्या सागरात ती अथांग भिजली होती.

तो तिच्यावर जरी प्रेम करीत असला तरी यासमयी त्यानं तिचं आणि तिच्या मायबापाचं सुख पाहिलं. आपल्यामुळे त्यांचे हाल हाल होवू नये. त्यासाठी आपल्या प्रेमाची कुरबानी चढली तरी चालेल. तिला चांगले स्थळ मिळेल, सुख मिळेल. ती त्या मुलाच्या घरी राणी बनून राहिल. पण काय घडते हे त्याला दुसऱ्या दिवशी कळणार होतं. तशी ती त्याला म्हणाली,

"काय विचार करतोस? कोणत्या विचारात गुंतला? "

"काही नाही सहजंच."

"मी आज विचारतेय माझ्या मायबापाला आपल्या प्रेमाबद्दल. त्यांना पक्क करते मी लग्नासाठी."

"अन् ते पक्के नाही झाले तर.......”

"म्हणजे? "

"त्यांनी होकार नाही दिला तर.....”

"तर आपण दोघंच निर्णय घेवू.”

"अन् ज्यांनी लहानाचे मोठे केले त्यांना डोहात ढकलून देवू.”

"माझे आईवडील वेगळ्या विचाराचे आहेत. ते नाही म्हणणारच नाहीत.”

"तुला वाटतंय की ते खरंच तयार होतील.”

"हो, मला तसं वाटतेय.”

"ठीक आहे तुला मनोमन वाटते, तर तू विचारुन बघ काय म्हणतात ते. त्यानंतर माझा निर्णय. अजून एक. उद्या तू सुटी घे. तुझ्या वडीलानं त्या मुलाला पाहायला बोलवलंय. त्याच्या समक्ष सन्मानानं जा. त्याचा आदर कर. त्याला तुझं कुणावर प्रेम आहे हे दाखवू नकोस. असं समजायचं की तोच मुलगा तुझा प्रियकर आहे.”

"म्हणजे? "

"म्हणजे त्याची प्रेमिका बनून त्याच्या पुढे जायचं. तुझ्या मायबापाची इज्जत खाली पडू द्यायची नाही. त्यांची शान तुझ्या हातात आहे.”

"पण तेवढं माझ्याच्यानं जमणार तरी आहे का? "

" न जमायला काय झालं? त्याच्यातच निर्दोष पाहायचा. समजायचं तुला पाहायला निर्दोषच आलाय.”

"मी आईलाही सांगणार आपल्या प्रेमाबद्दल आणि त्या पुतळ्यासमोरही उभी राहणार. त्यालाच निर्दोष समजून. मी माझ्या मायबापाची इज्जत खाली पडू देणार नाही. सारंच समजलं. ठीक आहे."

"आतं मला वाटते तू कोमलसारखी."

"म्हणजे? "

"अगं तू हे करशिल असं वाटतंय."

"होय का? "

"होय."

ती विचार करीत होती. तिचा ठाम विचार होता की तिचे मायबाप तिच्या विवाहासाठी तयार होतील. याचं कारणही तसंच होतं. गावात आपल्या मुलीला एवढं कोमलएवढं शिकवलं नव्हतं. जेवढं तिच्या मायबापानं शिकवलं होतं.

आज ती खुश झाली होती. कारण तिन आपले प्रेम आपल्या प्रियकराजवळ जाहिर केले होते. त्याचा अर्धा होकारही मिळाला होता. तो तिला फार आवडत होता. हे तिचं शरीरआकर्षण होतं की ध्येय होते हे तिलाही माहित नव्हतं. तसा तो तिच्या जातीचाही नव्हता. शिवाय पाहायलाही तेवढा देखणा नव्हता. तरीपण तो तिला आवडत होता. हे प्रेम त्याचेवर कसे निर्माण झाले? केव्हा झाले? हे ही तिला माहित नव्हतं.

तासीकेची वेळ झाली. तसा मोनाचा आवाज आला ते दोघंही बराच वेळ बोलत आहेत हे मोनानं टिपलं होतं. ते असेच बोलत राहतील असं मोनाला वाटलं व ती म्हणाली,

"कोमल, वेळ झालीय तासीकेची आज तासीकेला बुटी मारते काय? तुला ध्येय गाठायचे ना."

"हो हो." तशी ती भानावर आली.

"अगं मीही विसरले होते की आपण कॉलेजात आहो."

"बरं निर्दोष मी चलतेय." निर्दोषला ती म्हणाली.

"बरं ठीक आहे." निर्दोष म्हणाला.

महाविद्यालयात ऐच्छीक विषय होते. हा विषय निर्दोषला नव्हता. त्यामुळं को तो बाहेरच बसला होता आपल्या मित्रांसोबत, ज्यांनी हा ऐच्छीक विषय निवडला नव्हता.

आज ती आनंदी होती खरी. पण वर्गामध्ये तिचं मन लागत नव्हतं. निर्दोषची संमती तिला मिळाली आहे असं वाटत होतं. पण मनात काही प्रश्न होते. खरंच आपली आई तयार होईल काय.

तासीका सुरु होती. पण तासीका बेजार करीत होती. केव्हा केव्हा घरी जातो आणि केव्हा केव्हा नाही असं तिला वाटत होतं. तासीकेदरम्यानच्या काळातही ती प्रश्नांच्या गोतावळ्यात कधीचीच हरवून गेली होती.

एकदाच्या पुर्ण तासीका संपल्या. तशी ती घराकडं निघाली. आज सकाळपासूनच तिच्या मनात अकलेचे तारे तुटत होते. बसमध्येही तिचं मन लागत नव्हतं. कारण ती जास्तच भावविभोर झाली होती.

अचानक गाव आलं. तशी बस थांबली. निर्दोषही त्याच गाडीत होता. तो सगळं पाहात होता. त्याला गाव आल्याचं समजलं होतं. पण तिला....... ती गाव येवूनही विचारानं हरवून गेली होती.

"अगं कोमल, उतरत नाही का? " तो म्हणाला.

तशी ती भानावर आली. म्हणाली,

"गाव आलं का? "

"होय. आज कशात लक्ष आहे तुझं? "

"काही नाही मी विचार करीत होते."

"कोणता विचार? "

"मगाचा."

"जास्त विचार करु नकोस. चल उतर लवकर."

"हो उतरते. बरं झालं तू सांगितलं तर. नाहीतर मी पुढे गेली असती."

तशी ती उठली व बसमधून उतरु लागली.

एकदाचं घर आलं. आई शेतावरून घरी यायचीच होती. तसे तिनं हातपाय धुतले आणि अभ्षासाला बसली. तसं तिचं मन अभ्यासातही लागत नव्हतं. पण आईला दाखवायचं होतं की ती किती अभ्यास करीत असते.

थोड्या वेळानं आई आली. अंधार पडायला लागला होता कोमलला मनात फार आनंद झाला. मनातल्या विचारानं कालवाकालव केली. विचार उकळ्या फोडू लागले. तसा आईचा आवाज आला.

"कोमल$$ कोमल$$"

अभ्यासाचे पुस्तक बाजूला सारत ती उठली. म्हणाली,

"काय आई? "

"अगं भारा उचलू लाग. लई डोक्स्यात बसला."

आईच्या डोक्यावर गवताचा भारी होता. बैलाला घरी खायला हवं म्हणून गवताच्या पेंढ्या आणाव्या लागत. कोमलनं आईकडं पाहिलं. तशी धावत जावून भाऱ्याला हात लावत तिनं भारा उतरविला. व म्हणाली,

"काय आई हे. असले काबाडकष्ट. एवढा भारा कशाला आणतेस? एक दोन पेंढ्या कमी आणल्या तर नाही का चालत."

"अगं बाळे, पण त्या बैलाची भूक. ती भूक भागन का? ते उपाशी नाय राहणार का? अगं ते मेहनत करत्यात. म्हून आपुन पोटभर खातो. अन् त्याईलेच उपाशी ठेवाचं. हे काई बराबर नाय. अगं ते आपल्यासाठी मेहनत करतेत. आपण त्याईसाठी."

"अगं आई........"ती बोलायची थांबली.

भारा उतरवला गेला. तो एका बाजूला ठेवून आई अंगणातल्या स्नानगृहात गेली. तिनं हातपाय धुतले व ती घरात आली. मुलगी मात्र पुस्तक धरुन अभ्यास करीत असलेली दिसली. तशी ती म्हणाली,

"बाळे, आज लवकर बसली अभ्यासाले."

"होय."

"उद्या पावणे येतीन अभ्यास होणार नाय म्हून बसलीस वाटते."

"होय."

"मंग का ठरवलं त्याबद्दल? "

"............."ती गप्प होती.

"बाळे, तुह्य माह्या बोलण्याकडं लक्ष हाय का? "

''काय आई? "

"उद्याचं ठरवलं का म्हंतो

"म्हणजे? "

"उद्या पावणे येणार नव्हं तुले पावाले."

"हो, मग काय झालं? "

"मंग का ठरवलं. मंगाशी ठरवीन म्हणेस न."

"अगं आई, उद्याचं उद्या पाहू."

आई गप्प झाली. तशी परत ती बोलली नाही. थोड्या वेळाचा अवकाश. आईनं दिवे लावले. अंधार पडायला लागला होता. कोमल प्रश्नात गुंतली होती. तिला अंधाराचं भान राहिलं नाही. तिला आईला कसं विचारावं ते समजत नव्हतं. तशी आज आईनंच चूल पेटवली.

सिलेंडर गावात अजून पोहोचायचा होता. त्यामुळं की काय, चुलीवरच स्वयंपाक करावा लागायचा. क्षणात चूल पेटली व भाकरीचं आंधण ठेवत ती म्हणाली,

"बाळे, ये. मी तुले स्वयंपाक शिकवते. उद्या तुले तुह्या नवऱ्याच्या घरी स्वयंपाक करा लागन. मंग कसा करशीन मा स्वयंपाक. पोरीच्या नशीबी चूल आन् मूल. सारेच भोग. का करु=पोरीचा जनमच व्यर्थ. पोरीचा जनमच घेवू नये. पण काय करणार. समदी देवाची देण. पोरगा काय, पोरगी काय, समदं देवालेच ठाव."

कोमल उठली. ती आईजवळ गेली आईच्या प्रत्येक गोष्टीला न्याहाळू लागली. तशी ती म्हणाली,

"आई, मला त्याच्याशी लग्नच करायचं नाही."

"म्हणजे? तू का बोलतेस पोरी? "

"मले उद्या त्याच्यासमोर उभंच राहायचं नाही."

"पोरी हे का बोलतेस? आमची इज्जत चव्हाट्यावर आणशीन का? "

"पण आई मला मोठं व्हायचं आहे. उद्या लग्न केल्यावर मोठं होता येणार नाही. तुच सांगितलं ना की तू खूप शिक. लय मोठी हो. खरंच उद्या लग्न केल्यावर तो मला शिकू देईल काय? ह्या सगळ्या स्त्रीजातीची दैना दूर करता येईल काय? "

"अगं पण स्त्रियांच्या नशीबी चूल आन् मूलच असतं. या संबंध स्त्रियांचे नशीब धुतल्या जाईन का तुह्या एकटीनं. समदा समाज स्त्रीजातीले दुषणे देत फिरते. पुळं जावूच देत नाय. मंग तू कशी करशीन या स्त्रीजातीचा करंटा दूर. अगं एखाद्या स्त्रीनं उशिरा लगन केलं, नाय केलं तरी तिलेच दुषणं देतेत लोकं. नाव बोटं ठेवतेत. कुलथा बी समजतेत."

"आई, समाज जर असा कुलथा समजत असेल तर मी जातीत का लग्न करु? "

"म्हणजे? "

"मी हवा तसा जोडीदार निवडणार. मी प्रेम करणार आणि त्याच्याशीच विवाहबद्ध होणार."

"बये, बये, बये. म्हणजे आमाले कलंक लावीन म्हणतेस तर...."

"कलंक! मी माझ्या आवडीच्या मुलासोबत लग्न करणं म्हणजे कलंक होय."

"हो, कलंक नायतं का? "

"कसा? "

"तो पोरगा न जातीचा न पातीचा. आपले पूर्वज सांगत आले का उगाच का जातीसाठी खावी माती."

''अगं ही जात जात करुनच आपण मागे राहिलो. जातीनं का दिलं आपल्याला? अशा जाती आपण टाकूनच द्यायला पाहिजे. जात नाही ती जात. आई या जातीनंच आपल्या

छाताजावर लात मारली आहे. अगं दलिताच्या अश्रुला जबाबदारही जातच आहे. आपल्या भावनांचा घात करते जात. ह्या जातीमुळंच हे धर्माचे ठेकेदार माजले आहेत. आई, या जातीनं मान खाली घातली आहे. कधीकधी ही जात जेव्हा मान वर काढते, तेव्हा भांडणं होतात. लग्नातही जात पाहातो आपण. वरही जातीचाच. तो मग व्यसनीही असला, हुंडाही मागत असला जबरदस्तीनं जबरदस्त. दिसायला कुरुप असला. तरी चालतो. त्याने लग्नानंतर हाल केले पोरीचे तरी चालते. आपल्याली माहित नसते आपण फसवले जाणार. अगं ही जातच अशी विटाळाची राजनीती खेळते. त्यामुळंच या देशात विषमता निर्माण झाली आहे. ते अस्पृश्य आपण स्पृश्य. हा भेदभाव याच जातीनं आणला आहे.

आई, त्या दलितांच्या कमरेला झाडू आणि गाडगाही याच जातीनं टाकला होता. मी वाचले होते पुस्तकात की अस्पृश्य जातीची माणसं खुप विद्वान होती. राजेशाही थाट होता त्यांचा. पण आपण तो इतिहास समजून घ्यायला तयार नाही. आपणच त्यांना बिघडवतो. त्यांना हिन समजून कामे देत नाही. म्हणून ती मंडळी दारु काढतात. पितातही. यात त्यांनाच चुकीचे मानतो आपण. पण आपण आपला दोष दाखवत नाही. मला सांग ते तरी पोट भरण्यासाठी काय करतील? वीतभर पोटाची खळगी दिली आहे ना. त्यासाठी वाट्टेल ते. आपण त्यांच्या असहायतेचा फायदा घेवून त्यांच्यावर अनन्वीत अत्याचार करीत आहोत. आई, एवढंच नाही तर या जातीमुळंच आपणही अज्ञानी राहिलो. अगं जर त्या महात्मा फुलेंनी स्री शिक्षणाची शाळा जर काढली नसती तर मलाही शिकता आलं नसतं.

अगं या आपल्या मंदिरालाही जातीनं वेढलं आहे. या मंदिरात प्रवेश सर्वच जातीचे करु शकत नाहीत. का? तर त्यांची जात. ही जात आडवी येते. का गं आपण सगळी देवाची लेकरं आणि देवासमोर सगळे समान म्हणतो. मग हा नीच आणि हा उच्च का बरं? स्रियांनी आपल्या पसंतीचा जोडीदार निवडू नये हे कुठं लिहिलंय. फक्त मनुस्मृतीतच ना. ती तर बाबासाहेबांनी जाळलीय. सर्वासमक्ष तिला संपविलं. कधी सीता स्वयंवर ऐकलं आहे ना तू. कधी द्रोपदी

स्वयंवर. कधी रुक्मीनी स्वयंवर. पुर्वी स्रियांचे स्वयंवर व्हायचे आणि जोडीदार निवडीचं स्वातंत्र्य असायचं. पुर्वी स्रियांना असंच स्वयंवर घोषीत करण्याचं स्वातंत्र्य होतं.

क्रिष्णाला तू देव मानते ना. त्याला तर रुक्मिणीच्या सख्ख्या भावाचा विरोध होता. तेव्हा युद्ध न करता पळवून नेली रुक्मीनी. मग देवच जर जोडीदार निवडू शकतो, तर आपण मानव का नाही निवडू शकत जोडीदार?

अगं स्वार्थासाठी जातीनं जातीवर बलत्कार केला. समाजात आजही स्वार्थ वाढत आहे. माझं पद ढळायला नको असं  सगळे म्हणतात. हेच लोक जातीचं विष कालवतात. हे उच्च ते नीच..... ह्या त्यांच्याच शिकवण्या. यानं समाज स्थिर राहात नाही.

नागरीकांचे विचार या जातीनंच ठार केले आहेत. जात न पाळल्यास त्याला स्मशान हमखास मिळतं. जात न पाळल्यास देशात नाही तर जगात न राहण्याची जागा प्रेमायुगलांना मिळत नाही. वेगवेगळ्या जातीत लग्न केल्यास समस्या येतात का? कधी दुष्काळी परिस्थिती निर्माण होते का?  अगं नाही ना. तरीही जाती का पाळल्या जातात. ही शोकांतिका आहे की मागं गोखलेच्या सुना पोराला आत्महत्या करावी लागली आणि त्या सायली राम्याचंही तेच झालं. पण आई, मी ठरवलंय. पुन्हा मी हा इतिहास दोहरवणार. मीही आंतरजातीय विवाह करणार. मीही पाहते कोण मला ठार करते ते.. अगं मी ठार झाले तरी चालेल."

"अगं कशी बोलतेय तू. हे माझ्याजवळ बोलली तं बोलली, तुह्या बापाजवळ बोलू नगं. नायतं तो मरुन जावाचा होये. नायतं तुले तरी मारुन टाकन. म्हणन मले वंशच झाला नाय."

"मारन तं मारन, त्यात काय, लहानपणी मायबाप तसेही पोरीचा भ्रुण पाहून गर्भातच मारतात. आज मोठी झाल्यावर मुलगी झाली म्हणून ठार मारणं काही माझ्यासाठी नवीन गोष्ट नाही. हेही गर्भात मारण्यासारखं झालं. मला ते मंजूर आहे."

"पण बेटा, तुले जे कराचं ते नंतर करजो. पण निदान उद्या पावण्यायसमोर उभी रायजो. अगं त्याईच्च्यासमोर उभं रायणं म्हणजे लगन उरकवणं नाय. आपुन त्याईले होकार देवून तवा उरकन लगन.. त्यााईच्च्या अटी आपल्याले, मंजूर होतीन तवाच होईन लगन. तू उभी रायजो. एवळं करजो बेटा. मंग पावू का कराचं ते."

कोमल विचार करीत होती. दुपारी निर्दोषनं सांगितलं होतं, त्याच्यासमोर निर्दोष समजून उभं राहायचं. आईबापाची इज्जत खाली पडू द्यायची नाही. तिलाही ते पटलं होतं. तशी ती म्हणाली,

"आई, मी त्यांच्यासमोर उभी राहिल. पण एक अट आहे."

"आतं अजून तुही कोणती अट हाये? "

तिला दुपारचं सगळं संभाषण आठवत होतं. जे निर्दोष बोलला होता. ते आईला ती विचारणार होती. आईबापाला आपलं प्रेम आहे निर्दोषवर आणि ती त्याचेशी विवाह करणार. अशी तिचीही अट होती. ती आपली अट मांडत होती. तशी ती म्हणाली,

"आई, तू रागावणार तर नाही

"नाय रागावणार. आजपर्यंत कधी रागवली का तुह्यावर. तुह्ये समदे हट्ट पुरवलेत. सांग तुही कोणती अट हाये? "

"आई माझं प्रेम आहे एका जणावर."

"प्रेम! भैताड तं नाय झाली तू."

"आतं तू भैताड म्हण की काहीही म्हण. माझं खरंच प्रेम आहे. मी त्याच्याशीच लग्न करीन."

"बये, अगं तू का बोलत हाये तुले तरी कळत हाये का? तुले भुतानं झपाटलं तं नाय."

"नाही आई. मी खरंच सांगते."

काळजाला भेद देवून गेलेली किनार. जसं काळजाला शब्दतीरानं फाडलं जातं. तसा तो प्रेम नावाचा शब्द. तो प्रेम आपल्याच जातीच्या पोराशी का असेना. माषबापाची परवानगी नसतांना हे प्रेम झालंच कसं असा आईचा प्रश्न होता. तशी ती फार चिंताग्रस्त झाली होती. तशी ती म्हणाली,

"बाळे निदान आपल्या मायबापाचा तरी ईचार करायचा. तुले उन्हातून सावलीत नेला. लायनाची मोठी केला. हा ईचार त्यागून दे बेटा. तू आमची एकुलती एक पोर हायेस."

"आई, बघ तू हो म्हणत असशील तर मी उद्या त्या पोरासमोर उभी राहिल. नाहीतर नाही. मग पाहते तुम्ही कसे उभे करता तर........"

"पण तो पोरगा तरी कोण हाये? "

"निर्दोष."

"निर्दोष.... कोण निर्दोष? "

"तो चांभार मोहल्यातला."

"तो निर्दोष. त्या म्हायद्या चांभाराचा पोरगा."

"हो तोच. मी प्रेम करते त्याचेवर."

आईचा क्रोधाग्नी भडकला होता. तशी ती म्हणाली,

"तुले बाकी जातीतले भेटलेच नाय. तोच भेटला होता."

अतिशय संतापाची लाट आईच्या डोळ्यात दिसत होती. तिला याच क्षणी मारुन टाकावं असं आईला वाटत होतं. पण तिही हतबल होती. उदर फाडून काढलं होतं तिनं.

त्यावेळी झालेल्या प्रसववेदना तिला आठवत होत्या. तिनं मारुनही टाकलं असतं पोरीला. पण ती तिची एकुलती एक मुलगी होती. तशी ती स्वतःशीच म्हणाली,

'काय कर्म केले होते वाईट की हे पोरगी जनमाले आली. अशी भैताड पोरगी. खरंच इले भुतानंच झपाटल्यासारखं वाटते. '

आईला मनोमनी विचार येत होता. आपली पोरगी अशी नाही याची तिला शाश्वती होती. नक्कीच निर्दोषनं हिच्यावर मोहिनी केली असेल असं तिला वाटत होतं. नाहीतर नक्कीच कोणत्यातरी भुतानं झपाटलंय असंही तिला वाटत होतं. तशी ती म्हणाली,

"बाळे तुह्यावर त्या निर्दोषनं मोयनी तं केली नाय. तुले एखाद्या भुतानं झपाटलं तं नाय."

"नाय आई, मोहिनी किंवा भुतानं झपाटल्यासारखं काय आहे त्यात. आम्हाला शिकवेल्यांना या मोहिण्या कळत नाही. ह्या मोहिण्या तुझ्यापाशीच ठेव. कारण या अंधश्रद्धा आहेत. मी विचारपूर्वक निर्णय घेतलाय."

"अगं पण तो चांभार आपण उच्च जातीचे. असाच ईटाळ होते आपल्याले अन् तू लगन करीन म्हणतेस."

''का कसला आला विटाळ? का त्याला दोन डोळे, दोन कान नाही, का त्याचं रक्त लाल नाही, का त्याला हाड, मांस नाही? कसला आला विचार? अन् हा विटाळ कोणं निर्माण केला? आपणच ना. ती राजेशाही थाटातली माणसं युद्ध हरल्यावर शरणागत झाली. म्हणून आपणच लावली त्यांच्यावर बंधनं. मी विटाळाला मानत नाही. आपणच आपल्या स्वार्थासाठी केला विटाळ निर्माण."

कोमल आपल्या जिद्दीस पेटली होती. कदाचित ही घटना तिच्या वडीलांना माहित झाली तर किती अनर्थ होईल असं तिला वाटत होतं. तो बाप अनभिज्ञ होता. तो अनभिज्ञच राहिलेला बरा असं आईला वाटत होतं.

"अगं बाळे, तुह्या बाप येईपर्यंत तुह्या निर्णय बदलव."

"नाही आई, मी माझा निर्णय बदलविणार नाही. हवं तर तू माझ्या वडीलांना सांगून टाक. ते जेही काही करतील त्याचे परीणाम भोगेन मी."

आईला वाटत होतं की उद्या पाहूणे येणार. उद्या आनंदाचा दिवस. मायबाप दोघांसाठीही. उद्याचा दिवस गोड व्हावा नाहीतर हा विषय बापाला कळल्यास उद्याचा दिवस दुःखात जाईल. त्यापेक्षा कोमलला आश्वासन दिलेलं बरं. विचार करत करत आई म्हणाली,

"ठीक हाये मी तुह्या बापाले म्हणीन. पण आतं नाय. उद्यानंतर कवाबी. तुले तो पोरगा नाय मंजूर तं नोको करु त्याच्याशीन लगन. पण तू त्याच्यापुळं उभी रायशीन एवळी ईनंती हाय. अन् हे गोष्ट आजतरी बापाले सांगू नोको आन् उद्याचा दिस दुःखाचा करु नोको."

आपली गोष्ट आईला पटली याची विचार करुन कोमल चूप बसली. सायंकाळी रतीराम घरी आला. बैलं बांधले. त्यांना गवताच्या पेंढ्या टाकल्या. हातपाय धुऊन घरात ओसरी टाकून त्यावर बसला. मुलगी कुठाय वितारताच ती अभ्यास करीत आहे एवढंच उत्तर आईनं दिलं.

रतीराम गप्प झाला. थोड्याच वेळात स्वयंपाक झाला. आईन जेवन वाढलं. त्यांनी परीवारासह जेवन केलं व ते झोपी गेले. जसं काही घडलंच नाही या आवेशात.

दुसरा दिवस उजाडला. आई सकाळीच उठली होती. तिनं संपुर्ण अंगण झाडून काढलं होतं. शेणाचा सडा टाकण्यासाठी कालवण तयार केलं होतं. तशी कोमल उठली. तशी आई कोमलला म्हणाली,

"कोमल सडा टाकून घे. अन् घर बी सारवून घे. काम करता करता येळ कशी होईन ते सांगता यायचं नाय."

नुकतेच तोंड धुवून आलेली कोमल आईला म्हणाली,

"आई, उठल्याबरोबर तुझं हेच. धड झोपूही दिलं नाही आज."

"अगं पोरीच्या नशीबी कुठं आल्या झोपा. सकाळी उठून सडा सारवण करा लागते. नंतर स्वयंपाक. मंग कामालेबी जाणं. सगळ्याच गोष्टी. तरीबी नावबोटं आपल्यालेच. घे लवकर उरकून."

आईच्या हातचं सारवण कोमलनं घेतलं धप्प धप्प सडा टाकत कोमल सडा टाकत होती. आई स्वयंपाक बनवू लागली. सडा टाकून झाल्यावर कोमल पाणी गरम करु लागली. तशा सर्वांनी आंघोळी उरकवल्या.

रतीरामनं सकाळी बैलं शेतात नेवून बांधले. तसा तो घरी आला. घरी येताच त्यानंही आपली अंघोळ उरकून घेतली व जेवनखावण करुन तो पावण्यांची वाट पाहात बसला.

साधारणतः एक वाजला होता. पाहुणे आले होते. रतीरामनं पाय धुवायला पाणी दिलं. खाली गोना टाकला त्याबाजूला सतरंजी. काही पाहूणे खुर्चीवर तर काही पाहूणे पलंगावर बसले. रतीराम खाली बसला. त्याचबरोबर पोरीकडले नातेवाईकही. काही वेळपर्यंत इकडल्या तिकडल्या गप्पा रंगल्या तसा रतीराम म्हणाला,

"अगं, झाला का नाश्ता, आण. पाहुण्यांना उशीर होते."

कोमलनं नाश्ता आणला. तो पाहुण्यांना देण्यात आला. तसेच काही वेळानं चहा ही. सर्वांना पानसुपारी देण्यात आली. तसे पाहूणे रतीरामला म्हणाले,

"बोलवा पोरीले."

थोड्याच वेळात कोमल बाहेर आली. ती एका टेबलवर बसली. तसा पोराचा नातेवाईक प्रश्न विचारु लागला.

"बेटा, नाव का तुह्य? "

"कोमल."

"किती शिकलीस? "

"बी ए फायनला आहे."

त्यानंतर पाहूण्यांनी बरेच प्रश्न विचारले. मामकुळ जन्मतारीख अजून काही जाब वैगेरे. त्यानंतर पाहूणे म्हणाले,

"ठीक हाये. सांगतो आम्ही."

कोमलनं साडी नेसली होती. थोडा मेकअप केला होता. तशी ती सुंदर दिसत होती. पाहताबरोबर पावण्यांची शुद्ध हरवली होती. ती पाहूण्यांच्या डोळ्यात भरली होती. तसं कोमलच्या पाहूण्यांकडं कटाक्ष टाकून मुलाचा बाप म्हणाला,

"तुम्हालेबी काई ईचारायचं हाये का पोराले? "

"हो." पोरीचा मामा म्हणाला.

"नाव काय बेटा? "

"गणपत."

''काय करते? "

"शेती. शेती करतो जी. दोन जोड्याची कास्तकारी हाये बापाची. तेच पाह्यतो. गडीमाणसं सर्वकाई हायेत जी. कोणाले कोणताच काम कराची गरज नाय."

"राज करन राज तुमची पोरगी." कोणीतरी मधातच म्हणाला.

"किती शिकलास="

"मॅट्रीक."

"मॅट्रीक पास का नापास? "

"नापास हाये जी."

"हं मंग ठीक."

दोन्ही पार्टीनं एकमेकांना पैसे दिलेत व रामराम म्हणत पाहूणे निघून गेले.

पावणे आल्या मार्गानं निघून गेले. त्यांच्या चर्चांचा फड गाडीत रंगला होता. पोरगी पाहायला सुंदर आहे. शिवाय शिकलीही आहे. हो म्हणायला काही हरकत नाही. तुमची पिढी उजळून जाईल.

जशी गाडीत चर्चा रंगली होती. तशी चर्चा कोमलच्या घरीही रंगली होती. पोरगा पाहायला सुंदर जरी नसला तरी भक्कम शेती आहे. पोरगी राज करेल. आजच्या काळात शिक्षणाला कोण वितारतंय. पैशाची इज्जत आहे आजच्या काळात. शिवाय घरकाम करायला नोकर चाकर. सगळं ठीक ठाकच आहे. हो म्हणायला काहीच हरकत नाही.

कोमलच्या घरी बोलावलेले पाहूणे गावी निघून गेले होते. घर अगदी शांत वाटत होतं. कोमलच्या मनातील इच्छा मावळत चालल्या होत्या. आईलाही जणू विसर पडल्यागत आईही गप्प होती. तसा एक दिवस रतीराम आईला म्हणाला,

"काय जावई पसंत आला नाय का? "

"मले आला. पण बाळीले आला का नाय ते मालूम नाय. तिले ईचारुन घ्या."

"तिले का ईचाराचं? आपली पसंत तिची पसंत."

"नाय नाय. तिले एकदा तरी ईचारुन घ्या."

काई समस्या हाये का? "

"नाय तरीबी एकदा......."

"पण आपल्या गावात अन् परीवारात आजपर्यंत पोरीले ईचारुन कोणत्याच गोष्टी केलेल्या नाय. मंग हे का मधातच खुळ्यासारखं? "

"अहो जमाना बदललाय. आपल्या गावात जरी परीवर्तन दिसत नसलं तरी देशात परीवर्तन घडत हाय. पोरगी कॉलेजले शयरात जाते. शयरात परीवर्तन हाय. म्हणून एकयेळ ईचारावंच म्हणते."

"ठीक हाय तू म्हणते तं ईचारतोच."

पुरते आठ दिवस निघून गेले होते. जसा आईला विचार येत होता. तसे विचाराचे बांध कोमलच्याही मनात चालले होते. कदाचित आई आपल्या प्रेमाबद्दल विसरली तर नाही असं तिला वाटत होतं. तशी सवड पाहून एक दिवस ती आईला म्हणाली,

"आई, तू बाबाला विचारलं का निर्दोषबद्दल? "

आई चकाकली. तिला तर ती निर्दोषचं प्रेम विसरली असेल असं वाटत होतं. तशी आई कोमलला म्हणाली,

"बेटा, ईसरुन जा त्या निर्दोषले. पिरम बिरम काय नाय राहात. पिरम टिकत नाय पुळं. अगं लग्नाचा पतीच परमेश्वर रायते. तो पिरमाचा पती शैतानासारखा. लग्नात सर्व विधी होतेत. त्यानं देवदेवता शांत होतेत. अन् पिरमात काय पण शांत होत नाय. मंग या देवदेवता आपल्याले सतावतेत."

"अगं त्या देवीदेवताला जावू दे. देव माणसानंच बनवला. त्याला मुर्तीची जशी कल्पना सुचली, तसा देव बनला. म्हणूनच प्रत्येक ठिकाणच्या मुर्त्या वेगवेगळ्या आहेत. अन् ह्या मुर्त्या काय शांत होतील? ह्या माणसाले देवानं जन्म दिला म्हणते ना तू. मग या देवानं जन्मास घातलेला जीव देवाच्या मुर्तीवर चक्क नवश म्हणून चक्क भाव म्हणून चढवला जातो. त्या जीवास देव का वाचवत नाही. अगं, देवाचा लेकरु असतो ना तो. मग माय बाप तरी कापतात

का आपल्या लेकराला. त्या कोंबड्या बकऱ्यांसारखं? नाही ना. खरंच देव त्या नवसाला पावत असेल का? नाही ना. मग ही जात पात सोड. आपण सगळे एक आहोत. तू आजच विचार बाबांना.”

आई विचार करु लागली. एक दिवस सवड काढून ती रतीरामला म्हणाली,

"अहो, मी म्हणलं होतं पोरीले त्या पोराबद्दल ईचारा. पसंत हाये का म्हणून. ईचारलं का? "

"नाय ईचारलं. ईचाराची गरज हाये का? "

"हो, ईचाराची गरज हाये.”

"ठीक हाये ईचारीन.”

आईनं आपल्या विचाराची होणारी तारांबळ तात्पुरती बंद केली. तिला वाटलं की माझ्याकडून माहित होताच रतिराम ओरडेल.

सायंकाळ झाली होती. महाविद्यालयातून कोमल घरी आली होती. रतीरामही घरी आला होता. त्यानं बैलं बांधले. तसा तो सातरी टाकून घरी चिलीम फुंकत बसला होता. तसा तो बोलला,

"बेटा कोमल, इकडं ये.”

कोमल बाहेर आली. तसा रतीराम म्हणाला,

"बेटा तुह्या अभ्यास कसा सुरु हाये? "

"बरा हाये बाबा. पण तुम्ही हे का विचारता आहात? "

"अगं तुह्या आतं लगन कराचा हाये नं. म्हून ईचारतो. काई चुकलं का? "

"अं हं बाबा."

"बेटा, पोरगा आमाले लय आवडला. तुले पसंत हाये का? "

"..........."

"का झालं बेटा, गप्प का? "

"बाबा, मला मुलगा पसंत नाही."

"का बरं! अगं त्याच्याकडं कास्तकारी हाये. गडी माणसं सर्वकाई हाये. तुले राणासारखी ठेवन तो."

"पण शिक्षण कमी आहे नं बाबा."

"अगं पण आतं शिक्सनाले तेवळं महत्व नाय. पोरीच्या तं नायच नाय. ज्याच्याकडं जास्त पैसा, त्याचीच गावात इज्जत हाय. जावईबापूले समदा गाव ईचारते. त्याईची गावात इज्जत हाय. तुले पसंत हाये का तेवळं सांग."

"नाही."

"का बरं! मोकळंपणानं सांगून टाक."

ती भीत होती वडीलांना. वडील काही म्हणतील याची भीती होती. ती गप्प होती. तसा रतीराम आपल्या पत्नीला म्हणाला,

"गीते, पोरगी कावून गप हाय. एवळा चांगला रिश्ता आला अन् पोरगी नाय म्हणते. आमच्या काळात तं आमचे मायबाप लगन जोडत अन् लावत बी. मायबापाले पसंत ते आमाले पसंत. आमी लगन होईपर्यंत पोरीकडं पाहात बी नोयतो. शिवाय पोरगी पावालेबी आमाले नेत नोयते. तेच पावून यायचे पोरगी. आमी मातर वखराले जुतलेल्या बैलालारखे. मुंडी हालवत हो म्हणायचो. आन् आतं पोरगी नाय म्हंते."

तशी चिडून गीता म्हणाली,

"अहो, तिच्या उरावर भुत सवार हाये."

"म्हंजे? "

"अहो, ते त्या शैतानाच्या पिरमात पल्ली."

तसा रतीराम कोमलला म्हणाला,

"बाळे, मी हे का आयकून रायलो? "

ती गप्प होती. तिला गप्प राहाणं भाग होतं. कारण ती वडीलाला जास्त घाबरत असे.

"मी का ईचारुन रायलो बाळे? " रतीराम जोरात म्हणाला.

"होय, मी प्रेम करतेय."

ते शब्द. अंगाचा दाह होईल असे ते शब्द. रतीरामच्या अंगाचा दाह होत होता. कोणीतरी आपल्याच तोंडात विष ओतच आहे असे रतीरामला वाटत होते. तसा तो म्हणाला,

"पिरम करतेस. कोणाशीन करतेस? "

ती गप्प होती. तसा रतीराम गीताला म्हणाला,

"कोणाशीन पिरम करते बाळी? "

"त्या निर्दोषशीन."

"निर्दोष कोण? "

"त्या म्हायदू चांभाराचा पोरगा."

"तो म्हायद्या. शिव, शिव, शिव. अरे पिरम कराले भेटला तं भेटला तो चंभार भेटला. दुसरी जातच नोयती भेटली. बाळे, तुले मालूम नाय का गावात किती ईटाळ हाये? "

"होय आहे माहित. पण बाबा मला हा विटाळच मोडायचा आहे."

"म्हूनच केलं का पिरम त्याच्यासोबत."

"होय, तसंच काही समजा "

"पण हा गाव तुले जगू देईन का? "

"ते मला माहित नाही."

"तुले माईत नाय का पुराण्या गोष्टी. अगं त्या सायली अन् राम्याले आपल्या गावातल्या लोकांईनं पिरम केलं म्हून ठार केलं होतं. अन् ते गोखल्याची सुन न् पोरगा........ आत्महत्या करुन मेले लमचे. ते तं उच्च्या जातीचे होते. पण तुह्या हा फिल्मी अवतार नीच जातीचा हाये त्याचं काय? "

"बाबा, तो नीच असो का उच्च. आहे माणूसच ना. मी माणसावर प्रेम केलंय. जनावरावर नाही बाबा. शिवाय शिकलेलाही आहे. बाबा, तो चांगल्या स्वभावाचा आहे."

"श्रीमंत हाये का? कितीक कास्तकारी हाये. गडी माणूस एकादा."

"अठरापगड संपत्ती असूनही, पायात सुख लोळत असतांनाही, गडी माणसं सोबतीला असतांनाही जर तो व्यसनी असेल, तर तो कोणत्या कामाचा? सतत मारझोड करणारा, शंकेखोर ह्या गोष्टी पत्नी म्हणून कायद्यात बसतात का? त्या पत्नीनं सासरी कसं नांदावं? त्यापरस सात पटीनं बरा आहे निर्दोष. शिवाय आम्हा दोघांना या गावचा विटाळ मिटवायचा आहे. मग जर मी कास्तकारी पाहून लग्न केलं तर बाबा मी हा विटाळ कसा मिटवणार? ह्या गावचा विटाळ ही गावाला लागलेली कीड आहे. तुम्हीच म्हणताय ना तसं."

"हो पण याचा अर्थ असा पिरम करणं नाय बाळे."

"बाबा आता तुम्ही हो म्हणा की नाही म्हणा. मी माझं ध्येय निश्चित केलं."

"बाळे, लहानपणापासून तुह्या लाड केला उन्हातून सावलीत नेलं. या माईनं तुले दूध पाजलं. तू हे समदं सारं इसरलीस. निदान या दुधाची तरी जाण ठेव. तू तं आमाले फाशीवर चढवाले लागलीस."

"नाही बाबा, मी फक्त प्रेम केलं. तुम्हाला टाकून दिलं नाही. टाकून देणार नाही. एकुलती एक मुलगी तुमची. मला जाणीव आहे. तुमचं माझ्याशिवाय कोण करणार. तो कास्तकार..... त्याचा रुतबा असेल, संपत्ती असेल. पण तो तुमची सेवा करु देईल काय? तुम्हाला वाटते का तसं? "

''अगं मायबाप का कफनाले पुरतेत. आमच्या नशीबात जे लिहिलं असन ते होईन. त्याची चिंता करु नगं. आमी तुह्याघरी येणार नाय."

"का बरं बाबा? "

"अगं पोरगी पराया धन रायते. ती बापाची संपत्ती नाय का मरेपर्यंत बापाच्या घरी रायन."

"बाबा, तुम्ही काहीही म्हणा. मी त्याचेवर प्रेम करते. अन् लग्न देखील त्याच्यासोबत करेल."

"ठीक हाये. तुही इच्छा. पण याद राख पोरी. ज्या दिशी तू लगन करशीन न तसा, त्या दिशी मा मेलेला देह पायशीन. आतं मी तुले काईबी बोलत नाय. तुले जे कराचं ते कर."

रतीराम बोलून गेला आपल्या वेदना. तशी आई म्हणाली,

"नक्कीच हिच्यावर करनी झाली हाये. आपून हिले गंगारामकडं घेवून जावू."

रतीराम गप्प झाला होता. तशी कोमलंही शांत होती. कोमलला बापाच्या बोलण्याचं वाईट वाटत होतं. आईही तशीच बोलली होती. त्यामुळं कोमलला नक्कीच काय करावं सुचत नव्हतं. नुसता तिला तिच्या जीवनाचा वैताग येत होता. तशी बराच वेळ ती विचार करीत होती. तसा रतीराम म्हणाला,

"गीते, तुह्यं बी म्हणणं बराबर हाये. हिच्यावर करनीच केली असन त्यानं."

"हो करनीच झाली. त्याशिवाय कोणी असं बोलत नाय."

"हं मलेबी तसंच वाटते. आपल्याले गंगारामकडंच जावं लागन."

आपल्या आईबाबांचा हा संवाद. कोमल झोपेत ऐकत होती. रात्रीच्या अंधारात गीता आणि रतीराम बजबडत होते. कोमल झोपी गेली आहे हे समजून. ते आपापसात बोलत होते.

कोमलला आपल्या प्रेमाचा विचार येत होता. कारण तिला गावातील विटाळ मिटवायचा होता. वाट होती पुरक शिक्षणाची. पुर्ण शिक्षण झाल्याशिवाय लग्न करु नये असं तिला वाटत होतं आणि लग्न केलं तर शिक्षण होणार नाही हेही तिला माहित होतं.

"उद्या आकतंचा दिस. आपुन उद्याच हिले गंगारामकडं नेवू."रतीराम म्हणाला.

"उद्याचं उद्या. झोपा आता."गीता म्हणाली.

तसे ते गृहस्थ झोपी गेले. रात्रीच्या गर्भात. उद्याचा सुर्य पाहण्यासाठी.

रतीरामचे बोलणे ऐकत असतांना रात्रीच कोमलच्या मनात विचार आला की कसले अंधश्रद्धेचे बुरखे पांघरलेले लोक. ह्या साध्या प्रेमाला करनीचा साज चढवितात. उद्या आकत म्हणून गंगारामकडं नेतील. तो काय या प्रेमाच्या तुटण्यावर औषध देणार. खरंच यानं काय आपलं प्रेम तुटणार! की पुन्हा ते वाढत जाणार. इत्यादी प्रश्न तिच्या मनात घोळत होते.

अर्धी रात्र उलटून गेली होती. मायबापाचा संवाद संपला होता. कोमलला मात्र झोप येत, नव्हती. परंतू आता झोपलं पाहिजे. तिनं मनाशी ठरवलं. तसंच गंगारामकडंही जावूनच पाहू हेही मनाशी ठरवलं. तो काय करतोय हे पाहायला. अंधश्रद्धेची परीक्षेत गंगारामची परीक्षा घ्यायला. असंच काहीसं मनात ठरवत ती झोपी गेली होती.

गंगारामच्या घरी रतीराम व गीता आपल्या एकुलत्या एक मुलीला घेऊन आले होते. गंगारामच्या अंगात देव होता. त्यानं डोक्याला विशिष्ट आकाराचं पागोटं बांधलं होतं. एका हातात झाडणी होती. तर दुसऱ्या हातात बेत होता. तसा बेत पाहताच रतीरामला लहानपणची आठवण आली. त्याचा शाळेतला मास्तर त्याला याच बेतानं मारायचा. मोठ्या जोरानं लागायचा हा बेत. हाच बेत गंगारामकडं. जणू देवीकडं. कारण ते लोकं गंगारामच्या अंगात येण्याला देवंच मानायचे. वास्तविक ते सोंग असायचं.

नुसता शैतानी आवाज. भीतीचा लवलेश. एक एक करत कोमलचा नंबर आला. गंगारामच्या अंगातील देव बोलला,

"कोण$"

"तुझा झाड." कोणीतरी बोललं.

"बोल का झालं तुले? "

"हिले काई झोंबल्यासारखं वाटते बाबा. हो हे काई केल्या आयकत नाय. मी लगन करीन तं प्रेमवाल्याशीनंच करीन म्हंते."

"तो कोण? "

"हाये एक फिरस्ती. मा पोरीले नादाले लावलं त्यानं."

"मले वाटते का तुह्या पोरीले आसरा लावल्या त्यानं."

आसरा..... आसरा शब्द त्यानं ऐकला होता.. तरीपण न समजल्यासारखं करुन रतीराम म्हणाला,

"देवा आसरा म्हंजे? "

"तुले नाय समजणार. अरे मोयनी घातली त्यानं तुह्या पोरीले. पण मोयनीहूनबी खतरनाक हाये हा परकार. पाण्याकडं टकरमक पाहत असतांनी लागतेत आसरा. झाड पाण्याकडं गेला होता."

कोमल गप्प होती. तसा देव म्हणाला,

"पाण्याकडं गेली होती का तुही पोरगी? "

"मालूम नाय बाबा पाण्याकडं गेली होती पोरगी का कोठं तं."

"थांब मी आतं मालूम करतो. हा जबरदस्त शैतान हाये तुह्या पोरीच्या आंगात. लय धीट हाये. बऱ्या बोलानं बोलतच नाय."

कोमलला ते पाहून अभद्र वाटत होतं. तसा बाबानं झाडू अन् बेत कपाळाला लावला. काहीतरी पुटपूटला. तसा त्या बेतानं आव न ताव पाहता सपासप कोमलच्या अंगावर वार केले. तसा तो म्हणाला,

"बोल शैताना, कोठून आलास="

बेताच्या तडाख्यात अंगाची लाही लाही झाली होती. तशी ती ओरडली.

"मेलो रे बाप."

तिच्यासमोर संकट उभं राहिलं होतं इथं येण्यानं. मनातून शिव्या निघत होत्या. या अंधश्रद्धेच्या प्रकाराचा किळस येत होता. मात्र तो विचित्र वाटणा-याा बाबासमोर आता उपाय नव्हता. तशी ती म्हणाली,

"तुमच्या अंगात देव येते का राक्षस? अन् तुम्हाला असा स्रियांना मारायचा अधिकार कोणी दिला? "

तसा अंगातला देव म्हणाला,

"लई स्टँडर्ड दिसते भुत. मलेच प्रश्न ईचारते. बोल शैताना, कोणत्या पाण्यापाशी गेला होता? "

असे म्हणत अजून दोनचार बेत कोमलच्या अंगावर लावून दिले. तशी असहाय्य कोमल म्हणाली,

"बागेत गेलो होतो. तळं पाहायला. काय म्हणायचं तुला? "

-आता आपला मोर्चा लोकाकडं वळवीत गंगारामच्या अंगातला देव म्हणाला,

"पाहा शैतानानं कबूलीजबाब दिला. तुम्हाले या शैतानाले हाकलून लावाचा असन तं एक उपाय सांगतो."

"सांगा बाबा, सांगा."

"याचा उतारा काढा लागन. सात काटवे लागन."

"अजून काई? "

"उतार्‍याचं सामान लागन."

"मंग पुरी बरी होईन का? "

"हो, होईनच."

"बाबा उतारा नाय काहाळला तं नाय बरी होणार का? "

"हा देवाचाच बेत हाये. मी अर्धा पर्धा या बेतानंच काहाळतो. नाय निगला तं मंग उतारा हाये. पण तुम्हाले आकत लावाले दोन चारदा तरी या लागन."

"ठीक हाये बाबा, हा शैतान काळून द्या म्हंजे झालं."

"जा आतं. पुळच्या हफ्त्याले ये जा."

तसे ते बाजूला झाले. दक्षिणा पेटीत टाकायची होती. दक्षिणा पेटीत टाकली. तसा तो आपल्या पोरीला घेवून घराकडे चालता झाला.

कोमल गप्प होती. मनातल्या मनात विचार करत चरफडत होती. अंधश्रद्धेच्या विळख्यात पडलेल्या बाबाचा त्याला राग येत होता. तसा राग मांत्रीकाचाही. कारण त्यानं बेतानं मारलं होतं. निर्दोषवर फक्त तिचं प्रेम होतं. यात काही आसरा नव्हत्या. काही मोहण्याही नव्हत्या. एकमेकांचे विविध विचार पटवून घेतलेल्या मनाचा खेळ होता तो. तशी ती आईला म्हणाली,

"आई, कशाला पैशाची बरबादी करता? काही आसरा नाही अन् काही मोहिणी नाही. अन् तो बाबा तरी आहे का? बाईले मारायची बंदी असतांना तो बाईला मारते बेतानं चक्क. एखादी तक्रार जर दिली तं बाबा आतं फसते."

"बाळे, तो तुले मारत नोयता तं तुह्या आंगातल्या शैतानाले मारत होता. तुह्या आंगात शैतान हाये न शिरला."

"कुठला शैतान आन् कुठला काही. आई, जमाना बदललाय. तो गंगाराम अंगात आणून लुटतो लोकांना. अगं मी खरं प्रेम केलं त्याचेवर तर तुला माझं प्रेम माझ्या अंगातला शैतान वाटतो? ह्या आसरा मोहिनी....... हा सगळा थोतांड आहे."

"बरं मले सांग, तू तळ्यापाशी गेली होती का? "

''हो. नेहमीच जाते.”

"बरं तेथं मासोळ्या होत्या का? "

"आई तळ्यात मासोळ्या नाय तर का राहणार? "

"त्या तुनं पाह्यल्या का? "

"नेहमीच पाहते.”

"मंग बुवानं का सांगतलं? बुवा समदं बराबर करन.”

"आई, तुझं सगळं बरोबर आहे. तू म्हटलं म्हणून मी तुमची शंका काढायला आली. याचा अर्थ असा नाही की त्यानं एका स्त्रियांवर हात टाकावा. तुम्ही आहात म्हणून. नाहीतर मी त्याची तक्रारच पोलिसात दिली असती. पण आता सांगून ठेवते. त्यानं जर मारलं तर त्याले पोलिसच दाखवेल मी. तुमचंही ऐकणार नाही.”

पोलिसांचं नाव ऐकताच आई घाबरली होती. पण तिच्याजवळ उपाय नव्हता. रतिरामच्या जवळ उपाय होता. पण रतीराम ऐकायला तयार नव्हता. त्याचाा पक्का विश्वास गंगारामच्या अंगातल्या देवावर बसला होता. त्याला वाटत होते की खरंच त्याच्या पोरीला आसरा लागल्या.

नेहमी नेहमी आठवड्याला आक्ता होत होत्या. दोन तीन उतारे काढून पाहिले. पण कोमलमध्ये काहीच फरक जाणवला नाही. तो बेताचे तडाखे मारत होता. पण कोमल पोलिसातही तक्रार देत नव्हती. तिलाा वाटत होते, कदाचित ते पोलिस आपल्या मायबापालाही तुरुंगात टाकतील म्हणून ती त्या बेताचे वार सहन करीत होती. देव धर्म, शैतान ह्या गोष्टी जगात नसतात. ते थोतांड आहे हे तिला वाटत होते. ती मायबापालाही तसं सांगत होती. पण मायबापही ते ऐकायला तयार नव्हते.

गीता नेहमी विचारत असे. कधीकधी तिला वाटत असे की कोमलनं प्रेम बंद केलं असावं. पण जेव्हा ती कोमलला विचारत असे, तेव्हा उत्तर ठरलेलं असायचं, माझं खरं प्रेम.

पुरता महिना निघून गेला होता. पाहूण्यांचे सतत निरोप येत होते. महिण्याच्या या चक्रव्युहात आश्वासनाशिवाय रतीराम काहीही पाहूण्यांना देवू शकत नव्हता. हो सांगतो म्हणत रतीराम दिवस मारुन नेत होता. हे कोमललाही ठाऊक होतं. आपल्या मुलीचा विवाह त्याच्याशीच व्हावा असं रतीरामला वाटत होतं. कारण असं स्थळंच मिळणार नाही असंही त्याला वाटत होतं. असाच तो दिवस उजाडला. रतीरामला मुलीच्या होकाराची आस उरली नव्हती. आता जबरदस्तीनं मुलीचं त्याच्याशी लग्न करण्याचा निर्णय रतीरामनं घेतला. तो निर्णय त्यानं मुलीलाही बोलून दाखवला.

रतीराम जेव्हा जेव्हा मुलीला गंगारामच्या घरीक न्यायचा, तेव्हा तेव्हा रतीरामलाही आपल्या मुलीची दया वाटायची. पण तिच्या अंगात शैतान आहे असं वाटून घेवून रतीराम चूप बसायचा. वाटायचं की मुलगी सुधरावी. पण कोमल परीवर्तनाची कक्षा पास केलेली मुलगी. कशी काय अंधश्रद्धेच्या विळख्यात फसणार. तिच्या मायबापाच्या अंधश्रद्धेच्या कक्षा वेगळ्या होत्या.

कोमल कॉलेजला जात असे. तिच्या चेहऱ्यावर चिंता राहात असे. ती निर्दोषशी बोलत असे. पण तिनं आपल्या मागचा प्रकार कधी निर्दोषला सांगितला नाही. नाह जिवलग मैत्रीण मोनाला. गुपचूप तिही अंधश्रद्धेचा मार आणि बेताचे तडाखे सहन करीत राहिली निव्वळ मायबापासाठी. या चिंतेमुळं तिच्या शरीरात बदल होत होता. तिची कांती ढळत चालली होती. ओठ काळे पडले होते. डोळ्याभोवती काळपट पणा व वलय जाणवत होता. गाल शुष्क झाले होते. अन्नही गोड वाटत नसल्यानं भूक कमी झाली होती. अंगकाठीही घसरली होती.

निर्दोषला हे सगळं दिसत होतं. तो तिला नेहमी विचारायचा. कशी आहेस. त्यावर ती उत्तर द्यायची बरी आहे. आपल्या मायबापाची बदनामी होवू नये म्हणून. एरवी निर्दोषला न दिसता ती गंगारामच्या घरी जात राहिली.

आज आकत होती. तसा गंगारामच्या घरीजवळ निर्दोष खेळत होता. अचानक तो चेहरा. कोमलच असावी. तसं कोमलनं त्याचेकडे पाहिलं. क्षणातच तोंड लपवलं. कोमलच ही. पुष्टी झाली. तसे असंख्य प्रश्न त्याच्या मनात उदभवले.

गंगारामच्या अंगातल्या देवाबद्दल बरंच काही त्यानं ऐकलं होतं. तो मांत्रीक रुपात पैसे खातो. अंगात देव........ सारंच काही. तसा तो चांभार असल्यानं व गंगारामही चांभार असल्यानं बराच घरोबा व गोष्टी माहित होत्या. आता त्याच्या लक्षात आलं होतं की प्रकार काय आहे. ती बारीक का झाली. चिंतेत का राहते सर्वकाही.

तिची अवस्था. तिच्या चेहऱ्यावरच्या भावना, तिची घसरत गेलेली अंगकाठी. सारं काही या गंगाराममुळंच घडलं असावं असं निर्दोषला वाटत होतं. कारण सारं तो एक महिण्यापासून पाहात होता. उद्या नक्कीच कॉलेजला आल्यावर आपण कोमलला विचारु याचा निर्धार मनामध्ये पक्का केला निर्दोषनं. जणू तिच्या अधपतनाची जड गंगारामच असावा अशी मनाशी खुणगाठ बांधून.

दुसरा दिवस उजाडला. नेहमीप्रमाणे कोमल कॉलेजात आली. त्याचबरोबर निर्दोषही. आज आपण कोमलला तिच्या घसरणाऱ्या कांतीबद्दल विचारुच हा विचार मनात होता. जशी कोमल त्याला दिसली. तसा तो तिच्याजवळ गेला. म्हणाला,

"अगं कोमल इकडे ये."

"बोल निर्दोष, कशाला आवाज दिलाय? "

"तुला एक विचारायचंय."

"काय विचारायचंय तुला? "

"तू रागावणार तर नाही ना."

"मी आजपर्यंत तुझ्यावर कधी रागावले का? नाही ना. मग आताही नाही रागावणार. बोल काय ते."

"काय म्हणतात बाबा तुझे आपल्या प्रेमाबद्दल? "

"काही नाही."

"होकार दिला का? "

"नाही. पण देतील होकार नक्कीच देतील."

"कसा काय? "

"मी अजूनही त्यांना प्रेमाबद्दलच विचारते. म्हणते की जर त्यांनी होकार दिला नाही तर मी पळून जाईल."

"त्यावर ते काय म्हणतात? "

"म्हणतात की सायली राम्या, गोखल्यासारखी तुही सुद्धा अवस्था तीच होईल."

"मग तू काय निर्णय घेतला? "

"माझा निर्णय ठाम आहे. मी निश्चय केलाय तुझ्याशीच लग्न करण्याचा. तुझ्यासोबतच संसार बसवायचं."

"तुझ्या आईवडीलांना काय वाटतं? "

''त्यांना वाटतं मी तुझ्याशी लग्न करु नये."

"का बरं? "

"जात अन् विटाळ. तू दुसऱ्या जातीचा आहेस."

"तरीही तुझा ठाम निर्णय."

"होय, माझा निश्चय ठाम आहे."

"का? तुला मायबापाची कदर नाही."

"मला जातीप्रथा मोडायची आहे."

"हो, मोडायची आहे जातीप्रथा. ती जातीत विवाह करुन नाही मोडता येणार का? "

"नाही, त्यासाठीच तर आंतरजातीय विवाह.... स्पृश्य अस्पृश्य विवाह होण्याची गरज आहे."

"हो, पण ते संभव नाही ना."

"का बरं? तू तयार नाहीस का? "

"नाही गं, मी तयारच आहे. तू जशी आहे तशी स्विकारायला. पण....."

"पण काय? यात कसलं आलं पण? "

"अगं मायबापानं ऐकलं पाहिजे ना. ''

"हो ऐकलं पाहिजे, मीही मानते. पण मायबापानंही ऐकावं न पोरांचं. त्यांच्या इच्छेला विरोध का करावा? "

"म्हणजे? "

"अरे त्यांना वाटते की कोमलनं त्या पोराशीच विवाह करावा. त्यांना तोच आवडला. मला नाही आवडला तो."

"का बरं? "

"मला तू आवडतोस ना."

"कोमल, थोडंसं प्रेम बाजूला ठेवून सांग, तुला तो का नाही आवडला? "

"अरे हे प्रेम जरी बाजूला ठेवून मनाला विचारलं, तर मनही सांगेल की तो शिकला नाही. शिवाय पाहायलाही साजेसा नाही. मेहनत करणारा नाही. मग विचारच कसे सुंदर असतील बरे."

"म्हणजे? "

"कमी शिकलेल्यांचे विचार नेहमी अंधश्रद्धाळू."

"कसे? "

ती विचार करु लागली. तसा तो म्हणाला,

"का गं गप्प. माझ्या प्रश्नांचं उत्तर नाही दिलं तू. सांग ना अंधश्रद्धाळू माणसाचे विचार सांग. कसा असतो कमी शिकलेला अंधश्रद्धाळू तेही सांग "

"मला नाही सांगता येणार....... पण एवढंच सांगेल की मी तुझ्यावर प्रेम करते. शेवटपर्यंत करीत राहणार. श्वासाच्या अंतिम क्षणापर्यंत."

"मी नाही केलं तरीही......."

"हो."

"माझ्यावर तुझं खरं प्रेम आहे तर...."

''हो."

"समजा प्रेम साकार नाही झालं तर....."

"म्हणजे? "

"आपण मरण पावलो तर......"

"तर भुत बनून प्रेम करु आपण."

"जर लोकांनी एकालाच ठार केलं तर....."

"तर आत्मा बनून प्रेम करु. पण तू असा का बोलतोस? "

"सहज गंमत म्हणून."

"अजून एक प्रश्न विचारु? "

"विचार."

''काल तू त्या गंगारामच्या घरी काय करत होती? "

"काही नाही."

कशाला गेली होती? "

''............."

''अगं तो गंगाराम एक नंबरचा खोटारडा माणूस आहे. लुच्चा अन् मतलबी आहे. लुटारुदेखील आहे. अगदी पैसे कमविण्याचा धंदा करतो तो. सांग कशाला गेली होती? "

"मी..... मी......." ती परत गप्प झाली. तसा तो म्हणाला.

"अगं तू इकडे समाज परिवर्तनाच्या गोष्टी करतेय आणि त्या अंधश्रद्धाळू माणसाच्या घरी जाते. तुझं कोण ऐकेल अशानं. भुत येणं अंगात रमणं, तसेच देव अंगात येणं हाया अंधश्रद्धा आहेत. एवढा वेळ नाही देवाजवळ की तो कोणाच्या अंगात एवढा वेळ राहिल. मग त्याच्या अंगात देव येतो ही विसंगत गोष्ट नाही का? तरीही लोकं त्याच्याकडं येतात. बरं झाल्याचा आनंद व्यक्त करतात. पण तू तर शिकलेली ना. तू कशाला जातेस? "

"अरे मी नाही जात त्याच्याकडे."

"मंग काल तुझं भुत दिसलं का? "

"नाही ते मीच होते."

"कशासाठी गेली होती? " तशी ती सांगू लागली.

"मी घरी सांगितलेय की निर्दोषवर प्रेम करते."

"मग त्यात कुठं आला अंधश्रद्धाळू प्रश्न? "

"तू पुर्ण ऐकून घे आधी."

"बरं सांग."

"तर मला घरी म्हटलं तो खालच्या जातीचा. त्याचा पिच्छा सोड. मी म्हटलं की मी पिच्छा सोडत नाही. तेव्हा घरची मंडळी म्हणाली की हिला भुत लागलंय. तेव्हा गंगारामकडं न्यावं लागेल. मी फक्त त्यांचं मन ठेवण्यासाठी गंगारामच्या घरी जात राहिली.

मला गंगारामच्या घरी नेण्यात आलं. मला तो अंगातला म्हणायला लागला. हिला आसरा लागल्या मोहिनी पेक्षा महाभयंकर."

"अन् तू विश्वास ठेवला."

''नाही ना रे. आधी ऐकून तर घे."

''बरं सांग."

"तो विचारु लागला की तव्ळ्यावर गेली होती का? मी म्हटलं हो." तशी ती रडायला लागली.

"का झालं रडायला? काय केलं त्यानं? "

"मी जेव्हा गप्प होते, तेव्हा तेव्हा बेतानं मारलं त्यानं. माझ्याकडून होकार येण्याची वाट पाहात. धाकाच्यानं मी प्रश्नांची उत्तरे देत राहिली."

"तो माझ्याकडून होकार येण्याची वाट पाहात होता. तो म्हणत होता, 'बोल शैताना, कोठून आलास? ' मी मात्र गप्प होते."

"मग सांगितलं का नाहीस का आम्ही तळ्यावर गेलो होतो म्हणून."

"सांगितलं ना. धाकानं सांगावं लागलं. त्यावर तो म्हणाला की हिला आसरा लागल्या."

"मग."

"मग त्या आसरा काढण्यासाठी धावपळ. नेहमी नेहमीचे बोलावणे. दर आठवड्याला त्याच्या घरी जाणं. उतारे काढले, अंगारे धुपारे लावले. पण माझ्या मनातले विचार बदलले नाहीत. मी मात्र अजुनही ठाम आहे तुझ्याशी लग्न करण्यासाठी."

''तू तक्रार करायचा विचार केला नाहीस का? "

"केला ना. पण त्यात माझे मायबाप आड आले. ते फसणार नाहीत का? कारण त्यांनीच नेलं ना मला तिकडं. आतं तर नुसता जीवनाचा वैताग आलाय. जगावंसं वाटत नाही. जेवन रुचकर वाटत नाही. काय करावं सुचत नाही. अन् ते गंगाराम म्हणतो की एक दिवस तो आसरा काढूनच दाखवेल. दर आठवड्याला बेदम मारते बेतानं. जीव अगदी कासावीस होतो माझा."

"म्हणूनच तू उदास दिसतेस. लाकडासारखी वाळून गेल्यागत. डोळेही तरुणपणातच खोल गेलेले. गाल शुष्क झालेले. चेहरा काळवंडलेला. डोळ्याभोवती काळे वलय. चेहरा निस्तेज झाल्यासारखा. जणू असे वाटत आहे की तू कित्येक वर्षापासून त्रास भोगतेय. अपार चिंता आहे तुला. कदाचित असं जर चालू राहिलं तर एक दिवस तू मरुन जाशील."

"हो अगदी तसंच वाटतं. पण मी तरी काय करु? इथं माझं डोकंच चालत नाही. माझ्या शिक्षणाचा उपयोग होत नाही. मी काय गावचा विटाळ दूर करणार! मी पोलिसांची माझ्या आईच्या मनात भीतीही टाकून पाहिली. पण फरक पडला नाही. पण माझी आई ती. तिच्यात फरक पडला नाही. तिला अगाढ विश्वास आहे त्या गंगारामवर अन् माझ्या वडिलांनाही. त्यांची अंधश्रद्धा केव्हा बाहेर निघेल हेच मला समजत नाही."

"ती अंधश्रद्धा बाहेर येईल तेव्हा येईल. पण आजतरी तू त्यांचा मुकाबला करायला हवा."

"पण कसा करणार त्यांचा मुकाबला? "

"हे बघ तू माझ्यावर प्रेम करतेस ना खरं खरं."

"हो. मी खरं खरं प्रेम करते तुझ्यावर."

"मग मी दिलेला सल्ला ऐकशील."

"काय सल्ला आहे तुझा? "

"तू तुझ्या मायबापानं सांगितलेल्याच मुलाशी विवाह कर."

"काय बोलतोस? ते शक्य तरी आहे का? "

"का शक्य नाही? "

"ते यासाठी शक्य नाही. मी तुझ्यावर प्रेम करते. मी तुझ्याशिवाय जगू शकणार नाही. एक क्षणही. शिवाय तो कमी शिकलेला असून पाहायला तेवढा खास नाही."

"तरीपण तू त्याच्याशी लग्न कर."

"मग तुझ्या माझ्या प्रेमाचं काय? "

"तू माझ्यावर खरं प्रेम करतेस ना."

"हो खरंच प्रेम. म्हणून काय हा त्याग करायचा? "

"हो त्याग करायचाच. कारण ज्या प्रेमात विश्वास, त्याग, बलिदान असतं, त्यालाच खरं प्रेम म्हणतात."तुझं माझ्यावर खरं प्रेम असेल तर असंच कर. मी सांगतोय तसं."

"मग माझ्या ध्येयाचं काय? "

"ते मी पाहून घेईल."

"अन् तू कसा जगशील."

"माझी चिंता सोड. मी जगेल कसा ही."

ती विचार करु लागली होती. तिला तो विसरणे शक्य नव्हते.

त्याचेही मनात तोच विचार होता. तोही तिचं प्रेम विसरु शकत नव्हता. पण त्याला तिचं सुख हवं होतं. ते सुख तिला मिळवून देणं भाग होतं. त्यासाठी तो आपल्या प्रेमाचे दान करीत होता.

आजचा दिवस दोघांसाठी दुःख देवून गेला. तिचं अभ्यासात मन लागत नव्हतं. त्याचंही वर्गकार्यात मन लागत नव्हतं. आपण आपल्या आयुष्यातील फार मोठी गोष्ट हरवली असं त्यांना वाटत होतं. ध्येयाचं जावू द्या. ध्येय तर निर्दोष पुर्ण करेलच असं वाटत होतं. कारण तिचा त्याचेवर विश्वास होता. पण प्रेमाचं काय? ती जगेलही कदाचित पतीजवळ. पण त्याचं काय? तो कसा जगेल? त्यानं प्रेमासाठी नव्हे तर माझ्या सुखासाठी आपल्या प्रेमाची आहूती दिली हे तिला समजत होतं पण ती तरी काय करणार होती बिचारी. कारण तिही लाचार होती. अहाय्य अबलेसारखी. रावणाच्या कैदेत पडलेल्या सीतेसारखी........

सायंकाळ झाली होती. तशी ती कॉलेजमधून घरी आली होती. आईही घरी आली होती. आज मात्र ती अतिशय निराश होती. कारण तिची इच्छा नेस्तनाबूत झाली आहे असं तिला वाटत होतं. काय करावे तिला सुचेनासे झाले होते.

आईनं तिचं मन हेरलं. तशी ती दररोज आपल्या पोरीबद्दल नाराजच राहायची. तरीही आज तिची अवस्था पाहून तिच्याच्यानं राहावलं नाही व ती म्हणाली,

"बेटा कोमल, का झालं? एवळी निराश का? "

तिनं डोळ्यातून पाणी आणलं. नकळत तोंडातून शब्द फुटले व म्हणाली,

"आई."

"का झालं बेटा? का झालं? अगं स्रियांच्या नशिबी असेच भोग. येथं पिरमाले थारा नाय. बाईच्या जातीले निर्णयच नाय घेता येत. समदे निर्णय पुरुषच घेतेत. बोल का झालं बरं? "

"आई माझं निर्दोषवर प्रेम.. पण तो खुप चांगला आहे की त्यानं माझ्या सुखासाठी प्रेम नाकारलं आज. म्हणत होता की मी त्या पोरासोबतच लग्न करावं. माझ्या सुखासाठी आहूती दिली प्रेमाची."

"मंग तुह्यं का मत हाये? "

"अगं पण प्रेम.. हे प्रेम मी एकाएकी कशी विसरु? "

"अगं हळूहळू विसर. पिरमानं पोट भरत नाय. पिरम क्षणिक, पती हा आयुष्यभर असतो. असन निर्दोष चांगला. पण ईसर त्याले. ईसरावंच लागन. कारण गावात एवळा ईटाळ भरला हाये का जीव केव्हा जाईन याचा नेम नाय. मी पण सपन पाह्यलं होत का देश स्वातंत्र्य होईन. ईटाळ संपन. पण नाय. ईटाळ हा त्या अस्पृश्यांच्या पाचवीलेच पुजला हाये. ईटाळ आज शयरातबी लोकाईच्या अंतर्मनात हाये. आपल्या गावात फक्त खुलेआम दिसते. लोकाईचं मन

तुले कसं कळन बेटा. आज बी सुशिक्षीताच्या मनात लपूनछपून बसला हाये हा ईटाळ. अन् नवकरीत बी हाये हाच ईटाळ

काळीज चिरत असन बेटा त्या अस्पृश्यांईचा. काळीज चिरत असन बेटा, जवा आपण त्याईले अस्पृश्य म्हणून चिडवतो. शिकवतांनी आपल्या गावात त्याईच्याच पोराईले बाजूले बसवतेत. बाईचा आजबी चार दिसाचा ईटाळ मानतेत. अस्पृश्य गावात शिरला तं ईटाळ मानतेत. खरं तं आजबी ईटाळ. काल फाटकाबाहेर उभा होता. आतं घराच्या अंदर शिरलाय. म्हणूनच अख्ख्या देशात असृश्यांईच्या पोरीवर येदनादायक बलत्कार. शिवाय आत्महत्या केली असं जाईर. सर्रास खुन व नंतर त्याले आत्महत्येचं रुप.

अगं ज्या देशात आपल्या स्पृश्य समाजाच्या स्त्रियांवर बलत्कार होतेत, तेव्हा त्याईची कोणती केवा. न्याय देणारा स्पृश्य, गवाही देणारा स्पृश्य, आरोपी स्पृश्य. सारेच स्पृश्य यात.. अन् गवाही देतांनी अस्पृश्य बी धाकाच्यानं स्पृश्य होवून जातेत. म्हणजे गवाही बदलवतेत. साधा नवकरी बी करु देत नाय हे स्पृश्य समजणारे. त्याईले जगू बी नाय देत. त्याईचे खटले बी यशस्वी नाय होवू देत. न्याय देणारी, धोरणं राबवणारी, अंमलबजावणी करणारी समदी माणसं आज बी स्पृश्य. अस्पृश्य जरी असला तरी त्याईच्यावर दबाब असते स्पृश्याईचा.

काय ईटाळ आईच्या गर्भातून पैदा होते? त्या गर्भातल्या लेकराले मालूम असते का, का तो चांभारच हाये वा तो कुंभारच हाये म्हणून. काय ईटाळ जनमाबराबर मालूम होते? काय ईटाळ देव शिकवते? का मानतेत हे ईटाळ तं तेच कळत नाय. अगं जे ईटाळ मानत असतीन नं त्याईच्या सारखे देशात नपुंसक नाय. अन् त्याईचा देव बी नपुंसकच. अगं देव माणसातच हाये. अस्पृश्याईच्या घरात हाये. बाबासाहेबच खरा देव. त्याईनं समद्याईले जगणं शिकवलं. समद्या लोकाईले हक्क मिळवून देले. पण हे समदं ईसरले. या गावाचं सोड. या गावानं कधीच समानता दाखवली नाय. अस्पृश्यााईले हक्क देले नाय. अन् त्याईनंबी मागतले नाय. पण गावाबाहेरच्याईनं ज्यानं ज्यानं हक्क मागतले, त्याले तरी भेटले का? अगं जेथं आपुन जनम

देणाऱ्या मायबापाले इसरतो, तेथं बाबासहेबाचं काय? त्याईले ईसरतीन नाय तं का लोक. उलट आपुन स्पृश्य. आपुन जर सांगाले गेलो नं ईटाळ सोडा म्हणून तं आपल्यालेच पागलात काहाळतीन हे लोकं. अगं त्याईलेच गरज नाय ईटाळ संपवायची तं आपल्याले कोणती गरज येवून पल्ली.”

"आई, तुझं म्हणणं बरोबर आहे. पण त्यांना त्याबद्दल समजत नाही. शिवाय आपणच ते आपल्या पायाखाली राहिले पाहिजे असा विचार करुन त्यांना पायदळी तुडवतो. त्यांच्या भावनांची कत्तल करतो. आजही तुच पाहा, मला निर्दोष पसंत असुनही तुम्ही चक्क माझ्या विचारांची हत्या करीत आहात की नाही.”

आई काय समजायचं ते समजली. तशी ती गप्प झाली. बऱ्याच वेळानंतर ती बोलली,

"बेटा, हे समदं जावू दे. तू मले सांग की लगनाबद्दल का ठरवलं? "

"आई, मी तरी काय करु? निर्दोषही म्हणतो की त्याचा नाद सोडून मायबापानं पसंत केलेल्या पोराशीनच लग्न कर. म्हणतो प्रेम विश्वास, त्याग, बलिदानावर आधारीत असतं. निदान माझ्या प्रेमाखातर त्याच्याशी लग्न कर. किती चांगला आहे निर्दोष बघ. नाहीतर तुम्ही....... तुम्ही मला जन्म दिला. प्रेमासाठी नाही तर स्वार्थासाठी. तुम्ही आजही आपला स्वार्थ सोडायला तयार नाही. तुम्ही आजही जातीतील पोराशीच लग्न करायला लावता. दाखले देता. उन्हातून सावलीत नेले. लहानाचं मोठं केलं. मोठमोठे दाखले. हे माझ्यावरील प्रेम नाही तर स्वार्थ आहे तुमचा. खरंच प्रेम जर असतं तर तुम्ही माझ्या मनाप्रमाणे लग्न करु दिलं असतं. त्या गंगारामकडे नेलं नसतं.”

"अगं तू स्वार्थ समज की अजून काई. बेटा जातीसाठी माती खावीच लागते. नाहीतं जातीची माणसं वाळीत टाकतेत. व्यवहारबी बंद. मंग जगणं मुश्किल. तू अजून लान हायेस. तुले नाय समजणार त्या गोष्टी.”

"हा स्वार्थीपणा नाय झाला का? जातीसाठी आपल्या जन्म दिलेल्या बाळाला अग्नीत टाकणं, ढकलणं जाणूनबूजून नाही म्हणत का याला? "

"बेटा हे समदं जावू दे आतं. तू का ठरवलं ते सांग."

"मी काय ठरवणार आहे. तुम्ही जिंकलात मी हारले. मला तुम्ही स्वार्थ पुढे करुन आणि त्या निर्दोषनं प्रेमाचा वास्ता देवून हारवलं. जिंकूच दिलं नाही. ठीक आहे. आता ठरलं, तुम्ही आणि तो निर्दोष जसं म्हणेल तसं वागायचं. मग मी मरणाच्या खाईत गेले तरी चालेल मला. मी आता त्या पोराशीच लग्न करणार. ज्या पोराला तुम्ही पसंत केलंय. आपल्या सर्व इच्छा आकांक्षाची होळी करुन. त्यांना तिलांजली देवून." ती हुंदके देत म्हणाली.

मुलीच्या दुःखाची कल्पना आईला होती. पण तिच्याजवळ कोणताच उपाय नव्हता. सगळं मनुस्मृतीनुसार रतीरामच्याच हातात होतं.

आज आकतचा दिवस होता. दर आठवड्याला रतीराम आपल्या मुलीला आकत लावण्यासाठी गंगारामकडे घेवून जात असे. आजही तो नियमाप्रमाणे घेवून जाणार होता आकत लावण्यासाठी.

सकाळीच त्याची जेव्हा रतीरामनं आठवण काढून दिली, तेव्हा गीता म्हणाली,

"मुलगी लग्न कराले तयार हायेआज काई आकतले जाणं नाय."

"म्हंजे आज तिच्या आंगातला भुत निंगला तर........"

"हो निंगला मी तिले ईचारलं तं ते लगन कराले तयार झाली."

"व्वा व्वा गंगारामची कमाल. त्याच्या देवानं मा पोरीले बरं केलं."

अंधश्रद्धाळू रतीराम....... मुलीच्या होकार देण्याला गंगारामच्या देवाची कृपा समजू लागला. खरं तर तिला निर्दोषनं समजावलं नसतं तर आजही कोमल लग्नाला तयार झाली

नसती. पण सगळं गंगारामनं केलं असं रतीराम मानत होता. मुलीच्या होकाराचं श्रेय तो गंगारामला देत होता.

दोन महिने पुर्ण झाले होते. वरपक्षाच्या पुर्ण इच्छा मावळल्या होत्या. तसा वर मुलगा कमी शिकलेला होता. त्याचं नाव गणपत होतं. पण त्याला घरी लाडानं बापूराव कदाचित मुलगा कमी शिकलेला असल्यानं पोरीचा निरोप आला नसेल असं वरपक्षाला वाटत होतं. मात्र त्या मावळलेल्या आशा कोमलच्या होरारानं पुलकीत होणार होत्या. हे तेवढंच खरं होतं.

आज सोमवार होता. आज जर निरोप आला नाही तर उद्यापासून आपण दुसरी मुलगी पाहू असा विचार वरपक्षाकडील मंडळी करीत होती. तसे पाहता गणपतला फार मोठी आस होती की कोमलचा निरोप नक्कीच येईल. कदाचित त्याला संपत्तीचा गर्व होता. कदाचित संपत्ती असल्यानं आपण ज्या मुलीवर हाव टाकू, ती मुलगी पदरात पडेल असं वाटत होतं. पण झाले उलट. आज एक महिना होवूनही कोमलचा निरोप आला नव्हता. केव्हा त्याला त्याच्या अहंकाराला पायदळी तुडवावे लागले होते. त्याच्या अहंकाराच्या कक्षा मावळल्या होत्या.

दुपारचे बारा वाजले होते. तसं शेतीत जाण्याचं काम वडीलच करीत असत. त्याचे वडील नित्य सांगत असत की त्यानंही शेतीत जावं व शेतीत लक्ष द्यावं. मेहनत केल्याशिवाय पैसा दिसणार नाही. पण तो काही ऐकत नव्हता. त्याच्या मतानुसार शेतात काम करणं मजूरांचं काम असून बसून खाणं मालकाचं काम आहे. त्यामुळं तो मनात वाटल तेव्हा शेतात जात असे.

लहानपणापासून गणपत व्यसनी असून टवाळक्या करण्याकडे त्याचं जास्त लक्ष राहायचं. बापानं कमविलेली अगाढ संपत्ती गणपतला व्यसनं लावण्यास कारणीभूत ठरली. संपत्तीच्या माजानं व्यसनं जडली होती. बाईक वर केवळ सुंदर सुंदर पोरी घुमविण्यात त्याचा दिवस जात असे. पण गावात त्याच्या बापाचा दरारा असल्यानं लोकं गणपतला रोखत नसत. तसं पाहता गणपत हा अल्लड वाया गेलेला मुलगा होता.

कधीकधी मुलीबद्दल त्याच्या घरी भांडणंही येत. तेव्हा हिच मंडळी समजावून तर कधी पैसे देवून पोरीच्या मायबापांना चूप करीत. आपला बाप सगळं सांभाळून घेतो हे हेरुन गणपतनं कित्येक गावातील मुलींच्या इज्जती लुटल्या होत्या. तसेच धाकदाखवून त्यांना तक्रारीपासून रोखले होते.

अख्खा गाव घाबरत होता गणपतच्या परीवाराला. त्यांच्या मुलीवर गणपतने हात जरी टाकला तरी आपण काही म्हणू शकत नाही. हे त्यांना माहिती होतं. प्रसंगी एखाद्याने हिंमत केलीच तर त्याला मारुनही टाकत असे. शिवाय त्याचा पताही राहात नसे. अर्थात पुरावेही सापडत नसत. सगळा गाव धाकाच्यानं त्यांच्याच बाजूनं बोलत असे. पोलिसही बांधलेले असल्यानं शहानिशा होत नव्हती. असं ते गाव.

नशीबाला दोष देत देत कोमलनं लग्नाला होकार दिला. कोमलला माहित नव्हतं की ज्या व्यक्तीशी लग्न करण्यास होकार दिला, तो व्यक्ती कसा असेल.

महिना नुकताच संपला होता. कोमलनं जसा होकार दिला, तसा कोमलच्या होकाराचा निरोप गणपतला पोहोचला. त्यानंतर गणपतलाच नाही तर पुर्ण परीवारालाही आनंद झाला. गणपतला कित्येक मुलींचे तोंडसुख मिळाले होते, पण कोमलला पाहिल्यावर त्याची भुरटी नजर तिला चोरुन गेली होती. गणपतला तीच हवी होती. झाला निरोप मिळाला व पुढील बैठकीसाठी पाहूणे सक्रीय झाले.

पुढची बैठक ठरली. तसा गणपतही पुढच्या बैठकीला तयार झाला. पुढच्या बैठकीला गणपतसह पाहूणे आले. त्यावेळी गणपतच्या चेहऱ्यावर हास्य स्पष्ट दिसत होतं. पण कोमलचं काय! ती मात्र निराश दिसत होती.

पाहूणे आले. त्यांचं चाहापाणी झालं. तसं पाहूण्यांनी विचारलं,

"चायपान झालाय. आतं देवाणघेवाणाचं काय? "

"म्हंजे होईलच की रितीरिवाजापरमानं."

"नाय नाय. आधी ठरवलेलं बरं."

"देईन स्वखुशीनं जावईबापूले आंगठी आन् पाच हजार रुपये रोख. सुटबूटही देईन."

"अहो जमाना हाये का पाचहजाराचा? "

"मंग किती पाह्यजे? "

"पन्नास हजार म्हणा की."

"पन्नास हजार. लय मोठी रक्कम हाय. तुमाले तं माहित हाये का दुष्काळामुळं पुरती वाट लागली शेतीची. माही शेती डोंगरात हाय. तेवळं पीकलं नाय. तसा लग्नालेबी पैसा लागणारच."

"अहो पण आमी का कराचं? त्याचा ईचार तुमी करा."

"माई तेवळी औकात नाय. गरीबाकळं पाहा. वरुन लग्नालेबी पैसा लागन."

"सांगा बोला की नाय जमत म्हून. दुसरी पावू आमी. कायपण बंधन नाय. आमाले पोरगी कोणीबी देतेत. अहो गडी माणसं सर्वकाही हाये म्हणावं. राज करन कोणती बी पोरगी."

रतीरामला विचार आला होता. त्यानं छाती ला माती लावून आपल्या लाडाच्या पोरीला शिकवलं होतं. शिवाय तिच्या मर्जीविरुद्ध लग्न करीत होता. तेही तिनं दुसऱ्या जातीसोबत लग्न करु नये म्हणून त्याला लवकर लग्न उपकंवायचं होतं. त्यातच या पाहूण्यांचं हुंड्याचं नाटक.. त्याक्षणी विचार येत होता. तसा तो म्हणाला,

"आमची पोरगी शिकलेली हाये. त्याचा तं ईचार करा थोडासा."

"अहो, पोरीले कोणं शिकवाले सांगतलं. ते जावू द्या सगळं. तुमाले आमच्या अटी मंजूर हायेत का सांगा? "

रतीराम विचार करु लागला. हे घराणं जावू द्यायला नको. घरी भक्कम शेती. गडी माणसं. आपली मुलगी सुखात राज करेल. त्यानं होकार द्यायचं ठरवलं. लग्नाचं पाहून घेवू काय ते म्हणत. असा विचार करीत कोमलच्या आयुष्याची राखरांगोळी करीत कोमलच्या बापानं कमी जास्त करुन लग्नाला होकार दिला.

साक्षगंध पार पडलं. आज लग्नाचा दिवस उजाडला. तसा घरासमोर पळस, जांभूळ व करंजच्या डाहाळ्याचा मंडप टाकला गेला. गावातच बास मिळाल्यानं मंडपाचा खर्च वाचला. पण गणपतचं काय? त्यानं अख्खा गाव झाडत आणला होता. मंडपाचा खर्च वाचला खरा. पण जेवणाचं काय? एवढ्या लोकांना जेवन कसं पुरवायचं रतीरामला प्रश्न पडला होता.

गाव संपन्न होतं. गावातील माणसे जरी विटाळ मानत असली तरी चांगली होती. कोणी परगाववाल्यांनी अशी जरी कुटूंबाची धुळधानी करण्याचा प्रयत्न केला तरी गाव ती धुळधानी होवू देत नसत. मदतीला धावून येत.

रतीरामचे मुलीला शिकवणे आवडत नव्हते. म्हणून काही लोकं त्याचा तिरस्कार करीत. ते बोलत नव्हते जणू रतीरामला वाळीत टाकल्यासारखं. पण जेव्हा त्यांना कळलं की रतीरामची मुलगी एकाा दहावी नापासला दिली, तेव्हा ते मनोमन खुश झाले होते. जणू त्या मुलीच्या शिक्षणाचा उपयोग झाला नाही असा विचार करुन. कोणी मात्र हळहळत होते.

गावानं द्वेषभावना सोडली होती. पाहूणे रतीरामची फजीती करीत आहे हे गावानं ओळखलं. त्यातच ती फजिती रतीरामची नसून अख्ख्या गावाची आहे हेही गावानं ओळखलं.

गावानं जसा पाहूण्यांचा डाव ओळखला. तसा डाव हाणून पाडायचा असा निर्धार गावानं केला.. त्यामुळं गावातील श्रीमंतांनी धान्य आणून टाकलं. वेळीच पैसा पुरवला. तसेच पाहूण्यांच्या जेवनाची यथायोग्य पद्धतीने सोय केली.

रतीरामची चिंता. पाहूण्यांची आरास कशी करणार. पण गावाने ऐन वेळी केलेल्या मदतीनं तो सुखावला होता.. लग्नसोहळाही उत्तम रितीनं पार पडला होता. कोमल सासरी नांदायला गेली होती.

कोमल सासरी राहायला गेलू खरी. पण आता तिची खरी परीक्षा होती. गावची आठवण येत होती. मायबापाची तर येतच होती. पण त्या निर्दोषचीही आठवण तिला अस्वस्थ करीत होती. तिथं तिला नवीन वाटत होतं.

निर्दोष लग्नाला दिसला नव्हता. तसं पाहता या लोकांना गावात जेवायला बोलवत नसत.. कारण विटाळल चरणसीमेवर होता. तिनं बोलवण्याचा प्रयत्न केला. पण निर्दोषनं येणं टाळलं होतं. त्यानं विटाळ व त्याचं प्रेम दोन्हीही गोष्टी टाळल्या होत्या. त्यालाही वाटत होतं की तिच्या विवाहाला बाधा नको.

तिच्या मनातील त्याच्याबाबतची प्रीती संपावी असं निर्दोषला वाटायचं. तिनं पतीवर प्रेम करावं असंही त्याला वाटायचं. केवळ त्या अस्पृश्यांच्या स्पर्शानं गावच नाही तर पाहूणेही विटाळतात. असं अस्पृश्यांचं मानणं. ते मात्र दुसऱ्या दिवशी वाचलेलं अन्न मागायला जात. तसं पाहता ताजं अन्न खाणं त्यांच्या नशिबी नव्हतं.

नवीन परीसर. घरात सेवेकरी सेवेला असतील असं सासरच्या लोकांनी म्हटलं होतं. पण कपाळ करंट्याचं बनलं होतं. तसं तिथं काहीच नव्हतं. ते धांदात खोटं बोलले होते. शेतीत नोकरं होते. पण घरी सासूशिवाय काम करायला कोणीच नव्हतं.

कोमल घरातील एकुलती एक रतीरामची मुलगी. लाडात वाढली असल्यानं तिला कामाची सवय नव्हती. सासूबाई खास्ट होती. दोन मजली घर होतं. घरी गाई म्हशी होत्या. सकाळपासून म्हशीचं शेण पोयटा तिला करावा लागत होता. दूध काढायला गडी येत होता. पण घरात कामं करायला कोणीच नव्हतं. कोमलला मात्र आता कामाची दगदग होत होती. घरात फरशी नसल्यानं दररोज शेणाचं सारवणंही करावं लागायचं.

कोमल रोज सकाळी सकाळी उठायची. नव्हे तर उठावच लागायचं. कारण सासू ओरडत असे. हेच तुह्या मायबापानं शिकवलं का?? असे म्हणून ताणे देत असे. नुसता वैताग यायचा. त्याचबरोबर चीडही. पण आता उपाय नव्हता आईच्या घरी आरामात उठणारी मुलगी, तिला मात्र शिकवेली असूनही या गोष्टीचा सामना करावा लागत होता.

कोमलची होणारी दुर्दशा पाहून कोणीही तिच्या मदतीला धावून येत नव्हता. शिवाय तेही कोमलला दोष देत. गणपततही आपल्या पत्नीची बाजू घेत नसे.

दोन मजली इमारत खाली शेणाचं लिपण. वर फरशी लावलेली. कोमलला खाली सारवण तर वर फरशी पुसणे. फरशी पुसून झाली की अंगणात शेणाचा सडा टाकावा लागायचा. शिवाय त्यावर रंगरंगोटी म्हणून रांगोळी. त्यानंतर लवकरच अंघोळ आटोपून लवकरच स्वयंपाक करावा लागत होता. कारण घरची सर्व मंडळी शेतात कामाला जायची. फक्त गणपतला सोडून. दहा वाजेपुर्वी स्वयंपाक करावाच लागत असे. दुपारी सर्व व्यक्तींचे कपडे, भांडे धुण्यात नाकीनव यायचं. कोमलला एक जीव नाही तर मोलकरीण म्हणून काम करावं लागायचं. रात्री झोपताना डोकं दुखायचं. तर कधी अंग. पण पती गणपत तिला शिव्याशिवाय काहीही देत नव्हता.

नावासाठी प्रसिद्ध होतं गणपतचं घराणं. एकदा रात्री झोपेच्या वेळी कोमल म्हणाली,

"अहो, माझं ऐकता काय? "

"बोल का म्हणायचं ते." दारुच्या नशेत धृत असलेला गणपत म्हणाला.

"मी राबराब राबते. अंगं दुखतं. सारखा वैताग येतो. एक मोलकरीण नाही घरात. किती कामं असतात घरी. माहित आहे का? "

"तू एकटीच करते का? "

"हो मी एकटीच राबते. सासूबाई एका कामाला पण हात लावत नाहीत. तुम्ही देखील नाही."

"मग आम्ही का झक मारते का? " शिव्या देत गणपत म्हणाला.

"मी तसं नाही म्हटलं."

"मंग वावरातले कामं तुह्या बाप करते का? का माय करते? "

"अहो मी तसं नाही म्हटलं."

"मंग का म्हणलं? "

"अहो मला तसं म्हणायचं नाही."

"मंग का म्हणाचं हाये? "

"मी म्हणते की एखादी मोलकरीण लावा घरात."

"अन् तुले बिबूसारखी आयती पोसू. देलन का तुह्या बापानं जास्तीचे पैसे? म्हणलन का हे घ्या पैसे. मोलकरीण लावजा. अन् मा पोरीले पाळण्यावर बसून झुलवजा."

"अहो इथं माझे मायबाप कशाला आणले? मी सहज म्हटलं अन् तुम्ही माझे मायबाप काढता. लावायची असेल मोलकरीण तर लावा. नाहीतर नको लावा. पण माझे मायबाप काढायची गरज नाही. माझ्या मायबापानं कसंही करुन माग म्हटलं का मला? "

"मंग का मी तुझ्याच्यानं अडकून पल्लो होतो का? लय भेटते पोरी. लय रांगा लागते आतं बी पोरीयच्या. तुह्या सारख्या छप्पन उभ्या करतो."

"जा ताकद असेल तर आणूनच दाखवा. मी काहीपण बोलणार नाही. तुमच्यासारख्याले हुंगतेच कोण? मी चांगल्याचं सांगते अन् तुम्ही बाऊ करता. निदान माहित तर होईल तुमची ताकद."

"हे पाय. तू आतं भांडण करु नको. नायतं......."

"नायतं का नायतं? "

"तू चूप बस, नायतं......"

"का करान? करताच का येते तुम्हाला? तुम्हाला मायबापानं जन्म दिला. लहानाचे मोठे केले. फार कष्ट उपसलेत. अन् आमच्या मायबापानं कंचे खेळलेत."

"आतं चूप बस म्हणतो न."

"नाही बसणार."

ती जसजशी उत्तरं देत होती. तसतसा गणपत आणखी चिडत होता. त्याला आता पारा वाढला होता. त्याला रागही येत होता. तसा तो पुन्हा म्हणाला,

"आतं चूप बस म्हंतो तं चूप बस."

"मी काय बोलले असं तुम्हाला? साधी कामाला मोलकरीण लावा म्हणते. कामाची सारखी दगदग होते. शेतात कामाला मजूर लावता येतात अन् घरी. बस मागायला आले तेव्हा तर मोठमोठ्या डिंगा हाकलच होते. अन् आता.......... आता तं दिसूनच राहिला थाटबाट. म्हणे कसे, तुमची पोरगी राज करन राज. हाच आहे का राज? निव्वळ पेकाळ. दररोज दारु पिवून झिंगत राहाणं. शेतावर न जाता गावातच हुंडदत राहाणं. अन् सायंकाळी मला गोष्टी सांगणं. पुर्ण खानदानंच बैताड."

त्यांची अशी दररोज भांडणं व्हायची. तोही तिचा बाप काढायचा. तिही चिडायची. आजही मायबाप काढल्याने तिला भयंकर राग आला होता. तिनेही त्याची खानदान काढून टाकली होती. परीणाचा विचार केला नाही. पण त्याचा परीणाम असा झाला की गणपतचा राग अनावर

झाला आणि त्याने तिला बेदम मारले. त्या कोमलचं खानदान काढणं व खानदानीला बैताड म्हणणं त्याला काही आवडलं नाही.

हे भोग होते तिच्या नशिबाचे. मायबापाच्या घरी लाडानं वाढलेली पोरगी त्या गंगाारामने पहिल्यांदा तिच्यावर हात उचलला होता बेतानं मारुन आणि हा दुसरा प्रसंग होता की ज्यावर विश्वास ठेवून लग्न केलं, त्या पतीरायानं बेदम झोडपलं होतं.

कोमललाही ताकद होतीच. तो दारुच्या नशेत असल्यानं त्याला तेवढी ताकद नव्हती. पण पतीवर हात उचलू नये असा मनुस्मृतीचा पडदपडदा आड आला होता. तसा सुसंस्कृतपणा तिच्याही डोक्यात होता. तिनं पाहिलं होतं की लहानपणी बाप आईवर रागवत असे, तेव्हा आई काहीच बोलत नव्हती बापाला. आज तेच संस्कार तिच्यामध्ये कुटकुट भरलेले होते. पण बापानं मात्र तिच्या आईला कधीही मारलं नव्हतं. हे तिनं अनुभवलं होतं. आता आपलंच चुकलं असा विचार करुन ती म्हणाली,

"सगळे पुरुष एकसारखेच असतात. स्रियांना पायातली चप्पल समजतात. त्यामुळं एकच काम. स्री दबली नाही तर हात उचलणे. आम्ही नाही मारु शकत का?? "

'तू मारते का मले' म्हणत अजून गणपत तिच्या अंगावर धावत होता. ते पाहून कोमलला चूप राहणे भाग होते. त्या दिवशी ती जेवली सुद्धा नव्हती.

दुसरा दिवस उजाडला. रात्रीचा राग मनात होताच. तरीही तो दाखवत गणपतला ती चहा देवू लागली. त्याला न उठवता कपबशीचा आवाज केला. चहा बेडरूममध्ये ठेवून ती आपली कामे करायला निघून गेली.

कपबशीचा आवाज ऐकून चहा आला आहे असं समजून गणपत उठला व चहा घेवून तो चौकात फिरायला गेला.

दुपारी सगळे कामाला जात असत. कोणी घरात राहात नव्हते. गणपतचे मायबापही सकाळी दहा वाजताच डबा घेऊन शेतावर निघून जात असत. शेतातील कामात मश्गूल होवून ते मध्यान्ह घरी न येताच शेतात रमत असत. अख्ख्या गावातीलही लोकं रोजमजूरीसाठी जात असल्यानं गावात अगदी सामसुम राहायची अशावेळी गणपत आपला डाव साधवत असे. तो वस्तीच्या मुलींना फुस लावून घरी आणत असे. त्यांच्याबरोबर रंगरलिया मनवीत असे. त्यानंतर तो त्या पोरींना पैसे देत असे. पैसे मिळतात म्हणून त्या पोरीही गणपतसोबत रंगरलिया मनवायला तयार होत होत्या. पण आता मात्र विवाहानंतर त्याला तसं करता येत नव्हतं. कारण त्यानं कोमलशी लग्न केलं होतं. कोमल तशी करु देणार नाही असं त्याला वाटत असे. आपली करतूत आपल्या मायबापाला सांगेल असं त्याला वाटत असे.

कोमल जरी स्वभावानं चांगली असली तरी सासूला तिची किंमत नव्हती. तिच्या मुलाशी जेव्हा खटके उडत, तेव्हा सासू मुलाला दोष न देता तिलाच खोटं करीत असे. याचाच फायदा गणपतनं घेण्याचं ठरवलं. एक दिवस दुपारी कोमल घरी असतानाच गणपतनं रंगरलिया मनविण्यासाठी व कोमलला दाखविण्यासाठी एक मैत्रीण घरात आणली. कोमलनं हे सगळं पाहिलं. तिला भयंकर वेदना झाल्या.. त्या प्रकाराची किळसंही आली. पण ती काय करणार होती. त्यानं तिला रात्री भांडणात चूप बसवले होते.

कोमलसमक्ष घरात आलेली मैत्रीण....... दार बंद करुन बंद कमऱ्यात गणपतसोबत रंगरलिया मनवीत होती. कोमलला चीड येत होती. पण उपाय नव्हता. सासूला सांगावे रात्री तर सासू आपल्यालाच दोष देईल असं तिला वाटत होतं. ती विचार करीत होती. तसा गणपतचा आवाज आला.

"कोमल, पाणी आण."

कोमलनं पाणी आण शब्द ऐकला होता. नाही पाणी दिलं तरी राग. गणपत पुन्हा मारझोड करेल. ती हतबल झाली होती. त्यामुळं तिनं भीतीनं त्याला पाणी नेवून दिलं. त्याला तो काय करतो हेच दाखवायचं होतं.

तिनं त्याला पाणी नेवून दिलं खरं. पण न पाहणाऱ्या अवस्थेत आपल्या पतीला पाहून तिचं सर्वांग दुखायला लागलं. तिलाा त्याचक्षणी वाटायला लागलं होतं की गणपतचा जीव घ्यावा नाहीतर आपलाच गळा आपल्याच हातानं दाबून जीव द्यावा. पण ती मजबूर होती. काळजाचा दाह होत होता. तिनं तसंही केलं असतं. पण त्या गणपतच्या परीनारानं तिलाच दुषणे देत तिला व तिच्या परीवाराला बदनाम केलं असतं.

काय करावे सुचत नव्हते. आता मात्र दररोज दुपारी गणपत अशा वेगवेगळ्या पोरी आणू लागला होता. ती दररोजची चिंता तिला सतावत चालली होती. मेंदूचा संपुर्ण दही झाला होता. पण बिघडलेला गणपत काही केल्या सुधरत नव्हता. त्यामुळं विचार होता कीकी जी काल समाज सुधारायला निघाली होती. तिचा नवराच स्वतः बिघडला होता. त्यालाच सुधरवता येत नव्हते.

आज मात्र तिनं निर्धार केला होता. दररोजच्या ती त्या गोष्टी पाहून कंटाळली होती. आज सायंकाळी सासू काहीही म्हणेल तरी चालेल असा विचार करुन ती सासूबाईला ती कहाणी सांगणार होती. ती सायंकाळ होताच सासूबाईच्या येण्याची वाट पाहात होती.

सायंकाळी सासूबाई घरी आली. गणपत बाहेर गेला होता. संधी साधून ती सासूबाईला म्हणाली,

"सासूबाई एक गोष्ट सांगू."

"काय सांगायचं हाये? " ती जरा रागातच म्हणाली.

"तुमच्या पोराचं लक्षण काही बरोबर नाही."

"म्हंजे? "

"तुमचा पोरगा चारित्र्यहिन आहे."

"अर्थात."

"अहो सासूबाई.. ते बऱ्याच दिवसापासून पोरींना माझ्यासमक्ष घरात भरवतात. रंगरलिया मनवतात. मलाच पाणी पाजायला लावतात. अन् नको त्या अवस्थेत दिसतात. हे काही बरोबर नाही. तुम्हाला माझे खोटे वाटत असेल तर एखाद्या दिवशी येवून बघा दुपारी."

"हं लबाड कुठली? माह्या पोराले बदनाम करते. तू कोणती मार चांगली हायेस. कामाचा नेट लागते म्हून बदनाम करते का? मा पोरगा दहा बायका ठेवो. तुले बसून खाले भेटते न.. चूप बस."

सासूनं पोराचीच बाजू घेतली होती. ती कल्पना होतीच तिला. तशी ती समजदार नव्हतीच. तरीही कोमल म्हणाली,

"सासूबाई हा संभाव्य धोका आहे उदयाचा. माझं सोडा पण त्याच मैत्रीणी उद्या तुमच्या पोराची वाट लावून टाकतील."

"म्हंजे? का करतीन त्या? अन् तो तं तसा नाय. तू काईबाई बोलतेस. कुलथा असल्यासारखी. माह्याच घरी रावून माह्याच पोराचा खावून माह्याच पोराले शिव्या देतेस. खावू खावू बेशरम झालीस."

"ठीक आहे.. मी बेशरम झाली ना तर उद्या दुपारी येवून आपल्या डोळ्यानं पाहून घ्य. आतातरी डोळे उघडा. नाहीतर तुमचाच लेक मारला जाईल. मग नको पश्चाताप. म्हणून म्हटलं."

"कोण मारन मा पोराले? "

"त्या मारतील त्या."

"तू अभद्र बोलू नोको. अशी शापवाणी तोंडातून काळू नोको."

"अहो, आतंच अडकवलेले बरे म्हणून सांगितलं. उद्यापासून सांगणार नाही. सासूबाई मुलगा हरवाल."

"चूप बस. आतं काई बोलू नोको. नायतं या चुलीतली कोयती काळीन अन् टाकीन तोंडात. तोंड भाजून टाकीन वांग्यासारखी. चूप चांडाळीन. आली मा पोराच्या नशिबात. मा पोराचा मास खाले. समजत बी नाय का मी का बोलून रायलो म्हून. वांझोटी कुठली."

कोमल गप्प झाली. कदाचित तिला भीती वाटत होती. सासरची सगळी मंडळी नालायकच होती. चांगल्या गोष्टीही ते ऐकत नव्हते. कदाचित तिला सासूचे डोळे उघडतील असं वाटलं होतं. पण निराश झाली होती ती. सासूनं उलट विस्तवाचे चटके देण्याची भाषा केली होती.

कोमलनं सासूची कानउघाडणी केली. त्यावर सासूनं तिला गप्प बसवलं. याचं कारण तिला सुनंला चढवायचं नव्हतं. पण तिचं मन तिलाच खात होतं. सासूला वाटत होतं की तिचा मुलगा तसाच असेल. त्यामुळं की काय सासूनं त्याला पकडायचं ठरवलं. पण ही गोष्ट तिनं आपल्या सुनंलाा सांगितली नाही.

आज विचाराविचारात सासूला झोप आली नाही. बऱ्याच वेळानं ती झोपली. तिला मनोमन 'मुलगा हरवाल' हे कोमलनं बोललेलं वाक्य आठवत होतं.

असाच दुसरा दिवस उजाडला. सगळी तयारी करून सासूबाई शेतावर गेली. पण तिचं काही शेतावर मन लागत नव्हतं. रोजरोज मुलगा पोरींना आणतो ही गोष्ट काही तिला स्वस्थ बसू देत नव्हती. त्यातच डोकं दुखण्याचा बहाणा करुन सासू घरी आली.

सासू घरी आली खरी. तर बघते काय कोमल भांडे घासत आहे. तसेच दार बंद आहे. घडत असलेला प्रकार सासूच्या लक्षात आला. तिनं इशाऱ्यानच कोमलला बोलावलं. म्हटलं,

"हे रोजच चालते का? "

"हो, रोजच चालते. मला बाहेर हाकललं जाते."

"तू चाल बरं माह्या सोबत."

"तुम्हीच जा सासूबाई." ती म्हणाली.

सासू पुढे गेली. दरवाजा आतमधून लावला होता.. तशी तिनं दरवाज्यावर थाप मारली. तसा आतून आवाज आला,

"का झालं? आमचं बरं दिसत नाय का? बरं दिसत नसन तं मराले जा."

तसा सासूबाईनं जोरात दरवाजा ठोकला. कोमल मात्र गप्प होती. काय प्रकार घडतो हे गप्प राहून पाहात होती.. तसा आतून परत आवाज आला.

"आतं आलो तं कोंबड्या सारखा भाजूनच खाईन."

तशी पुन्हा सासूबाईनं जोरात थाप दिली. सासूबाईलाही वाटत होतं की बोलल्यास आतूनच मागल्या पावलानं मैत्रीणीचा बंदोबस्त लावेल. म्हणून ती न बोलता दरवाजा ठोकत होती. मात्र माहित नसलेल्या गणपतचा चेहरा रागानं लाल होत होता. तसा पुन्हा आवाज ऐकून तो म्हणाला,

"थांब आतं दाखवतोच तुले. कसा दरवाजा ठोकणं रायते तं."

तो उठला आणि तो त्याच तावाच बाहेर निघाला. त्यानं दरवाजा उघडला पण उघडता उघडता बोलला,

"साली, माजली साली. लय माजली. खावू खावू लय माज आला. थांब आतं दाखवतोच तुले."

दरवाजा उघडला. तसं त्यानं समोर पाहिलं तर त्याला त्याची आई दिसली. तसा तो म्हणाला,

"आई तू होय. ते कोंबडी कोठाय? कावून दरवाजा ठोकतेस? का झालं असं? "

सासूबाईनं दरवाजा उघडताच पाहिलं की एक मुलगी पलंगावर अर्धनग्न अवस्थेत बसलेली आहे. सासूबाईला ते पाहून धक्काच बसला होता. कोमलचं बोलणं खरं निघालं होतं. तशी ती पलंगावरची मुलगी उठली. तिनं आपले कपडे सवारले. तसा तो म्हणाला,

"आई, अशी आज अचानक दुपारीच कशी आलीस? "

"तुलेच पावाले आलो. अन् हे कोण पोरगी? तुही बायको होये का? "

"हे. हे माई मैत्रीण होये."

"मैत्रीण! बायको असतांनी. अन् अशी मैत्रीण. दरवाजा बंद करुन. तुले लाज तरी वाटते का पोरा? घरात सुंदर बायको असतांनी रंगरलिया मनवतेस. तुले सांगाची लाज तरी वाटत नाय का? निदान मनाची नायतं जनाची तरी लाज ठेव. आमी त्या कोमललेच उलटे बोलत असतो."

"म्हंजे? हे आग कोमलनंच लावली तर....... अवो माय, ते जळते कोमल आपल्याले. अन् मीनं कोणता गुन्हा केला ह्या मैत्रीणले आणून? "

"म्हणजे? "

"ते वारस नाय देवू शकत म्हून आणतो मी."

"असा लपून छपून आणतेस. अरे लगन लाव चारचौघासमोर."

"ते कोमल काई मणन नाय का? "

"कायले मणन. तिनं का आपल्याले खरीदलं हाये."

गणपत पुरता सापडूनही त्याची बाजू घेवून सासू बोलत होती. तशी ती बाहेर पलंगावर एक हात कपाळावर ठेवत स्वगत म्हणाली,

"कोणतं पाप केलं होतं मी का हे समदं माह्याच नशिबात आलं."

तशी कोमल म्हणाली,

"सासूबाई काय झालं? "

"नुसता गोटा आला माह्या नशिबात. अन् वरुन ईचारतेस का झालं म्हून? "

"सासूबाई डोकं दुखतंय का? जरा चेपून देवू का? चहा आणू का? "

"आतं मा तू जीवच घेवून टाक. कायले डोकं चेपते.. गळाच दाब. कायले चहा आणते. जहरच पाज. घे मा जीव."

सासूबाई वैतागून म्हणाली. तशी कोमल गप्प झाली.

सासूबाई चांगली नव्हती. तिनं आपल्या लेकराच्या बोलण्यावर विश्वास ठेवला. 'कोमल लेकरु देवू शकत नाही'नव्हे तर पुढील काळात ती त्याच वाक्यानुसार आपल्या सुनेसोबत तसा व्यवहार करु लागली.

आईला पाहताच रंगरलिया मनविणारा गणपत त्यानं आपल्या मैत्रीणीला रवाना केले व आईजवळ बसून गप्पागोष्टी करु लागला. कोमल मात्र काम करण्यास निघून गेली.

कोमल जवळ नाही हे पाहून आई म्हणाली,

"बेटा, असं कोणाच्या पोरीले लपून छपून आणू नये. हालाहुजरीनं आण."

"मी नाय समजलो आई."

"अरे लगन करुन आण लगन."

"हो पण तिचा बाप मानन का? "

"आपल्याले गावात अडवणारा कोण हाये? "

"पण हे असतानी."

"हिचा नाद सोड.. तू ईचार तं सई "

कोमल मात्र त्या मायलेकामध्ये चाललेलं संभाषण दुरुन लपून ऐकत होती. तिच्या कानावर मात्र दुसरी पत्नी करण्याचे शब्द पडले. तशी ती अवाक झाली. स्वतः तिच्या मनामध्ये विचार आला की मी ह्या सासूला सचेत करण्यासाठी सांगितलं आणि ही तर मुलाचं दुसरं लग्न करायला तयार झाली. त्यामुळं असं रोजरोज वेदनेत जगण्या पेक्षा मरणं बरं. यानंतर कधीच या कुटूंबाला काहीच सांगायचं नाही. असा जणू निर्धार तिनं मनाशी पक्का केला. तो दुसरी पत्नी आणो की न आणो आपण फक्त आपलं पाहायचं. असा विचार करुन ती गप्प बसली होती.

गणपतला आता मोकळे रान मिळाले होते. आता तो बिनधास्तपणे पोरी आणू लागला. त्यातच एका मुलीला दिवस गेल्याचं कळलं. ते कळताच गणपतने तिच्याशी लग्न करायचं ठरवलं.

गणपतनं लग्न केलं होतं. रंगरलिया मनवता मनवता गणपतनं लग्न करुन टाकलं होतं. आता सवत घरात आली होती. खरा सासुरवास आताच सुरु झाला होता. कोमल काहीही बोलत नव्हती. कारण जेव्हा कोमलनं ते प्रकरण उघडकीस आणलं होतं, तेव्हा गणपतनं तिला खुप मारलं होतं. तो दिवस आजही आठवत होता.

गणपतनं लग्न करुन आणलेली पोरगी गरोदर होती. ती कोणतीच कामे करीत नव्हती. मस्त खाणे अन् राहणे एवढेच ते जाणत होती. घरातील सगळी कामं एकट्या कोमललाच करावी लागायची. एरवी शिकलेली असूनही तिच्या शिक्षणाला वाव मिळत नव्हता. उलट घरात असलेली ती अनपढ माणसं तिच्या शिक्षणाच्या खिल्ल्या उडवीत.

तिला विचार यायचा कधीकधी की मी एवढी शिकण्याचा मला फायदा काय? निदान कोणाच्या कामासाठी तरी माझ्या शिक्षणाचा उपयोग मी करु शकत नाही. आपण एवढी पुस्तके वाचली. एवढे ग्रंथ वाचले. ज्ञान मिळवलं. हे ज्ञान असंच जावू द्यायचं काय? कारण या अज्ञांनी लोकांच्या घरात आपल्या ज्ञानाला काही किंमत नाही. उलट आपले ज्ञान अंधारात खितपत पडल्यासारखे आहे. जणू मनुस्मृतीत सांगितल्याप्रमाणे आपले आयुष्य. माझ्यापरस माझी सवत बरी की जी न शिकता राज करते. ती तरी स्वातंत्र्याचा भरपूर उपभोग घेत आहे. दुसरी पत्नी असुनही मालकीण म्हणून मिरवते. ती शिकली नसली तरी शिकल्यासारखी वाटते. अन् मी शिकली असुनही मला अनपढ ठरवलं जातं या घरात. यापेक्षा हे घर सोडून वेगळं राहिलेलं बरं.

बाहेरचं जग कधी तिनं पाहिलं नव्हतं. कोण आपल्याला कामधंदा देईल याचा तिला विचार होता. कारण तिनं शिक्षण अपुर्ण ठेवून लग्न केलं होतं. तरीपण जेही शिक्षण मिळवलं, त्या शिक्षणाच्या आधारावर आपण नक्कीच एखादे काम मिळवू असं तिला वाटत होतं. कारण आता हा रोजचा त्रास तिला सहन होत नव्हता.

गणपतनं टोमणे बंद केले नव्हते. त्यातच सासूही कोणती दया घेत नव्हती. आताची आलेली सवतही शहाणपण सांगून जात होती. सगळेजण बिळावरचे नागोबे असल्यागत तिच्या कष्टाचे मोल खात होते. तिच्या कष्टाचे पाणी पाणी होत होते. मात्र सोडून जायच्या अचानक आलेल्या विचारानं तिला बळ प्राप्त झालं होतं.

मनुस्मृती वाचली होती तिनं. त्यामुळं तिनं बोध घेवून भरपूर शिक्षण घेतलं होतं. पण नशिबात काय, हे मनुस्मृतीचं जगणं. एवढा अभ्यास करुनही हे मनुस्मृतीचं जगणं जगतो. आपणच याबद्दल लोकांना उपदेश करायला हवा. पण...... आपणच हा त्रास सहन करावा. हे काही बरोबर नाही. मायबापाची इज्जत करता करता एक वेळ अशी येईल की आपण संपून जावू. ज्या मायबापाची इज्जत करु करु आपण या डोहात पडलो.. पण आता मायबाप कितीही सांगो, आपण हे घर सोडायचं.

जसं तिनं वेगळं होण्याचा निर्णय घेतला. तसा तिच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. तिला क्षणात विचार आला की जिथं यांना स्रियांची इज्जत समजत नाही. यांना माणसं तरी म्हणता येईल काय? काय गुन्हा आहे माझा की ही मंडळी माझ्यावर सुड उगववात. मला त्रास देतात. माझी अवहेलना करतात. आपण एवढे शिकलो. म्हणून अवहेलना करतात की आपण उशिरा लग्नाला होकार दिला म्हणून अवहेलना करतात. की आपले मायबाप गरीब म्हणून अवहेलना करतात? नेमकं कारण तिला माहित झालं नव्हतं. सततचा वाढता त्रास सहन होत नव्हता. तशी एक दिवस ती सासूला म्हणाली,

"सासूबाई, मी असं कोणतं पाप केलं की तुम्ही मला असा त्रास देता? मी काय गुन्हा केला की मी एवढी दुःख भोगते. ती आता आलेली माझी बहिण तिला सुखानं वागवता. तिला एवढंसंही काम करायला लावत नाही. मी मात्र अपार कष्ट करते. तरीही तुमचे असे वागणे मला सहन होत नाही.

त्यावर सासू म्हणाली,

"आम्ही तुले त्रास देतो म्हणतेस. आम्ही तुले कोणता त्रास देला? अवो, घरचे कामं करालेबी त्रास समजतेस. मंग कायले रायतेस इतं. चाल निंग आमच्या घरामधून. वांझोटी कुठली."

सासूचे बोलणे तिला चांगले खटकले. तशी ती निघ म्हणायची वाटच पाहात होती. तशी ती म्हणाली,

"सासूबाई, मी खरंच या घरातून जाणार. तशीही तुम्ही इथं राहण्यालायक काहीच ठेवलेलं नाही. तिला आपली पोरगी म्हणून आणि मला मावशीमायची पोरगी म्हणून सांभाळता. मला आता हे असह्य होते आहे."

"जा जा इतं कोणाले सांगतेस. घरघुशी कुठली."

सासूला वाटत होतं की ती जाणार नाही. म्हणून ती काहीबाही शब्द बोलत होती. तसा तिचा मुलगा गणपत दुरुन त्यांचं संभाषण ऐकत होता. तो जवळ येताच सासू म्हणाली,

"बेटा, हे लय माजल्यावाणी करते. हिले घराच्या बाहेर काहाळ."

सारे एक होते. रात्रीची वेळ होती. स्वतःवरच्या अन्यायाविषयी ती बोलत होती. तिही तशी वैतागलीच होती. म्हणून मनात जे येत होतं, ते ती बोलत होती. पण त्याचा परीणाम वाईट झाला. आईचं बोलणं कुबुद्धी व कपटी मुलानं ऐकलं. त्याला तशीही ती आवडत नव्हती. तिच्या शरीराचा उपभोग घेवून तो थकला होता. तसा त्याने धक्के मारुन तिला घराच्या बाहेर काढलं.

बाहेर वारा सुटला होता. थंडीचे दिवस असल्यानं थंडी वाजत होती. तशी उद्या जाईल म्हणून ती गयावया करीत होती. पण त्यांनी दरवाजे आतून बंद केले होते. सर्वजण आतून दात काढत खिदळतांना आवाज येत होता. तर ती बाहेर थंडीत कुडकुडत आयुष्याचा इतिहास आठवत होती. आपली इच्छा नसतांनाही निर्दोष अन् मायबापानं आपल्याला डोहात ढकललं असं तिला वाटत होतं. निर्दोषनं तर मायबापाचा शब्द पाळ म्हणून प्रेमबंधनात गुंफलं होतं. तर मायबापानं श्रीमंत आहे असं समजून दुःखसागरात. आता पुढं काय म्हणत व थंडीचा विचार करीत ती मनाला पक्क व पक्क करीत होती.

पुर्वी लग्न झाल्यावर स्त्रीनं मायबापाच्या घरी येवून राहू नये म्हणत. मुलीनं आपल्या नवऱ्याच्याच घरी मरावं म्हणत. म्हणूनच स्त्रिया सती जात बापाच्या घरी न येता. कारण सासरचा त्रास विधवांना भयंकर असे. परीतक्तेलाही भयंकर त्रास असायचा. नवरा काहीही करेल तरीही स्री पतीचं घर सोडत नसे. पण इथं तिच्या मनात नवऱ्याबद्दल सहानुभूती राहिली नव्हती. जगण्याची इच्छा असेल तर कसं मरावं असं तिला वाटत होतं. यापेक्षा घर सोडलेलं बरं. बापाच्या घरी गेलेलं बरं असंही तिला वाटलं. असा विचार करीत ती रात्रीच्या वेळी अंधारात मायबापाच्या घरी जवळ पैसे नसल्यानं पायी पायी चालत निघाली.

सकाळ झाली होती. ती पायी पायी चालत आल्यानं पार थकली होती. अनवाणी पायानं चालत चालत मायबापाच्या घरी पोहोचली होती. सकाळीच अचानक मुलीचे येणे मायबापाला आश्चर्याचा धक्का देणारे होते. पण आश्चर्यानं थक्क न होता रतीरामनं तिचं स्वागतच केलं. काही वेळ गप्पा करायच्या टाळल्या. मग आईनं विचारलं,

"बाळे का झालं? आज एवळ्या सकाळी अचानक."

तशी ती रडू लागली. तसा रतीराम म्हणाला,

"पोरीले थोडी उसंत तं घेवू दे. मंग ईचार."

"हं ठीक हाये." ती म्हणाली.

घरी आली कोमल. ते पावलं तिनं घरी ठेवले, जे पावलं तिच्या पतीनं घराबाहेर काढले होते. तिच्याजवळ सामान नव्हतं. त्यामुळं तर जास्त आश्चर्य वाटत होतं. तसा बराच अवधी झालेला पाहून रतीराम म्हणाला,

"बाळे, सामान गिमान काय आणलं नाय. सहज आली का भेटाले. मायबापाची आठवण आली म्हणून रडते का? "

ती गप्प होती. काय बोलावं तिला सुचत नव्हतं. तसं काहीतरी विपरीत घडलं असं जाणवत होतं.

"बेटा, का झालं? "

"तशी आई म्हणाली,

"बाळे, का झालं? "

तशी कोमल हुंदके देत रडू लागली. तिच्या डोळ्यातून अश्रू टपकायला लागले. तसा बाप म्हणाला,

"बाळे, सांगशील तं खरं. जावयाईनं मारलं का? "

"पण बाळ, कायसाठी मारलं. काई गुन्हा घडला का तुह्या हातानं. तसा पती परमेश्वर असतो. मारलं बी तं त्याले परमेश्वरावाणी माफ करुन टाकावं."

"नायतं का. आपुन देवावर रागावतो का. देव आपल्याले देत नाय. आपल्या शेतीत पीकत नाय. कधी ओला दुष्काळ तं कधी सुका. कधी पूर, भुकंप, वादळं तर कधी नैसर्गिक आपत्ती. तरी आपुन देवावर रागवत नाय. देवच सारं घडवतो हे माईत असतानी बी."

आपल्या बापाच्या भ्रामक देवकल्पनावर कोमल नाराज होती. तशा त्या मायबापाच्या भ्रामक कल्पनेनंच कोमलवर ही पाळी आली होती. तशी ती म्हणाली,

"हे बघा, पूर, भुकंप, वादळं, पाऊस ह्या गोष्टी देव घडवून आणत नाहीत. ह्या सगळ्या गोष्टी वातावरणातील बदलानुसार घडतात. सूर्याचे आणि पावसाचे लपंडाव. थंडी ऊन, वारा, पाऊस ह्या सगळ्या गोष्टी सूर्याच्या तपमानावर अवलंबून आहेत. सुर्य जास्त तापला तर जास्त पाऊस येणार. कमी तापला तर कमी. हा वातावरणीय बदल आहे. तुम्हाला नाही कळणार. त्यात कुठं आला परमेश्वर? ' कोमलनं डोळे पुसले.

"पण बेटा, तो पती हाये तुह्या. माफ करुन टाक."

"सतत सतत एखादा माणूस शैतानासारखा वागत असेल तर त्याला माफ कसं करावं? "

"मायबाप विचारात पडले होते. मुलगी काय बोलत आहे. याचं त्यांना आश्चर्य वाटत होतं. काय बोलावे ते सुचेनासे झाले होते. तसं काहीतरू नक्कीच घडलं याचा विचार करुन गीता म्हणाली,

"बेटा, नक्की का घडलं? "

"काय सांगू आई, मी माझ्या कर्माचे गोटे."

बापाला एकदम धक्का बसला होता. तसा बाप म्हणाला,

"बेटा, आतं तू जास्त अंत पावू नोको. मी त्याईची खबरच घेतो."

ती गप्प होती. तसा रतीराम पुन्हा म्हणाला,

"आतं सांगते का नाय. का घडलं ते."

रतीरामचा आवाज चढला होता. त्याच्या भुवया उंचावल्या गेल्या. स्नायू ताठर झाले होते. जणू बदल्याची भावना जागृत झाली होती. तशी कोमल म्हणाली,

"सांगते सांगते. सगळं सांगते."तशी ती सांगू लागली आपली करुण कहाणी.

"बघा मी गेली त्या दिवसापासून ते मला भयंकर त्रास देत होते. पण मी सगळं सहन करीत होती. घरात मी सगळी कामं करीत असे. तरीही ते मला टोमणे मारत. कधी मारझोडही. त्यांनी तर माझं जगणं मुश्किल केलं होतं.

सासरा सासूच्या आवाक्यात. निव्वळ गाढवांचाच बाजार.

जावई तो कसला जावई? निव्वळ दा्रु पिते. त्याला सगळ्या प्रकारचं व्यसन. एखादं जनावरंही सुधाारलं असतं आतापर्यंत. पण तो सुधरायची चिन्ह नाही. मी शिकले, आपण शिकवलं, अपार कष्ट शोषले. पण त्या ठिकाणी शिक्षणाला किंमत नाही. तिथं कोणीच शिकलेलं वाटत नाही. त्यामुळं तिथं शिक्षणाची कदर नाही. त्यांनी दहावी नापास सांगितलेलं, पण तेही अनपढ वाटतात.

""बेटा, त्यात काय झालं? नाय लावायची कटकट मागं. सांगायच्या सासूलसासूला त्या गोष्टी..”

"बाबा, सासूच खास्ट आहे माझी. खासकरुन सासूमुळच भांडण झाली. ती नेहमी मला वांझोटी म्हणत असे. ती सासूपदाला शोभत नाही.”

""अगं सासू बोलतेच त्याचा एवळा बाहू करायचा. अगं समद्याच्या नशिबी सासू्पण असतं. तू बी एक दिस सासू बनली असती न. सासवा बदमाश रायतेत.”

"अगं आई, राज का घेवून बसली. जिथं आताच पोटभर खायला मिळत नाही, तिथं तेव्हापर्यंत जीवंत तरी राहिल का कोणी? "

"म्हणजे? "

"सासू मोठी खास्ट आहे हे मी आधीच सांगितलंय. ती घरात एकाही कामाला हात लावत नाही. ती शेतावर जशी मजूर लावते, तशी घरात एकाही कामाला मोलकरीण लावत नाही. कामं भरपूर असतात. बस याच विषयावर भांडण. भांडण एवढं वाढते की ती सासू काहीही मनात येईल तसं बोलते. तुले आयतं पोसू का? तुह्या मायबापानं पैसे देले का? हेच शिकवलं का मायबापानं? माह्या पोरीले पाळण्यात झुलवजा म्हणलं का? म्हणजे त्याच्या मायबापानं लहानाचं मोठं केलं कष्ट उपसावे आणि माझ्या मायबापानं कंचे खेळले. तुम्ही बाबा शेती पुरेशी

पीकत नसतांना सुध्दा शिकवलं. मी अगदी लहानपणापासून या डोळ्यांनी पाहात आले. पण त्यांना शिक्षणाचं काही घेणदेन नाही."

"मी काही म्हणताच ते चिडतात. मारतात. अधमरं होईपर्यंत. माझ्यासमोर उपाय नसतो कोणता. मी मारु शकत नाही. मी मात्र गप्प बसते. पण बाबा केव्हापर्यंत बसणार. तुम्हीच म्हणताय ना की पती परमेश्वर अ्सतो. मग......... पतीनं का दारु पिवून असा धिंगाणा करायचा."

"त्यात काय झालं. पती मारतातच. तू त्याईले सनकवलं नसतं तर मारलं नसतं त्याईनं."

"अगं आई, तू म्हणते ते बरोबर आहे. पण तो रोज रोज माझ्यासमोर मैत्रीण आणत होता. तिच्यासोबत झोपत होता माझ्यासमोर. मला पाणी आणायला लावत होता. सांगायलाही लाज वाटते अशा गोष्टी."

"हे सासूले का सांगितलं नाय."

"सांगितलं. तिनं स्वतः पकडलं त्याला. मग काय झालं माहित नाही. नंतर तीच मला म्हणाली, त्याले सवय आहे रंगरलिया मनवायची. लग्नापूर्वीच तो रंगरलिया मनवत होता. तुले वाटते तं डोळे मिटून घे."

"सासूनं त्याला टोकण्याऐवजी दुजोरा दिला. आपल्या पोरांची चूक झाकून नेली. त्याला माझ्याचसमोर बिनधास्त पोरगी आणत जा म्हटलं. बापू आता खुलेआम पोरी आणत होता. एक दिवस कळलं की ती पोरगी गरोदर आहे."

"बापरे....... मग."

"मग काय, लग्न केलं दुसरं."

"आई, त्याची रोजची कटकट. आणि काल रात्री तर जबरदस्तीनं काढलं घराच्या बाहेर. मी पायी पायी चालत आली तेवढ्या दुरुन. आता मी जाणार नाही अजिबात तिथं.""

"बेटा, असं करु नोको. आपली बदनामी होईन गावात. केली बायको तं केली त्यानं. जावू दे ते पुरुषाची जात. वरुन श्रीमंत. आपुन गरीब. ते दहा बायका करु शकतेत. पण आपुन नाय. हा आपला इतिहास सांगते. आपल्या राजे लोकाईनं दहा बायका केल्याचं आयकलं हाये नं.."

"बाबा, जमाना बदललाय. आम्ही कोणत्या जमान्यात वावरतो हे लक्षात घ्या तुम्ही. तुम्ही गावाच्या बाहेर निघा. जगाचा अभ्यास करा. मुलीचा जमाना आलाय. सतीप्रथा केव्हाच बंद झालीय. मनुस्मृती केव्हाच जळली. भाला संग्रामही जाळला. आता कायद्याचे राज्य आहे. संविधानानुसार प्रत्येकाला दाद मागता येते. न्यायालयातून शिक्षा व दंड होत असते. माहित आहे का तुम्हाला. अहो बाबा अजून एका त्या नराधमानं काय केलं ते."

"सांग अजून सांग का केलं त्याईनं."

"त्यानं दुसरी पत्नी केली. ती कोणतंच काम करीत नव्हती. ती गरोदर असल्यानं बसून खात होती. मी सासूबाई ला विचारलं, माझा गुन्हा काय? एवढा मला का त्रास देता."

"बेटा, कामं केले तं का झालं? ती गरोदर होती नं."

"हो, मीही मानते. ती गरोदर आहे म्हणून मी स्वतः कामं करायला तयार होती. तरीपण त्यांचे टोमणे सुरुच. त्यांनी मोलकरीण नाही लावत म्हटलं तरी मी यथायोग्य परीस्थितीशी जुळवून घेत कामं केली. पण त्यांना काहीच नाव नाही. अगदी जीवाला बोचल असं बोलणं. हे माझ्या डोक्याच्या पलिकडे गेलं. सासू म्हणते मी काहीच त्रास देत नाही. त्रास होते तं घरातून निघून जा. त्यासाठी मारते. मारायला लावते आणि तुम्ही म्हणता त्या घराचा उंबरठा सोडायचा नाही. नवऱ्याच्याच घरी मरावं. मलाही नेमकं समजत नाही की काय करावं? "

कोमलनं विचारलेला प्रश्न नुसता वैताग आणणारा होता. तशी आई म्हणाली,

"आपुन गंगारामले ईचारु. त्या तुह्या नवऱ्यावर त्या तुह्या सवतीनं मोहिनी टाकली असन. पैशावर भाळली ते. आतं गंगारामच सोडवन आपला प्रश्न."

"मोहिनी मोहिनी मोहिनी. जादूई विद्या, तंत्र मंत्र भुत प्रेत, मोहिनी या सर्व गोष्टी थोतांड असतात. तुम्हाला जायचं असेल तर जा. मी नाही जाणार. कायद्याच्या राज्यात तो अनपढ गंगाराम माझा त्रास कदापिही कमी करणार नाही."

"मंग तू का करशीन बेटा? "

"मी त्याच्या विरोधात न्यायालयात धाव घेईल. मी दाद मागेल न्यायालयात. अशा नराधमाला शिक्षा करण्याचा प्रयत्न करेल. नाहीतर अशा गणपतसारखे कित्येक गणपत माझ्यासारख्या मुलींचा फायदा घेवून कित्येक तरुणींचे आयुष्य बरबाद करतील."

"तुले जे करायचं ते कर बेटा, पण आम्ही गंगारामकडं जाणार."

वडिलांचे म्हणणे रास्त होते. कारण त्यांना वाटत होतं की लग्नासाठी याच गंगारामनं आपल्या पोरीला तयार केलं. म्हणून ती लग्नास तयार झाली. ते त्या गंगारामच्या गोष्टीला चमत्कार समजत होते. त्या गंगारामच्या चमत्कारिकतेनं ते फसले जरी असले तरी त्यांचे डोळे उघडले नव्हते. त्यांना सवतीनं कोमलवर करनी केली असंच वाटत होतं.

गंगारामचं नाव काढून ती मंडळी त्या गंगारामच्या घरी गेली. पण कोमल काही गेली नाही. तिचा गंगारामवर विश्वास नव्हता. गंगाराम अंधश्रद्धाळू गृहस्थ. तो काय आपल्यापरीनं अन्याय दूर करणार. आपण एवढे शिकलो. आणि त्या निरक्षर माणसाचं विचार न करता ऐकणे बरोबर नाही असं तिला वाटत होतं. आपण आपल्या ज्ञानाचा वापर करुन ही अंधश्रद्धा आहे असं लोकांना सांगावं असं तिला वाटत होतं.

गंगारामच्या अंगातला देव. त्यास रतीराम म्हणाला,

"देवा, आमची पोरगी सुखानं नांदू दे त्यांच्या घरी."

डोहातून बाहेर निघू पाहणारी मुलगी. तिला परत डोहात ढकलण्याचं काम मायबाप करीत होते. तसा गंगारामचा देव म्हणाला,

"तुमी कायपण चिंता कराची गरज नाय. मी समदं पाहतो. मले समदं दिसते. ते लोकं जे करतेत. ते देवाची मर्जी. देवापुळं कायपण चालत नाय झाडाचं. तुह्या पोरीले शिक्सनाचा गरवं आला हाये. तो काळण्यासाठीच देवाची लिला."

"बाबा, आतं का करा लागन? "

"तुमी तिले त्या सासरच्या घरी पाठवून द्या. मी समदं बराबर करतो. तुमची समदी अडचण दूर झाली म्हंजे झालं."

गंगारामच्या अंगातला देव खरा बोलतो अशी आख्यायिका असल्यानं रतीरामनं त्यावर विश्वास ठेवला. तसा घरी येता येता तो विचार करीत होता की आता काहीही करायचं. पण पोरीला जावयाकडं पाठवायचं.

ते जोडपं घरी आलं होतं. कोमलही घरी होतीच. तिचं कॉलेजचे शिक्षण पूर्णतः बंद झालं होतं. म्हणून आता तिला घरी राहाणं भाग होतं. तसा रतीराम म्हणाला,

"बेटा, एकदाव तरी जावून पाय. असं समज का हे समदं तुह्या नशिबानं घडलं. तो देव म्हणतो का तू जास्त शिकली म्हून हे घडलं. कारण पोरीले शिकवणं पाप हाये न बेटा. अगं तू उद्याची राजलक्ष्मी हायेस त्या घरची. क्रिष्णाले नोयत्या का सोळा हजार एकशे आठ बायका. जावू दे. त्याईनं केली तं केली बायको. आमच्या जमान्यात आठ आठ बायका करेत. मी हवं तं येत जाईन आतं. जावयाईची समजूत घालत जाईन आतं. देव म्हणते तुह्यावर करनी केली. म्हून जावई असा वागते. आपुन पुन्हा गंगारामच्या देवाले ईचारु. मंगच जावू. तू थोडा तरी ईश्वास ठेव गंगारामच्या अंगातल्या देवावर. तो देव तुह्यं समदं बराबर करन."

रोजरोजची मायबापाची कटकट. सासूच्या घरीही रोजचे टोमणे व मारझोड. तिचा जीव अगदी मेटाकुळीस आला होता. जणू आपलाच जीव संपवून टाकावा असं कधीकधी वाटत होतं. पण तिलाही जगायचं होतं. आपल्यासाठी नाही तर आपल्यासारख्या अभागी अशाच मुलींसाठी. काहीतरी नक्कीच करुन मरावं असं तिला वाटत होतं.

ती शिकली होती. पण आज अचानक तिच्या मनात अंधश्रद्धा निर्माण झाली होती. कदाचित देवाचे भोग असावेत असेच तिला वाटायला लागले होते. गंगारामच्या देवानं सांगितलेलं तिला थोडं थोडं पटलं होतं.

आपण मनुस्मृती नुसार वागलो नाही म्हणून हे घडलं असेल असंही क्षणभर तिला वाटलं. त्या देवानं आपण शिकलो हे पाप झालं असं सांगितलं. त्यामुळं कदाचित ते पापच झालं असेल असं तिला वाटत होतं. कदाचित सवतीनंच गणपतवर करनी केली असंही वाटत होतं. आपण असंच प्रेम निर्दोषवर प्रेम करीत असतांना ते प्रेम गंगारामच्या अंगातल्या देवानं तोडलं असं तिला वाटत होतं.

आपल्यात हा बदल कसा होतोय याची तिला जाणीव नव्हती. हळूहळू वैतागानं तिला अंधश्रद्धेच्या बुरख्यात टाकलं होतं. गाव, मायबाप, सासर, माहेर तिचे शत्रू बनले होते. त्यामुळं तिला गंगारामच्या देवावर थोडा विश्वास ठेवावाच लागला. कारण ती सध्या तरी सक्षम नव्हती. विचारानं ती परीपक्व नव्हती. एकटी कमवून खाण्याची कुवत तिच्यात अजून निर्माण व्हायची होती.

"मी जायला तयार आहे गणपतच्या घरी. पण मला त्या गंगारामच्या देवाची परवानगी घ्यायची आहे त्यांनी जर जा म्हटलं तर मी अवश्य जाईल. पण त्यांना ती करनी आणि मोहिनी उतरंवायचे प्रकार करावे लागतील." कोमल अचानक एक दिवस म्हणाली.

मुलीनं दिलेल्या होकाराचा परीणाम रतीराम व गीताला फार आनंद झाला. तो आनंद गगनात मावेना असा. दुसरा दिवस हा आकतचा होता. ते तिघंही मिळून त्या गंगारामच्या घरी गेले.

आकतीदरम्यान गंगारामच्या देवानं सांगितलं की मी जे देणार, ते सासरच्या जेवणात कालवायचं. म्हणजे हळूहळू त्यांचं मतपरीवर्तन होईल. ते तुझ्या मुठीत येतील. तुला त्रास देणार नाहीत. तू त्यांना हवीहवीशी वाटशील. मग तुला जसं वागायचं तसं वाग.

गंगारामनं दिलेली वस्तू घेवून कोमल वडील व गावातील काही प्रतिष्ठित मंडळींना घेवून सासरी गेली. मायबाप आणि गावातील माणसे गणपतची समजूत घालून परत आले. जेवनाचा भाग कोमलकडेच असल्यानं एक दिवस संधी साधून तिनं गंगारामनं दिलेली वस्तू जेवनात कालवली व ते जेवन सासरच्यांना खायला दिलं. पण तरीही काही फरक पडला नव्हता. उलट 'आली दारी घरसोडी' म्हणत पुन्हा तिच्या मनाच्या चिंधड्या होत होत्या. घरात पाच पाच जीव. त्यांची मोलकरणीसारखी धुणीभांडी, कपडेलत्ते करता करता नाकीनव यायचं. तसेच अजून टोमण्यात व मारझोडपणात वाढ झाली होती. त्यामुळं दररोजचा दिवस कसा काढायचा असा विचार येत असे.

एक ना एक दिवस बदल होईल या उद्देशाने ती एक एक दिवस कठीणचा काढत होती. अगदी दुःख वाटत असे तिला. पण काहीएक उपाय नव्हता. गंगारामच्या औषधीनंही काही चमत्कार केला नव्हता.

दर महिन्याला मायबाप येत भेट देवून जात. त्यानुसार त्या गंगारामच्या पुड्या तिला लपून छपून भेटत. ती त्यांच्या जेवनात टाकत असे. फायदा होईल या उद्देशाने. पण फायदा होत नव्हता. कारण गंगारामच्या अंगात येणं हे थोतांड होतं. तसं गंगारामशी बोलूनही पाहिलं. पण फरक अजिबात जाणवत नव्हता. आता मात्र परीणाम काहीही न दिसत असल्यानं तिच्या मनात निर्माण झालेली अंधश्रद्धेची आस्था हळूहळू कमी होत चालली होती.

तिच्यावर परीवाराचा अत्याचार वाढत चालला होता. गंगाराम फक्त आश्वासन देत होता. कोमलनं आपल्या मायबापाला ते सांगूनही पाहिलं. पण मायबापही फक्त तुझे हेही दिवसं निघून जातील एवढंच आश्वासनं देत. त्यामुळं आता माहेरलाही जावून राहण्याची सोय नव्हती. कारण मायबापानंच नाही तर अख्खा गावानं तिला टोमणे देईल हे तिलाही माहित होतं.

वाढता अत्याचार. त्यामुळं तिनंच आता कंबर कसली होती. तिनं पुन्हा मनात तयारी केली. पतीपासून फारकत घेण्याची. अशातच एक दिवस छोटंसं भांडण झालं. उकारे पाकारे निघू लागले. त्यातच नेहमीप्रमाणे गणपतनं 'निघून जा आताच्या आत्ता' असा शब्दप्रयोग केला. त्यामुळं आता आधीच तयारी केलेली कोमल घराच्या बाहेर पडली.

ती रस्त्याने चालत होती. ऐन तरुणाईच्या उंबरठ्यावर होती ती. रस्ता चालता चालता तिला तहानही लागली होती. भूकही फार लागली होती. काय करावे सुचेनासे झाले होते. क्षणात तिला एक धाबा दिसला. सगळीकडं पाहिलं. त्या धाब्यावर एक पुरुष काम करीत होता. थांबावे की काय? तिच्या मनात विचार आला. कारण जमाना खराब होता. पुरुषाच्या भिरभिरत्या नजरा तिला न्याहाळत होत्या. पण तिथं तिला कोणीच ओळखणारं नव्हतं. तशी ती त्या चहावाल्यांना म्हणाली,

"भैय्या, मला खुप भूक लागली आहे. मला जेवन देता का? वाटल्यास मी तुमचे सगळे कामं करुन देते."

अगदी शुद्ध बोलणारी महिला. ती बोलण्यावरुन फार शिकलेली, तारुण्याच्या उंबरठ्यावर असलेली, भीती दाटलेली असून खुप घाबरलेली, तसा तिचा उतरलेला चेहरा, भिरभिरती नजर, ती फारच थकलेली असून भैय्या म्हणत आहे. हे त्या धाब्यावरील पुरुषाच्या लक्षात आलं. त्याला दया आली व तो म्हणाला,

"बहन कहाँ से आयी तू और इतनी परेशान क्यो है? "

"भैय्या क्या बताऊँ मै अपनी कहानी। बडी अजीब है मेरी कहानी।फिलहाल मुझे भुख लगी है। पहले खाना दे दो।"

मनसुद अली....... धाब्याचा मालक मुसलमान होता. तसं मुसलमान खुप खराब असतात असं तिनं ऐकलं होतं. वासनेने लिप्त असतात असंही ऐकलं होतं. एका एकाला चार चार बायका असतात असंही ऐकलं होतं. तसेच ते स्वबहिण सोडून मावशी किंवा काकाच्या मुलीशीही विवाह करतात हेही ऐकलं होतं. तिला भीती वाटत होती त्याची. पण तरीही पोटातील भुकेने न घाबरता तिनं त्याला आपलं समजलं. त्यानं तिला नाश्ता दिला. तो नाश्ता तिनं पटकन संपवला. तसा तो पुन्हा म्हणाला,

"बहन और दूँ।"

"हाँ भैय्या, बडी भुख लगी है।"

मनसुद अलिनं अगदी पोटभर जेवण दिलं. तशी ती म्हणाली,

"भैय्या, आपका नाम? "

"मनसुद अली।मुझे मनसुद अली के नाम से जानते है लोग।जात का मुसलमान हूँ।मगर घबराना नही।इस धाबे को अपना ही समजना।बरसो बाद किसीने भाई कहाँ है।"

तिला आश्चर्य वाटत होतं. क्षणभराच्या भेटीनं एका अनोळखी माणसानं तिला ओळखल्याचा संदर्भ दिला होता. ते दोघंही अनजान होते. पण मनसुदअलीचं मायाळू बोलणं तिला भावलं. तसा तिलाही पर्याय नव्हताच. त्यामुळं मजबुरीनं का असेना. तिला त्या ठिकाणी नाश्ताच नाही तर जेवनही मागावं लागलं.

काही वेळानं पोट भरताच ती म्हणाली,

''भैय्या अब आप काम बताओ मै फटाफट कर देती हूँ।"

त्यानं भांड्याकडे बोट दाखवत म्हणाला,

"बहन रहन दो, मै कर लूँगा।"

"नही नही भैय्या, मै कर देती हूँ सापसुथरा।"

ती भांडे घासू लागली. तसा गिऱ्हाईक नसल्यानं तो तिच्याजवळ खुर्ची टाकून बसला. म्हणाला,

"अब बताओ बहना, क्या हुआ? "

तो अनोळखी माणूस. त्याला कसं सांगावं तिला विचार येवू लागला होता. तसा तोच म्हणाला,

"बेटा, घबराना नही। इस नाचीज को तू अपना भाई समज. सगा भाई।मै तुम्हारे बाल को भी धक्का नही लगने दुँगा।"

तिला थोडा विश्वास वाटायला लागला. तशी ती म्हणाली,

"क्या बताऊँ भैय्या।" तिनं डोळ्यातून अश्रू काढले. तसा तो म्हणाला,

"बहन रो मत।मुझे भी रोना आ सकता है।बताओ, क्या मामला है? बताने से दिल हलका होता है।"

तशी ती सांगू लागली. जीवाचा आकांत, ते माहेरचे वागणे, ती सासरची लिला, ती गंगारामचा ढोंगीपणा आणि गणपतचा दुटप्पीपणा. हे सगळं सांगत असतांना ती खुप रडली. तशी ती म्हणाली,

"मै दोनो के भी घर जाना नही चाहती।"

"माशाअल्ला।इतनी मुशीबत।लेकिन मैने तो सुना है कि तुम्हारे धरम मे बहोत अच्छे लोग होते है।सभी धरमवाले तो हमे ही दोष देते है।"

"भैय्या दूर से परबत भी अपने को अच्छा लगता है।"

"हाँ ऐसा ही है तेरे जीवन में।तेरा जीवन भी बड़ा दर्दभरा है।"

गोष्टी करता करता तिचे भांडे पुर्ण धुवून झाले होते. तशी थोड्या वेळानं ती म्हणाली,

"भैय्या, अभी चलती हूँ।"

"कहाँ जाओगी? "

"कहीं भी।जहाँ रास्ता मिले।मंजिल कहीं न कहीं नजर आयेंगी ही।"

तसा तो विचार करु लागला. ह्या अबलेनं आपल्याला भाऊ म्हटलं. आपण हिची रक्षा करायला पाहिजे. तरुण आहे. जमाना खराब आहे. या जमान्यात पिसाळलेले नराधम असतात. हिला कोणी सुरक्षित ठेवणार नाहीत. बलत्कार करुन मारुन टाकतील. जीवंत ठेवणार नाहीत. नाहीतर कोणी बलत्कार करुन वेश्येच्या कोठ्यावर विकून टाकतीन. त्यापेक्षा इथंच राहा म्हटलेलं बरं. तिची इज्जतही वाचेल. आपल्याला अल्लाचा आशिर्वाद लाभेल. खाईल एखादा भाकर तुकडा. तसं तर खराब झालेलं अन्न फेकावंच लागते. शिवाय मला कामाला थोडा आसराही होईल. असा विचार करीत असताना ती म्हणाली,

"क्या सोच रहे हो भैय्या? "

"यही कुछ।"

"क्या, कुछ कहना चाहते हो? "

"हाँ।"

"बोलो, क्या बात है? "

"मै ये बोल रहा था कि अब तुम कहाँ जाओगी? "

"मैने कहाँ न जहाँ रास्ता मिलेगा।"

"कोई पहचानके नहीं।"

"भैय्या पहचान के घर नही जाऊँगी। क्योंकी वे लोग दो दिन घर मे रखेंगे।फिर वे लोग मुझे माँ बाप के यहाँ छोड़ आय़ेंगे।"

"तो फिर कहाँ जाओगी इस उजली दुनिया मे? "

"अब ये दुनिया उजली रहे या अँधेरी।मुझे कुछ फर्क नही पडता।"

"मेरी एक बात मानोगी? "

"हाँ बताओ।"

"अगर सच्चे दिलसे भाई मानती होगी तो इस धाबे पर ही रहो।"

ती विचार करु लागली नव्हे तर तिला विचार आला की आपल्याला तसंही बाहेर जगात तसंही कोणी ओळखीचे नाही. कुठं जायचं या जगात. सगळीकडं अंधारच पसरला आहे. तसेच मी तरुण. सगळीकडं भिरभिरत्या नजरा. ही पुरुष जात त्या गणपतच्या सारखी. आपला हव्यास पुर्ण करणारी. जिथे शेकडो मुलांना भुलथापा देवून बलत्कार करतात.. तिथं मुली नाहीही भाळल्या तरी बलत्कार. हत्याही.......... वेश्यालयातही विकल्या जातात मुली. त्यापेक्षा इथंच राहिलेलं बरं. जाईल तर जाईल इज्जत. लुटल तर लुटल मनसुदभाई इज्जत. एरवी मुसलमानात बहिणीलाही बायको बनवतात. पण हा माणूस स्वभावानं बरा वाटतो. त्या निर्दोषपेक्षाही बरा. त्यानं तर माझ्या आयुष्यातला विचारच केला नाही. आपलं प्रेम सिद्ध करायला झोकून दिलं त्या गणपतच्या सोबत खस्ता खायला. कदाचित त्यानं प्रेम करीत असतांना माझ्याशी लग्न केलं असतं तर आज हे दिवसं दिसले नसते मला. आतं थोडं का होईनहोईना, मनसुदभाईवर विश्वास करावाच लागेल. तशीही मी आता कुठं जाणार.

ती विचार करीत होती. तसा तो म्हणाला,

"क्या सोच रही हो बहना? "

"यही सोच रही हूँ कि जमाना खराब है।"

"इसी वास्ते कह रहा हूँ कि बहन तुम इस धाबे पर रुको।सुरक्षित रहोगी।तुमने मुझे भाई कहाँ है न, अल्ला का वास्ता मै जबतक जीवित रहूँगा, तब तक तुमपर आच नही आने दुँगा।"

मनसुद भाईची गोष्ट तिला पटली. ती विचार करु लागली. जे होईल ते पाहिलं जाईल याचा विचार. सध्या आपल्याकडं राहायला जागा नाही. घर नाही दार नाही. तसंही स्रियांना घर नसतंच. तिनं मनुस्मृतीत वाचलं होतं. कुवाऱ्यापणी मायबापाचं घर, म्हातारपणी पुत्राचं, तर तरुणपणी नवऱ्याचं घर. स्रियांनी त्या घराला आपलं समजू नये. तसंच त्यांनी हवं तर केव्हाही बाहेर काढण्याचा अधिकार आहे. तिनं त्यांच्याकडे एका आश्रीताचं जीवन जगावं. सगळं मनुस्मृतीत लिहिलेलं. तशी ती म्हणाली,

"मनसुदभाई, अगर आप कहते हो तो मै यहाँ रह लेती हूँ। मगर आपको मेरी सुरक्षा का जिम्मा उठाना होगा।"

"हाँ हाँ क्यो नही।तुने मुझे भाई जो कहाँ।मै भाई के नाते अपना फर्ज निभाऊँगा।केवल भाई रक्षाबंधन के धागे से नही बनता।आज तो ऐसा जमाना है कि भाई सिर्फ रक्षाबंधन या भाईदुज के दिन ही याद आता है या बहन याद आती है।बाकी दिन लड़ते झगड़ते रहते है।आज बहन भाई को अपना नही समजता।सिर्फ विश्वास होना।तुझे अगर शंका कुशंका है तो यह धग्गा ले और बाँध दे मेरे कलाईपर।तब तो तुझे तसल्ली होगी।

"नही नही मनसुद भाई।मै इतनी बेवकुफ नही हूँ कि आप पर विश्वास नही करु।अगर आप अच्छे है तो इस रेशम के धागे का भी कोई मतलब नही।यह धग्गा उन भाई बहन के

प्यार के बीच फेल है।आप जो कह रहे हो, उसे मै मानती हूँ और यहाँपर रहती हूँ।वैसे भी मै कहाँ जाऊँ, मेरा तो कोई पहचानका नही है।"

मै आपको मना नही करुँगा।आप जब चाहे, जिस समय आपका पहचान का मिले, जा सकती हो।मगर तुझे आजसे उस बात के लिए कही जाने की जरुरत नही है।"

तिनं त्या अनोळखी माणसावर विश्वास ठेवला. परिस्थितीने ती विवश होती. दुसरं कोणीही तिच्या तसं ओळखीचं नव्हतंच. ती तशी काय करणार होती. परीस्थीतीसापेक्ष तिला तिथं राहाणं भाग होतं.

तिनं तिथं राहण्याचं ठरवलं. तसं वचनही दिलं. त्यानं तिला बहिणीसारखं सांभाळलं. त्यामुळं तिचा मनसुदभाईवर विश्वास बसला. ती त्याच्या सोबतच राहू लागली.

बरेच दिवस झाले होते. मनसुदभाई म्हातारा झाला होता. बायकापोरं होते त्याला. पण परीस्थितीनं लाचार झाल्यानं या धाब्यावर एकटाच राहात होता. सकाळी धाबा उघडायचा. चहा पाणी नाश्ता बनवायचा. तो लोकांना चारायचा. त्यातून आलेल्या पैशावर स्वतःची गुजराण करायचा. दिवसभर गिऱ्हाईकाशी गोष्टी सांगण्यात त्याचा वेळ जात असे. पण आपला समजणारा कोणीही नव्हता. त्याला जीवन म्हणजे नरकासारखं वाटत होतं. कामात कधीकधी लक्ष लागत नव्हतं. पण भिका-यासारखं मागण्याची सवय नसल्याने त्यानं लहानसं का होईना हॉटेल टाकलं होतं. त्याच ठिकाणी तो राहात होता.

कोमल तिथंच राहात होती मनसुदभाईची ढाल बनून. ते ती खानावळही सांभाळत होती. तशी त्या भावाची सेवाही करीत होती. त्यानेही तिला बहिण मानून बहिणीसारखेच प्रेम दिले होते. नाहीतर आजची पोरं तरुणींना पाहून भाळून जातात. पोरं तर सोडा, म्हातारेही तरुण भुलून जातात सुंदर सुंदर मुलींवर. त्या प्रकारातील मनसुद नव्हता.

दिवसभरात खानावळीत भरपूर लोकं येत. त्यांची वासनेची नजर कधीकधी कोमलवर पडत असे, पण ममनसुदभाईसमोर कधी कोणाची तिला बोलण्याची हिंमत व्हायची नाही. वा कोणी ब्र ही काढत नव्हता. एवढा रुतबा मनसुदभाईनं आधीच जमवला होता.

कोमलचा पायगुण लागल्यासारखी खानावळ जोरात चालायला लागली होती. तशी एक दिवस सवड पाहून कोमल म्हणाली,

"भैय्या अभी धंदा जोर पकड रहा है।आप चाहे तो होटलको बड़ा कर सकते हैं।" त्यावर मनसुदभाई म्हणाले,

"अभी मै तो बुढा हो गया हूँ। मै इतनी भागदौड नही कर सकता।तुही कुछ कर ले।आगे तुझे ही सँभालनी है इसकी बागडौर।अभी तो सिर्फ मै एक प्याधा हूँ।"

मनसुदभाईनं म्हटलेलं वाक्य तिला दिलासा देवून गेलं. तिच्या डोळ्यात आनंदाश्रू तराळले. एक नवखा माणूस या होटलची बागडौर तिच्या हाती देण्याच्या गोष्टी करीत होता. त्यानं ऐनवेळी तिला सांभाळलं होतं. जो आधार बनला होता. नव्हे तर जीवनही. आज ती सुखी होती.

नात्यातल्या माणसानं नव्हे तर खुद्द मायबापानं तिला दगा दिला पण ज्यानं ओळख नाही, पारख नाही असा मनसुदभाई...... स्वतः वासनेने पेश न होता केवळ लहान बहिण मानून माया दाखवली होती. त्याच मायेने अभिप्रेत होवून तिनं धंदा वाढवला होता. नव्हे तर त्याचे श्रेयही ती मनसुदभाईला देत होती. त्याचे बहिण मानणे व सांभाळणे तिला सहानुभूती देणारे वाटले. म्हणून की काय, तिच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले होते.

मनसुदभाईनं जशी होटलची बागडौर तिला दिली. तसा तिला हुरुप आला. ती नवउत्साहानं भारुन गेली. तशी ती संपूर्ण लक्ष त्या होटलवर केंद्रित करु लागली. तिनं त्या होटलला आधुनिकतेनं सजवलं. त्याचं बांधकाम केलं. खाण्यापिण्याची व रहिवासाचीही सोय

केली. नोकर चाकर लावले. पण कधीच मनसुदभाईला तिनं दुरावले नाही. वा कोणता त्रास दिला नाही.

होटल मोठं झालं होतं. धंदाही जोरात चालायला लागला होता. तसं तिला मनसुदभाई कडे लक्ष देता येत नव्हतं. तो आता म्हातारा झाला होता. फारच थकला होता. त्याच्यानं काम करणं जमत नव्हतं. होटलचा व्याप वाढला होता. जसजसा होटलचा व्याप वाढत होता, तसतसा मनसुदभाई आजारी पडत चालला होता. हे आजारपण सुखाचे होते की दुःखाचे ते काही कळत नव्हतं. अशातच होटलचा व्याप व कामाची दगदग यामुळं मनसुदभाईची दैना होवू नये म्हणून काळजी घेण्यासाठी तिनं एक परीचारीका लावली होती. ती परीचारीका मनसुदभाईचं अंथरुण पांघरुन, जेवनखावण करीत होती. तसं पाहता तिही स्वतः येवून मनसुदभाईची सेवा करीत असे. कधीकधी मनसुदभाई वर कामाच्या व्यापानं लक्ष देता येत नव्हतं. तरीपण रात्री होटल बंद झाल्यावर ती मनसुदभाईजवळ यायची व एक एक तास बसून त्याला सांत्वना द्यायची. त्यातून त्याला हायसं वाटून अर्ध आजारपण दूर गेल्याचं समाधान प्राप्त होत असे.

आज तिच्याजवळ सगळं काही होतं. मनसुदभाईच्या कृपेनं गाडी, बंगला, नोकर चाकर मनसुदभाईची शेवटची वेळ होती. तो जास्त खंगला होता. तसं एक दिवस त्यानं तिला आपल्या जवळ बसवलं. ज्ञानाचे बाळकडू पाजले. "बेटा जीवनात कधी घाबरायचं नाही. कोणत्याही समस्येचा राईचा पर्वत करायचा नाही. हताश व्हायचं नाही. संकटं येतात पर्वतासारखी..... हळूहळू निस्तारत जातात. हत्तीच्या पावलानं दुःख येतं. मुंगीच्या पावलानं जातं. मात्र सुखानंतर दुःख, दुःखानंतर सुख येत असतांना आपल्या मनात आस्था व आशा तेवढी ठेवावी. दुःखावर मात करण्यासाठी हिंमत.

"तू खूप मोठी हो. या होटललाही मोठं कर. पण आपलं अतीत विसरु नकोस. जमीन विसरु नकोस. अहंकार बाळगू नकोस. आज जर तू अतीत विसरली तर उद्या तुझ्याकडं

कितीही पैसा आला तरी तो तुझ्या काही कामाचा नाही. महत्वाचं म्हणजे मी जीवंत असो की नसो, तू गरजूंना मदत कर. कारण कोणताही गरजू कधीकधी त्या अल्लाच्या रुपात येत असतो. "

मनसुदभाईनं पाजलेलं बाळकडू आज तिच्या अगदी लक्षात होतं. आज मनसुदभाई जगात नव्हता. पण त्याचं बहिण मानणं, त्याचा वेळोवेळी मिळणारा सल्ला, वेळोवेळी आठवत होता. त्याचे देहावसान झाले खरे, पण त्याचे मार्गदर्शन, त्यानं केलेली मदत सारं सारं मनसुदभाईच्या म्हणण्यानुसार अल्लाची देणच होतं.

आज गाडी, बंगला, नोकर चाकर सगळं काही असलं तरी त्या मनसुदभाईच्या आठवणीसमोर सगळं फिकं होतं. तिला आजही वाटत होतं की जर मनसुदभाई भेटला नसता तर एकतर कोणी तरी तिच्यावर बलत्कार करुन तिला मारुन टाकलं असतं किंवा कोणी तिला कुंटणखाण्यात विकून टाकलं असतं. नव्हे तर आता तिची गणती वेश्येत झाली असती. तिच्याजवळ स्वातंत्र्य उरलं नसतं. पावित्र्यपण जपता आलं नसतं. मनसुदभाई मुसलमान जरी असला आणि त्यांचा धर्म तिला कितीही वाईट वाटत असला तरी सर्वच धर्मात मनसुदभाईसारखी काही लोकं नक्कीच असतात हे आज तिला मनसुदभाईवरुन वाटत होतं. त्यामुळं धर्माला दोष देण्या ऐवजी माणसंच चांगली वाईट असतात हे तिला नक्कीच चांगले समजले होते.

आज तिला गावची आठवण आली होती. मनसुदभाईनं अतीत विसरु नको असं सांगितलं होतं. तेच त्याचं शेवटचं बोलणं होतं. नव्हे तर सल्ला होता. माझे आईबाप जीवंत असतील का? हा प्रश्न तिला सतावत होता. आज तिच्याजवळ सगळं काही होतं.. पण ते सगळं फिकं वाटत होतं. नात्याची माणसं नव्हती. त्यामुळं एकाकी वाटत होतं.

आज गावाची आठवण तिच्या मनात आकार घेत होती. तशी एक दिवस सवड काढून मॅनेजरच्या हाती त्या दिवसाचा कारभार सोपवून तिनं गाडी काढली व ती त्या गावच्या रस्त्याने

जाऊ लागली. क्षणार्धात गावात पोहोचली. तर पाहते काय गाव पुर्ण बदललं होतं. गाव ओळखू येत नव्हतं. गावात अंधार नव्हता. संपुर्ण रस्ते चौडे तसेच सिमेंटचे बांधकाम. गावात जो तलाव होता. त्याचं सौंदर्यीकरण झालं होतं. आजुबाजूच्या गावचे लोकं येवून गावात वस्ती वाढली होती. दोनचार कारखानेही डौलात उभे होते. एकंदरीत सांगायचं झाल्यास गावाचे सौंदर्य अधिकच फुललं होतं.

तशी तिही पार बदलली होती. तिच्या चेहऱ्यावर सुरकृत्या आज दिसत नव्हत्या. कारण तिनं जोरदार केले होते.

ती कारमध्ये होती. तशी ती कार तिच्या घराजवळ उभी ओठावर लाल रंगाची लिपस्टीक अजुनही चिपकून होती. केसं मोकळे सोडलेले असून त्या केसाच्या निमुळत्या शैलीनं ते शैलीदार दिसत होते. त्या केसानं तिचं सौंदर्य अधिकच खुललं होतं. ती सारखी घडीकडं पाहात होती. तशा मनात तिच्या काहीतरी भावना दडलेल्या आहेत असे जाणवत होते. तशी एक म्हातारी आजीबाई तिला गवसली. तशी ती त्या चालकाला इशारा करीत होती.

"ह्या म्हाताऱ्या आजीबाईला विचारुन पाहा रतीरामचं घर."

ते तिचंच घर होतं. घर पडलेलं होतं. त्या घरावर इवलंसं छतही नव्हतं. पार भुईसपाट झालं होतं. भिंती तेवढ्या शिल्लक होत्या. त्याही पडल्या होत्या. नुसते मातीचे ढिगारे उरले होते. ते ढिगारे म्हणजे याही ठिकाणी एक घर होतं याची साक्ष देत होते.

ती म्हातारी त्याच भिंतीपाशी बसली होती. वयोमानानुसार तिचे डोळे खोल गेले होते. गाल पुर्णतः बसले होते. तिच्या डोळ्यांना स्पष्ट दिसत नव्हतं. त्या म्हातारीवरुन जाणवत होतं की तिच्यात फक्त हाडाचा सापळाच आहे. चालक तिच्याजवळ गेला. म्हणाला,

"आजी रतीरामचं घर कोणतं आहे? "

"तिच्याशी चालक बोलत होता. पण ती विस्मयकारी नजरेनं त्याच्याकडे पाहातच राहिली. कदाचित तिला बरोबर ऐकायला येत नाही. असं वाटत होतं. तशी बाईला एक बाई उभी होती. ती म्हणाली,

"कोण पाहिजे? कोण पाहिजे आपल्याला? कोणाचं घर पाहिजे."

"रतीराम.......... रतीराम पावसकर."

"माहिती नाही." असं म्हणून ती गप्प झाली. तशी आत असणारी तिच्याच सारखी म्हातारी तिच्या तोंडून आवाज आला.

"रतीराम पावसकर. हे बाजुचंच घर हाय."

"ते आतं कुठं राहतात? "

"ह्या माह्या बुढीले ईचारा जी. ईले माईत असन." तशी ती त्या म्हातारीला आवाज देत म्हणाली,

"या नं सासूबाई.. बाहेर या. पाव्हणं आवाज देतेत."

तशी ती म्हातारी बाहेर आली. ती तेवढी थकली नव्हती. तिनं त्या चालकाला पाहिलं. तसं तिनं चालकाच्या बाजूला असलेल्या तरुणीलाही पाहिलं. तशी ती म्हणाली,

"रतीराम पावस्कराचं घर हेच हाये. बोला, का काम हाये तुम्हाले? "

"अजी पण ते कुठं गेले? "

"ते तं मेलेत बाई. पण तू कोण? "

"मेले. कसे मेले? "

"अहो, त्याईची एक पोरगी होती. कोमल नाव होता तिचा. ते सासरवरुन कोणातरी सोबत पळून गेली म्हणे.. याचा धसका या बुढ्यानं घेतला. मंग त्याले अटक आली, अन् तो मरुन गेला.

"अन् त्याची बुढी? "

"त्याची बुढी त्या धसक्यानं पागल झाली. ते गावात भीक मांगते.. अन् या घरापाशी रायते. हेच ते बुढी होये."

"माझी आई....... अशी अवस्था." ती मेकअपवाली तरुणी म्हणाली व रडू लागली.

"तुम्ही कोण? "

"मीच कोमल.. यांची पोरगी." ती तरुणी म्हणाली.

"तू कोमल होये म्हणतेस. बेटा एवळे दिस कोठं गेलती मा."ते म्हातारी म्हणाली.

ती कोमल काहीच बोलू शकली नाही. चूप होती. तशी ती म्हातारी म्हणाली,

"बेटा, तू पळून गेली अन् तुनं आपला सुख पाह्यला. अन् या जन्म देणाऱ्या मायबापाले इसरलीस पोरी."

कोमलला त्या काकूला ओळखलं होतं. लहाणपणी ती तिच्या अंगाखांद्यावर खेळली होती. लहानाची मोठी झाली होती. तशी ती म्हणाली,

"कोणं सांगतलं की मी पळून गेले."

"अशी बातमी आली होती. तुह्या सासरवरुन. माईत पल्ला का तू पळून गेली. बाळे ते बातमी आयकून तुहा बाप मेला. तुह्या बापानं धसका घेतला त्या गोष्टीचा. अन् तुह्या माईची तं अवस्था तू पाहातच हाय."

"हो, सगळं त्या गणपतच्या करणीचं फळ."

"का म्हणलीस अन् कोठं होती एवळे दिस."

"ती लंबी कहाणी आहे काकू? " तिनं लांब श्वास घेतला.

"सांग तं खरं का घडलं ते."

तशी कोमल आपली आपबिती सांगू लागली. सांगता सांगता तिच्या डोळ्यात पाणी येत होतं. प्रसंगावर प्रसंग ऐकताच काकूचेही डोळे पानावले होते. पण ते जाणवू न देता कोमल आपली आपबिती सांगत होती.

"बापरे, अस्स झालं व्हय. तुह्या आयुष्यात. भयंकर त्रास झाला तुले. तुले बदनाम करण्या ताल. चोर तं चोर वरुन शिरजोर. पळून गेली हे सांगितलं त्याईनं. तुले त्याईनंच धक्के मारुन काढलं. पण बेटा हितं कावनाय आली तू? "

"आली होती. पण ह्या माझ्या मायबापानं मला परत त्याच घरी दलदलीत टाकण्यासाठी नेवून दिलं. म्हणत होते माझे बाबा की पोरीनं लग्न केल्यावर नवऱ्याच्या घरी मरावं. पण मायबापाच्या घरी येवू नये. मी काकू जगली म्हणून तुमच्या डोळ्याला दिसली. नाहीतर मी दिसली नसती तुमच्या डोळ्याला."

"आतं बाळ, तू घेवून जा आपल्या मायले आतं."

"हो, आता मी नेणारच. पण त्याईले चांगली अद्दल घडविणार."

"हो बेटा, त्याईले अद्दल घडलीच पाहिजे. कारण त्याईच्याचमुळे तुह्य कुटूंब ईस्कळीत झालं."

"बरं एक विचारु काकू? "

''ईचार."

"तो निर्दोष कुठं राहतो? "

"निर्दोष!! कोण निर्दोष? "

"अगं काकू, तो म्हायदू चांभाराचा पोरगा."

"अं, तो चांभाराचा पोरगा. लई छान हाये बाई तो. पण तुही त्याची वळख कशी? "

"काकू, तो माझ्या वर्गात शिकला. त्याला भेटायचं होतं. म्हणून विचारलं."

"पण तो आतं भेटणार नाय."

"का बरं? "

"अगं तो त्या वीरभद्रच्याकडं चपराशी म्हून काम करते नं."

"वीरभद्र."

"हो, वीरभद्र. तो आपल्या ईलाक्याचा आमदार झालाय. जसा तो आमदार झाला, तसाच त्यानं गावचा ईकास केला."

"अन् हा का रिकामटेकडा आहे चपराशी म्हणून काम करायला."

"अगं तू त्याले रिरामटेकडा समज. पण त्यानेच त्या वीरभद्रच्या मागं लागू लागू गावचा ईकास केला. शिवाय त्यानं तं वस्ती बी सुधरवली. त्याचा रुतबा पाहून. गाव आतं ईटाळ मानत नाय. अवं त्याले कायदे कानून समदं माईत. म्हून कोणी ईटाळ मानत नाय. ज्यानं ईटाळ मानला, त्याले हा सरळ कोर्टाचा रस्ताच दाखवते. पुलिस स्टेशनात पाठवते. म्हून ईटाळ संपला. हा मुलगा माईत हाय, लय गुणाचा निंगला बाई."

"हो का, पण त्यानं ईटाळ कसा संपवला? "

"बये बये बये, परीवर्तन झालं. देश स्वतंत्र्य झाला. बाबासाहेब आंबेडकराईनं कायदा लेहला. या बाबासाहेबाच्या कायद्यानुसार जो कोणी ईटाळ मानन, त्याले पोलिसस्टेशननच्याा चकरा माराले लावल्या यानं. मंग धाकाच्यानं लोकाईनं ईटाळच पाळणं बंद केलं."

"पण हे एकाएकी बंद झालं नसेल. अन् कोणाची तक्रार कोणी एकदम कशी टाकल कोणी? काहीतरी प्रसंग सांग."

"अवं एकदा का नाही एक डुकरी  आन् तिची पिल्लं त्या चांभारवाड्यातल्या ईहिरीत पल्ली होती. तवा त्याईले प्याले पाणी नोयतं. गावातल्या तलावात बी त्याईले मनाई केली होती. त्यामुळं मोठ्ठा प्रश्न त्याईच्यासमोर उभा झाला होता. पेवाच्या पाण्याचा प्रश्न. इटाळानं छळलं होतं गावाले. गाव म्हणत होतं तेच डुकरी पल्लेल्या ईहिरीचं पाणी प्या. पण ते कसे पेणार. कारण ते बी इन्सानच."

"मग काय झालं? "

"मग का, अख्खा गाव ईरोधात. गाव म्हणत होता तळ्याचं पाणी प्याचं नाय अन् निर्दोष म्हणत होता प्याचं असन तं तळ्याचंच पाणी प्या."

"मंग."

"मंग का? ते तळ्याचं पाणी जवा प्याले आले तवा गावातल्या माणसाईनं त्याईचं टाळकं फोडलं. त्यावर तक्रार गेली ठाण्यात. मंग पोलिसाईनं एकाएकाले पकडून नेलं. अंदर केलं. मंग पोलिसाईनं सांगतलं, 'बाबा रे परीवर्तन झालंया देशात. आतं तुमी याईले कसाबी ईरोध करु शकत नाय. तुमाले पाणी पेवू द्याच लागन. नायतं बाराच्या भावात जान. का ठरवाचं ते लवकर ठरवा. बस. गावानं तवापासून ठरवलं का त्याईले पाणी पेवू द्यायचं. अन् गाव सुधारून गेलं. आतं पुराणं गाव रायलं नाय. गावात सुधारणा झाली हाय. निर्दोषनं गाव सुधारलं म्हून. अन् तसाबी तो निर्दोष मानतच नोयता नं. तो भेदभाव मानत नाय. त्याले फक्त मतदान पाहिजे. अन् हिशेब ठेवाले इशवासाचा पोरगा पाह्यजे होता. तो निर्दोषच्या रुपानं भेटला. गावातला इशवासाचा पोरगा म्हून त्या वीरभद्रनं ठेवून घेतलं त्याले.

गावात असलेल्या विटाळाच्या बैसाख्या नष्ट झाल्या होत्या. ज्या बैसाख्या कायमच्या काढण्याबद्दल कोमल बोलत असायची. त्या बैसाख्या निर्दोषनं काढल्या होत्या. त्यानं लोकांना माणूस बनवलं होतं. निर्दोषनं संबंधित गाव सुधरवलं होतं. आता गावचे लोक एकमेकांच्या घरी जात. बसत उठत. व्यवहारही करीत असत. ते पाणीच पेत नसत तर जेवनही करीत असत. एकमेकांच्या घरी बारसे, वाढदिवस व लग्नाला बोलवत असत. त्यांच्या तव्यातलंही पाणी पित असत.

गावात सुधारणा झाली होती. रस्ते सिमेंटचे बनले होते. घरोघरी नळंही लागले होते. दोन चार पुढाऱ्यांचे पुतळेसुद्धा डौलात उभे केले होते. तलावावर हिरवा चिला चढला होता. पण आजही त्याच तलावाच्या घाटावर लोकं पाणी भरत होते. कोणी कपडे धुत होते, कोणी गाईम्हशीही.

फोनचा जमाना आला होता. प्रत्येकाजवळ मोबाईल होता. काहीजण स्मार्टफोनही वापरत होते. शहरासारखं गाव सुधारलं होतं. मात्र आजही आंतरजातीय विवाह होत नव्हते. तशी ती काकूला म्हणाली,

"निर्दोषचे मायबाप भेटतील का घरी? "

"हो, ते घरीच राहतात. आज त्याईनं चांभारकीचा धंदा सोडला हाये."

"का बरं? "

"अगं जसजसं गाव सुधारलं. गावात परगावचे लोकं याले लागले. तसतसा लोकाईचा ईरोध होत गेला. मंग सरपंचानं सांगतलं ठणकावून का तुमाले हा धंदा सोडा लागते. नाय तं गाव सोडा लागते. तवा ते आयकून त्याईनं धंदे सोडले. तसं पाह्यलं तं आतं ईहिरीत मोट लागत नाय. पंप आलं हाये इलेक्ट्रीक. आन् वार्त्याबी लागत नाय. चांगले दोर भेटतेत. त्या चमड्याईच्या

चपला कोणी घालत नाय. प्लास्टिक चप्पल वापरतेत लोकं. म्हून त्याईचा धंदा बी चालत नाय. म्हून त्याईनं आपोआपच बंद केला धंदा.”

''मग कोणता धंदा करतात ते लोकं? "

"अगं आतं ते लोकं मोलमजुरी करतेत. कोणी शेतावर जातेत. कोणी कोणी तं दुकानं लावली मोठमोठी. कोणी कारखान्यात जातेत. मात्र मांगाईचा अन् खाटकाईचा धंदा आजबी चालू हाय. ते मातर सुधरले नाय. मात्र त्या धंद्यात पैसा जास्त हाये म्हून ते लोकं तो धंदा करतेत. ते बी काई दिवसानं सुधरतीनच.”

"म्हणजे आतं कोणी विटाळ मानत नाही तर........”

"नाय आतं कोणी ईटाळ मानत नाय. ते ईटाळ मानणारी पुराणी पेळी गेली. शिक्सनानं हा जो बदल झाला. तो बदल लोकाईनं घेतला. अन् मी म्हणते जर का हे लोकं अनपढ राह्यले असते तं आज बी ईटाळ राह्यला असता.”

"हो बरोबर आहे काकू तुमचं मत.”

"पण बेटा एक लक्षात घे.”

"काय काकू? "

"आतं हे तुह्या बुढीले तेवळं सोबत घेऊन जा बेटा. लयी गती भोगते हे म्हातारी. लई रडते तुह्यासाठी कधीकधी.”

"हो, मी आता आली तर माझ्या आईला घेवूनच जाणार.” तशी ती म्हातारीला म्हणाली,

""म्हातारे, हे तुही पोरगी होये कोमल. जरा वळखलीस का? "

"अवं बाळे, इले आयकाले बराबर येत नाय. जोरात बोला लागते.. स्पष्ट बी दिसत नाय. हे फक्त तोंडाकडंच पाह्यते. रायते माह्या आंगणात पडून. माई सुनच भाकर तुकडा देते. आतं हिचा कोणीच नोयता. म्हून देत होती माई सुन."

"बुढे तुही पोरगी होये कोमल." ती जोरात म्हणाली.

"कोण? "

"पोरगी$$$ पोरगी होये तुही$$$"

"कोण पोरगी? "

"तुही पोरगी$$$"

"माई पोरगी."तिनं त्या हातानं तिचा चेहरा चााचपला व म्हणाली,

"हे माई पोरगी होये म्हणतेस."

"हो, मीच कोमल."

''कोठं गेलती पोरी एवळे दिस? "

"मी तरी कसं सांगू तुला. तुला तर ऐकायला येत नाही. आतं शांत राहा. सगळं सांगेन."

तशी ती म्हातारी चूप होतीच. कारण तिला ऐकायलाच गेलं नाही.

"आतं उठ चल, ह्या गाडीत बस. मी तुला न्यायला आलोय."

त्या म्हातारीला काहीच ऐकू आलं नाही. तशी कोमल तिला उठवायला लागली... गाडीच्या दिशेकडं. तशी ती म्हातारी म्हणाली,

"मले कोठं नेता. मी येत नाय तिकडं. मी येथंच मरीन. हे माई जनमभुमी हाय."

तशी काकू म्हणाली,

"बाळे, हिले ने. पर हिच्या मयतीची बातमी देजो. मले तं वाटते हिले येतं आणजो. ईची इच्छा येतंच हाये."

"होय काकू, तुम्ही सांभाळलं. छान केलं. तुमचे उपकार कधीही विसरु शकणार नाही. माझ्यामुळे माझ्या आईच्या गती झालेल्या आहेत. पण मी तरी का करु? माझाच तं प्रश्न होता."

तशी ती पुन्हा म्हणाली,

"काकू, येते हं, या तुम्ही कधी आमच्याही घराला. मी वाट बघेल."

"ठीक हाये बाळे. येत रहा अशी."

तशी ती निघाली. चालकानं गाडी सुरु केली आणि विचारत विचारत निर्दोषचं घर गाठलं. निर्दोषच्या संबंधीतापासून व्हाट्सअप नंबर घेतला. तशी गाडी सुरु करुन ती आपल्या घरी आली.

रस्ता खाचखळग्याचा होता. पण गाडीत बसलेल्या लोकांना काहीही वाटत नव्हतं. तसा मुख्य रस्ता आला. या रस्त्याने कशा गाड्या भरधाव चालत होत्या. गाडीतून बाहेचं सगळं दिसत होतं. झाडंही पळत होते.

चालक गाडी बेधुम चालवत होता. लवकरच तिचं राहातं घर आलं. ज्या ठिकाणी मनसुदभाईच्या स्मृती दडलेल्या होत्या. घर येताच गाडी थांबली. तसं तिनं आईला खाली उतरवलं. चालक म्हातारीला घेवून आत गेला. तिही नंतर आत गेली.

एक दिवस ती निवांत बसून होती. निवांत आराम करीत असतांना अचानक तिली निर्दोषचा नंबर आठवला. तिनं आपल्या पर्समधून नंबर काढला. तो नंतर आपल्या मोबाईलमध्ये समाविष्ट केला. तसा व्हाट्सअप वरुन फोन लावला.. तशी बेल जावू लागली.

"हॅलो, कोण बोलतंय."

"मी...... मी कोमल."

"कोमल कोण कोमल? "

"अरे तू ओळखलं नाहीस."

"नाही, परीचय सांगा."

"मी कोमल पावसकर. तुझ्या वर्गातील मुलगी. कॉलेजातील. तू माझा मित्र होता. आठवलं का? एक लाजरी मुलगी, गावात राहात होती तुझ्या. आठवते तुला ते बागेतील फिरणे. आठव, एक दिवस आपण मासोळ्या पाहिल्या होत्या. ते पावसात भिजलो होतो. तेही आठवत नसेल तर तुच मला लग्न करायला बाध्य केलं हेही आठव."

"हो, सारंच आठवलं. बोल कशी आहेस? कुठे आहेस? "

"अरे मी गावाला आले होते तुला भेटायला."

"हो का? मग भेटली नाहीस अन् का गं मी तर ऐकलं होतं की तू सासरमधूनच कोणातरी सोबत पळून गेली म्हणून."

"नाही नाही. ते सगळं खोटं आहे. मला गावातच माहित झालं. त्याची लंबी कहाणी आहे. ते मी नंतर सांगेन. आधी तू सांग तू कसा आहेस? "

"मी बरा आहे."

"काय करतोस? "

"पीए बनलो साहेबाचा."

"बरं वहिणी काय म्हणते? काय करते? "

"वहिणी, कोण वहिणी? "

"अरे, तुझी पत्नी. तुझी पत्नी काय करते म्हटलं."

"..........." तो गप्प होता. तशी ती म्हणाली,

"सांग ना काहीतरी. गप्प का आहेस? बरेच दिवस झाले. तुझा पत्ताच नव्हता. आता बऱ्याच दिवसानं बोलायला मिळालं. मोबाईलवरच सही. पण भेट तर झाली."

"हो ना. अगं तुला काय मुलंबाळं? कोणत्या वर्गात गेलीत? "

"मला मुलं नाहीत."

"का बरं? . तुला झाली नाहीत की होवू नाही दिलीत." तो हसला तशी ती म्हणाली.

"अरे ती मोठी लंबी कहाणी आहे. ती मग सांगीन. आधी तू सांग तुला पोरं किती? "

"अगं मी मुलांबद्दल काय सांगू."

"म्हणजे? "

"अगं माझं लग्नच झाले नाही."

"काय बोलतोस? लग्न केलं नाही का बरं? "

"होय, मी लग्न नाही केलं. आतं ते जावू दे. कारण विचारु नकोस."

"नाही कारण सांग. तू तसाही मस्करी करतोस. तुला सवयच आहे तशी."

"खरंच सांगतोय. मी लग्न नाही केलं अजून."

"का बरं? "

"कोणावर प्रेम केलं एवढं मला तरी कळू दे."

"ते जावू दे."

"अरे माणूस प्रेमभंगात लग्न करीत नाही कोणी? प्रेमभंग झालं का? "

"हो, तसंच समज."

"कोणाशी झाला? "

"अं जावू दे."

"माझ्याशी तं प्रेम करीत नाही राहिला."

"अगं जावू दे. तुला सवडीनं सांगेन. तू सांग आधी. तुझं तर लग्न झालं होतं. तू खुश आहे ना संसारात."

"हो म्हण. नाही म्हण. अन् खुशच समज."

"म्हणजे नक्की काय? मला समजलं नाही. बुवा त्रास देतात का? सासुसासरे....... ननद वैगेरे. कोणाचा त्रास आहे तुला? "

"मी सांगू शकत नाही."

"अगं सांग, तुला सांगावच लागेल. मला नाही सांगत तर कुणाला. सांगितल्यानं मन हलकं होतं."

"अरे तू आपल्याबद्दल सांगितलं नाही. मग मी कशी सांगू तुला."

'आधी तू सांग, आधी तू सांग म्हणत त्यांचा वेळ जावू लागला. तशी तिनंच सुरुवात केली.

"मला मुलबाळ नाही. तुझ्या म्हणण्यानुसार मी लग्न केलं. पण मी फसले. तू आणि माझ्या मायबापाच्या म्हणण्यानुसार मी लग्न केलं. पण मला त्या निर्लज्जानं संसारसुख दिलं नाही. उलट त्रासच दिला. वांझोटीपणाचा दाग लागला त्यानं. पण काय करु, ते माझ्या नशिबाचे

भोग होते. निर्दोष मला सासरमध्ये फार मोठ्या संकटाचा सामना करावा लागला. दररोजचे टोमणे व मारझोड, जीव माझा फार कंटाळला होता. एकदा आलेही होते मा माहेरी कायमची राहण्यासाठी. पण माझ्या मायबापानं लग्नानंतर पतीलाच देव मानून पतीच्याच घरी मरावं असं म्हटलं व नेवून दिलं."

"बापरे! खुप मोठं घडलं तुझ्या आयुष्यात."

"मी परत माझ्या पतीच्या घरी गेले तर तिथं सगळे अनपढ असल्यानं माझ्या शिक्षणाचा सत्यानाश केला. माझा पती सर्वांना कामाला जावू देवून दुपारी घरी माझ्याचसमक्ष मुली आणायचा. त्यातच ती गोष्ट सासूबाईला सांगितली. पण तिनं मलाच खोटं करत खुलेआम आणत जा असं म्हटलं. मुलानं खुलेआम पोरगी आणणं सुरु केलं. त्यातच तिला दिवस राहिले. तेव्हा ते मला खुप त्रास देत. कुलथा वांझोटी म्हणत. आता ती तू मित्र आहे म्हणून सांगते की जो माणूस मला शरीरसुखच देवू शकला नाही. मग मी वांझोटी कसली? पण ही माझी परीक्षा असेल. एक दिवस त्यानं तर घरातूनच हाकललं. मी असहाय्य बापाच्या घरी गेली असती, पण बापानं पुन्हा मला समजावून नेवून दिलं असतं पतीच्या घरी."

"मग कुठं गेली तू? "

"मग मी रस्त्यानं चालत जात होती. खुप थकली होती भूक खुप लागली होती. मग मला एक धाबा दिसला. त्या धाब्याचा मालक मुसलमान होता. त्याला विनवणी केली. त्यानं मला जेवन तर चारलंच चारलं. पण तो एकटाच राहात असल्यानं........"

"काय पत्नी बनवलं तुला! तू मुसलमानाची पत्नी बनली! "

"अरे ऐकणं आधी. मला त्या मुसलमानानं बहिण मानली. मरतपर्यंत सांभाळलं. धंदा शिकवला. आज मी त्या लहानशा खानावळीच्या जागेवर मोठं होटल बांधलं आहे.

आज माझ्याकडे सर्व आहे. तो माझा भाऊ मरण पावला. पण त्याचे उपकार मी विसरु शकणार नाही. काही दिवस गेले.. गावची आठवण आली. वाटलं गावला जावून यावं. निर्दोषला भेटून यावं. मायबापाची अपेक्षा नव्हती. पण गावला जाताच आई जीवंत असल्याचं कळलं. घेवून आले तिला घरी. बाप मरण पावल्याचं कळलं आणि हेही कळलं की त्या पतीनं मलाच बदनाम करीत पळून गेल्याचं गावात पसरवलेलं. तसेच मला हेही कळलं की जे गाव मी विटाळमुक्त करण्याची स्वप्न पाहात होतो, ते काम तू केलं. तू विटाळ संपवला आहेस. मला आश्चर्य वाटलं की जी विटाळाची भेग मलाच संपवायची होती, ती तू संपवली एका चुटकीसरशी."

"होय, पण त्यात बाबासाहेबांचं योगदान आहे."

"यात बाबासाहेबांचं योगदान कसलं? ते तर महानिर्वाण होवून एवढी वर्ष झाली."

"अगं त्यांनी कायदे बनवले ना. म्हणून त्याचा फायदा झाला मला."

"मला नाही समजलं."

"त्यात काय समजायचं आहे. अगं मी संविधानाचा धाक दाखवू दाखवू या लोकांना चूप बसवलं. कधी पोलिसं आणले तर कधी न्यायालयात खटलेही लढलो. अगं आता गावात विटाळ नाही. ती जुनी पिढी गेला. आता नवीन पोरं आली. ती शिकत आहेत. शहरात जात आहेत. परीवर्तन आणत आहेत खरं सांगू का. मी गावात चवदार तळ्याचंच आंदोलन घडवून आणलं. खुप कष्ट पडले मला विटाळ संपवितांना. ते रोजचे अर्ज लिहिणे. त्याच्या प्रती काढणे, पोलिस स्टेशनला चकरा मारणे. न्यायालयाच्या चकरा मारणे. पैसा तर गेलाच गेला. पण वेळ ही बराच गेला. पण आज मला समाधान वाटते. आत्मीय आनंद मिळतो."

"ते सगळं जावू दे. हे सांग की तू लग्न का केलं नाही? "

"ते जावू दे नं. गेल्या गोष्टी कशाला उकरुन काढाव्या? "

"म्हणजे? नाही नाही सांगच आता. का बरं लग्न केलं नाही ते."

"ठीक आहे, तर मग ऐक."

तसा तो सांगू लागला लग्न का केलं नाही त्याची कहाणी.

"अगं माझं प्रेम होतं ना तुझ्यावर. पण तुला तुझ्या सुखासाठी लग्न करायला लावले. मला काय माहित होतं की तू दिल्या घरी सुखी राहणार नाही म्हणून. शिवाय ती जात आडवी येत होती आपल्या प्रेमाच्या. पण तुझं लग्न झाल्यावर मी ठरवून टाकलं की आपण लग्नच करायचं नाही. सगळं बेईमान जग. लग्न करुन संसार थाटणारी मंडळी. त्यांना पत्नी तर सोड, मायबापच नकोसे वाटतात. तिथं तू एक पकत्नी. मायबाप उन्हातून सावलीत नेतात. लहानाचं मोठं करतात. शिक्षण देतात. अन् हे शिकलेले लोक मायबापांना वृद्धाश्रमात टाकतात. ज्या वृद्धाश्रमात मायेचा ओलावा नसतो. नुसता असतो फाफटपसारा. त्यांना तेव्हा मरणप्राय यातना होतात, जेव्हा त्यांच्या स्वप्नांचा चुराडा होत असतो. जेव्हा त्यांच्या तोंडासमोर त्यांची नातवंड दिसत नाही. जेव्हा पोरगा अन् सुन दिसत नाहीत. कदाचित नातवंडांना गोदीत खेळविण्याचे स्वप्न त्यांनी पाहिलेले असते. ते रंगविले असते. पण ते तरी काय करणार. त्या कुपुत्रासमोर आशा आकांक्षा फोल ठरलेल्या असतात. हे सगळं माझ्या या डोळ्यानं बघतो. बघितलंही आहे. त्यांची सेवा करतांना माझी इच्छा मुरलेली आहे. मलाही वाटले की लग्न केल्यानंतर माझे वारसं मलाही वृद्धाश्रमात टाकतील. त्यापेक्षा लग्न न केलेलं बरं. बरं का नाही."

ती काय समजायचं ती समजली. तो थोडा वेळ गप्प झाली. काही वेळानं म्हणाली,

"बोलणं काही..... तू गप्प का? "

''मला तुझ्यासारखी सुंदर मुलगी न सापडल्यानं मी लग्न केलं नाही."

"अन् सापडल्याही असतील पण तुझं माझ्यावर प्रेम असल्यानं तुला त्या मुली सुंदर दिसल्या नसतील."

"हं, तसंच समज."

"बरं आपण नंतर बोलू. बराच वेळ झाला. आता फोन ठेवते."

"ठीक आहे. तसं पाहिलं तर मलाही तासनतास बोलावसं वाटतं तुझ्याशी. पण काय करु. मर्यादा आहे."

"आपण सवड मिळाल्यास व्हाट्सअपवर व्हीडीओ कालनं बोलत जावू. बरेच दिवस झाले तुला पाहिलं नाही. त्या निमित्ताने पाहता येईल."

"ठीक आहे."

त्यांनी फोन ठेवला. ती मात्र विचार करु लागली. निर्दोष बालमित्र माझा. आपल्या इच्छा आकांक्षा मारुन त्यानं माझ्या जीवनाला चांगलं बनविण्याचा प्रयत्न केला. स्वतःच्या प्रेमाचा त्याग केला. स्वतःचे जीवन दुःखातच तडपडत ठेवले. पर्वाही केली नाही दुःखाची.

त्यानं प्रेमाचा त्याग केला, पण त्यात फायदाच झाला त्याचा. त्याला विटाळ मिटवता आला गावातला. जर तो विवाहबंधनात पडला असता तर आज त्याला गाव सुधरवता आले नसते. काल गावाला जी विटाळाची कीड लागली होती. ती कीड समाप्त करता आली नसती. खरंच तो महान आहे. आपणच पापी आहो. आपल्या हातून कोणतेतरी पाप केले असेल. म्हणूनच त्या पापाची शिक्षा मिळाली आपणास.

तशी ती भानावर आली. तिला तिची आई आठवायला लागली. बाप मरण पावल्याचं जेव्हा ऐकलं, तेव्हा तिच्या डोळ्यात पाणी आलं. क्षणभर रडावसं वाटलं. पण आज तर तिच्या डोळ्यात अश्रू ही सुकलेले होते. बस आता आईला सांभाळायचं, जी त्या कचाट्यातून वाचली आहे. असा विचार ती करीत होती. तशी ती आईजवळ गेली.

आज तिनं आईला अंघोळ घातली होती जी अंघोळ आईनं कित्येक वर्षापासून केली नव्हती. असे एकंदर तिच्या आईच्या अवतारावरुन वाटत होते. आईचे केसंही गुंतले होते. त्यांची वेणी बनत नव्हती. त्यामुळं ते कापणे भाग होते.

कोमलनं आईचे केसं कापून घेतले. जेणेकरून नवीन केसं आल्यावर त्या केसांना वळण देवून साहजिकच चांगल्या केसांना वळण देवून साहजिकच चांगल्या केसाची पायाभरणी करता येईल. असे तिला वाटत होतं. मात्र तिच्या मनात बदल्याची भावना होती. आपल्या सासरकडील मंडळींना धडा शिकवला पाहिजे असे तिला वाटत होतं.

एक दिवस बसली असतांना सहज तिच्या मनात विचार आला. आपण आपल्या सासरकडील मंडळींना धडा शिकवलाच पाहिजे. नाहीतर प्रत्येक माणसाला धडा शिकवला नाहीतर जगातील प्रत्येक माणसं असेच वागतील असं तिला वाटत होतं. तसं वाटणंही साहजिकच होतं.

बालमित्र निर्दोष हा तिच्याहीपेक्षा जास्त शिकलेला होता. त्याचा सल्ला घ्यावा असं वाटत होतं. आज जशी बदल्याची भावना तिच्या मनात आली, तिनं त्याला फोन केला.

"हॅलो निर्दोष. मी कोमल बोलतेय."

"बोल कोमल. कसा काय फोन केलाय."

"सहज केला. करमत नव्हतं म्हणून आणि एक काम पडलं म्हणून."

"कोणतं काम पडलं? "

"काम..... फोनवर कसं सांगता येईल. ये घरी एखाद्या वेळी."

"पण वेळ भेटत नाही त्याचं काय? "

"कसा वेळ भेटत नाही."

"अगं, दिवसाचा वेळ ही अपुरा पडतो. हिशोब लिहावा लागतो ना प्रत्येक दिवसाचा. शिवाय साहेबांच्या सभा, संमेलने असतात. वाटते का ही नोकरी सोडून द्यावी. पण या वयात दुसरं काम कसं मिळेल. शिवाय साहेबांच्या माध्यमातून मोठमोठी कामं करुन घेता येतात. म्हणूनच मी येवू शकत नाही. वाटल्यास फोनवरुनच सांग. चुटकीसरशी तुझं काम करुन टाकतो."

"अरे हे काम चुटकीनं करण्यासारखे नाही."

"बोल तं कोणतं काम आहे? तक्रार करायची आहे का पोलिसात? " तसा को तो हसला.

"हो, तसंच काही समज."

"कोणाची टाकायची आहे तक्रार."

"पतीची...... माझ्या पतीची टाकायची आहे तक्रार. ज्यानं माझा छळ केला. माझ्या मायबापाच्या भावना दुखावल्या. माझा बाप ज्यामुळे मरण पावला. मी चूप बसले आजपर्यंत. वाटलं जावू द्यावं. पण आता असं वाटतेय की त्याला धडा शिकवलाच पाहिजे. कारण त्यानं मी पळून गेल्याचीही खोटी बातमी पसरंवण्याचं धाडस केलं. त्याच्याचमुळे माझी आईही वेडी होवून गावात भीक मागत होती. मी आज त्याला धडा शिकवायला सक्षम आहे. ज्यावेळी त्यांनी घराच्या बाहेर मला काढलं, तेव्हा मी सक्षम नव्हतो. हे मनसुदभाई जर भेटले नसते तर मी केव्हाचीच वर गेले असते किंवा वेश्यालयात वेश्या बनून आयुष्याचा सत्यानाश केला असता. अरे कोणी ना कोणी तशा असहाय्यतेत माझ्या शरीराचा उपभोग घेतलाच असता नं. मग वेगवेगळे पती बदलवत जीवन जगले असते. वेगवेगळ्या आजारानं त्रस्त झाले असते. म्हणून मला ते करायचंच आहे. नाहीतर अशासारखी काही मंडळी उद्या माझ्यासारख्या मुलींना असाच त्रास देतील."

"यावर तुला पोलिस राहत देणार नाहीत. तुला न्यायालयात टाकावी लागेल ती केस. तिथेच तुला दाद मागता येईल. पण तिथं वेळ जातो. तारखावर तारखा पडतात. भयंकर त्रास होतो. जर मान्य असेल त्रास भोगायला तर टाक."

"मी तयार आहे त्रास भोगायला."

"ठीक आहे. जर तुझी इच्छाच आहे तर तर येईल एखाद्या वेळी."

"ठीक आहे. नक्की येशिल हं."

"होय, नक्कीच येणार."

"आता फोन ठेवू."

"ठीक आहे." ती म्हणाली. तसा त्यानं फोन ठेवला.

बरेच दिवस निघून गेले होते. काम झालं नाही निर्दोषशी बोलूनही. गणपतला धडा शिकवलाच पाहिजे असा तिनं विचार केला होता. निर्दोष मी तुला मार्गदर्शन करेल असं आश्वासन दिलं होतं. तब्बल वर्ष झालं होतं. ती वाटच पाहात होती. तिनं त्याला बरेचदा फोनही लावण्याचा प्रयत्न केला. पण आऊट ऑफ कव्हरेज दाखवत होता. बहुतेक निर्दोषनं फोन बदलवला होता.

आज सोमवार होता. त्या दिवशी ती वैतागल्यागत अंगणात बसली होती. गिऱ्हाईकाची वर्दळ सुरु होती. तशातच कोमलला फोन आला,

"हॅलो."

"कोण बोलताय? "

"मी........ मी निर्दोष. ओळखलं नाही का? "

"ओळखलं ना. तुला कशी विसरणार."

"आज आहे का रिकामी."

"होय, का? तू येत आहे का? "

"होय."

"मी घरीच आहे. ये. सवडही आहे. इकडे नोकरं बघतात सगळी कामं."

"ठीक तू पत्ता दे."

तिनं व्हाट्सअपच्या माध्यमातून पत्ता पाठवला. तसा तो दुपारच्याला दोनचाकी गाडीनं तिच्या घरी पोहोचला.

ती वाट पाहात बाहेरच बसली होती. तसा एक माणूस काळा चष्मा लावून ऐटीत गाडी थांबवत काउंटर वर बसलेल्या माणसाला पत्ता विचारु लागला. काउंटर वाल्यानं तिच्याकडं अंगुलीनिर्देश केला.

"कोमल आपणच का? "

''होय. का बरं? "

"मी निर्दोष."

"अरे निर्दोष तू." ती आनंदावली. तशी ती म्हणाली,

"ये बस. नाही आपण वर बसू. घरामध्ये."

"तू कोमल. तू तर ओळखूच येत नाहीस. म्हणतात चिंतेनं बारीक होतो माणूस. तू तर लठ्ठ बनली आहेस."

ते दोघेही वर घरामध्ये गेले. तसं त्यांचं बोलणं सुरु झालं. ती म्हणाली,

"मला इथं कोणतंच काम नाही. सगळं नोकरं बघतात."

"छान आहे."

"काय घेशील? "

"काही नाही गं. फक्त तुझ्याशी बोलायला आलो."

"नाही नाही तुला घ्यावंच लागेल काहीतरी."

तिनं फोनवरच नाश्त्याची ऑर्डर दिली. तसा तो म्हणाला,

"बोल कोणतं काम आहे? "

"हे बघ, मला माझ्या पतीला धडा शिकवायचा आहे. त्यानं मला फार त्रास दिला."

"ते मागंच सांगितलं. आता ते मला माहित आहे. पुढलं सांग."

"ते तुच सांग."

"बरं ऐक तर. तुला न्यायालयात खटला टाकायचा ना. मग एक वकील करावा लागेल. ती केस लढावी लागेल. भरपूर पैसा लागेल."

"तू पैशाची चिंता करु नकोस. फक्त मार्ग सांग."

"बरं. हे बघ. आपली मैत्रीण वकील आहे शहरात. तू ओळखत असशील."

"कोणती? "

"ती मोना, ती वकील बनली. तुझ्यासोबत राहणारी. तुला मार्गदर्शन करणारी."

"नाही मला नाही आठवत. बरं ते आठवणं जावू दे. तू हे सगळं करुन दे. मी फक्त तुझ्या पाठीमागं उभा राहिल."

"हे बघ, न्यायालयात तुलाच पुढं होवून केस लढावी लागेल. मी राहिल पाठीमागं उभा. अन् एक सांगू."

"सांग."

"तू मोनालाच भेट. तिच करेल तुला मार्गदर्शन."

''ठीक आहे दे पत्ता."

त्यानं तिचा पत्ता दिला. फोन नंबर सगळं काही. तसे ते बराच वेळ बोलत होते. तस तशी सायंकाळ झाली. तसा निर्दोष म्हणाला,

"मला निघायला पाहिजे. सुर्य मावळायला लागलाय."

"जेवन कर. मुक्काम कर."

"नाही. मी आज कशीबशी सुट्टी घेतली. पुन्हा येईल कधीतरी."

"ठीक आहे. जशी तुझी इच्छा. व्यवस्थित जा. हळूहळू."

''बरं." तो म्हणाला. तसा तो निघाला. पण कोमल तो दिसेनासा होईपर्यंत त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडं पाहात होती. जुने दिवसं आठवत.

रस्त्यानं तो आपली बाईक चालवत होता. त्याच्या मनात शेकडो विचार होते. किती प्रेम करते ती माझ्यावर. म्हणते व्यवस्थित जाशील हळूहळू. तिच्या प्रत्येक वाक्यात प्रेम भरलं आहे ओसंडून. ओतप्रोत भरलेलं प्रेम आज दिसत आहे. चेहऱ्यावर सुरकृत्या पडलेल्या असुनही ती प्रेम करते.

तिच्याही मनात त्याच्याबद्दल प्रेम निर्माण झालं होतं. तिही विचार करीत होती. तो सवडीत सवड काढून माझ्याकडे आला. मार्ग दाखवायला. कदाचित त्यालाही वाटते की ज्यानं हिला त्रास दिला, त्याला शिक्षा व्हावी.

दिवसामागून दिवस जात होते. आज रवीवार होता. तसा दररोजच तिच्यासाठी रवीवारच असायचा. पण मोना ही नोकरी पेशातील मुलगी असेल असा विचार करुन करुन तसेच तिला

रवीवारशिवाय सुटी नसेल असा विचार करुन ती रवीवारची वाट पाहू लागली. तशी आज ती सकाळीच उठली. तसं मोनाला फोन लावून ती म्हणाली,

"हॅलो, मोना बोलत आहा काय? "

"हो मी मोनाच बोलते. आपण? "

"मी कोमल, तुझी कॉलेजातील मैत्रीण."

"कोण कोमल? चुकीचा नंबर."

"अगं चुकीचा नंबर नाही. मी कोमल, निर्दोषची मैत्रीण. निर्दोषला ओळखते का? "

"अगं तू कोमल. निर्दोषवर प्रेम करणारी. फार दिवसानं आठवण केली तू. कुठं आहे? कशी आहेस? "कोणं नंबर दिलाय? "

"निर्दोषनं."

''म्हणजे तू अजून निर्दोषला सोडलं नाही तर.....” तशी ती हसली.

"का गं तू......"

"बोल कसा फोन केला? कशी आहेस? "

"बरी आहे. तू कशी आहेस? "

"व्यवस्थित."

"वकील बनली वाटते."

"होय. तुमची केस भांडायला." ती परत हसली.

"तू काय करते गं? "

"मी व्यवसायात आहे."

"कोणत्या? "

"होटल आहे माझं मोठं."

"मग तर मोठं काम दिसतं."

"हो, तसंच समज."

"तुझं सांग गं? माझंच विचारते." कोमल म्हणाली.

"मी........."

"काय मी मी करते गं. तुझी सवय नाही गेली अजून. गाजलेली वकील दिसतेस. भरपूर पैसे कमवीत असशील."

"नाही गं. मी काही तेवढी गाजलेली नाही."

"मग तू खटले भांडत नाही काय? "

"भांडते ना. पण छोटे छोटे."

"म्हणजे? "

"अगं मिही मोठी होईल, जेव्हा दोन चार केसा जिंकीन."

"माझी लढशील एखादी केस."

"का नाही लढणार. देवूनच पहा, कशी पट्टदिशी काढते की नाही ते."

"म्हणजे? "

"अगं पटकन जिंकून देते म्हटलं."

"हो का? पण पैसे नाही देणार."

"नको देवूस. तुला मागतेही कोण? "

"अगं मी गंमत केली."

"अगं इथं सिरियस कोणं घेतलं. बरं मला सांग खरंच खटला टाकायचाय."

"होय."

"कोणाबद्दल? "

"तुझ्या भावजीबदद्ल."

"हो, मला मागे निर्दोषनं तशी कल्पना दिली होती फोन करुन. तो येतच राहते नेहमीच माझ्याकडे कोणत्या ना कोणत्या कारणाने."

"हो का? "

"हो."

"म्हणजे आता तो तुझ्यावर लाईन मारायला लागला तर........."

"ऐ........ काय बोलते. तुला टाकून तो माझ्यावर कसा लाईन मारन. अगं तो क्षण न् क्षण तुझीच आठवण करीत असायचा. माहित आहे तुला. तू गेल्यावरही बिचाऱ्यानं लग्न नाही केलं. कुवाराच आहे तो."

"हो, माहित आहे मला. सागितलं त्यानं."

"बरं ते जावू दे. कशाची केस आहे. ती जरा डिटेल्स सांग."

"बरं."

कोमलनं तिची केस डिटेल्स सांगितली. तशी विव्हळत मोना म्हणाली,

"बापरे, फार विपरीत घडलं तुझ्या आयुष्यात. सबंध स्त्रीजातीची व्यथा. तुला तर भांडायलाच पाहिजे त्याबद्दल खटला. एखाद्या चित्रपटाला शोभेल असं तुझं जीवन. बापरे! "

"मला टाकायचाय खटला. येवू का आज? "

"आज नको येवू."

"का बरं? "

"आज चालले मी फिरायला. आधीच फोन करायला पाहिजे होतं ना. अगं ह्या प्रदुषणाच्या शहरात अगदी जीव वैतागून जातो. कासावीस झाल्यासारखं वाटतं. म्हणून आम्ही बाहेरगावी जातो फिरायला."

''एखाद्या दिवशी आमच्याकडेही ये."

"येणार ना. एखाद्या दिवशी नक्कीच येईल."

"बरं मी केव्हा येवू? "

"तू पुढल्या रवीवारी ये. पण जरा फोन करुन आदल्या दिवशीच फोन लावशील."

"ठीक आहे, मग मी शनिवारीच फोन लावणार."

मोनानं फोन बंद केला. तसा कोमलचा जीव पडला. आज सकाळीच ती उठली होती. आज तिला वाटत होतं की मोनाची भेट होईल. पण मोनानं फिरायला जाण्याचा बेत सांगितल्याप्रमाणे ती फिरायला गेली होती. त्यामुळं तिला मोनाला भेटायला जाण्याचा बेत रद्द करावा लागला.

मोनानं आश्वासन दिल्याप्रमाणे कोमलनं तिला शनिवारीच फोन केला. तसं तिनं भेटायचं आश्वासन दिलं. तशी दुसऱ्या दिवशी कोमल लवकरच मोनाला भेटायला निघून गेली.

गाडी शहरात पोहोचली होती. तसा एका पानठेल्यावर चालकानं पत्ता विचारला. तशी ती मोनाच्या घरी पोहोचली.

मोनाचं घर म्हणजे दोनमजली इमारत होती महाराजा दरवाजा अगदी शोभून दिसत होता. अंगणात झाडं लावली होती. त्या झाडांना तारेचं कुपण होतं. तशी त्या बंगल्यासमोर गाडी थांबली. चालक गाडीतून उतरला. तो महाराजा दरवाज्याजवळ गेला. त्यानं दरवाजा उघडला. तिथं शहाबादी फरशी होती. त्यावर मोना आणि तिच्या पतीचं नाव लिहिलेलं होतं. समोर पेशाही. तसा चालक गाडीजवळ आला व कोमलला म्हणाला,

"ताई, हेच घर आहे तुमच्या मैत्रीणीचं."

"कोमल गाडीतून उतरली. चालकानं गाडी पार्किंगमध्ये लावली. तसे ते आत गेले.

मोना आतमध्ये सोफ्यावर बसली होती. कोमललाा तिनं पाहिलं. तशी ती म्हणाली,

"कोमल का? "

"होय. कोमलच."

"येणं कोमल, आत ये."

"होय."

तिनं दरवाज्याबाहेर पादत्राणे काढली व पाय धुवून ती आत गेली.

कोमल....... नेहमीप्रमाणे घालत असलेली लाल साडी आजही घातली होती. तसाच काळा चष्मा आजही लावून होती.

" ती आत गेली. तिनं सभोवताली नजर टाकली तर तिची नजर त्या पुरस्कारावर गेली. ज्या पुरस्कारावर तिचं नाव लिहिलेलं होतं. तशी ती म्हणाली,

"मोना यु आर ग्रेट."

"अगं ते जाऊ दे. मग पाहशील. आधी सांग काय घेशील? "

''म्हणजे? "

"लिंबूसरबत की चहापान की नाश्ता की जेवन."

"काही नको."

"नाही नाही. लांबून आली जरा. नाश्ता बनवते. चल आतमध्ये. गोष्टी ही करु आणि नाश्ताही बनवू."

कोमल मोनासह आतमध्ये गेली. त्यांचा संवाद सुरु झाला. त्या संवादात मोना आणि कोमल असे हरवून गेले होते.

"काय गं भाऊजी काय करतात?

"भाऊजी डॉक्टर आहेत."

"मग तर वेळच मिळत नसेल."

"हो गं, सवडच नाही. सकाळी उठल्यापासून तर रात्री झोपेपर्यंत रुग्नांचीच सेवा."

"बापरे, काय लाईफ आहे तुझं. किती धावपळीचं जीवन तुझं."

"अं शहराची वस्ती पडते ना."

"हं तुझंही बरोबरच."

"बरं ते जावू दे कामाच्या गोष्टी करु."

"केस सांगू."

"ते मला माहितच आहे."

"मग तूच सांग. का करावं लागेल? "

"तुला खटला टाकायचा ना. मग काही कागदपत्र आहेत का? "

"म्हणजे? "

" त्यांना काही नोटीश दिले होते काय? "

"नाही."

"त्यांनी पाठवले काय? "

"माहित नाही."

"म्हणजे? "

"अगं मी गावला नव्हती नं."

"तुझ्या हातात मिळाली का? "

''नाही."

"हं, तेच विचारलं."

" मग चिंताच आहे तर......"

"मोना असल्यावर चिंता करायची गरज नाही. फक्त ते राहतात त्याचा पत्ता हवा."

"तो आहे."

"हे बघ आता आपण एक नोटीश पाठवू, मग दोन मग तीन. नाही उत्तर आल्यास केस कोर्टात घेवू."

"ठीक आहे. तर मग ठरलं."

"ठीक."

मोनानं तिची एका कागदावर सही घेतली तशा त्यांच्या गप्पा सुरु झाल्या. त्या गप्पा ज्यात कधी त्या खो खो हसत होत्या. तर कधी भावूकही होत होत्या. कॉलेजातील सोनेरी प्रसंग रेखाटता रेखाटता. बऱ्याच दिवसांनी भेटलेल्या मैत्रीणी आज अगदी मनसोक्तपणाने गोष्टी करु लागल्या होत्या. तशी सायंकाळ झाली.

कोमल म्हणाली,

"मोना अगं मी निघते. ये कधी आमच्या होटलमध्ये. मुक्कामी ये बरं का? "

"हो तूही येशिल."

"हो ना. मी तर नक्की येईल. माझी तर खटल्याच्या निमित्ताने नेहमीच भेट होत राहिल."

"बरं येते हं मोना. बाय."

मोनाही बाय करु लागली होती. तसा तिच्याही मनात विचार होता की ही कोमल, काल किती हुशार होती माझ्याहीपेक्षा. वाटत होतं की ही पुष्कळ पुढे जाईल माझ्याहीपेक्षा. कारण मी तेवढी हुशार नव्हती. पण प्रारब्ध. आज तिनं किती भोगलं. किती किती भोगलं. निव्वळ प्रारब्धानं.

मोना थोडी हसली. तसं तिनं डोळ्यानंच होकार देत कोमलला रवाना केलं होतं.

नोटीस बरोबर निशाण्यावर लागला होता. त्यांनी घर बदलविलं नव्हतं. गणपत घरी राहात होता. आई मरण पावली होती. बाबा अंथरुणावर होते. घरची जबाबदारी अंगावर आली होती. दारुमध्ये पुर्वीचा लिबास नष्ट झाला होता. होती नव्हती ती इस्टेट दारुच्या व्यसनात निघून

गेली होती. कधीकधी पोट दुखायचं. पण ते स्वतःच्याच पापाचे भोग म्हणून पोटाचं दुखणंही तो सहन करीत होता. पोटाचं दुखणं कोणी विचारत नव्हतं

लेकरं मोठमोठी झाली होती. ती त्याला ऐकत नव्हती. अमाप असलेलं शेत नष्ट होवून पोटाला लागेल एवढीच जमीन उरली होती. बायकोही राब राब राबत होती. तिला आयतं खायची सवय लावली होती.

गणपत स्वतःचे काम पुर्वी कधीच स्वतः करत नव्हता. पण आज त्याला पत्नीससमोर नतमस्तक व्हावं लागलं. ती मात्र बसून खात होती. कधीकधी बापाचा अंथरुणावर आवाज यायचा. तेव्हा तळपायाची आग मस्तकात जायची. काय करावे सुचेनासे व्हायचे. कोणी त्याला विचारत नव्हते. फक्त सगळे खाण्यावर टपले होते. सगळेच बसून खात होते.

आज नोटीश आला होता. गावाकडचा एक पोलिसवाला तो नोटीस घेवून आला होता. विचारल्यावर माहित नाही एवढंच उत्तर होतं.

गणपतनं नोटीस घेतला. पाकीट फाडलं व त्यातून एक पत्र बाहेर काढलं. त्यात तीनचार पानाचा एक मजकूर लिहिला होता. मजकूर इंग्रजीतच होता. त्याला तो मजकूर इंग्रजीत लिहिल्यानं काय लिहिलं आहे ते समजत नव्हतं.

गणपतनं नोटीस पाहिला. तशी त्याची पंढरी घाबरली. तसा त्यानं तो नोटीस गावातील शिकलेल्या माणसाकडे नेला. नोटीसबद्दल त्यांनाही काही समजत नसल्यानं तो नोटीस वकीलाला दाखववावा असं गणपतनं ठरवलं. वकीलानं स्पष्टपणे त्यात काय लिहिलेलं आहे ते सांगितलं होतं. त्यावर प्रतिउत्तर देणं भाग आहे असंही सांगितलं होतं.

कौटुंबिक हिंसाचार कलमेअंतर्गत तो नोटीस गणपत व त्याच्या आईबद्दल होता. तसं घाबरतच गणपतनं त्याचं उत्तर वकीलाला पाठवायला लावलं. कसेबसे पैसे घेत त्या कोमलच्या नोटीसवर गणपतच्या वकीलानं उत्तर पाठवलं.

नोटीसचे उत्तर आले होते. तशी सुचना मोनानं कोमलला दिली. कोमल ही नेमकं काय उत्तर आलं हे पाहायला मोनाकडं गेली. उत्तरात लिहिलेलं होतं की कोमलला कोणीही घरातून बाहेर काढलेली नसून ती स्वतःच एका पुरुषासोबत पळून गेलेली होती. ती दागदागीणे व रोकड घेवून गेलेली होती. मात्र आता त्यानं केलेला आरोप खोटा कसा हेच सिद्ध करणं बाकी होतं.

मोनानं कोमलला म्हटलं,

"कोमल, त्यांना काय म्हणायचं होतं ते उत्तर आलेलं असून आता आपल्याला ती तक्रार न्यायालयात दाखल करुन लढावी लागेल. न्यायालय काय न्याय द्यायचा ते देईल पण आधी नियमाप्रमाणे आपल्याला न्यायालयाचं दार ठोठावावं लागेल. नाहीतर आपोआपच त्यानं केलेला आरोप सिद्ध होईल व पुढील काळात तो नुकसान भरपाई मागेल.

कोमल पुरती घाबरली व मोनाच्या विचारावर सहमती दर्शवली. तसं तिनं मोनाला सांगून खटल्याचे दस्तावेज तयार करवून घेतले.

मोनानं वकालतनाम्यावर कोमलची सही घेतली होती. तशी मोनानं कोमलची न्यायालयात तक्रार दाखल करायला लावली. त्यानुसार गणपतलाही बोलावणे आले. आता गणपतलाही पेशीवर राहणे होते.

पेशीवर पेशी होत होत्या. वकील फीच्या नावाखाली दोघांनाही लुटू लागले होते. या ना त्या कारणाने का होईना नुसता वैताग येवू लागला होता. काय करावे सुचेनासे झाले होते. कोमलला मात्र खटल्याबाबत काहीही वाटत नव्हते. कारण तिच्याजवळ पैसा होता. पण गणपतचं काय? त्याची फारच त्रेधातिरपीट उडत होती. केलेल्या कर्माचं जणू त्याला फळ मिळत होतं.

बरीच वर्ष शांततेत गेली होती. कोणत्याही प्रकारचा त्रास आतापर्यंत झाला नव्हता. आई जीवंत असेपर्यंत तरी कोमलचा त्रास तिला जाणवला नाही. तो रंगरलिया मनवीत राहिला. पण आई जाताच कोमलच्या रुपानं जे संकट आलं, ते निस्तारता निस्तारता त्याला नााकीनव येत होतं.

पश्चातापाची लाट कोमलच्या मनात नव्हती. पण गणपत पश्चातापाच्या आगीत जळत होता. अगदी भाजून निघत होता. त्याच्या वेदना त्याला व्यक्तही करता येत नव्हत्या. दुर्दैवी भोग तिला भोगावेच लागत होते. पण आता त्यांना भोगावेच लागत होते. पश्चाताप करुन काही उपयोग नव्हता. कारण जेव्हा तो अत्याचार करीत होता, तेव्हा त्यांचं माणुसपण हरवलं होतं. त्यांच्या मनात शैतान शिरला होता. त्याला त्यांचं भविष्य कळलं नव्हतं. श्रीमंतीचा माज चढला होता. त्या माजाच्या भयात त्यानं ते सगळे प्रकार केले होते.

म्हातारपणाची झळ जशी कोमलला लागली, तसा शिरकाव गणपतच्याही आयुष्यात म्हातारपणानं केला होता. गणपत मात्र आज दुःखी होता. काय करावे सुचत नव्हते. दररोजच्या न्यायालयाच्या खेटा मारणं अगदी वैताग आणण्यासारखं होतं.

खटला बोर्डावर आला होता. वकील व प्रतिपक्ष वकील यांच्यात शाब्दिक खडाजंगी होत. प्रतिउत्तरात प्रतिपक्ष वकील काय उत्तर देणार असा प्रश्न दोन्ही वकिलांना पडत असे. पण वकील त्यावर उत्तर काढून आणतच असे. पण अजून पर्यंत न्याय मिळाला नव्हता. एकदा गणपतनं दिलेल्या दलिलवर मोना म्हणाली,

"मा. वकीलसाहेब, आपला पक्षकार म्हणतो की माझी पक्षकार परपुरुषासोबत पळून गेली. याचा काही पुरावा आहे काय? "

यावर प्रतिपक्ष वकील गप्प होता. तशी मोना परत म्हणाली,

"माय ऑनर, हे निव्वळ आरोप करु शकतात. त्रास देवू शकतात. माझी पक्षकार कोणाहीसोबत पळून गेलेली नसून यांनी घरातून हाकलून दिलेली आहे. हा निव्वळ माझ्या पक्षकाराला बदनाम करण्याचा डाव माझ्या प्रतिपक्ष वकीलाच्या पक्षकाराचा आहे.

माय ऑनर, आपण या गोष्टीकडे लक्ष केंद्रित करा की प्रतिपक्षाचे म्हणणे आहे की माझी पक्षकारा घरातील दागदागीणे व मौलवान वस्तू व रोकड घेवून पळाल्या. पण यांच्याजवळ जी रोकड होती, ती रोकड कुठून आणली? ते दागीणे कुठून आणले? ती रोकड कोणत्या बँकेतून आणली. ह्याचाही पुरावा द्यावा. किंवा कोणत्या सोनाराकडून प्रमाणपत्र आणले त्यांच्या पावत्या न्यायालयात दाखवाव्या. समजा त्या दाखवल्या नाही तर एवढा पैसा कोठून आणला हे त्यांनी सिद्ध करावे."

यावर प्रतिपक्ष वकील काहीच स्पष्ट उत्तर देवू शकले नाहीत. तेव्हा न्यायाधीश म्हणाले,

"मिस मोनाजी, अजून तुम्हाला काही सांगायचे आहे का? "

"होय माय ऑनर, माझ्या पक्षकार यांचा मुळ धंदा सावकारीचा होता. त्यांच्याकडे भरपूर शेती होती. तिही लुबाडलेली होती. दागदागीणे डावपेच खेळत लुबाडलेले. शिवाय हे गावातील कित्येक तरुणींना बिघडवणारे. यांनी तर कित्येक तरुणींचे जीवन बरबाद केले. हा यांचा इतिहास आहे."

"मिस मोना, न्यायालयात पुरावा मागतात. लक्षात आहे ना. आपण केवळ आरोप करीत आहात. माहित आहे का तुम्हाला. पुरावा नाही दिल्यास दंडही होवू शकते."

"माय ऑनर, माझ्याजवळ पुरावा आहे."

मोनानं विकलेल्या जमिनीचे दस्तावेज दाखवले व काही तरुणींचे प्रेमपत्र दाखवले. त्या तरुणींनी सांगितले होते की गणपत आम्हाला त्रास देईल. आमची बदनामी होईल. म्हणून

आम्ही न्यायालयात येत नाही. पण चिठ्ठ्या तेवढ्या देतो. आमचे लग्न झालेले असून आमचा संसार रस्त्यावर येईल. म्हणून या चिठ्ठ्या गुप्त ठेवाव्या.

न्यायालय त्या चिठ्ठ्यांना मानत नव्हतं. पण विकलेल्या शेत्या, लुबाडलेल्या शेत्यांचे दस्तावेज न्यायालयानं पाहिलं होतं. न्यायालयानं त्या संबंधीत दस्ताऐवजांची चौकशी केली. त्यासाठी अभियोजन पक्षाला पुढची तारीख मुकद्दर केली.

न्यायालयानं दोन्ही पक्षांना पुढची तारीख दिली होती. त्यानुसार ते दिशा ठरवणार होते. कोमलला विचार येत होता की मोनानं एवढं सारं आणलं कुठून? ती मोनानं दाखवलेल्या पुराव्यावर आश्चर्यचकित होत होती. तिनं न्यायाधीशांना मुलींच्या दाखविलेल्या चिठ्ठ्या आणि शेती संबंधीचे कागदपत्र एवढ्या लवकर मिळवलीच कशी याचं तिला आश्चर्य वाटलं होतं. पण काहीही न बोलता ती मोनाला भेटून घरी गेली.

मोना स्वतःची केस समजूनच ती केस लढत होती. त्याचं शुल्क मिळो अगर न मिळो, तिनं पर्वा केली नाही. कोमलला न्याय मिळायलाच हवा असं तिला वाटत होतं. ती जरी मैत्रीण असली तर मात्रीणीचा खटला म्हणून त्याकडं न बघता तिला जो त्रास दिलाहोता त्याने, तो त्रास बघून ती खटला लढत होती. तसं आजच्या स्त्रियांचं जीवन कष्टपद असतं ही जाणीव ठेवून ती खटला लढत होती.

कोमल एके दिवशी घराच्या अंगणात बसली होती. तशी तिला निर्दोषची आठवण आली. तिनं त्याला फोन लावला. कारण बरेच दिवस झाले होते. निर्दोषची भेट झाली नव्हती.

"बोल कोमल, बरीच विसरलेली दिसते. आजकाल फोन करीत नाहीस. आठवण विसरली होती काय? "

"नाही रे तसं नाही. मी कामातच होते."

"आज कशी काय आठवण आली? "

"सहजच आली.

"आता कोणती सेवा करु? "

"भेटायला ये म्हटलं. करमत नाही आहे."

"आता! "

"का बरं! "

"ठीक आहे येतो. तुझ्यासाठी तर जीव हाजीर."

"तशीही मी एकाकी आहे. ये लवकर.""

तो तिचा फोन जाताच तिला भेटायला निघाला. नेहमीप्रमाणे तिनं त्याचं स्वागत केले. चहापान, नाश्ता सर्वकाही. मग गोष्टी सुरु झाल्या.

निर्दोषची आठवण ती म्हणाली,

"निर्दोष, तुला आठवतात ते दिवस. त्या बागेत त्या मासोळ्यांसोबत फिरतांना जो आनंद मिळाला होता, तो आनंद."

"हो, सारंच आठवतं अन् तो क्षणात पाऊस आला होता आणि तुला मला भिजवून गेला होता."

"हो ना, तेही आठवतं. अन् त्या तरुणाईचे धिंडवडे."

"हो अन् त्यांचे अश्लिल वागणे. काय भलत्या अवस्थेत बसले होते ते."

"अगं ते जावू दे ना स्वप्न समज. ती बागच त्यांच्यासाठी होती. तू दुसरा विषय काढ."

"तू म्हणते तर दुसरा. बरं तो गंगाराम कसा आहे? त्याच्या आत्ता तोडणं सुरु आहे का? "

"नाही गं. अख्खं गाव सुधारलं. त्यात भुतातटीला कोणताच थारा नाही. अगं काही वर्षाचा काळ झाला असेल. कोणीतरी त्याचेवर गुन्हा दाखल केला की तो लुटतो म्हणून."

"मग."

"मग काय? तो आता तुरुंगाची खडी फोडतोय."

"अन् तो निर्णय."

"अगं त्याला बऱ्याच वर्षापुर्वी अटॅक आला."

"म्हणजे? "

"अगं तो मरण आला. आजारानं कोणाला सोडलंय."

"बरं झालं मेला तं तो. गावात फारच विष कालवत होता."

"हं, मीही तेच म्हणणार होतो. अगं तो होता, तेव्हापर्यंत हा विटाळ मोडताच आला नाही. संपूर्ण गाव त्याच्याच बाजूनं उभं राहायचं. पण तो मेल्यावर विटाळ आपोआपच संपुष्टात आला."

"त्याची पोरंबारं असतील ना. ती कारस्थानी करीत असतील न गावात? "

"अगं पोरं आहेत. पण त्या पोरांनाा काही समजत नव्हतं. बरं ते गावचं जावू दे. तुझी केस काय म्हणते? "

"आहे सुरु. बरी आहे. निकालाच्या टप्प्यात आहे."

"मी तसं मोनाला सांगितलं होतं."

"हो का? म्हणूनच ती म्हणत होती."

"कशी आहे ती. बरी आहे का? "

"हो, अगदी बेस्ट. माहित आहे तिनं केस जिंकण्यासाठी कुठून कुठून पुरावे आणले? "

"म्हणजे? "

"अरे त्यांच्याकडं जी शेती होती, त्या शेतीची कागदपत्र आणली अन् त्या मुलींच्या चिठ्ठ्या ही आणल्या. कुठून आणल्या तर माहित नाही. ज्या पोरी त्याच्यासोबत फिरत होत्या. मला तर आश्चर्य वाटलं बा."

"अगं ती वकीलमंडळी पुरावे कुठून आणतील ते सांगूच नको. फक्त आपण जसा डॉक्टर वर विश्वास करतो, तसा वकीलावरही ठेवावा. ती चांगली आहे. नाहीतर काहीकाही वकील पैशासाठी पेशाही गहाण टाकतात."

"हो ना रे, कोर्टरुममध्ये तिचं ऐकून प्रतिपक्ष वकीलाची दातखिळीच बसली."

"पण तू खटला जिंकू शकशिल का? "

"होय, मला तर तसंच वाटतेय. सगळं काही मोनावर आहे आता."

"अगं मोनावर नाही, तुझ्या नशिबावर."

"मी नशिबावर विश्वास ठेवीत नाही. अगं नशिबात असेल नसेल म्हणून आपण जर बसलो तर हेच नशिब आपले जीवन चांगले घडवणार आहे."

"मी तसं नाही म्हटलं. नशिबावर असते असं नाही. तर त्यासाठी प्रयत्नांचीही गरज आहे."

"हं तसं म्हण. तसं संयुक्तीक वाटते."

"मी तेच म्हणत होतो ना."

"बरं आईबाबा कसे आहेत? "

"अगदी छान, मजेत आहे. फक्त एक चिंता आहे त्यांच्या मनात."

"कोणती चिंता? "

"माझ्या लग्नाची. लग्न कर म्हणतात ते."

"मग लग्न का करीत नाही तू? "

"अगं कसा करु? आतं कोण देतील मला पोरी."

"का नाही भेटणार? "

"अगं या म्हातारपणी, माझ्या चेहऱ्यावर सुरकृत्या पडल्याय. अर्धा म्हातारा झालोय. अन् या वयात कोणती मुलगी पसंत करेल? "

"करेल करेल. शोध तू." तसा तो विचारात पडला. तशी तिच म्हणाली,

"काय झालं? "

"मी विचार करतोय की कोणत्या मुली मिळतील? "

"अरे, मिळतील. तू प्रयत्न कर."

तसा तो चूप बसला. थोड्या वेळानं म्हणाला,

"एक विचारु? "

"विचार. काय विचारत आहेस? "

"रागावणार तर नाही."

"नाही रागावणार."

"तुच माझ्याशी लग्न कर ना."

ती गप्प झाली. लाजली जणू. ती विचारात पडली. काय उत्तर द्यावे. कारण तिनं आता विचारही केला नव्हता. तसा तो म्हणाला,

"कोमल, कुठं हरवली? " तसा तो परत म्हणाला,

"मी म्हटलं, माझ्याशी लग्न करशिल का? "

"या म्हातारपणी. मी म्हातारी झालेय. सुरकृत्या पडल्याय चेहऱ्यावर."

"काय हरकत आहे. लोकं म्हातारपणी लग्न करीत नाहीत का? "आपण एवढेही म्हातारे झालो नाहीत."

"हो रे ते बरोबर. पण लोकं काय म्हणतील."

"कोण लोकं म्हणणार? कोण ओळखतात आज तुला. ज्यावेळी तू त्रास भोगत होती. वेदना झेलत होती. कोण आलं होतं धावत, मदतीला. कोणीच नाही ना. मग आता कशाला घाबरायचं. कोणी काही म्हणणार नाही आता."

"तुझं म्हणणं ठीक आहे. पण......"

"पण काय? '

"माझी कोर्टाची केस सुरु आहे ना."

"बस एवढंच."

"सोडचिठ्ठी झाली नाही न."

"एवढंच ना. ते वकीलाच्या हातात आहे. मी मोनाला सांगून केस संपवायला सांगतो. तू फक्त हो म्हण."

तिनं लग्नाचा होकार दिला. पण तिला एक भय होतं की खटल्याची परीयंती काय होते. कदाचित निर्दोषचं आधीचं प्रेम प्रकरण गणपतचा वकील शोधून काढत खटला हारवायचा दावा गणपतचा वकील करेल. अशी भीती तिला वाटत होती. जशी कागदपत्र मोनानं हुडकून काढली तशी.

जसा कोमलकडून लग्नाचा होकार मिळाला. तसा निर्दोषच्या आनंदाला पारावार राहिलेला नाही. त्यानं तिच्यावर विश्वास ठेवला. स्वप्नाला तडा जावू नये म्हणून. त्यानंच गणपतशी लग्न करण्याचा सल्ला दिला होता. कदाचित ती सुखी व्हावी. हाच त्याचा उद्देश होता. त्यासाठीच त्याने आपल्या प्रेमाची आहूती दिली होती. पण आज त्याचा आनंद गगणात मावेनासा झाला होता. तशी सायंकाळ झाली होती. आज जावंसं वाटत नव्हतं. तरीही तो म्हणाला,

"बरं, सायंकाळ झाली होती. मला घरी पोहोचायला हवं. घरी म्हातारे मायबाप आहेत. त्यांनाही जेवन द्यावं लागतं."

"स्वयंपाक तुच बनवते का? "

"म्हणजे? कोण बनवणार आता स्वयंपाक."

"एखादी बाई नाही ठेवली का? "

"तेवढा पगार नाही माझा."

"मग तुच करते का? "

"होय."

"तुला त्रास येत असेल."

"आता सवय झाली. पण आता तू होकार देवून माझा त्रास वाचवलाय. बस थोडे दिवस वाट पाहायची आहे.”

"मी नाही करणार स्वयंपाक. मीच तर माझ्या खानावळीत नोकर लावले.”

"माझ्यासाठीही नाही.”

"हं तुझ्यासाठी ठीक.”

"माहित आहे का. आपण कॉलेजात असतांना तुझ्या डब्यातलं मी खायचो. माझ्या डब्यातलं तू. अगं आता बरीच दिवस झालीत, तुझ्या हातचं खाल्लेलं नाही तर. आता खायची इच्छा आहे. पण इथं तुझे नोकरच बनवितात.”

"बरं.”

"बरं, आता मी निघतोय.”

"आता केव्हा येशिल? "

"फोन कर. सेवक आपल्या सेवेत हजर.” तो हसला.

"बरं, बाय.”

"बाय.”

तो बाय म्हणत निघाला होता. ता विशेष नजरेनं त्याच्याकडे पाहत होती. पण आज ती खुश होती कारण आज पुर्वीचं प्रेम तिच्या मनात उफाळून आलं होतं. जे पुर्वीचं प्रेम त्यानं त्यागलं होतं, तेच प्रेम आज तिला स्विकारायला तयार झालं होतं.

कोमलच्या मनात कुतूहलाचे वादळ उठले होते. महाविद्यालयातील दिवस पुन्हा आठवायला लागले होते. तो त्यानं केलेला हाताचा स्पर्श तिला शरीरसुखापेक्षाही मोठा वाटत

होता. ती म्हातारपणी का होईना, प्रेम मिळण्याची वाट पाहात होती. त्यानं लग्नाचे विचारताच तिचं प्रेम जागृत झालं होतं. त्याची आसक्ती तिला वाटत होती.

"दिवस बुडाला होता. तशी रात्र झाली होती. पण संधीप्रकाश बाहेर होताच. आता तर संधीप्रकाशही अदृश्य झाला होता. पण जो गारवा सुटला, तो गारवा तिला तिच्या अस्तीत्वाची जाणीव देत होता. जणू स्वप्न पाहिल्यागत वारा तिला मिठी मारत होता. तो वारा नसून जणू निर्दोषच आहे असं तिला वाटत होतं. तिच्या इच्छेला पंख फुटले होते. आज अगदी तिला छान वाटत होतं. आजपर्यंतचे दिवस तिचे त्रासात गेले असले तरी पुढे आपल्याला सुखद दिवस नक्कीच येतील याची आस मनात बाळगून ती आनंदी झाली होती. वेदना झेलता झेलता म्हातारपण केव्हा आलं ते तिला कळलंच नाही. पण आज त्या निर्दोषच्याा विचारण्याचं तिच्या अर्ध्या म्हाताऱ्या वयात तारुण्याची हलकीशी का होईना छटा उमटली होती.

निर्दोष आज बराच खुश होता. त्यानं अजुनही अर्धांगिनीचं सुख पाहिलं नव्हतं. त्यानं आपल्या प्रेमासाठी नाही तर तिला सुख मिळावं म्हणून आपल्या उभ्या आयुष्यातील सुखाचा त्याग केला होता. तो तिच्याशी विवाह करुन सुखीही होवू शकला असता. पण त्याला कोणाला दुःखी करणं आवडत नव्हतं. त्याच्या विवाह केल्याने तिचे मायबाप तर दुःखी झालेच असते. व्यतिरीक्त त्याचेही मायबाप दुःखी झाले असते. त्यामुळं सारं दुःख मनात ठेवून त्यानं सगळं सहन केलं. मनात दुःख असुनही त्यानं ते ओठावर येवू दिलं नाही. चेहऱ्यावर तर नाहीच नाही. मात्र तिच्याशी बोलता बोलता तो आज तिच्याचसारखा तरुण झाला होता.

आज न्यायालयात तारीख होती. अकराची पेशी होती. सगळी मंडळी हजर होती. न्यायाधीश महोदय अजून आले नव्हते. गणपत कटघऱ्यात उभा राहणार होता. त्याला चिंता होती निकालाची. बाजू पलटली होती. निकाल तिच्या बाजूनं लागेल हे निश्चित झाले होते.

थोडाच वेळ. न्यायाधीश महोदय आले. ते आपल्या आसनावर बसले. तशी कार्यवाही सुरु झाली.

"बोला, कुठपर्यंत आलो होतो आपण? "

तशी मोना म्हणाली,

''माय ऑनर, आपण आपल्या शेत्यांचे दस्तावेज तालुक्याकडे पाठवले होते पडताळणीसाठी."

"होय."

त्यांना आठवण आली. तसं त्यांनी तेथील अधिकारी वर्गाला विचारणा केली. प्राधीकाऱ्यानं ती फाईल दिली न्यायाधीश महोदयाकडे. न्यायाधीश महोदयांनी ती फाईल तपासली. त्यांना सत्य काय ते माहित झालं. त्यानुळं सहजच त्यांच्या लक्षात आलं. गणपत कसा आहे. पाप वडीलांनी केलं होतं. मात्र भोगमान पोराच्या मागं आलं होतं. न्यायाधीश महोदयांनी सत्य तपासून विचारलं. अजून काही कोणाला सांगायचं आहे का? "त्यावर प्रतिपक्ष वकील म्हणाले,

"महोदय, या दस्ताऐवजांचा व माझ्या काबील मैत्रिणीच्या खटल्याचा काहीच संबंध नाही. आज त्या शेत्या सरकारजमा झाल्या आहेत."

तेव्हा मोना म्हणाली,

"माय ऑनर, माझ्या प्रतिपक्ष काबील मित्रांने आधी चौकशी करावी आणि ठरवावं की नेमकं काय करावं. ह्या शेत्या सरकारजमा झाल्या आहेत की विकल्या आहेत ऐय्यासीसाठी."

"न्यायाधीश महोदय, माझे पक्षकार हे अय्याश नाहीत. तरीही ऐय्याशीसाठी म्हणत ह्या काबिल वकीलसाहेबा माझ्या पक्षकाराचा अपमान करीत आहेत."

"माय ऑनर, हे यांचं म्हणणं धांदात खोटं आहे. कारण माझ्या वकीलसाहेबांना माहित नाही की हे अय्यास आहेत की नाही."

"कसा केला अय्यासपणा तो सिद्ध करावा मा महोदय."

"बघा लग्न झाल्यावर कायदेशीर सोडचिठ्ठी घेतल्यावरच दुसरा विवाह करता येतो. पण यांनी अशी कोणतीही कार्यवाही न करता लग्न केलं. स्वतःची वासना पुर्ण करण्यासाठी त्यांनी केलेला हा प्रयोग नाही तर हा गुन्हा आहे माय लार्ड."

"कोण म्हणतंय की माझ्या पक्षकारानं लग्न केलं? "

"मी म्हणते साहेब."

"हे ही सिद्ध करावं.? "

"ठीक आहे आपण पुढची तारीख मुकद्दर करावी. ते सिद्ध करण्यासाठी तारीख घ्यावीच लागेल ना."

"ठीक आहे."

न्यायाधीश महोदयांनी पुढची तारीख दिली होती. मोनाला विचार पडला की जर हे सिद्ध केलं नाही तर आपण ही जिंकलेली केस हारु. आपल्याला नाव सांगायलाही तोंड उरणार नाही. कसेही करुन त्यांनी दुसरी पत्नी केली हे सिद्ध करावेच लागेल. तशी ती त्या तारखेदरम्यान त्याच गावात गेली. जिथं एक प्राथमिक शाळा होती.

मोना त्या शाळेतील मुख्याध्यापिकेला भेटली. तिला कोर्टाबद्दलची माहिती दिली. नव्हे तर तिनं त्या गणपतच्या मुलीच्या डुप्लीकेट बोनाफाईटा मिळवल्या. तसे काही दिवस गेले व तारखेचा दिवस उजाडला.

या तारखेत तिनं गणपतच्या मुलांची बोनाफाईड न्यायाधीश महोदयांना दाखवली. त्यात मायबापाचं नाव व आडनावही गणपतचं असल्यानं गणपतनं दुसरी पत्नी केली हे सिद्ध झालं. तशी ती न्यायाधीश महोदयांना म्हणाली,

"माय ऑनर, हे वकीलसाहेब व यांचे पक्षकार किती खरं बोलतात हे मी पुराव्यासह सिद्ध केलं. गणपत निव्वळ व्यसनी, ऐय्यासबाज माणूस. यांना दुसरी पत्नी करायची असल्यामुळे यांनी माझ्या पक्षकार उमेदवाराला सोडलं. त्यांनी जाणीवपूर्वक यातना दिल्या नव्हे तर घरातून हाकलूनही दिलं. एवढंच नाही तर त्या गावातील निरपराध लोकांच्या जमीनी जबरदस्तीनं हिसकावून हस्तगत केल्या. त्यांना भीक मागायला नव्हे तर यांनी आत्महत्या करायलाही भाग पाडलं. यांनी जबरदस्तीनं लोकांचे अंगठे घेवून जमीनी हडप केल्या. शिवाय त्या सरकारजमा झाल्याचं खोटंच सांगितलं. त्या जमीनी सरकारजमा झाल्या नाहीत, तर त्या विकल्या यांनी. त्या जमीनी विकतांना यांचं मन थोडंसही द्रवलं नाही. यात या माझ्या काबील मित्रांचे पक्षकार, यांनी माझ्या पक्षकाराचा छळ केलेला असून त्यामुळं झालेला अपमान हा खुनच आहे. म्हणून मा. महोदय, आपणच या प्रकरणावर योग्य प्रकाश टाकून माझ्या पक्षकाराला न्याय मिळवून द्यावा ही विनंती."

न्यायाधीश महोदयांनी असं कधी जोशपुर्ण बोलणं ऐकलं होतं. ते बोलणं ऐकून त्यांनी विचारलं.

"याबद्दल तुम्हाला काही बोलायचं आहे का वकीलसाहेब? "

"मी काय सांगणार. पण माझं म्हणणं असं आहे की माझे पक्षकार हे निर्दोष आहेत. ह्या जमीनी त्यांच्या वडिलांनी हिसकावल्या असतील. पण माझ्या पक्षकारानं असं कोणतंही पाप केलं नाही."

"मग त्या जमीनी यांनी त्या त्या शेतकऱ्यांना का परत केल्या नाहीत? "

"अहो कसे करतील? ती विक्री काय यांनी केली होती. अन् त्या जमीनीही माझ्या पक्षकाराच्या वडीलांना स्वतः शेतमालकांनी विकल्या होत्या. कर्ज घेतलं होतं त्यांनी."

"मग माय ऑनर, यांनी जर कर्ज दिले तर हे सावकार झाले. मग यांच्याकडं सावकारी परवाना असायला हवा. तो यांनी दाखववा न्यायाधीश महोदयांना."त्यावर न्यायाधीश महोदय म्हणाले,

"वकील मातरमाच्या म्हणण्यानुसार आपण तो परवाना न्यायालयात दाखववा. म्हणजे आमचा विश्वास बसेल की तुमच्या पक्षकाराच्या वडिलांनी केलेलं कार्य उचित आहे."

"ठीक आहे साहेब."

"न्यायाधीशांनी यावेळीही तारीख दिली. तारखेनुसारही आलेल्या तारखेनुसार ती लायसन नसल्यामुळे ते प्रतिपक्ष वकील पुरावा सादर करु शकले नाहीत. तरीही त्यांनी पुढील तारीख दिली. पण दोन तारखा पडूनही पुरावा सादर न झाल्यानं न्यायाधीश महोदयांनी म्हटलं, 'पुढील तारीख ही सुनावणीची तारीख असेल. जे काही सांगायचे असेल, ते याच तारखेला सांगा. ' तरीही प्रतिपक्ष वकील चूप होते.

अंतिम निकालचा दिवस उजळला. आज न्यायालयात गर्दी होती. तो निर्दोषही हजर होता. तसा पुकारा झाला. निकालाची वेळ आली. न्यायाधीश महोदय आले. त्यांनी आसन ग्रहण केलं. तसे ते म्हणाले,

"मी दोन्ही पक्षांचं बोलणं ऐकलं. पुरावे तयार तपासले. बोलणंही ऐकलं. पण आता आपल्याला काहीच बोलायचे नाही हे गृहीत धरून हे गृहीत धरून पुराव्याअंती मला समजले की दोन्ही पक्षकाराचं म्हणणं बरोबर आहे. पण प्रतिपक्ष प्रतिवादी हे पुरावे सादर करु शकलेले नाहीत. तर वादींनी पुरावे दिले आहेत. यावरुन असे स्पष्ट होते की प्रतिवादीने वादीवर जाणूनबूजून अत्याचार केलेला असून प्रतिवादीचा यात गुन्हा आहे. ते गुन्हेगार आहेत हे सिद्ध होते.

यावरुन हे ही सिद्ध होते की वादी ह्या प्रतिवादीच्या घरी गेल्यावेळपासून प्रतिवादींनी वादीवर अत्याचार केलेला आहे. दया दाखवली नाही. त्यांनी वडीलांच्या संपत्तीचा गैरवापर करीत अतिरेक केला. हे दोन्ही पक्षकाराच्या पुराव्यावरुन सिद्ध होते. पक्षकार व वकीलाच्या बोलण्यावरुन हे समजते की प्रतिवादी हे गुन्हेगार असून त्यांना शिक्षा व्हायलाच हवी. जर न्यायालयानं त्यांना सोडून दिलं तर उद्या तमाम पुरुषमंडळी स्त्रीयांवर असाच अत्याचार करतील हवा तेव्हा हवा तेवढा उपभोग घेतील पत्नी म्हणून आणि मग हवे तेव्हा सोडून देतील.

कायद्याचा धाक असायलाच हवा. कायदा हा कठोर पावले टाकायला शिकवतो. जर कायद्याचा धाक ठेवला नाही तर उद्या देश चालवणे कठीण होईल. जर असा देश चालवायचा असेल तर न्यायाधीश म्हणून मला कठोर व्हावेच लागेल. कठोर पावले उचलावीच लागतील.. तेव्हा मी या खटल्यातील निकाल या आधारावर सुनावीत आहे.

न्यायालयानं दोन्ही पक्षाचं बोलणं ऐकलेलं असून न्यायालय या निर्णयापर्यंत पोहोचलं आहे की प्रतिवादीनं वादीला भयंकर त्रास दिलेला असून त्यांनी अय्यासबाजीही केलेली आहे, तेव्हा त्यांना शिक्षा म्हणून हा बलत्कारच असल्यानं सात वर्ष सक्तमजूरी व पन्नासहजार रुपये दंड ठोठावत आहे. जर पन्नासहजार रुपये प्रतिवादी भरु शकत नसल्यास त्या शिक्षेत तीन वर्ष वाढ करण्यात यावा हाच माझा न्यायाधीश म्हणून अंतिम निर्णय आहे.

न्यायाधीश महोदयांनी निकाल दिला होता. तो निकाल ऐकून न्यायाधीशाचा राग आला होता गणपतला. पण आता उपाय नव्हता. तो रडत होता. पण रडून काही उपयोग नव्हता. शिक्षा ही भोगायचीच होती. त्याला त्या कोमलचाही राग येत होता. सर्वात जास्त राग वकील मोनाचा येत होता. जिनं कोमलला केस जिंकून दिली होती.

कोमल खुश होती. कारण तिनं गणपतला धडा शिकवलाच होता. तसंच यातून तिच्यासारख्या कित्येक अबलांना न्याय मिळणारच होता. तसा तिनंही बराच अत्याचार त्या गणपतचा सहन केला होता. अगदी नाकी नव आलं होतं. तिचं त्याच्या घरी राहाणं वेळानं का होईना, तिला न्याय मिळाला होता. आज तिला हायसं वाटत होतं.

गणपत तुरुंगात आज खडी फोडत होता. त्याला कोमलवरील अत्याचाराची आठवण येत होती. खडी फोडता फोडता पश्चातापाचा अग्नी त्याच्या काळजात धुमसत होता. त्याला पश्चात्ताप येत होता की आपण जर असं केलं नसत तर आज मात्र दुःखी झालो नसतो. कधीतरी आपण तिची माफी मागावी आणि आपल्या पापाचं प्रायश्चित करावं असं त्याला वाटत होतं. हवं तर आता कैद पुर्ण झाल्यावर आपण तिला भेटायला जावं असं त्याला मनोमन वाटत होतं. तो जेव्हा जेव्हा सवड मिळेल तेव्हा तेव्हा तसा विचार करायचा.

गणपतची कैद आज पुर्ण होणार होती. त्याच्या मनात आशेचे किरण निर्माण झाले होते. तसा आता तो जास्तच म्हातारा झाला होता. तसा तर त्याच्या मनात पश्चातापच होता.

आज तो सुटणार होता. तसा तुरुंगधिकारी म्हणाला,

"गणपतराव इथून सुटल्यावर तुम्ही प्रथम कुठं जाल."

त्यावर गणपतनं उत्तर दिले.

"मी तसं त्या कोमलला भेटायला जाणार."

"कशासाठी? ती घाबरणार नाही का? ती परत तक्रार टाकेल. असे काही आता करु नको. बदल्याची भावना ठेवू नको."

"साहेब, मी बदल्यासाठी जाणार नाही तर मी माझ्या पापाचे प्रायश्चित करायला जाणार आहे. मी माफी मागणार आहे. मी केलेल्या वर्तनाची. मी घोर पाप केले आहे. मी तिच्या शिक्षेचा आदर करतो. हवं तर ही शिक्षा काहीच नाही. मी जीवंत राहण्याच्या लायकीचा नाही. पण तरीही मी जीवंत आहे. कदाचित ह्या पापाची माफी मागण्यासाठीच देवानं मला जीवंत ठेवलेले आहे. असं मला वाटते."

"पण ती तुला माफ करेल."

"न करो. पण जरुर जाणार."

"ती ओळखणार तुला? "

"न ओळखो. तसंही तिनं मला पाहताक्षणी ओळखू नयेच. मी प्रथम तिला सांगणार की मी माफी मागायला आलो. तू जर माफ करीत असशील तर मी माझा परीचय देतो. तिनं हो म्हटल्यावर मी माझा परीचय सांगेन."

तुरुंगधिकाऱ्याला त्याचं बोलणं पटलं होतं. तसा तो म्हणाला,

"ठीक तुमच्यासारख्या विचाराचे आज देशात नाही. वेळानं का होईना पण तुम्हाला शहाणपण आलं. ही माफी जर तुम्ही पुर्वीच मागितली असती तर आज ही वेळ आली नसती. कदाचित हा तुरुंगवासही तुम्हाला भोगावा लागला नसता."

"पण हा जो मी तुरुंगवास भोगला. त्यामुळं माझं मन शांत झालं. शिवाय तिचंही मन शांत झालं असेल. त्यासाठी मला तुरुंगवास भोगणं भाग होतं. तो माझा हक्क होता. त्याशिवाय मी सुधारलोही नसतो. माझ्या विचारात बदलही झाला नसता."

"हं तुमचं म्हणणं बरोबर आहे वेळानं का असेना, बदलाव झाला आहे. तुम्ही वाल्मीक व अंगुलीमालाचं अनुकरण केलेलं आहे."

"हो अगदी तसंच समजा."

सुटण्याची वेळ झाली होती. गणपतनं सही मारली. तसा तो तुरुंगाचा दरवाजा उघडला. गणपत त्या कालकोठडीतून बाहेर पडला. ती पन्नास हजार रुपये दंडाची रक्कम न भरल्यानं दहा वर्षाची शिक्षा झाली होती. ती संपुर्ण शिक्षा भोगून तो बाहेर पडला होता.

तो तुरुंगातून बाहेर आला. तसा त्याला आनंद वाटला. पण त्याचबरोबर त्याला दुःखही. कारण बाहेरचं हे जग तब्बल दहा वर्षानंतर खायला धावत होतं. तसा त्याच्या मनात विचार आला तिला भेटण्याचा. तो तिचा पत्ता आठवू लागला. क्षणात त्याला सगळं आठवलं व तो तिच्या होटलचा पत्ता शोधत शोधत तिच्या होटलवर पोहोचला.

ते एक हॉटेल होतं मोठं. सुसज्ज........ ते पाहताक्षणीच गणपत अवाक झाला. आपण जरी हिला त्रास देवून सोडलं असेल, तरी हिमतीनं तिनं हे सगळं उभं केलं असेल असं त्याला वाटलं. तसा पत्ता दाखवत त्या होटलच्या चौकीदाराला तो म्हणाला,

"कोमल इथंच राहतात का? "

"आपण? "

"त्यांना सांगा कोणीतरी आलंय. आपल्याला भेटू इच्छितात."

नोकरानं त्याच्या चेहऱ्याकडे पाहून शंका व्यक्त करीत तो म्हणाला,

"ठीक आहे , सांगतो."

तसा तो आत जावून त्यानं त्या माणसाबद्दल सांगितलं. तसं तिच्या बोलण्यावरुन चौकीदारानं त्याला आतमध्ये पाठवलं.

तो अक्राळविक्राळ चेहरा. डोक्यावर पिकलेले केसं. पिकलेली दाढी. अंगावर मळकट कपडे, जसा भिखारी वाटावा असा. तशी त्याला पाहताच कोमल म्हणाली,

"आपण कोण आणि मला भेटायचं कारण? "

"कोमल आपणच का? "

"होय. आपण? "

"मी माफी मागायला आलो."

"पण आपण कोण? "

"आधी माफ करा. मग सांगतो."

"अहो कोण आपण? "

"रागावणार नसाल तर ओळख सांगतो."

"सांगा. नाही रागवत."

"मी...... मी....."

तो सांगणार होता.. पण सांगायला लाज आणि भीतीही वाटत होती.

"अहो सांगणार की मी मीच कराल."

"मी गणपत. तुमचा छळ करणारा. वाटल्यास मी इथं यायला नको पाहिजे. पण काय करु? मला माफी मागायची होती. त्याशिवाय मरण आलं नसतं सुखानं. मी तुम्हाला फार त्रास दिलाय त्याची शिक्षा भोगलीही आहे मी. मला माफ करा.

मला पैशाचा फार अहंकार चढला होता मला. आपण मोठ्या मनाच्या आहात. मला वाटतंय की या शेवटल्या काळात मला सुखान मृत्यू यावा. हवं तर राग सोडा आणि तो सुटत

नसेल तर पुन्हा तो राग सोडण्यासाठी मला तुम्ही जी शिक्षा द्याल ती अजूनही भोगायला तयार आहे मी. पण मला माफ करा."

त्याच्या बोलण्यात आवेश होता. दयेचा भाव होता. पण कोमलला ते ऐकून आश्चर्य वाटत होतं. तो तिथं आलाच कसा? असंही वाटत होतं. त्याचम ऐकून घेत ती म्हणाली,

"आता शांत व्हा. तुम्हीही बरंच भोगलं आहे. मी तुम्हाला माफ केलं. तुम्ही ही करा आणि जा आता सुखानं राहा. पण माझ्या संसाराला आग लावू नका."

तिचं ते बोलणं त्याच्या मनाला जिव्हाळा देत होतं तसा तो म्हणाला,

"तुम्ही मला माफ केलं."

"हो. शेवटी पती पत्नी होतो आपण. पण आज नाही हे लक्षात घ्या." ती म्हणाली.

"म्हणजे तुमचं लग्न झालं तर......."

"हो. माझं लग्न झालंय. मला एक मुलगी आहे. माझा पतीही चांगली आहे. तुमच्यासारखा नाही."

"केव्हा केलं लग्न? कॉलेजात जात असेल मुलगी."

"नाही. पण तुम्ही हे का विचारताय? "

"सहज विचारु नको का? राग मानू नको "

"नाही मानत राग. विचारा."

"केव्हा केलं लग्न? "

"दहा वर्ष झाले."

"तेव्हापर्यंत तुम्ही पतीविणाच राहिल्या तर."

"होय. कारण मला लग्न करायचीच इच्छा नव्हती. पण ते आलेय माझ्या आयुष्यात."

"कसे काय? "

"मी तुम्हाला सांगू शकत नाही."

"बरं बरं! ठीक आहे. मी आतं निघतो. मी अजूनपर्यंत गेलो नाही घरी. थेट तुरुंगातून इथंच आलो. माफी मागण्यासाठी. आता फार बरं वाटतं. जीवात त

जीव आल्यासारखा वाटतो. काय माझी ओळख करुन नाही देणार का तुझ्या पतीशी? "

"करुन देवू शकते. पण ते का म्हणतील."

"अर्थात तुम्ही मला माफ केलेलं दिसत नाही. मी अवाजवा बोलणार नाही तुमच्या पतीशी. मी तुम्हाला माफ केलं. जरी मी एवढा भोगलो तरीही. तुम्हीही मला माफ करावं म्हणून आलो एवढ्या दूर पायी पायी चालत."

"ठीक आहे. तुम्ही एखाद्या वेळी याल. मी ठेवील यांना घरी."

"ठीक आहे. मी निघतो."

"ठीक आहे. तुम्ही निघा आता." ती म्हणाली. तसा तो निघाला. ती मात्र गतकाळातील आठवणी काढत काढत त्याच्याकडे पाहत होती. कारण तो काही का असेना, पण तिचा पती होता. त्याच्यासोबत तिनं लग्नाचे सात फेरे घेतले होते. सात शपथाही घेतल्या होत्या. मात्र तो त्या सात शपथांना जागला नाही एवढंच.

सायंकाळ झाली होती. तसा निर्दोष घरी आला. ती विचार करीत होती. तशी निर्दोष घरी येताच ती स्वागत करायची. पण आज ती चूप होती. तशी ती शांत असून कुठल्या तरी विचारात आहे हे निर्दोषनं जाणलं. तसा तो म्हणाला,

"आज काय झालं शांत राहायला."

त्या निर्दोषच्या बोलण्यातून त्याचं प्रेम दिसत होतं. पण तिकडे लक्ष नव्हतं. तसा परत तो म्हणाला.

"काय झालं? एवढी उदास का?

"तो आला होता."

"कोण? "

"तो माझा पहिला पती."

"काय म्हणत होता? "

"तुम्हाला भेटायची इच्छा होती."

"कशासाठी? बदला घ्यायला आला असेल."

"नाही."

"मग कशाला आला तो."

"माफी मागायला."

"मग करुन टाकायचं माफ. होतात चुका कधी. पण त्याचा शेवटी पश्चाताप होतोच."

"मी माफ केलं नाही. अन् कशी करणार. कमी अत्याचार केले का माझ्यावर. अन् तुमचीही मागायची माफी त्याला."

"अगं मोठ्या दिलानं माफ करुन टाकावं. माफी सर्वात मोठा दागीणा आहे. जगण्याचा. अहंकारानं होतात चुका कधीकधी.. पण त्याचा कधी न कधी पश्चात्ताप होतोच. तसला पश्चात्ताप झाला असेल त्याला."

"पण माफ केल्यावर ते उमेदीचे दिवसं येतील का? "

"न येवू दे. परमेशानं तुला जन्म दिला असेल भोग भोगण्यासाठी. जे भोग नशिबात असतात तं ते चुकत नाहीत. कोणी भाग्यवान असतो. तोच या संसारचक्रातून सुटतो. बाकी सगळे सापडतात. जिवजंतू सगळेच. एखाद्या दिवशी बोलावून टाक. त्याचीही नाराजी दूर करु. अगं आपल्याला जन्म मिळाला ना मानवाचा. वाणी दिली. या वाणीनं कोणाचं मन दुखावू नये. होतात चुका. पण त्यात बदल्याची भावना ठेवू नये. सगळ्या जगात दुःख आहे. पण प्रत्येकाला जगण्याचा अधिकार आहे. या अधिकाराचा उपभोग प्रत्येकालाच घेता येत नाही. म्हणून चुका होतात. कोणी नसतो भाग्यवान......... त्याचंही तसंच झालं."

ती काय समजायचं ती समजली. तशी ती म्हणाली,

"आता राहू द्या तुमची भाकडकथा. माझं आधीच त्याच्या येण्यानं डोकं तापलंय. ह्या डोक्याला शांत होवू द्या."

तो शांत बसला होता. तशी तिही शांतच होती. रात्रीचं दोघांनी जेवन केलं. तसा निर्दोष आज थकल्यानं लवकर झोपला. पण तिला झोप येत नव्हती. गणपतन तुरुंग भोगलं. यातनाही भोगल्या. माफीही मागितली. तरी आताही तिच्या मनात अत्याचाराची अग्नी अजूनही ज्वाला बनत होती. रात्रभर तेच ते विचार तिच्या मनात घोळत होते. नव्हे तर माफ करावे हा निर्दोषचा सल्लाही तिला बेचैन करीत होता.

दिवसेंदिवस तिची चिंता वाढत चालली होती. तेच ते विचार मनात घोळत होते. तिला अन्न गोड लागत नव्हतं. हालत घसरत चालली होती. काय करावे हे निर्दोषला समजत नव्हते. ही ढासळत चाललेली कांती कशामुळे ढासळत चालली हेही समजायला मार्ग नव्हता. त्यानं या संदर्भात कित्येकदा डॉक्टरांचे सल्ले घेतले. पण कोणताच पर्याय शिल्लक नव्हता. तिही आपल्या अंतर्मनातील गोष्टी सांगत नव्हती. सदैव तिला एकच गोष्ट आठवत होती माफी. ती माफी तिनं दिली नसल्यानं तिची ही अवस्था. त्यामुळं तिची प्रकृती दिवसेंदिवस खालावत चालली होती.

एकदा त्यानं तिला डॉक्टरकडे दाखवलं. डॉक्टर म्हणाले की तिला कोणत्यातरी गोष्टीचा जबर धक्का बसलेला आहे. हा धक्का कोणता हे त्यालाही माहित होता. त्यावर तोही काही करु शकत नव्हता. तिच्यासाठी वाट्टेल ते करायची इच्छा त्याची. त्याचसाठी त्यानं लग्न केलं होतं, तिली आधार व्हावा म्हणून. कारण तो तिच्याचसाठी जगत होता.

कोमल अंथरुणावर खिळली होती. तिला वाटत होतं की ती शेवटची घटिका मोजतेय. हे निर्दोषला माहित होते. तसा निर्दोष तिच्याजवळ गेला. म्हणाला,

"काय झालं तुला? डॉक्टरची औषधं काम करीत नाहीत. तुझा आजार कळत नाही. निदान काय झालं हे मला तरी सांगशील का? "

"हे बघा, मला नाही वाटत की मी जास्त काळ जगेन. मात्र माझीही एक इच्छा आहे.. ती तुम्ही पुर्ण करा."

तो आल्यापासून  तिनं आजपर्यंत कोणत्याही गोष्टी निर्दोषला सांगितल्या नव्हत्या. पण आता ती नव्या उमेदीनं सांगणार होती.

"कोणती इच्छा? " तो म्हणाला. कारण त्यानं सुरुवातीपासूनच तिच्या इच्छा पुर्ण केल्या होत्या. म्हणून त्यानं विचारलं.

"मला गणपतची माफी मागायची आहे व त्याला माफ करायचं आहे. पण तुम्ही माझी त्याचेशी भेट घालून द्याल."

"ठीक आहे. केव्हा चालतेस त्यांच्याकडे."

"मी तसं चालू शकणार नाही. तुम्हीच आणलं तर बरं होईल."

"का नाही चालू शकत. आपण फोर व्हिलरनं जावू."

"नाही. मी इथं सुरक्षीत आहे. तुम्हीच आणा त्याला."

"ठीक आहे तू म्हणशील तसं."

दुसरा दिवस उजाडला. निर्दोष बाईकनं निघाला व शोधत शोधत गणपतच्या घरी पोहोचला. दरवाजा लावला होता. घर पडलेलं होतं.. जणू ते कुटुंब दुसरीकडं गेलंय असं वाटत होतं. त्यानं आजूबाजूला विचारलं माहिती मिळाली की ते कामाला जातात. मुलं शाळेत जातात.

तो वाट पाहात बसला त्याची. कारण त्याला वाचवायचे होते आपल्या प्रिय सखीला. जी बऱ्याच वर्षीच्या दिर्घ प्रतिक्षेनंतर भेटली होती.

सायंकाळ झाली. तसे ते जोडपे उशीराने का होईना, कामावरुन आले. दारात एक बाईक उभी होती. पारावर एक समवयस्क माणूस बसला होता. हा आपल्याच घरचा पाहुणा असेल याचा विचार करुन त्यानं नमस्कार केला व विचारलं,

"कोण आपण? "

"मी निर्दोष."

"निर्दोष कोण? "

"कोमलचा पती."

"कोमल कोण."

"तुमची पहिली पत्नी."

"कशी आहे कोमल? "

"शेवटची घटका मोजतेय."

"का बरं? "

"माहित नाही. पण तिची शेवटची इच्छा आहे म्हणे की तुम्ही तिला भेटावं. तिला माफी मागायची तुमची."

"माझी! माझी कशाला? "

"माहित नाही."

"बरं ठीक आहे. जावू सकाळी."

"ती अंथरुणावर आहे."

"बापरे एवढी हालत."

"होय. मला निघायला हवं तुम्हाला घेवून."

"ठीक आहे. मी बैलं बांधतो. चारा टाकतो. मग निघू."

त्यानं बैलं बांधले. त्यांना चारा टाकला आणि पत्नीची परवानगी घेवून तो कोमलला भेटायला निघाला त्या रात्रीच्या अंधारात.

गाडी भरधाव वेगाने चालत होती. रात्रीचा गारवा मनाचा वेध घेत होता....... आजुबाजुला शेते पसरली होती. सुर्य आकाशात गडप झाला होता. चंद्राचा शितल प्रकाश पडला होता. तसा गणपत म्हणाला,

"गाडी थोडी हळू चालवा. रात्रीची वेळ आहे."

निर्दोषनं मान हलवली. तसं त्यानं आपल्या बाईकची धाव कमी केली.

रात्रीचे बारा वाजले होते. भुक खुप लागली होती. तसा गणपत फार थकला होता. दिवसभर त्यानं शेतात काम केलं होतं. तसा तो म्हणाला,

"साहेब, नाश्ता करुया का? "

निर्दोषनं याही वेळी मानच हलवली.. पुढे ढाबा होता. त्या ठिकाणी गाडी थांबवली व ते नाश्त्याऐवजी जेवन करु लागले. कारण गाव थोडं दुरच होतं.

पहाट झाली होती. तसं गाव आलं. पक्ष्यांचा किलबिलाट ऐकू येत होता. तसं घर आलं. दिवस उजाडला होता. तसे चौकीदार उठले होते. तसा तो चौकीदाराला म्हणाला,

"कोमल उठली का? कशी आहे तब्येत? "

"नाय जी. माहित नाय."

तसा तो आत गेला. त्याच्या मनात चिंतेचे वादळ उठले होते. तो कोमलच्या कमऱ्यात गेला. कोमल मात्र झोपली होती. तसा तो म्हणाला,

"कोमल उठ. बघ कोण आलंय."

अंथरुणातून कोणताच आवाज आला नाही. बहुतेक ती गाढ झोपेत आहे असं वाटून पुन्हा निर्दोष म्हणाला,

"कोमल उठ, कोण आलंय. तुच सांगितलं ना की मला माफी मागायची आहे. तुम्ही गणपतरावांना आणा. मी आणलंय. उठ."

कोमल उठली नाही. तिला मोठ्याने आवाज दिला तरीही. शेवटी तिला अंथरुणावर हालवून पाहिलं. पण काहीच प्रतिसाद नव्हता. शिवाय अंथरुणावर कोणतीच हालचाल दिसत नव्हती.

निर्दोष खाली बसला. त्यानं तिचं पांघरुण काढलं. कपाळावर हात ठेवला. कपाळ थंड पडलं होतं. अंग गार पडलं होतं.

त्याला पुष्टी झाली होती. ती जग सोडून गेला. तरीही तो तिला गदागदा हालवत होता. उठ उठ म्हणत होता. तसा तो रडायला लागला. त्याला अश्रू आवरता आवरेना.

तसा तो म्हणाला,

"कोमल, मी तुझ्या जीवनातल्या एवढ्या इच्छा पुर्ण केल्या. मात्र ही इच्छा पुर्ण करु शकले नाही."

पाठीवर हात ठेवत गणपत म्हणाला,

"मित्रा, धीर धर. तिचं जगणं एवढ्याच काळाचं समज. पण एक दुःख माझ्याही मनात राहिल. का तिची इच्छा मी पुर्ण करु शकलो नाही. कदाचित तिला वाटत असेल की गणपत माझ्या मयतीला यावा म्हणून तिनं तुमच्या रुपानं मला संदेश पाठवला होता.

त्या दोघांच्या रडण्याचा टाहो ऐकून खाली उभी असलेली मंडळी वर आली. त्यांच्याही डोळ्यांना अश्रू होते. कारण मायेचं प्रेम दिलं होतं तिनं सर्वांना. त्यांना सांभाळलं होतं. स्वतःच्या परीस्थितीवर मात करीत ती संकटाशी लढली होती आपल्या परीस्थितीची जाणीव ठेवून.

मैयत उरकली होती. तसा सायंकाळी निर्दोष गणपतला म्हणाला,

"बहुतेक तिची शेवटची घटिका आली असेल म्हणूनच तिनं मला तुम्हाला आणायला पाठवलं. पण ती त्याबद्दल बोलली नाही. पण मला ती गंमत करीत असेल असं वाटलं. निदान काही तास जगली असती तर तिला माफीही मागता आली असती. नव्हे तर माफही करता आलं असतं. पण मी काय करु गणपतराव. मी हिच्या ऋणात राहिलो. ही शेवटली इच्छा मी केव्हा पुर्ण करणार ही खंत राहिली माझ्या मनात. ते भाग्य केव्हा लाभेल ते कळत नाही."

हा संसाराचा सारीपाट. होटल सांभाळणं, नोकरी सांभाळणं, नव्हे तर आता पोरीला सांभाळणं. तसंच तिचं शिक्षण ह्या सगळ्या गोष्टी. कसं करेल मी. तो विचार करु लागला. तसा पाठीवरुन हात फिरवत व सांत्वना देत गणपत म्हणाला,

"हे नशिबाचे भोग आहेत मित्रा, ती वर बसलेली शक्ती आहे ना. ती आपल्याकडून जे नाही करायचं ते करवून घेते. मलाही त्या नियतीनच बदलवलं. अरे मित्रा धीर सोडू नकोस.

तुझ्याही मागं एक लेकरु आहे. त्या लेकराकडे पाहा. तुला तिच्यातच तुझी कोमल दिसेल. लहानग्या कोमलकडे पाहून जग. कोमल जर तुझं विश्व असेल, तर ते लहानगं लेकरुही तुझं विश्व आहे. जसं त्या कोमलला तू दुःख दिलं नाही. तसंच या लहानग्या लेकरालाही तू दुःख देवू नकोस. बघ मी अडाणी होतो. माझी भाषाही अडाणीच. मी हाकललं तर खरं त्या कोमलला. पण त्या कोमलच्या निघून गेल्यानंतर तिची आठवण यायची. पण नियतीनंच डाव साधला. ती कोमल शुद्ध बोलायची. मग मीही सुधारण्याचा प्रयत्न केला. मी सुधारलो. माझी भाषा सुधरवली. केवळ तिच्याचसाठी. आज सगळं आठवतं.

मित्रा, विधीलिखीत टळत नाही. आपण दोष दुसऱ्याला देतो. त्यांच्याचमुळं घडलं म्हणतो. पण तसं नसतं. ते आधीच असतं नशिबात लिहिलेलं. ते घडल्याशिवाय चुकत नाही. ती चांगली वागत होती. माझ्या घरी. पण विधीलिखीत प्रारब्ध असल्यानं मी हातात असूनही चांगला वागू शकलो नाही. ते सगळं आठवतंय मला."

"हो मित्रा, मला कळतंय सगळं. मला आता कोमलसाठी नाही, पण माझ्या या लहानग्या बाळासाठी निदान मला जगावंच लागेल. काही काळासाठी तरी. हिंमत न हारता. तिच्या इच्छा आकांक्षाही मलाच पुर्ण कराव्या लागतील. एक बाप असलो तरी आता एक माय म्हणूनही मला हिचं आयुष्य घडवावं लागेल. मनात किंतू परंतू न ठेवता."

तिसरा दिवस थाटात पार पडला. ती रात्र काळरात्र ठरली. तसाच दुसरा दिवस उजाडला. नवीन अंकूर घेवून. नवीन सुरुवात करायला.

"बरं मी निघतो मित्रा." गणपत म्हणाला.

"अजून एक दोन दिवस थांब. मला बरं वाटेल."

"ठीक आहे."तो म्हणाला. तसा तो दोन दिवस थांबला. तसा दोन दिवसानंतर निर्दोषचा निरोप घेऊन तो निघाला. येत राहण्याचं आश्वासन देऊन.

कोमलचं देहावसान झालं होतं. तिच्या जाण्यानं एक नवी जबाबदारी निर्दोषवर आली होती. तो काम करीत होता. होटलही सांभाळत होता. त्याचबरोबर पोरीलाही. फार कठीण जात होतं ते. त्यामुळे की काय, आता त्यानं नोकरी सोडून दिली होती. आता तो होटल व मुलगी एवढंच तो सांभाळत होता. काही दिवसानं तोही मरण पावला. कोमलची हाय खावून. पण मरतांना त्यानं आपल्या मुलीची जबाबदारी गणपतच्या अंगावर टाकली होती.

गणपतलाही पत्नी होती. आलिशा कोमल आणि निर्दोषची मुलगी आहे हे तिला माहित होतं. पण तरीही तिनं दुजाभाव न करता आलिशाला सांभाळलं. तिला आईची आठवण येवू दिली नाही. त्याचबरोबर गणपतनंही. गणपतही म्हातारा होता. आलिशा मोठी झाली होती. अगदी दिसायला ती कोमलसारखीच दिसत होती. तिचे हावभावही कोमलसारखेच होते. तिला लहानाचे मोठे करण्यात त्यानं आपल्या उतरत्या आयुष्याचा अनमोल वेळ दिला होता.

जेव्हा जेव्हा त्याला कोमलची आठवण येत असे. तेव्हा तेव्हा तो त्या मुलीला पाहात असे. त्या मुलीतच कोमल असल्याचा भास होत असे त्याला. तिच्याशी तासनतास बोलतांना वेळ कसा जायचा ते कळायचं नाही.

आलिशा लहानाची मोठी झाली होती. पण ज्याप्रमाणे कोमलला आईबापानं वाढवलं होतं. त्याप्रमाणे या आलिशाला मायबापाचं प्रेम मिळालं नाही. पण गणपतनं तिला आपली मुलगी समजूनच वाढवलं. तिला मायबापाचा अधूरेपणा जाणवू दिला नाही. मायचं रितेपण त्यानं स्वतःच माय बनून पुर्ण केलं. तिच्यात संस्कार भरला. लहानपणी तिची अंघोळ करणं, केसं विंचरणं एवढंच नाही तर तिचा डबा पुस्तकं भरुन देणं सारी कामं एक बाप म्हणून पुर्ण करतांना नाकीनव यायचं. तरीही ते सगळं सहन करुन गणपत तिच्या शिकवणी वर्गाचंही शुल्क भरत असे.

आज आलिशा शिकली होती. तिला बापमाय आवडत होते. पण त्याहीपेक्षा आवडत होता तो बाप. ज्यानं आपल्या पोरांना तर प्रेम दिलंच होतं. पण त्याचबरोबर आलिशालाही. पण

गणपत नेमका कोण हे मात्र तिला अजूनही माहित नव्हतं. कारण त्यानं कधीच ती कोमल व निर्दोषची मुलगी आहे हा दुजाभाव दाखवला नाही. स्वतःच्या मुलासमान तिचं कर्तृत्व फुलवलं.

त्यालाही दोन मुलं होती. त्यांचं लग्न झालं होतं. ती आपल्या पत्नीसमवेत दुसरीकड राहायला गेली होती. त्यांनी आपला वेगळा संसार थाटला होता.

मायबाप मेले तेव्हा आलिशा लहान होती. जशी ती मोठी झाली. तसं गणपतनं तिचा विवाह एका मुलाशी लावून दिला. ती सासरी गेली. ती सासरी रमली. तिच्या मनात सासरचे प्रेम निर्माण झाले. कधीकधी ती सासरहून माहेरी येत असे. दोनचार दिवस ती रमत असे. माहेरचा गोडवा तिला सासरपेक्षाही मोठा वाटत होता. त्यात साखरेची गोडी होती. पण जेव्हा ती माहेरी जात असे, तेव्हा तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडं गणपत टक लावून पाहात असे. तिचा माहेरी परत येण्याचा विचार करीत. कधीकधी न कळत त्याच्या डोळ्यातून अश्रू तरळत आणि कोमलची आठवण येई. तसे क्षणातच शब्द फुटत असत. 'कोमल माझीही इच्छा पुर्ण झाली. तुझीही इच्छा पुर्ण झाली' तद्वतच तो हुंदके देत रडत असे. तेव्हा पाठीमागून त्याची पत्नी खांद्यावर हात ठेवत असे. तेव्हा असं वाटायचं की कोमलच जणू त्याला स्पर्श करीत आहे.

# अत्त दीप भव

हल्ली मराठी साहित्याचा आणि वाचनाचा विषय निघाला की अनेक ठिकाणी निराशेचा सूर निघतो. एकीकडे नवीन चांगली पुस्तके निघतच नाहीत असे म्हणतात आणि दुसरीकडे मराठी तरूण वाचतच नाही असेही म्हणतात. परंतू आमचा अनुभव थोडा वेगळा आहे. मराठीत सध्य अत्यंत जानदार लेखन जन्म घेत आहे. नवनवीन विषय व नव्या नव्या जनविभागांचे आयुष्य नवीन साहित्यात येत आहे. ग्रामीण तरूण लेखक लिहीत आहेत. तर परदेशातील मराठी युवकही लिहीत आहेत. आणि त्यांचे लेखन ते स्वतःच इंटरनेटवर, फ़ेसबुक, ब्लॉग इत्यादी मार्गांनी प्रकाशितही करत आहेत. त्यांना वाचकवर्गही भरपूर मिळतो आहे. नाविन्याच्या शोधातला नवयुवक हे सर्व वाचतो आहे. भले नेहमीच्या रुळलेल्या प्रकाशन व्यवसायातून हे होत नसेल पण जे काही घडत आहे ते जोमदार आहे, ताकदीचे आहे. आणि या ताकदीच्या लेखनाला प्रकाशात आणण्यासाठी अनेक संस्था , नेटग्रुप्स, वेबसाइट्स झटून काम करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यापैकी एक संस्था आहे. सुमारे ५ लाख नोंदित सभासद आणि त्याशिवाय रोज वेबसाइटवर किंवा Whatsapp द्वारे पुस्तके मिळवून वाचणारे लाखॊ वाचक या संस्थेला लाभले आहेत. त्याचबरोबर कसलीही अपेक्षा न ठेवता साहित्याची सेवा करणारे अनेक कर्मयोगी लेखकही या संस्थेला जोडले जात आहेत.

मराठी साहित्य बहरेल याची आम्हाला खात्री आहे आणि त्याला आपलाही थोडा हातभार लागेल याचा अभिमान. आपणही या अभियानात सामिल व्हा. ई साहित्यच्या साइटला नियमित भेट देत रहा. आपल्या आप्त मित्रांना आणि मैत्रीणींनाही या अभियानात जोडून घ्या.

मराठी साहित्यात एक नवे पान जोडूया.

ई साहित्य प्रतिष्ठान